म. ग्रं. सं. ठाणे
विषय कु-५।५१
सं. क्र. ६०४

REFBK-0023511

REFBK-0023511

६२४
२३५९९
२४/४/८२

REFBK 0023511
REFBK-0023511

# जगप्रवास शोध आणि बोध

वा.वा. गोखले

प्रपंच प्रकाशन

प्रपंच प्रकाशन १२८

**प्रकाशक :**

माधव रा. कानिटकर
१९४५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०

**मुद्रक :**

दिनेश शं. चंदेल
चंदेल प्रिंटिंग प्रेस
१४८२, शुक्रवार,
पुणे ४११ ००२

© **वासुदेव वामन गोखले**
८० मित्र मंडळ कॉलनी,
पर्वती, पुणे ४११ ००९

**मुखपृष्ठ** : शिवाजी कांबळे

**आवृत्ती पहिली** : १५ मार्च १९८२

**मूल्य वीस रुपये**

# प्रवासाला निघण्यापूर्वी

प्रत्येक गोष्टीला वेळ यावी लागते. विलायतेला जाण्याकरता चाळीस वर्षं प्रतीक्षा करावी लागली. तसंच ह्या प्रवास वर्णनालाही. पहिला प्रवास घडला १९७६ साली आणि त्या प्रवासाचं वर्णन प्रसिद्ध होण्याची वेळ आज सहा वर्षांनी आली. कोणी यालाच नियतीचा खेळ म्हणतात, कोणी योगायोग म्हणतात. वेळ यावी लागते हेच खरं.

त्याचं असं झालं. 'माणसाच्या शोधात' मी जे परिभ्रमण केलं ते इतकं रोमहर्षक, प्रसंगी चित्तथरारक आणि गमतीचं होतं की ते ऐकून माझे आप्त व इष्टमित्र भारावून गेले, पुनः पुनः ऐकण्याची उत्सुकता दाखवू लागले. म्हणून त्यांच्या समाधानाकरता, ध्यानीमनी नसताना मी आठ दिवसात, एकटाकी, माझं मुंबई सोडल्यापासून परत येईपर्यंतचं प्रवास वर्णन लिहून टाकलं ते छापील दीडशे पानी झालं !

मला आलेले अनुभव, इंग्लंड अमेरिकेत मी जोडलेल्या असंख्य मित्रांचं पराकोटीचं आगतस्वागत आणि मी पाहिलेल्या आणि अनुभवलेल्या अनेक किश्श्यांवर माझ्या खुद्द पत्नीचाच विश्वास बसेना. म्हणून गेल्या वर्षी म्हणजे ऑगस्ट १९८१ मध्ये आम्ही उभयतांनी पूर्वेकडे तोंड करून जगाच्या प्रवासास आरंभ केला आणि ऑक्टोबर अखेर पश्चिमेकडील प्रवास पूर्ण करून आम्ही मायदेशी परत आलो. मी पूर्वी पाहिलेलं जग, तेथील मित्रांचं आगत्य हे पाहून, अनुभवून सौभाग्यवतीही चकित झाली आणि मी लिहिलेल्या प्रवासवर्णनाचा पडताळा तिला प्रत्यक्षच घेता आला.

माझ्या वाचकमित्रांना मी जरी प्रत्यक्ष घेऊन जाणार नसलो तरी ह्या पुस्तकाच्या माध्यमानं मी त्यांना घरबसल्या जगप्रवास, अगदी विमानात बसल्यापासून पुन्हा परत उतरेपर्यंत, एक झंझावाती दौरा घडविणार आहे. अनेक देश, नानाविध माणसं, असंख्य रम्य ठिकाणं, विज्ञानशास्त्रानं घडविलेल्या अनेक किमया, अंतराळ उड्डाणा-पर्यंतच्या, आणि अगणित गमती जमतीची पोतडी मी आपणापुढे

उघडी करून ठेवणार आहे. मी काहीशा धाडसानं, अमाप खर्च करून मळलेल्या वाटेनं न जाता जे पाहिलं, अनुभवलं ते प्रसंग आपण घर-बसल्या पहाल, अनुभवाल आणि त्याचा आनंद लुटाल, याबद्दल मला तिळमात्र शंका नाही. आजच्या जेटच्या युगात आणि कॅसेटच्या जमान्यात अशा प्रकारे जगप्रवासही ' आला अपुल्या दारी ! '

गेल्या महिन्यात सपत्नीक जगाचा प्रवास करून आल्यावर योगायोगानं "प्रपंच प्रकाशनचे श्री. माधव कानिटकर यांची काही काव्यं छापण्यासंबंधी गाठभेट झाली. बोलण्याच्या ओघात मी एका काळी प्रवासवर्णन लिहिल्याचं त्यांना सांगितल्यावर त्यांनी ते मागून घेतलं, वाचलं आणि ताबडतोब छापण्यास घेण्याचा निर्णय घेतला. ते पुन: वाचून शुद्ध अशुद्ध बघण्याचीही उसंत मला मिळाली नाही. मराठी भाषा व्याकरण शुद्ध शिकण्याची मला कधी संधीच मिळाली नाही. खरं तर प्राथमिक शाळेच्या चार इयत्तेपर्यंत मराठीशी माझा संबंध आला तेवढाच. त्यानंतरचं सर्व शिक्षण इंग्रजीत झालं, त्यामुळे मराठीतून लिहिण्याचा हा पहिलाच प्रसंग ! चूक भूल द्यावी घ्यावी. शेवटी भाषा अर्थवाहिनी असली म्हणजे झालं.

पूर्वेकडील प्रवास दुसऱ्यावेळचा आहे म्हणून सिंगापूर, हाँगकाँग, टोकियो संबंधी मजकूर पहिल्या लिखाणात नव्हता तो छापताना योग्य ठिकाणी घालण्यात आला आहे. तथापि, कोठे जोड दिल्या-सारखे वाटल्यास तो दोष माझा आहे.

आरंभी लिहिल्याप्रमाणे हे पुस्तक प्रसिद्ध होण्याची 'वेळ' प्रपंच प्रकाशनाचे श्री. माधवराव कानिटकर यांनी अचूक हेरली. किंबहुना त्यांच्या प्रोत्साहनामुळेच हे पुस्तक एवढ्या तातडीनं छापलं गेलं. तसेच, चंदेल प्रिंटिंग प्रेसचे मालक श्री. दिनेश चंदेल ह्यांनी तेवढ्याच तत्परतेनं सुबक छपाई करून दिली आणि उदयोन्मुख चित्रकार श्री. शिवाजी कांबळे ह्यांनी आकर्षक व समर्पक मुखपृष्ठ मोठ्या हौशीनं ताबडतोब करून दिले ह्याबद्दल मी त्या सर्वांचा ऋणी आहे.

पुणे, दि. १ मार्च १९८२ **वा. वा. गोखले**

६२४
२३५९९...
भूप्रवास २३/७/९२

# जगप्रवास शोध आणि बोध

विलायत म्हटलं की एका काळी तरुणांच्या मनात अनेक विचारतरंग उठत असत. ज्यांनी आपल्या देशावर १५० वर्षांहून अधिक राज्य केलं, किंबहुना, ज्यांनी जगाचा निम्म्याहून अधिक देश आपल्या अधिपत्याखाली ठेवला, ज्यांच्या राज्यावर सूर्य कधीच मावळत नाही असं म्हटलं जात असे, अशा या गोऱ्यासाहेबांचा देश पाहण्याचे कुतूहल तर असेच पण त्याहून अधिक सुप्त आकांक्षा असे की विलायतेत जाऊन खूप शिकावं. फॉरीन रिटर्न म्हणून मानाने आपल्या देशात यावं आणि मोठ्या हुद्याची नोकरी मिळवावी किंवा बॅरिस्टर अथवा डॉक्टर म्हणून यावं आणि आपल्या देशात प्रतिष्ठेचा व्यवसाय करावा. ह्यात वावगं काहीच नव्हतं. प्रत्येक महत्त्वाकांक्षी तरुणाला पारतंत्र्याच्या काळात तरी निदान असं विलायती पदवीचं शेपूट लावल्याशिवाय चांगली नोकरी मिळणं दुरापास्त होतं.

पदवी घेतल्यावर १५ दिवसांत बँकेत नोकरी मिळाली. पदवी परीक्षेत उत्तम गुण मिळालेले, चाचणी परीक्षेतही पहिला नंबर मिळालेला. पण पगार किती म्हणाल तर मोजून एकूण पन्नास रुपये पंधरा आणे फक्त; पगाराच्या तक्त्यावर लावलेल्या एक आणा तिकीटाला दिल्यावर! दिवसभर म्हणजे ९ ते ६ गोऱ्या साहेबांच्या हाताखाली मरमर काम कमी पडे म्हणून बहुधा रोजच एक दोन तास जास्त काम करावे लागे. त्याकाळी ओव्हरटाईम वगैरे शब्द इंग्रजी डिक्शनरीत नव्हते. बँकेचे क्लार्क हे कर्मचारी झाले आणि त्यांनी युनियन वगैरे गिरणगावातले शब्द थेट साहेबांच्या कचेऱ्यापर्यंत नेले ते नंतर. अशा लज्जास्पद नोकरीत मन भडकून उठे. वाटे, हे काही खरं नाही.

# विलायतेचे वेध

आपण विलायतेला जावं, तेथे एकादी पदवी मिळवावी म्हणून अंतःकरण आक्रोश करून उठे. साता समुद्रापलीकडे जाण्याकरता लागणारा खर्च कोठून आणा-वयाचा हा विचार मनातले विचार मनातच गोठवून टाकी. तरीही हा विलायतेचा ध्यास काही मनातून झटकून टाकता येईना. नोकरी करीत असताना मधल्या सुट्टीत बहुधा मी रोजच बलार्डपिअरवर लागणाऱ्या विलायतच्या बोटी बघण्यात घालवी. पी. एन्ड. ओ. च्या त्या सुंदर आगबोटी, त्यातून उतरणारे गोरे साहेब आणि त्यांच्या मडमा, सामान उतरवून घेणारे ते लाल डगलेवाले हमाल, ते पांढरेशुभ्र कपडे घातलेले बोटीचे अधिकारी आणि खलाशी आणि त्यांच्या गर्दीतून वाट काढीत हात उंचावून हास्यवदनानं डेकवरून उतरणारा एकादा भारतीय तरुण. हे लोभस दृश्य माझ्या डोळ्यांत सतत तरळत राही, बेचैनी आणखी वाढवी आणि विलायतेला जाण्याचा माझा निश्चय अधिक दृढ करी.

पण तो योग कधीच जुळून आला नाही. हिटलरच्या गर्जनांनी सारं जग हादरून गेलं. युद्धाचा वणवा केव्हा पेटेल ह्या भीतीने जगाचे डोळे हिटलरच्या हालचालींवर केन्द्रीत झाले आणि बोलता बोलता युरोपभर युद्धाच्या ज्वाला पसरल्या. ह्या युद्धाच्या आगीत माझ्या मनातील विलायतला जाण्याच्या सुप्त आशा-आकांक्षा केव्हाच पार जळून गेल्या. मनात रचलेले मनोरे हिटलरच्या तोफखान्यांनी जमीनदोस्त झाले. पुढल्या चार-पाच वर्षांत युद्धाच्या ज्वालांनी सर्व जग ग्रासलं गेलं. जीत कोण आणि पराजीत कोण ह्याचा हिशोब करण्याचेही त्राण कोणत्याही राष्ट्राला राहिलं नाही.

त्यानंतर पुढे ३० वर्षे म्हणजे आतापर्यंत नोकरी व्यवसायात एवढा गढून गेलो की प्रवास करण्याचा विचार करण्यासही उसंत मिळाली नाही. मग प्रवास प्रत्यक्ष करणं दूरच. मुंबईपासून पुण्यास अधून मधून ज्या काही वाऱ्या झाल्या असतील तीच काय ती माझ्या प्रवासखाती जमेची बाजू. नाही म्हणायला एकदा दिल्ली, दोनदा इंदूर व ग्वाल्हेरचा प्रवास घडला, नाही असं नाही. पण तोही काहीतरी निमित्तानं. वळकटी, तांब्या घेऊन मुद्दाम प्रवासाकरता घेतलेले बूट आणि गरम सूट अंगावर चढवून आम्ही काश्मीरच्या ट्रीपला चाललो अशी दवंडी पिटीत मजा करावयास जाणाऱ्या माझ्या शेजारच्या माणसांचा मला नेहमी हेवा वाटत असे.

म्हणून यंदा ' समरमध्ये विलायतला जावं असं म्हणतो ' संध्याकाळच्या गाडीनं पुण्यास जात आहे म्हणावं तितक्या सहजतेने मी माझ्या मित्रांना म्हणालो तेव्हा ते उडालेच ! तेच कशाला, माझा मीच चक्रावलो. कारण मी तरी कोठे सिरीयसली

विचार केला होता ? मनात इच्छा झाली हे खरं. पण ती आपण नेहमीच कृतीत उतरवतो थोडीच ! चार दिवस त्या हवेत तरंगावयाचं आणि काही-तरी निमित्त सापडवून ते विचार मनातून झटकून टाकावयाचे हा आता-पर्यंतचा शिरस्ता. पण ह्यावेळी ह्या इच्छेचा जबर अॅटॅक आला होता. रोगाचं कारण म्हणाल तर कधी नव्हे ते मनस्वास्थ्य लाभलं होतं. काही म्हणता काही काम केलंच पाहिजे अशी सक्ती राहिली नव्हती. मी व्यवसायातून जवळ जवळ निवृत्त होऊन २–३ वर्षे झाली होती. सामाजिक संस्थेची अंगावर घेतलेली कामं कधीच पुरी न होणारी, म्हणून थोड्या दिवसांकरता त्यांचीही सुट्टी घेतली. माझे मित्र भेटले की विचारीत ' कधी निघणार ?' काहींच्या चेहऱ्यावर उत्सुकता दिसे, तर काही कुत्सितपणे विचारीत. त्यांची जिरवावयाची अशी मी ह्यावेळी भीष्म-प्रतिज्ञाच करून टाकली. माझं एक गुपित आहे. मला एखादी गोष्ट मनापासून व्हावी किंवा करावी असं वाटतं तेव्हा मी चार चौघांना सांगत सुटतो, मी अमुक करणार म्हणून. एकदा अशी आवई उठविली की मग मनात आलं तरी माघार घेता येत नाही. तानाजीचा ही ' युगत ' हा मी घेतलेला इतिहासाचा सर्वात मोठा धडा. आपणच दोर कापून माघारी फिरण्याचा रस्ता बंद केला की राहतं ' जिंकू किंवा मरू '. मित्रांच्या चौकशांच्या रेटचापुढे माझ्या निर्धारापासून माघार घेणं आता नामुष्कीचं होईल म्हणून मी प्रवासाच्या तयारीला लागलो आणि एका झटक्यात पासपोर्ट मिळविला.

आता सर्वांना वाटू लागलं, सर्वांना कशाला माझं मलाच वाटू लागलं, मी नक्की जाणार. आणि मग अनाहूत सल्ला देणारी मंडळी जमू लागली. कोणी म्हणे एकच सूट पुरे तर दुसरा म्हणे नाही, दोन तरी हवेत. कोणी म्हणे सुती कपडे जास्त घ्या, सध्या तिकडे ' समर ' आहे. पण ह्यात एका मित्रानं मोलाचा सल्ला दिला. तो म्हणाला, ' माझ्या हिचा भाचा नुकताच अमेरिकेहून आला. तो म्हणत होता पुढल्या वर्षी अमेरिकेला स्वातंत्र्याची दोनशे वर्षे पूर्ण होत आहेत, त्या निमि-त्तानं पुष्कळ सवलती जाहीर होणार आहेत. तेव्हा तुम्ही त्यावेळी जा. ' माझ्या मित्राचा हा सल्ला ' मतलब की बात ' वाटली. म्हणून चौकशी करण्यास सुरुवात केली. पण कोणतीही प्रवासकंपनी अथवा विमानकंपनी निश्चितपणे काहीच सांगू शकली नाही. शेवटी अमेरिकेतील मित्रांकडून खुलासा मागवावा म्हणून त्यांना पत्रे लिहिली. त्यांची उत्तरे आली, तीही मोघम, पण काहीतरी सवलती मिळतील हे नक्की अशा स्वरुपाची. एवीतेवी चार महिने ह्या भानगडीत निघून गेले होते म्हणून आणखी काही महिने थांबून ह्या द्विशतक वर्षी म्हणजे १९७६ मध्येच जावं अशा विचारानं मी माझं प्रयाण तूर्त ' पोस्टपोन ' केलं.

## माणसाच्या शोधात

आता मिळालेल्या अवधीचा उपयोग प्रवासाचा तपशील तयार करण्यात घालविण्याचे मी ठरविले. प्रथम कोणते देश पाहावयाचे हे नक्की केले. इंग्रज साहेबाचा देश इंग्लंड, राखेच्या ढिगाऱ्यातून पुन्हा डोकं वर काढणारी जर्मनी, विलासी पॅरीस, बड्या राष्ट्रांच्या कात्रीत सापडलेला बेल्जियम, उद्योगधंदा आणि दुग्ध व्यवसाय करून पुढे आलेला हॉलंड आणि डेन्मार्क हे युरोपमधील देश. त्यानंतर जगातील सर्वात समृद्ध देश अमेरिका आणि थोडाबहुत कॅनडा एवढी नावे निश्चित झाली. त्यानंतर ह्या देशांत काय पाहावयाचं ह्यासंबंधी माझा विचार आधीच पक्का झालेला होता. मला पुरातन चर्चेस्, पुरातन वाडे किंवा किल्ले, पाश्चात्य देशात जतन करून ठेवलेल्या महान नाटककार, साहित्यकार, शिल्पकार, लोकोत्तर नेते, इतिहासकालीन राजेरजवाडे त्यांची वसतीगृहे किंवा त्यांत असलेलं पुरातन वस्तुभांडार पाहण्यात रस नाही. आपल्याकडे इतिहासकालीन वास्तू थोड्या का आहेत ? दक्षिणेतील सुंदर देवळे मी अजून पाहिलेली नाहीत. एवढेच काय महाराष्ट्रातील दुर्दम्य कडेपठारांतील सिंहगड सोडून अजून एकही गड मी पाहिलेला नाही. मग मी चार्लस राजाचा किंवा दुसऱ्या एलिझाबेथ राणीचा महाल पाहाण्यास का जावे ? मला 'इंग्रज माणूस' पाहावयाचा आहे. तेथला हमाल (असला तर), बस ड्रायव्हर, पेपरविक्या, झाडूवाला, सलूनवाला, स्टेशन-मास्तरपासून शाळा मास्तरपर्यंत आणि लंडनच्या 'बॉबी 'पासून मुख्यमंत्र्यांपर्यंतची माणसं मला पाहावयाची आहेत. साहेबानं आमच्यावर १५० वर्षे राज्य केलं ते त्याचं कर्तृत्व की आमचा नादानपणा हे समजून घ्यावयाचं आहे. दुसऱ्या महायुद्धा-पूर्वी प्रथम क्रमांकाचं राष्ट्र असलेलं इंग्लंड आज चौथ्या पाचव्या क्रमांकावर का गेलं हे जवळून अभ्यासायचं आहे. त्यातून ते कशी वाट काढणार आहे हे अर्थ-शास्त्रीयदृष्ट्या तपासून पाहावयाचं आहे. अमेरिका हा संपन्न देश आपल्या समृद्धीच्या जोरावर केवळ ख्यालीखुशालीत राहता तरी त्यांना कोणी नावं ठेवण्याचं कारण नाही. परंतु आपल्या समृद्धीचा भौतिक प्रगती करून जगाला दिपवून टाकण्याकडे त्यांनी केलेला उपयोग हा जास्त मोलाचा. अविरत उद्योग करणारा हा अमेरिकन माणूस मला त्याच्या घरी बघावयाचा आहे. त्याच्या नेत्रदीपक संपन्नीनं डोळ्यांचं पारणं फिटेल, पण त्याच्या कर्तबगारीचं मूल्यमापन करण्यास त्याला प्रत्यक्षच भेटावयास हवं.

## मुक्त प्रवासाचे वेड

म्हणून मला प्रवासी कंपन्या आयोजित करतात तसल्या २१ दिवसांच्या किंवा ३१ दिवसांच्या बंदिस्त सफरीत सामील व्हावयाचे नव्हते. त्यांच्या पूर्व-नियोजित सफरीत खाण्यापिण्यासंबंधी, हॉटेलात राहण्यासंबंधी, विमान, बसच्या

'सुरक्षित' जागेसंबंधी सर्व जबाबदारी त्यांची असते. भटजी 'मम' म्हणा असे सांगतात त्याप्रमाणे त्यांनी 'बसा' म्हणा म्हटलं की बसमध्ये किंवा विमानात चढावयाचे. उतरा म्हटले की उतरावयाचे. ते दाखवतील ते बघावयाचे आणि प्रवास संपला की आपापल्या दिशेनं पांगावयाचं. असला मिळमिळीत प्रवास मला पसंत नाही. मला हवं असते थ्रील, काहीतरी सनसनाटी, काहीतरी जन्मभर आठवण काढावी असं आणि फक्त मुक्त प्रवास केल्यानेच ते मिळू शकतं. म्हणून थोडा धोका पत्करूनही हाच मार्ग मी स्वीकारला. अलिकडेच सर्व जगाचा प्रवास सपत्नीक करण्याचा पुन्हा योग आला. सिंगापूर, हाँगकाँग आणि टोकियो ह्या पूर्वेकडील देशात फिरून आम्ही टोकियोहून अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्याला पोहोचलो. ह्यावेळीही सर्व प्रवासाचे वेळापत्रक आमचे आम्हीच ठरविले. तेथील वास्तव्यात हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्थाही आम्ही तेथे पोहोचल्यावरच केली आणि परदेशी प्रवासाचे भरपूर 'थ्रिल' उपभोगले.

जुलैच्या पहिल्या आठवड्यात प्रस्थान ठेवावयाचं असं मी ठरवून टाकलं. हो! पुन्हा मागेपुढे व्हावयास नको. पण नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने म्हणतात तशी परिस्थिती निर्माण झाली. ज्या ओळखीच्या बाईंकडून मला आश्वासनपत्र (Sponsorship) येणार होतं ते काही केल्या येईना. शेवटी एक युक्ती फळाला आली. लंडनमध्ये स्थाईक झालेल्या काही मराठी मंडळींचे पत्ते मी मिळविले होते. त्यापैकी एका वसंत हरी जोशी नावाच्या गृहस्थांना मी दडपून पत्र लिहिलं. ओळखपाळख नसताना त्यांना मी मला हवं असलेलं पत्र पाठवण्याची आर्जवपूर्वक विनंती केली. आपणाकडून तसे पत्र आल्याशिवाय मला ब्रिटिश व्हिसा मिळणार नाही व केवळ व्हिसा मिळविण्यापुरतेच मला पत्र हवे आहे. माझा आर्थिक बोजा आपणावर पडणार नाही ह्याची त्यांना ग्वाही दिली आणि त्यांच्या पत्राची वाट पाहात राहिलो आणि काय आश्चर्य. त्यांचे तातडीनं पत्र आलं की मला हवे असलेले पत्र त्यांनी आधीच रवाना केलं आहे आणि ते माझ्या येण्याची वाट पाहात आहेत. निघण्यापूर्वी वेळ व दिवस कळवावा म्हणजे विमानतळावर घेण्यास येतो. पत्र एवढे अगत्याचे होते की माझा निकटचा नातेवाईक लंडनमध्ये गवसल्याच्या आनंदात मी माझे तिकीट काढण्यास एअर इंडियाच्या ऑफिसकडे धावलो.

हा माझ्या अद्भुत प्रवासाचा शुभारंभच म्हणायचा.

काही काळ आधीच फिरविल्यामुळे एअर इंडियाच्या ऑफिसमध्ये 'तिळा उघड' म्हणताच दासदासी हात जोडून समोर उभ्या राहाव्यात तसं तेथील कर्मचारी माझेपुढे हात जोडून उभे राहिले. जेथे मुंबई-न्यूयॉर्क-मुंबई ह्या तिकिटावर मध्ये कोठेही उतरता येणार नाही असं एकजात सर्व विमान कंपन्यांनी निक्षून सांगितलं होतं तेथे आता मोठा साहेब मला लंडनला आपल्याला पाहिजे तेवढे दिवस राहा सांगत होता. परतीच्या प्रवासातही पुन्हा कोठे उतरावयाचे आहे का

विचारीत होता ! आपण सांगाल त्याप्रमाणे आपली व्यवस्था होईल असं म्हणत होता. 'ब्रेक जर्नी' मिळत नाही म्हणून माझं लंडन-युरोप बारगळणार अशा विवंचनेत मी गेले कित्येक दिवस होतो आणि आता जादूची कांडी फिरावी तशी एकदम व्ही. आय. पी. ट्रीटमेंट. माझा माझ्यावरच विश्वास बसेना. पण ही 'हकिगत' आहे. कारण लंडनला उतरल्यावर मला तशीच आदबशीर वागणूक मिळाली आणि न्यूयॉर्कला तर मॅनेजरच दोस्त झाले, म्हणजे कमी अधिक वजनाचाही प्रश्न राहिला नाही !

## प्रस्थान ठेवले

'व्हिसा' इ. तांत्रिक गोष्टी सुदैवाने लवकर पार पडल्या व दि. १३ जुलै रोजी रात्री २–५५ वाजता एअर इंडियाच्या ७४७ जंबोजेट विमानानं आम्हांला घेऊन उड्डाण केलं. निरोप देण्यास आलेल्या मंडळींना बाहेरच ताटकळत उभं राहावं लागलं. हार घेऊन आलेल्या मित्रांचे हार त्यांच्या हातातच राहिले. कारण एकदा कस्टमच्या कक्षेत गेल्यावर ओझरते दर्शन देण्याकरतासुद्धा बाहेर डोकावता आले नाही. शेवटी वरच्या आगाशीत जमलेल्या मंडळींकडे पाहात अंधारात दिसले तेवढेच चेहरे आपल्या मंडळींचे समजून डोळ्यांत साठवून ठेवले आणि विमानाच्या पोटात शिरलो तो पुन्हा दोन महिने न दिसण्याकरता. क्षणात विमानानं आकाशात झेप घेतली आणि लुकलुकणाऱ्या दिव्यांत गाढ झोपी गेलेली ही सुंदर नगरी– क्षणार्धात दृष्टीआड झाली.

विमानाला हवाई जहाज म्हणतात ते नाव अगदी सार्थ आहे. जवळजवळ ४०० प्रवासी घेऊन जाणाऱ्या ह्या अजस्त्र विमानात आणि शेकडो प्रवासी दाटीदाटीनं घेऊन जाणाऱ्या 'सेंट अॅन्थोनी' किंवा 'रत्नाकर' बोटीत तसा फारसा फरक नाही. जंबोमधल्या प्रवाशांना 'हवाई सुंदरी' आपआपल्या खुर्चीवर नेऊन बसविते. त्यांना 'पेटी' बांधण्यास मदत करते. अधूनमधून खाऊपिऊ घालते आणि शिवाय इकडून तिकडे अंगविक्षेप करीत नाचून त्यांची भरपूर करमणूकही करते. कोकणच्या बोटीचा प्रवासी डेकवर मिळेल तेथे आणि तेवढी जागा आपलं कांबळं हातरून अडवितो. उशागती ट्रंक वळकटी ठेवतो आणि पडल्या पडल्या 'ल्याडीस' खेळतो. विमानात रविशंकरची सतार किंवा लताचं गाणं (पैसे देऊन) ऐकण्याची सोय असते तर बोटीवर चहा गरम, बटाटा वडा, शंकरपाळी विकणारी पोरं डोकं उठवतात. बोटीत कसं अघळपघळ बसावं. अघळपघळ गप्पा माराव्यात. सगळ्यांच्या संमिश्र आवाजाची कशी छान 'हार्मनी' धून तयार होते. तशात आजकाल बाणकोटचा रामादेखील गळ्यात ट्रान्झिस्टर अडकवून लोकांना फुकट 'एक कमरे में बंद' ऐकवितो. ही मजा विमानात नाही. जो तो आपल्याच 'ह्यात.' सगळे कसे काडे चिराईताचा काढा घेतल्यागत चेहरे केलेले. त्यांना बोलतं करायला तास दोन तास जावे लागतात.

आता विमानानं चांगली उंची गाठलेली असते. आता ते खऱ्या अर्थानं हवाई जहाज झालेलं असतं. ढगांच्या वर स्वार होऊन अलगद तरंगणारं. खिडक्यांवरील पडदे ओढून आणि दिवे मंद करून 'ठक्या' केव्हाच गडप झालेल्या असतात. 'मंडळी, आता निमूट झोपा,' असं सांगायला त्या विसरतात, म्हणून माझ्यासारखे काही प्रवासी उगीचच चुळबूळ करीत असतात. विमानाच्या आवाजानं एक छान ठेका धरलेला असतो आणि त्या संगीतानं केव्हा डोळा लागतो ते समजत नाही.

जाग येते तेव्हा पुन्हा 'हवाई सुंदऱ्या' इकडे तिकडे नाचताना दिसतात. खिडक्यांचे पडदे वर जातात आणि उगवत्या सूर्याचं दर्शन होतं. सकाळ झालेली असते. काही मंडळी टॉयलेटच्या दाराशी occupied ही पाटी पाहून रांग धरून उभे राहातात. काही शेटाण्या दोन दोन खुर्च्यांवर आडवारलेल्या असतात. त्या आता आळोखे पिळोखे देत उठतात. त्यांचे 'वर' शेटाणीचं ब्लँकेट-उशा गोळा करू लागतात. ब्रेकफास्टचे ट्रे सज्ज होतात. आणि 'सुदऱ्या' अधिक सुंदर दिसण्याकरता चेहऱ्याची रंगरंगोटी करू लागतात. थोड्याच वेळात हातात ट्रे घेऊन कसरत करीत फिरणाऱ्या 'सुंदरीं'मुळे पुन्हा चैतन्य येतं. मंडळी नास्ता करण्यात रममाण होतात. तेवढ्यात वैमानिक सांगतो 'आता सकाळचे आठ वाजले आहेत आणि आणखी १५ मिनिटांत आपण रोम विमानतळावर पोहोचू. मी माझ्या घड्याळात बघतो. त्यात १२ वाजलेले असतात. म्हणजे घड्याळ चार तास मागे करावयाला हवे. विमानाचा वेग मंदावतो. ते आता खाली खाली येऊ लागलेले असते. हळूहळू डोंगर, शेते दिसू लागतात. थोड्याच वेळात रस्ते दिसू लागतात. मोटारी हिंडताना दिसू लागतात. घरं दिसू लागतात, एका हारीनं उभी असलेली. रोमच्या पुरातन नगरीचं जवळून दर्शन होतं. विमानतळ दिसू लागतो आणि काही क्षणातच आम्ही रोमच्या जमिनीला टेकतो. एकच गडबड सुरू होते, शिड्या लावल्या जातात आणि ९।१० तास एकाच जागी बसलेले प्रवासी पाय मोकळे करण्याकरता खाली उतरतात. युरोपच्या भूमीवर पाय ठेवतात.

लंडन, न्यूयॉर्क वगैरे आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान थेट कॉरीडॉरला लावण्याची सोय आहे. त्यामुळे विमानातून सरळ गँगवेमधून चालत टर्मिनलपर्यंत जाता येतं. जमिनीवर उतरावे लागत नाही. पण रोमचा विमानतळ खूप मोठा असूनही तेथे ही सोय नाही. त्यामुळे विमानापासून टर्मिनलपर्यंत जाण्यास बसमधून जावे लागते. तेथे पोहोचल्यावर प्रथम 'जाच' होते. तुमच्या जवळ किंवा सामानात काही बंदूक-पिस्तुल वगैरे आहे का ह्याची! रोमचे पोलीस एक हात ट्रिगरवर ठेवूनच तुमची झडती घेतात. एका 'क्ष' किरण वर्तुळातून जावयास सांगतात आणि प्रवाशांना खूप घाबरवून सोडतात. आजकाल 'हायजॅकींग' वळावल्यामुळे ही कसून तपासणी आहे असे म्हणतात. पण पुन्हा म्हणून ह्या उतरण्याच्या भानगडीत पडाव-

याचे नाही असं ठरवून परत येताना मी अशा 'थांब्यावर' विमानाच्या बाहेर पाऊल टाकले नाही.

## जीवघेणी प्रसाधन सेवा !

आता विमानानं पुन्हा उड्डाण केलं आणि ते पॅरीसच्या दिशेनं जाऊ लागलं. टॉयलेटरूमच्या बाजूची गर्दी आता कमी झाली होती, तेव्हा आता 'उरकून' घ्यावं म्हणून मी टॉयलेटमध्ये शिरलो. साधारणत: सार्वजनिक टेलिफोन बूथपेक्षा थोडी मोठी खोली. त्यात गरम-थंड पाण्याचं हात धुवायचं भांडं, एक आरशाचं कपाट, त्यात सुवासिक द्रव्यांच्या अनेक बाटल्या आणि खाली इंग्रजी पद्धतीचा शौचकूप. आतापावेतो आपल्या देशी मंडळींनी त्याची रेल्वेच्या तिसऱ्या (नव्हे दुसऱ्या) डब्यातील शौच कुपापेक्षाही वाईट अवस्था करून ठेवली होती. नको तिथं घाण करून ठेवली होती. घाणेरडे कागद शौचकुपात कोंबून ते बंद करून ठेवले होते. नाही म्हणायला हात धुण्याच्या पात्रात 'तसली घाण' करून ठेवली नव्हती हे नशीब. कशीबशी दाढी करून घेतली. शौचाला तेथे बसण्याचा प्रश्नच नव्हता. तेव्हा निसर्गाची हाक तशीच पोटातल्या पोटात जिरविण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता. आता कळलं तेथे एवढ्या सुवासिक द्रव्याच्या बाटल्या कशाकरता ठेवल्या होत्या त्याची. एअर इंडियाच्या संयोजकतेचं कौतुक करावं तितकं थोडंच. विमानानं उड्डाण केलं की थोड्याच वेळात अपघात झाल्यास कोणत्या सुविधा आहेत, त्याचा वापर कसा करावा ह्याचं प्रात्यक्षिक करून दाखविलं जातं. विमान समुद्रात पडलं तर ' लाईफ जाकिट ' कसं अंगावर चढवायचं, ' गॅस मास्क ' कसं तोंडावर बसवायचं वगैरे प्रात्यक्षिक एक पर्सर ४।५ निरनिराळ्या जागी उभा राहून करीत असतो. हा 'खेळ' तो दर उड्डाणाच्या वेळी पुन: पुन: करीत असतो. त्याच्या जोडीला त्यांनी आणखी एक 'खेळ' करून दाखवावा अशी माझी प्रेमळ सूचना आहे. तो खेळ म्हणजे शौचकूप कसा वापरावा ह्याचा ! तेथे ठेवलेला टिश्यू पेपर कशाकरता आहे, त्याचं काम झाल्यावर तो कोठे टाकावा. थंड-गरम पाण्याचे नळ आहेत त्यातून आपल्याला हवं असेल इतपत कोंबट पाणी कसं मिळवावं, एवढेच काय, शौचकुपाचं दार कसं बंद करावं व उघडावं ह्याचं प्रात्यक्षिक करणं अगत्याचं आहे. काही प्रवासी त्या घडीच्या दाराशी ते उघडण्याकरता झटापट करीत असतात तर काही आतून दार बंद झालं आहे ह्या समजुतीनं निर्धास्त बसतात. तेवढ्यात बाहेरून कुणीतरी दार उघडतो तेव्हा कोण अधिक शरमतो हे बघण्यासारखं असतं ! साधारणपणे भारतीय माणसाला 'कमोड' आणि टिशू पेपर ह्या दोन्ही गोष्टी परिचयाच्या नाहीत. 'कमोड' एकवेळ खपवून घेता येईल पण टिशू पेपर म्हणजे फारच झालं. विलायतेच्या प्रवासात सर्वात कोणती गोष्ट कठीण वाटत असेल तर पाणी घेतल्याशिवाय शौच्याला जाणं. मी एक भला मोठा प्लॅस्टिकचा

लोटा बरोबर नेला होता. टिशूपेपरच्या वापराबरोबर मी पाणीही नेत असे. पुढे ७/८ दिवसांत टिशूपेपरची सवय झाली आणि माझा लोटा सुटला, लहान मुलाची दुधाची वाटली सुटावी तसा !

मी सूट घालूनच 'टॉयलेट रुम' मध्ये गेलो होतो. तेथे तो काढून ठेवण्याची सोय नाही. दाढी करून तोंड धुतले, टायची गाठ पुन्हा घट्ट केली आणि त्या सुवासिक द्रव्यांच्या वाटलीतून कोलोन अंगावर शिंपडले. रुमालावरही शिपडून घ्यावे म्हणून वरच्या खिशातून रुमाल काढला मात्र, खिशाला लावलेले पार्कर बॉलपेन जे उडाले ते नेमके शौचपात्रात ! मी माझी पेने हातातल्या बॅगेत ठेवली होती. पण मध्यंतरी शेजारच्या माणसाचा नाव पत्ता लिहून घेण्याकरता ते बाहेर काढले आणि नेहमीच्या सवयीप्रमाणे कोटाच्या वरच्या खिशाला लावले ह्याचं भान राहिलं नाही. शौचकुपानं पहिल्याच दिवशी असा हिसका दाखविल्यामुळे त्यापुढे टॉयलेट रुमच्या बाजूला जाण्याचं शक्यतो मी टाळीत असे. कधी जावेच लागले तर आधी कमोडचे झाकण पाडी. पुढे असा अनुभव आला की सर्वच घरात संडास व बाथरुम एकत्र असतात. तेव्हा दाढीचं सामान कमोडच्या पाडलेल्या झाकणावर ठेवून मी दाढी करू लागलो आणि गमविलेल्या पेनचा सूड अशा रीतीने घेऊन मनाचं समाधान करून घेत असे !

थोडया वेळानं ध्वनीक्षेपणावरून ऐकू आले. 'मी कॅप्टन महाजन, आपले स्वागत करीत आहे. आता आपण ३५ हजार फुटांवरून जात आहोत. खाली आल्प्स पर्वताची शिखरं दिसू लागतील आणि नंतर मध्यसमुद्राच्या जलाशयात तुम्हांला जे बेट दिसेल ते काप्री बेट आहे. सुमारे १५ मिनिटांत आपण पॅरीसच्या हवाई अड्डयावर पोहोचू.' कॅ. महाजन ! मला नाव ओळखीचं वाटलं म्हणून पॅरीसला विमान उतरल्यावर थेट त्याच्या कॉकपीटमध्ये गेलो. मला पाहताच त्यानं माझं स्वागत केलं. 'काढा, चंची काढा' म्हणून माझ्या पुढे हात पसरला. पान मिळण्याची ह्यापुढे अडचण होईल. म्हणून 'मी पानं मागेंच ठेवून आलो.' असे सांगितले आणि आता ही चुनागच्ची तंबाखू म्हणून त्यांच्यापुढे सुपारी आणि तंबाखूची डबी ठेवली. एकीकडे विमानात इंधन भरण्याचे काम चालू असताना त्यांनी मला कॉकपीटमधील यंत्रे दाखविली आणि थोडक्यात माहिती करून दिली. ती शेकडो लहानमोठी यंत्रे पाहून मी अवाक् झालो ह्यातील एकादे यंत्र बिघडले तर ! असा दुष्ट विचार मनात येऊन गेला, पण मी त्यांच्याजवळ तसं बोललो नाही. उगाच 'शुभ बोल रे नाऱ्या' व्हावयास नको ! पॅरिसला दाट धुकं असतं आणि ढग थेट जमिनीपर्यंत पोहोचल्यासारखे दिसतात. त्यामुळे क्षणात घरे दिसतात तर क्षणात काहीच दिसत नाहीसं होतं. वैमानिक येथे सांभाळून विमान उतरवतात आणि उड्डाण करतात. पॅरीस शहर असं धुक्याआड फारसं दिसलंच नाही. निदान एफ्. एल. टॉवर तरी दिसेल म्हणून मी वाकून वाकून बघत होतो. पण फुकटात

दर्शन न देणाऱ्या एखाद्या पटाईत वारांगनेसारखा तोही वेटा तोंड लपवून वसला होता. आता डोव्हरची खाडी दिसू लागली होती. म्हणजे आता काही मिनिटांतच आपण लंडनला पोहोचणार ह्या कल्पनेनं मन मोहरलं. खाडीवरही घनदाट धुकं होतं आणि मधूनच घरांच्या रांगा दिसू लागल्यामुळं आपण आता लंडन हवाई अड्डयाच्या नजिक आल्याचं जाणवलं. विमानाचा वेग अगदी मंदावला आणि ते घिरट्या घालू लागलं आणि आता खाली उतरेल म्हणायच्या आत जमिनीला टेकलं देखील.

## लंडन विमानतळ

लंडनच्या हीथ्रो आंतरराष्ट्रीय विमानतळ हा जगातील एक मोठा आणि अद्ययावत विमानतळ आहे. येथे विमाने थेट कॉरीडॉरला जाऊन भिडतात. कॉरीडॉर मधून बाहेर पडल्यावर लांबच लांब गँगवे लागतो. काही ठिकाणी सपाट विजेरी जिने (Ascalator) आहेत. त्यावर उभं राहिलं की आपण आपोआप पुढे सरकत जातो. डावी, उजवी, समोर करीत बराच वेळ चालल्यावर आपण कस्टम बॅरीकेड जवळ पोहोचतो. ठिकठिकाणी पाट्या असल्यामुळे त्या चक्रव्यूहातसुद्धा आपण चुकत नाही. लंडनचा दुसरा विमानतळ म्हणजे हॅरो. हा आता जुना झाला आहे. आणि तेथे फक्त वडे राजकीय नेते उतरतात. सरक्षणाच्या दृष्टीनं त्यांचं जाणं-येणं गुप्त असतं. तसाच गेटवीक विमानतळ स्थानिक स्वरुपाचा.

कस्टम आता किती आडवतो हा विचार विमानाच्या प्रवाशांना नेहमीच भेडसावीत असतो. पण कस्टम अधिकाऱ्याने Anything to declare असा प्रश्न विचारला आणि काही नाही म्हणताच माझ्या बॅगेवर खडूची फुली मारली आणि मी हायहुश करीत बाहेर पडलो. आता माझी बॅगही माझ्याजवळ असल्यामुळे हातातील बॅग मिळून दोन वोजे झाले. तेथे हमाल मिळत नाहीत, मिळाले तरी आपल्याला परवडण्यासारखे नसतात म्हणून हातगाड्यांची चांगली सोय आहे. मी एक ट्रॉली उचलली आणि माझ्या बॅगा त्यावर ठेवून रस्त्यावर आलो. मला प्रथम एअर इंडियाच्या ऑफिसला वर्दी द्यावयाची होती. रस्त्यापलिकडच्या इमारतीत सर्व विमान कंपन्यांच्या कचेऱ्या आहेत. ती गाडी लोटत एअर इंडियाच्या खिडकी-जवळ जाऊन मी आल्याची वर्दी दिली. तेथल्या सुंदरीनं माझं स्वागत केलं आणि मी येत असल्याचे आपणास आधीच कळविल्याचं सांगितलं, ते ऐकून मी आश्चर्यचकित झालो. मला हवं तसं पुढलं तिकीट माझ्या स्वाधीन केल्यावर मी तिची रजा घेतली. आणि मला कोणी घेण्यास आला आहे का पाहू लागलो. पण कोणीच आलं नसल्याची खात्री झाल्यावर आता वसंत जोशींच्या घरी कसं पोहोचावयाचं ह्याचा विचार करू लागलो. जोशांचा पत्ता सांगून कोणीही कसं जावं हे सांगेना. शेवटी त्यांच्या सल्ल्यानुसार मी बसनं व्हिक्टोरिया स्टेशनला

जाण्याकरता B O C च्या बसमध्ये चढलो. ती ट्रॉली तेथेच रस्त्याच्या कडेला, आणखी होत्या त्यात टाकून दिली आणि माझ्या बॅगा बसच्या पोटात खुपसल्या.

## तारेवरची कसरत-भुयारी रेल्वे

दुपारचा एक वाजून गेला होता. उन्हाळा चांगलाच जाणवत होता. अंगावरचं खोगीर केव्हा काढतो असं झालं होतं. सकाळी प्रार्तविधी न झाल्यामुळे शरीर आणि मन दोन्हीही मलीन झाली होती. १२ तासांहून अधिक प्रवास झाल्यामुळे शरीर आंबलं होतं. भूकेची वासनाही मेली होती. आता थोडी कळ सोसली तर लवकरच आपण इष्टस्थळी पोहोचू हा विचार त्यातल्या त्यात सुखावीत होता. पण कसलं काय आणि कसचं काय ! व्हिक्टोरिया स्टेशनवर पोहोचल्यावर तेथून फोन करू लागलो तर फोन लागेना. माझ्याजवळ एक सोडून चार जणांचे फोन होते. आळी-पाळीनं फिरवून पाहिले. पण कोणी उचलेना. मला सार्वजनिक फोन वापरण्याची सवय नाही. माझंच काहीतरी चुकत असेल म्हणून दुसऱ्या एक दोघांना १० पेन्सचं नाणं देऊन फोन करण्यास सांगितलं. पण फोन काही वाजायला तयार नाही. दोष फोनचा नव्हता. पाश्चात्य देशातील फोन, मग तो लांबच्या शहराचा (Long Distance) का असेना, लागला नाही असं कधी होत नाही. फोन कुणी उचलीत नव्हतं. कारण त्या वेळी घरात कोणीच नव्हतं. लंडनमध्ये नवरा-बायको नोकरीवर आणि मुलं शाळेत जातात व दुपारी घरी सहसा कोणीच नसतं. मग काय करावयाचं. जवळच एक माहिती केन्द्र होतं. तेथे 'तुम्हांस मदत हवी आहे का' अशी पाटी. पण आत माणूस नाहीच असं सवयीचं ते केन्द्र दिसलं नाही. म्हणून प्रथम बिचकायला झालं. पण तेथील बाई भारीच प्रेमळ. हा कोणीतरी परदेशी अड-चणीत सापडला असल्याचं माझ्या घामाघूम चेहऱ्याकडे पाहून तिला वाटलं आणि मी जोशांच्या पत्त्यावर कसा जाऊ म्हटल्यावर तिनं लंडन शहराचा भलामोठा नकाशा उलगडला, कोणत्याशा पुस्तकातून रस्त्याचं नाव पाहून त्या रस्त्याला पोहोचण्याकरता कसं जावं, कोणतं नजिकचं स्टेशन आहे वगैरे माहिती पाहिली. 'तुम्हांला ट्यूबनी गेलं पाहिजे, आधी व्हिक्टोरिया लाईननं लिस्टर स्क्वेअरला उतरा तेथून नॉर्थ लाईन घेऊन 'ग्रीनस बॉऊंड' ह्या स्टेशनावर उतरा. तेथे पोहोचल्यावर पुढली चौकशी करा' असं म्हणून बाईनं माझ्या हातावर ट्यूब रेल्वेचा नकाशा ठेवला आणि त्यावर कसं जावं हे खुणा करून दिलं. ट्यूब रेल्वे ! माझ्या पोटात गोळा उठला. आतापर्यंत लंडनच्या भुयारी रेल्वेचं नाव ऐकत आलो होतो. आणि मी सवडीनं तिच्याशी सलगी करणारच होतो. पण आता ह्या बॅगा घेऊन म्हणजे जीवघेणी परीक्षाच होती. पण आता दुसरा उपायच नव्हता. आलिया भोगासी असावे सादर म्हणून मी एक दीर्घ श्वास घेतला आणि त्या विजेरी जिन्यापाशी येऊन थडकलो. एस्केलेटरवर पाय ठेवण्याचा नव्हे बघण्याचा, तो पहिलाच

प्रसंग. दोन बॅगा घेऊन न पडता किंवा दुसऱ्याला न पाडता तीन मजले खोल त्यावरून खाली जावयाचं होतं. मी मनातल्या मनात कुलस्वामिनीचं स्मरण केलं. आठवले तेवढ्या देवांना मनोमन नमस्कार केला. देवी अंबाबाई आता माझी लाज तुलाच. तुझ्या दर्शनाला कधी येण्याचं मला सुचलं नाही. पण ह्यातून जगलो वाचलो तर तुझ्या दर्शनाला नक्की येईन अशी खोटीच थाप मारली आणि पुन्हा एकदा दम घेऊन त्या बॅगा उचलल्या आणि हळूच त्या विजेरी पाळण्याची एक पायरी जाम पकडून धरली. जगदंबेच्या कृपेनं खाली तर सुखरुप आलो. 'ग्रीन्स वॉऊंड 'चं तिकीट काढलं आणि Execuse me, Sir, आणि Thank you, sir चा मारा करीत विचारीत विचारीत गाडीत बसलो. लोकल रेल्वेनं मी थोडा का प्रवास केला आहे ? लोअर परळ टाकलं की एलफिन्स्टन की पुढलं स्टेशन दादर. डोळे मिटून ही चूक होणार नाही कारण, स्टेशन समोर दिसतात की हो ! पण भुयारी रेल्वेत ही सोय कोठून होणार ? आपलं स्टेशन आल्याचं कसं ओळखावे हा माझ्यापुढे यक्ष प्रश्न होता. पण त्याचं थोड्याच वेळात निरसन झालं. गाडीत प्रत्येक डब्यात त्या लाईनवरील सर्व स्टेशनांचा नकाशा असतो. शिवाय गाडी उभी राहिल्यावर प्रत्येक दरवाज्यासमोर स्टेशनची पाटी असते. गाडी चालू असताना त्या नकाशावरून आणि गाडी थांबल्यावर दरवाज्यासमोर येणाऱ्या स्टेशनाच्या पाटीकडे पाहून चुकावयाचं म्हटलं तरी आपलं स्टेशन चुकवता येणार नाही. तसेच गाडी बदलून दुसऱ्या लाईनला जाण्याकरता कॉरीडॉर मधून चालताना ठिकठिकाणी पाट्या असतात. नॉर्थलाईन करता सरळ पुढे चला, व्हिक्टोरिया करता येथे वळा अशा पाट्या असतात. त्यामुळे तोही घोटाळा होत नाही. युरोपमध्ये 'मेट्रो' अमेरिकेत 'सबवे' म्हणजे ट्यूबरेल्वेच. सर्व सुधारलेल्या देशात अशा भुयारी रेल्वे आहेत. पण लंडनच्या ट्यूबची शान काही और आहे. आणि लंडनची ट्यूब रेल्वे सर्वात जुनी म्हणजे जवळ जवळ आता शंभर वर्षे होतील, तरी ती सर्वात पहिल्या नंबरची आहे ह्याचा इंग्रजाला अभिमान वाटतो तो रास्तच नाही का ? अमेरिका सर्व बाबतीत सर्वांच्या कित्येक मैल पुढे आहे. पण दोन गोष्टींत तिचे नाक खाली आहे, एक मानवनिर्मित आणि दुसरे निसर्गप्रणीत, त्यांच्याकडे लंडनसारखी ट्यूब रेल्वे नाही आणि नायगारा फॉलचे खरे सौंदर्य पाहाण्यास कॅनडाच्या हद्दीत जावं लागतं. लंडन ट्यूब हा खरोखर जगातला एक चमत्कार मानावा लागेल. खाली खोलवर भुयारी रेल्वेचं जाळं आहे. त्या आतल्या आतही एकमेकांच्या डोक्यावरून जात येत असतात आणि वर पृष्ठभागावर गगनचुंबी इमारती उभ्या आहेत, प्रचंड रस्ते आहेत आणि त्यावरून वाहनांचा अखंड प्रवाह वाहात असतो आणि पादचारी चालता चालता केव्हा ह्या ट्यूबच्या बिळात शिरतात ते समजत नाही.

लिस्टर स्क्वेअर स्टेशनावर उतरल्यावर आता नॉथलाईन घेण्याकरता

आणखी दोन विजेरी जिने उतरणं आलं. पण आता धीर चेपला होता.सहिसलामत खाली आलो. म्हणजे जवळ जवळ सहा मजले मी खाली आलो होतो. पुन्हा एकदा Execuse me Sir, म्हणत हवा तो प्लॅटफॉर्म आल्याची खात्री करून घेतली. तेथें डाव्या हाताला एक आणि उजव्या हाताला दुसरा स्थानक होता. दोन्ही नॉर्थ-लाईनचे म्हणजे एक येणारी आणि दुसरी जाणारी गाडीकरता होता हे उघड झालं. पण भुयारात दिशा समजत नाहीत तेव्हा नॉर्थकडे जाणारी गाडी डाव्या की उजव्या स्थानकावर येते हे कळेना. नाहीतर आम्ही पुन्हा व्हिक्टोरिया स्टेशनवर पोहो-चायचे. ' दुसरा माणूस पकडला, तोच मंत्र Execuse me sir, मला ह्या स्टेशनवर जावयाचे आहे, मी कोणत्या स्थानकावर उभा राहू.' मी एक ठरवून टाकलं होतं. आपल्याला माहीत असलं तरी कोणाला तरी विचारून खात्री करून घ्यायची. त्याच त्या माणसाला सतवायचं नाही. दरवेळी दुसरा ब-यापैकी माणूस हेरायचा. त्याचेवर Thank you चा मारा करायला विसरायचं नाही. ह्या देशात एक बरं आहे. Execuse me म्हणून आधी त्याला थांबता करा आणि त्यानं माहिती सांगितल्या-वर पुन्हा पुन्हा Thank you म्हणा, तो आपली वाट वाकडी करून तुम्हांला रस्ता दाखवील. कित्येकदा आपल्याबरोबर चालून इच्छित स्थळी पोहोचतं करील. इंग्रज माणूस एरवी अबोल, पेपरात डोकं घालून बसेल. तुम्ही हातावर तंबाखू घेऊन मळत बसलात तरी तुमच्याकडे ढुंकून बघणार नाही. पण तुम्ही आदबशीर-रीतीनं काही विचारा, तो वेळ खर्च करून तुम्हांला मदत करील. पहिल्याच दिवशी बस शेवटच्या थांब्यावर थांबल्यावर बस ड्रायव्हरनं माझ्या खांद्यावर हात ठेवून रस्ता ओलांडून, मला ऑक्सफर्ड स्ट्रीटकडे जाणाऱ्या बस स्टॉपपर्यंत नेऊन सोडलं होतं. अमेरिकन माणूस ह्या बाबतीत थोडा उदासीनच. तुम्ही त्याला एकादा पत्ता विचारला तर go straight down and turn to left असं म्हणून चालू लागेल. तुम्हांला आणखी काही विचारण्यास अवसर देणार नाही. कदाचित इंग्लंडच्या मानानं अमेरिकन जीवन जास्त गतिमान आहे म्हणून असेल, पण हा फरक जाणवतो खरा.

तर काय सांगत होतो. नॉर्थलाईनच्या गाडीत बसून एकदाचा ग्रीन्स बांऊड स्टेशनवर उतरलो. त्यापूर्वी ज्या माणसाला मी पकडला होता तोही तेथेच उतर-णार होता तेव्हा त्याच्याबरोबर उतरलो. एवढ्यानेच तो थांबला नाही तर त्यानं मला तेथल्या माहिती केन्द्रावर नेले. तेथल्या बाईनं पुन्हा नकाशा बघून मला हवे असलेल्या ठिकाणी पोहोचण्यास मिनी कॅब (छोटी टॅक्सी) घ्यावी लागेल असे सांगितले. मी ठीक आहे म्हणताच तिने फोन करून टॅक्सी बोलाविली. टॅक्सीवाल्याला नकाशावरून माझे ठिकाण समजावून दिलं आणि मला सांगितलं ' तुमचं ठिकाण येथून जवळच आहे आणि तुम्ही फक्त ६० पेन्स टॅक्सीवाल्याला द्या,' मी पाकीट काढून पौंडांची मोड आहे की नाही बघू लागलो. तेवढ्यात माझ्या पाकीटात पुरेशी

मोड नाही असं पाहून माझ्या शेजारी, अजूनही उभा असलेल्या त्या गोऱ्या माणसानं बळे बळे ५० पेन्सचं नाणं माझ्या हातात कोंबलं आणि त्याचे आभार मानावयाच्या आत तो गर्दीत नाहीसा झाला. मला आलेला हा दुसरा विलक्षण अनुभव.

इच्छीत स्थळी टॅक्सीवाल्यानं नेमकं आणून सोडलं. माझ्या बॅगा जोशींच्या दरवाज्याजवळ आणून ठेवल्या आणि मी ६० ऐवजी ७० पेन्स दिल्यावर Thank you म्हणून तो निघून गेला. जीना चढून जोशींच्या फ्लॅटपाशी आलो तो कुलूप. तेवढ्यात शेजारची मड्डम बाहेर आली आणि म्हणाली, 'जोशी मंडळी सकाळपासून तुमचीच वाट पाहात आहेत. आत या. मिसेस जोशी एवढ्यात येतील.' तेवढ्यात मिसेस जोशी आपल्या दोन मुलांना घेऊन जिन्यावरून वर आल्या आणि गेले चार तास एकट्याने खिंड लढविणाऱ्या बाजी प्रभूच्या आवेशात झुंज देत देत शेवटी गड जिंकल्याच्या समाधानात मी जोशींच्या घरात प्रवेश केला.

## क्रिकेटवेडा इंग्रज

चहा, खाणं झाल्यावर आंघोळ करून घेतली. टबमध्ये आंघोळ करण्यापेक्षा बकेटभर पाणी डोक्यावर घेण्यात घरच्यासारखं वाटतं. माझ्याजवळ लोटा होताच. प्रत्येक ठिकाणी मी बकेट मागून घेई आणि त्यातून अंगावर दोन तांबे घेई. पायजमा बनियन घातल्यावर अगदी मोकळं वाटू लागलं. बाहेर एक चक्कर मारून पाय मोकळे करावे म्हणून तशाच कपड्यात पायात चपला सरकवून बाहेर पडलो. 'येथेच बगीच्यात जात असाल तर पायजम्यात जायला हरकत नाही' अशी यज-मानीणबाईंनी परवानगी दिल्यावर आणि सोबतीला छोट्या नीनाला बरोबर दिल्यावर मला शिवाजी पार्कमध्ये चक्कर लावल्यासारखं वाटलं. जवळच पार्क आहे. तेथे क्रिकेटची मॅच चालली होती. खेळणारे खेळाडू, एकजात पन्नाशी उलट-लेले, ऑफिसच्या कपड्यांतच खेळत होते. विकेटजवळच त्यांनी आपली दप्तरे ठेवली होती. एकादा आऊट झाला की सर्वजण मोठ्यानं ओरडत, टाळ्या वाजवीत. आऊट झालेला गडी 'तंबू' कडे येता येताच वाटेत पॅड सोडी आणि तंबूतून नवीन येणाऱ्या खेळाडूला पॅड बांधण्यास मदत करी. थोडक्यात म्हणजे तो लहान मुलं रस्त्यावर किंवा पार्कात—जशी चुरशीची मॅच खेळतात तशा प्रकारचा मोठ्या माणसांचा खेळ होता. संध्याकाळचे सहा वाजले होते. परंतु पुष्कळ उजेड होता. उन्हाळ्यात इंग्लंडमध्ये रात्री दहापर्यंत संध्याकाळच असते. हिवाळ्यात मात्र संध्या-काळी चार वाजताच काळोख पडू लागतो. त्या वडीलधाऱ्या मंडळींचा अटीतटीचा तो खेळ पाहून मला इंग्रज माणसाच्या क्रिकेटवरील अपार प्रेमाचं दर्शन झालं. संध्याकाळी ऑफिसमधून सरळ पार्कात जावयाचं, मनसोक्त क्रिकेट खेळावयाचं आणि मग हिरवळीवर बिअरचे घुटके घेत, चेष्टाविनोद करीत लोळावयाचं आणि नंतरच घरी परतायचं हा इंग्रज माणसाचा आवडता दिनक्रम.

खेळ बघण्याच्या नादात मी चांगला तास दीड तास बाहेरच्या हवेत नुसत्या बनियन पायजम्यात होतो. त्याचा प्रसाद लागलीच मिळाला. घरी येतो तो एकदम सर्दी सुरू झाली. वसंत जोशी घरी येऊन माझीच वाट पाहात होते. ते उठून पुढे आले आणि त्यांनी मला पायाला हात लावून नमस्कार केला. मला ओशाळल्या-सारखे झाले. ओळख ना पाळख, ना कधी नावही ऐकलेले किंवा मित्रानं ओळख-पत्र दिलेलं तरी दोन अनोळखी किंवा अपरिचित माणसं निमित्ताने एकत्र येतात काय आणि तंबोरे एवढे मस्त जुळतात काय, सगळेच नवल. इंग्लंडच्या हवेत आंघोळ केल्यावर तासभर बाहेर पडावयाचे नसते आणि अशा कमी कपड्यात तर नक्कीच नाही. जोशांनी मला समज दिली. आणि कपाटातून विस्कीची बाटली काढली, माझ्या सर्दीवर उतारा म्हणून... ! आणि मग अशा काही गप्पा रंगल्या की बस्स. त्यात त्यांनी विमानतळावर न येण्याचं कारण सांगितलं. ते म्हणाले, 'तुमची तार मला मिळाली. परंतु त्यांत कोणत्याही विमान कंपनीचं नाव नव्हतं, फ्लाईट नंबर नव्हता, लंडनला येणारं एअर इंडियाचं विमान संध्याकाळी येतं आणि तुम्ही तर दुपारी येतो म्हणून कळविले होते. तेव्हा तुम्ही कोणत्या तरी दुसऱ्या विमान कंपनीने येत आहात असं आम्ही धरून चाललो आणि विमान कंपनीचं नाव कळल्याशिवाय लंडन विमानतळावर जाण्यात काही अर्थ नसतो. कारण प्रत्येक कंपनीचं टर्मिनल निरनिराळे आहे आणि तेथे पोहोचण्याचे रस्तेही वेगवेगळे आहेत. ह्या अफाट विमानतळावर नक्की माहिती असल्याशिवाय कोणाला घेण्यास जाणं म्हणजे समुद्रात पडलेलं नाणं शोधण्यासारखं आहे. म्हणून आम्ही तुम्हांस घेण्यास आलो नाही. त्रास तर झाला नाही ना ?' जेव्हा मी माझा किस्सा सांगितला तेव्हा त्यांची हसता हसता मुरकुंडी वळली आणि हसण्याच्या नादात आम्ही जेवून घेतले–आमटी, पोळ्या, भाजी, चटणी, पापड.

## शेक्सपिअरचे जन्मस्थान

दुसऱ्या दिवशी त्यांनी एक सहल आयोजित केली होती. महान नाटककार शेक्सपिअर ह्याच्या जन्म गावी जाण्याची. स्टॅटफोर्ड अपॉन एव्हान–एव्हान नदीच्या काठावरील स्टॅटफोर्ड गाव. लंडनपासून सुमारे १०० मैल दूर. मुबईचा आमचा समान मित्र प्रभाकर कारेकर लंडनमध्ये मुक्काम ठोकून होता. मी आल्यावर दुसऱ्याच दिवशी ही सहल करावयाची असं त्या सर्वांनी ठरवून ठेवलं होतं. वसंत–वंदना जोशी, वसुधा–विसुभाऊ केळकर, मधुमती–मधू जोशी, सुधा–सुधाकर खुर्जेकर आणि मोकाशी दांपत्य अशी मंडळी आमच्यासह चार गाड्या घेऊन निघाली. आधी मधू जोशीकडे सर्वांचा नाश्ता झाला, कसं जावयाचं ह्याचा बेत नक्की झाला. किती वेग गाडीला ठेवावयाचा हेही नक्की ठरलं, फार मागेपुढे होऊ नये म्हणून, मध्ये थांबे कोठे घ्यावयाचे हाही तपशील ठरला. आता लंडनपासून कौंटीत जाण्याकरता

मोठाले ' मोटारवे ' झाले आहेत. त्यामुळे मोटारी विलक्षण वेगानं चालविता येतात. मध्ये अडथळे येत नाहीत. अमेरिकेसारखे ठिकठिकाणी फ्लायओव्हर बांधलेले आहेत आणि तीन तीन लेन्स एक एका बाजूला असल्यामुळे ज्याला पाहिजे तेवढ्या वेगानं गाडी नेता येते. आमचा सरासरी वेग ताशी ६० मैल होता. म्हणून वाटेत ठरल्या ठिकाणी थांबूनही आम्ही दोन तासांत तेथे पोहोचलो.

शेक्सपिअरचं हे स्टॅटफ़ोर्ड गाव अत्यंत रम्य ठिकाण आहे. बाजूनी आपल्या इंद्रायणीपेक्षाही किंचित लहानच अशी एव्हान नदी झुळझुळू वाहात आहे. त्याच्या दोन्ही काठांवर सुंदर, हिरवागार गालिचा पसरला आहे. वनराईनी वर छत धरलं आहे, त्यामुळे उन्हाचा त्रास नाही. आवालवृद्ध होड्यांतून इतस्ततः फिरत आहेत. काही गुलहौशी जोडपी झाडांच्या आड किंवा उघड्यावरही शेक्सपिअरला साक्षी ठेवून कामचेष्टा करीत आहेत. काही कॅफेटेरियातून खाण्याचे पदार्थ आणून हिरवळीवर बसून त्याचा स्वाद घेत आहेत. एवढा नयनरम्य परिसर पाहून डोळ्यांचं पारणं फिटलं. शेक्सपिअरचं घर अजून चांगल्या अवस्थेत ठेवलं आहे. त्याची टेबल-खुर्ची, जेवण करावयाची भांडी, त्याचं लेखनसाहित्य, त्याची जड जड कपाटं-सर्व काही जेथल्या तेथे सुरक्षित आहे. इंग्रज लोकांत आपल्या पुरातन वस्तूंचा नुसता अभिमानच नाही तर ते जतन करून ठेवण्याची पराकाष्ठेची तळमळ आहे. म्हणून सर्व इंग्लंडमध्ये ठिकठिकाणी त्यांच्या जगत्विख्यात लेखकांची, कवींची, नाटक-कारांची स्मारके जोपासली गेली आहेत. राजे-राण्यांबद्दल तर बोलायलाच नको. इंग्रज माणसाची ती ' मर्म बंधातील ' ठेव आहे. तिचं जतन तर ते जिवापाड श्रम घेऊन करतात. म्हणून आज बकिंगहॅम पॅलेस, विंडसर कॅसल, वेस्ट मिनस्टर अॅबे, लंडन टॉवर वगैरे सर्व राजघराण्यांचे अवशेष चांगल्या स्थितीत ठेवलेले दिसतात.

एव्हान नदीच्याच काठावर एक प्रचंड नाटचगृह आहे. तेथे दिवस रात्र शेक्सपिअरची नाटकं चालू असतात. तरीही सर्व खेळ ' हाऊस फुल्ल ' होतात. आम्हाला तिकिटे मिळाली नाहीत. मात्र रात्रीच्या शो ची ' उभे राहून ' Standy पाहाण्याची मिळत होती. परंतु रात्रीपर्यंत राहणं शक्य नसल्यामुळे तेथेच असलेल्या शेक्सपिअरच्या वस्तुसंग्रहालयाला आम्ही भेट दिली. शेक्सपिअरच्या नाटकात कामं केलेल्यांचे पुतळे, त्यांनी वेळोवेळी घातलेले मुखवटे, कपडे, दागिने, पडदे वगैरे पाहून आम्ही थक्क झालो. ह्या नाटचगृहाच्या दुसऱ्या टोकाला काही पुतळे आहेत ते त्याच्या नाटकांतील पात्रांचे. हॅम्लेट, अथेल्लो, मॅक्बेथ वगैरे अजरा-मर झालेल्या काही व्यक्ती. प्रत्येक पुतळ्याचे खाली त्याच्या नाटकातील ह्या व्यक्तींच्या कामगिरीचा आलेख कोरलेला आहे. शेक्सपिअरला तर त्यांनी लोकां-पुढे जिवंत ठेवला आहेच. पण त्याच्या नाटकांतील पात्रेही ह्या पुतळ्यांच्या द्वारे अजरामर करून ठेवली आहेत.

इंग्रजी माणसाची ही जाज्वल्य निष्ठा आणि प्रेम व्यक्त करण्याची तऱ्हा असाधारण नाही असं कोण म्हणेल ?

आम्ही तेथे हिरवळीवर बसून यथेच्छ खाल्लं. बिअरचं एक खोकं संपविलं. सर्वांनी आपआपले कॅमेरे बाहेर काढले आणि अनेक फोटो निघाले. त्यात प्रत्येक कुटुंबाबरोबर मी व प्रभाकर कारेकर समवेत फोटोही काढले.

परतीच्या प्रवासात आम्ही ऑक्सफोर्ड विद्यापीठ पाहण्याचं ठरविलं. त्याप्रमाणे गाड्या भरल्या गेल्या आणि आम्ही निघालो. तेव्हा संध्याकाळचे ४-३० झाले होते. मागेपुढे झाल्यास ऑक्सफोर्डच्या वेशीवर थांबावयाचं असं ठरलं होतं. त्याप्रमाणे तीन गाड्या पोहोचल्या. परंतु विसूभाऊ केळकरांची गाडी काही दिसेना. परत मागे दहा मैलपर्यंत त्यांचा तपास केला. पण त्यांचा शोध लागला नाही. शेवटी आम्ही युनिव्हर्सिटी कँपस्‌मध्ये शिरलो, आधी एका शॉपमध्ये जाऊन ड्रिंक्स घेतली आणि मग ऑक्सफर्डच्या एकाला एक चिकटलेल्या निरनिराळ्या फॅकल्टी बाहेरून बघत सर्व शहर फिरलो. पं. नेहरू राहात होते ते हॉस्टेल बघितले आणि रात्री ९ वाजता मधू जोशीकडे दिवसभराच्या चरवट खाण्यावर उतारा म्हणून खिचडी, दही, पापडावर तुटून पडलो. विसुभाऊंची गाडी बिघडल्यामुळे ते मध्यरात्रीपर्यंत तिकडेच रखडले आणि दुरुस्त झाल्यावर रात्री दोन वाजता परस्पर घरी गेले.

लंडन सभोवतालच्या शंभर मैलांच्या परिसरात ६।७ कौंटी मधून आम्ही फिरलो. इंग्लंडमधील खेडगावं ही मुद्दाम पाहण्यासारखी रम्य स्थळं आहेत.

शनिवारी रात्री माझ्या पेटीवादनाचा कार्यक्रम झाला. मी उत्तम पेटी वाजवितो असा माझ्याबद्दल प्रभाकर कारेकरनं उगीचच गैरसमज पसरवून दिला होता. कार्यक्रम माझ्या संमतीशिवाय मी येण्याआधीच नक्की केला गेला होता. त्यामुळे आल्या प्रसंगाला सामोरे जाण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. २५।३० मंडळी आली होती. तबल्याला देव नावाचे गृहस्थ होते. त्यांना मोजकेच ठेके येत होते. पण जेवढे येत होते तेवढे ते चांगले वाजवीत होते. त्यांना न येणारा ठेका असला म्हणजे प्रभाकर तबल्यावर बसे, शास्त्रीय रागदारी आणि त्याला जोडूनच त्याच रागातील नाट्यसंगीत असा सपाटा लावल्यामुळे असेल, पण मंडळींनी माझं वादन खपवून घेतलं खरं. एवढेच नव्हे तर 'फर्माइश' करून आणखी काही पदे वाजविण्यास मला भाग पाडले. रात्री तीन वाजेपर्यंत मी त्यांचा असा पिच्छा पुरवल्यामुळे त्यापुढे झोप येणं शक्यच नव्हते. बरीचशी मंडळी घरोघर निघून गेली, जी राहिली त्यांच्या समवेत सकाळी उजडेस्तो गप्पा झाल्या आणि सकाळी चहा घेऊन आम्ही सर्वच प्रभाकर कारेकर ह्यास निरोप देण्याकरता विमानतळावर गेलो.

## संगीत वेडा ब्रिटीश डॉक्टर

प्रभाकरला सोडून आम्ही रिचमंड सरे येथे एका ब्रिटीश डॉक्टरच्या घरी ब्रेकफास्ट करता गेलो. त्यांची पत्नी आपल्याकडील पुण्याची आर्यकन्या आहे. पती पत्नी दोघेही डॉक्टर आहेत. त्या बाईंचं आमचे घरी बरंच जाणं येणं होतं. म्हणून त्यांनी मला व जोशी कुटुंबाला आवर्जून बोलाविलं होतं. डॉक्टर मजकूरही ह्या वर्षीचं पुण्यास आल्यावर आमचे घरी न्याहारी करून गेले होते. मी मुद्दामच गरम कुडता पायजमा घालून गेलो होतो. डॉक्टरना पाश्चात्य संगीताची खूप आवड आणि त्याच्या जोडीला आता हिंदुस्थानी गाण्याचीही. त्यांच्या घरात अनेक वाद्ये दिसली. त्यापैकी एक दोन त्यांनी आम्हांला वाजवूनही दाखविली व माझेकडून, एक पियानो आणि आर्गनच्या मधील एक मुद्दाम तयार करून घेतलेलं वाद्य वाजवून घेऊन त्यावर हिंदुस्थानी संगीताची मेलेडी कशी उमटते हे अजमावून घेतलं. ते वाद्य विजेवर चालणारे होते आणि त्या सुरांना कंपने येण्याची सोय होती. त्यामुळे त्यावर सतारीचा 'झाला' वाजविता येईल असं मला वाटलं.

एका ब्रिटिश माणसाकडे जाण्याचा माझा हा पहिलाच प्रसंग म्हणून त्याचा मुद्दाम उल्लेख. जोशींच्या लहान मुलांना देण्याकरता त्यांनी बाजारातून मुद्दाम दोन वस्तू आणून ठेवल्या होत्या हे अगत्य मुद्दाम नमूद करण्याजोगं.

## विलायती माणूस आणि आंतरबाह्य स्वच्छता

सोमवार ते शुक्रवार विलायतची माणसं आपआपल्या कामधंद्यात चूर. त्यांना इकडे तिकडे बघण्यास मुळीच फुरसत नसते. जोशी सकाळी ७ वाजता चहा पिऊन दाढी करून नास्ता न करताच चालू लागत. वंदना आणि मुलं सकाळी ८ वाजताच बाहेर पडत. त्यानंतर माझं मी सावकाशपणे उरकून घेई. येथे आल्यावर दुसऱ्याच दिवशी वादळी पाऊस पडल्यामुळे लंडनची हवा एकदम थंड झाली. इतकी थंड की अशी सुंदर हवा उन्हाळ्यात झाल्याचं आठवत नाही असं तेथे स्थाईक झालेले लोक म्हणाले. कदाचित माझा पायगुण असेल. माझी उबदार कपडे घालून फिरण्याची हौस मात्र तेथे फिटली एवढं खरं. मी आंघोळ झाल्यावर चड्डी बनियन वगैरे अंगावरचे कपडे रोजच्या रोज धुवून टाकी. त्यांच्याकडील पद्धत म्हणजे मळक्या कपड्यांची आठवडाभर रास करावयाची आणि सुट्टीच्या दिवशी धुण्याच्या यंत्रात टाकावयाची. आपल्याकडे कशी फरसात कपडे हापटून हापटून धुण्याची सोय असते, कपडे वाळत घालावयाच्या दांड्या असतात. तशा सोई साहेबाला मानवत नाहीत. अगोदर अंघोळ 'जुम्मे के जुम्मे.' तेच ते पुन्हा पुन्हा कपडे घालणे, जेवणखाण झाल्यावर पाण्याची चूळ न भरता नुसत्या टॉवेलला किंवा अलिकडे कागदाच्या रुमालाला तोंड पुसणे, टबांत बसून तेच ते पाणी अंगावर घेणं, अंघोळ आणि शौचकुप एकाच खोलीत असणं, ते कमोड, तो टिशू

पेपर... ! छे, छे, साहेबांच्या घरातील स्वच्छतेच्या कल्पना त्याच्या सार्वजनिक स्वच्छतेच्या कल्पनेच्या अगदी विरुद्ध असतात. विलायतेत सार्वजनिक रस्ते, उद्याने वाचनालये, प्रेक्षणीय स्थळे, रेल्वेची स्थानके, सार्वजनिक वाहने, फार काय संडास मुत्र्या देखील एवढी स्वच्छ असतात की बोलायची सोय नाही. कुठे कागदाचा कपटा दिसायचा नाही की सिगरेटची थोटकं, सर्वच खाण्याचे पदार्थ, दही दुधसुद्धा सुंदर वेष्टणातून मिळतात. बहुतेक लोक दुपारचं जेवण रस्त्यावरच्या लहान लहान उपहारगृहात घेतात. ह्या ' Take away ' उपगृहात बसून खाण्याकरता नावालाच जागा असते. बहुतेक लोक उभं राहूनच खातात–आणि त्यांचा खाण्याचा शौक जबर, सबंध दिवस चरतच असतात. तरीही रस्त्यावर कोठेही खाऊन झाल्यावर रिकामी वेष्टने, रिकामे डबे दिसत नाहीत. ठिकठिकाणी ठेवलेल्या कचरापेटीत ते न चुकता टाकतात. बसचं तिकीटसुद्धा बसमधून बाहेर पडण्याच्या दरवाज्याजवळ असलेल्या पेटीत टाकावयाचं आणि मग खाली उतरावयाचं. सवयीनुसार अंगठीत अडकविलेलं माझं तिकिट तसंच राहावयाचं आणि मीसुद्धा न चुकता ते कचरापेटीत टाकू लागलो. लंडनच्या इतके स्वच्छ शहर, अमेरिकेत देखील, माझ्या पाहाण्यात आले नाही. लंडन इतकेच किंबहुना त्याहूनही अधिक स्वच्छ शहर म्हणजे सिंगापूर. त्याचे खालोखाल हाँगकाँग व टोकियो. व्ही. टी. स्टेशन म्हणजे सदा गजबजलेले. आंतरराष्ट्रीय लोकांचा मेळावा बघावा तर व्ही. टी. स्टेशनवर. पण तेथील मुत्र्या बघाल तर कमालीच्या स्वच्छ. टिशू पेपरची नळकंडी आपल्या जागेवर, सुवासिक साबूची भरलेली पात्रं जेथल्या तेथे, थंड गरम पाण्याने हात धुवायची पात्रं एकजात स्वच्छ आणि कार्यक्षम, सदैव सुवासिक द्रव्याचे फवारे मारलेल्या त्या खऱ्या अर्थानं स्वच्छतागृहानं मन प्रसन्न होतं. आमच्या मेट्रोसिनेमाच्या 'जंटलमेन' मध्येही एवढी स्वच्छता नाही, ह्याची खंत वाटल्याशिवाय राहात नाही.

' साखरेचं खाणार त्याला देव देणार ' माझ्या लंडनमधील २० दिवसांच्या वास्तव्यात मी रोज दोन्ही वेळा, तिन्ही त्रिकाळ म्हणू या हवं तर, भात, भाजी, आमटी, चटणी कोशिंबीर बेडेकराची लोणची, यावर आडवा हात मारीत होतो, हे सांगून खरं वाटणार नाही. चांगला बासमती तांदुळाचा भात लोण्यात शिजविलेला ! वंदना मुलं गेल्यावर, स्नान आटोपून आदल्या रात्री मुद्दाम जास्त करून ठेवलेले हे पदार्थ पुन्हा गरम करून टेबलावर मांडी व मी आरामात ह्या 'परब्रह्माचा' आस्वाद घेई. एकदोन दिवस घाईघाईने त्यांच्याबरोबर ' ब्रेक फास्ट ' घेऊन बघितला, नाही असं नाही. पण अशा सुग्रास भोजनाची व्यवस्था झाल्यावर एक प्लेट मिसळीला कोण हात लावणार ? दहा साडेदहापर्यंत भोजन आटपून मी कपडे करी. अपटूडेड सूट चढवून बाहेर पडे. आता शुक्रवारी रात्रीपर्यंत माझं मलाच एकट्यानेच फिरावयाचं होतं. मी रहात असलेल्या घरापासून २।३ मिनि-टाचे अंतरावर बस नं. १३४ तेथूनच सुटत असे. ती थेट डाऊन टाऊन समजल्या

जाणाऱ्या गजबजलेल्या बाजार पेठ, टॉटनहॅम कोर्टजवळ विसर्जित होई. तेथून सर्व प्रेक्षणीय स्थळे मैल दीड मैलाच्या अंतरावर, म्हणून ती बस मला फार सोईची. चेंज म्हणून कधीकधी मी ट्यूबनेही जाई. तिच्याशीही मी सलगी केली आणि निर्धास्तपणे मी त्यातून जाऊ येऊ लागलो. पण माझी खरी मैत्रीण बस नंबर १३४.

## फुटपाथ आहेत तर पादचारीच नाहीत !

लंडनला उतरल्यावर किंबहुना सर्वच पाश्चात्य देशात, चटकन जाणवतात अशा चार विलक्षण गोष्टी. पहिली गोष्ट म्हणजे रस्त्यावरील तुरळक दिसणारी पादचाऱ्यांची रहदारी. कोठे फारशी माणसंच दिसत नाहीत. व्ही. टी. स्टेशन, ऑक्सफोर्ड स्ट्रीट, ट्रॅफलगार स्क्वेअर, बँका व इतर व्यापारी कंपन्यांच्या कचेऱ्या असलेला आणि सिनेमा नाटयगृहे असलेला ज्याला डाऊनटाऊन म्हणतात तो भाग सोडला तर पादचारी अभावानेच दिसतात. हीच तऱ्हा सर्व देशात पाहिली. ह्याचं कारण, मर्यादित लोकसंख्या जागेच्या विस्ताराच्या प्रमाणात लोकवस्ती विरळ. दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत कोटयावधी माणसं मारली गेली, त्याला आता ३० वर्षं झाली तरी सुद्धा माणसांचा तुटवडा अजून भरून निघालेला नाही. ती एक इष्टापत्तीच ते मानतात, कुटुंब नियोजन, गाजावाजा न करता सुखी जीवनाचा एक अत्यावश्यक भाग म्हणून पाळतात. मात्र फ्रान्ससारख्या देशात स्त्रियांपेक्षा पुरुषांचे प्रमाण एवढे कमी आहे की ती एक मोठी समस्या होऊन बसली आहे आणि त्याकरता अधिक प्रजोत्पत्तीला सरकारी प्रोत्साहन दिलं जातं. लोकसंख्येचे जागेशी व्यस्त प्रमाण हे जसे दाटवस्तीच्या अभावाचं कारण आहे, तसेच दुसरे कारण म्हणजे नगररचना कौशल्य. लंडनची वस्ती १ कोटीच्या वर आहे असं म्हणतात. पण कोणत्याही भागात वस्ती प्रमाणाबाहेर एकवटलेली नाही. चोहोबाजूने लोक लंडनच्या मध्यभागात कामानिमित्त रोज सकाळी येत असतात आणि सायंकाळी चारी दिशांना पांगतात. ट्यूबरेल्वे, बसेस एवढा प्रचंड लोंढा वाहून नेण्यास समर्थ आहेत. कोठेही डब्यात चढण्याकरता चेंगरा चेंगरी नाही की उतरण्यात अडथळे नाहीत. डब्यांच्या दरवाजाला आतून बाहेर लोंबकाळणं नाही की ' राव जरा सरकून घ्या ' म्हणून तीनच्या ऐवजी पाच माणसं बाकावर दिसणार नाहीत. जेथे तीन माणसं बसावयाची तेथे तीनच बसतील. कडेवर मूल घेतलेली बाई समोर उभी असली तरी सरकून किंवा आपण उभं राहून तिला जागा करून देणार नाहीत. जागा न मिळलेले लोक दोन पायांमध्ये हॉफिसची बॅग ठेवून वरच्या पट्टयात एक हात अडकवून खुशाल संध्याकाळचा पेपर वाचताना दिसतील. आणि आपलं स्टेशन आलं की निमूट उतरून जातील, कोणाशी बोलणं नाही की गप्पा नाहीत ' रमीचा ' डाव तर आपल्याकडील खास वाण आणि तो देखील गर्दीच्या वेळात उभ्या उभ्या खेळण्याचा !

## लांबवर पसरलेली वसतिगृहे आणि उद्याने

निवासीवस्तीत चुकूनही कोठे स्कायस्क्रेपर्स नाहीत. एकजात सर्व इमारती सारख्याच. पुढे मागे तेवढीच हिरवळीची मोकळी जागा. एक मजली इमारतीवर तशीच धुराची चिमणी आणि त्याचे बाजूला टी. व्ही. ची अँटेना. घरे बंदिस्त, काचेची तावदाने लावलेली, कोठे गॅलेऱ्या नाहीत की त्यांवर ठेवलेल्या कुंड्यातून लावलेल्या झाडांवर पाणी घालून पादचाऱ्यांना अभिषेक नाही. मला तेथल्या स्थापत्यशास्त्रज्ञांची कीव आली. कोठे म्हणून कोठे इमारतीला नाविन्यपूर्ण कमानी, सुशोभित चौकटी नाहीत, बाल्कनी नाहीत किंवा उंचीत जास्त कमी नाही. विलायतेतील घरे बाहेरून सगळी साधी आणि एकसारखी असतात पण आतून सुविधायुक्त असतात. नगररचनाकारांचे कौतुक अशा करता की त्यांनी दूरदृष्टीनं शहराची संभाव्य वाढ लक्षात घेऊन रस्त्यांची, उद्यानांची, सार्वजनिक इमारतींची रचना अशी कौशल्यपूर्ण केली आहे की रस्ते अरुंद वाटू नयेत की मोकळ्या जागा कमी पडू नयेत.

लंडन हे जुने शहर असूनही त्यात हाईड पार्क, केन्सिंग्टन पार्क, रिजंट पार्कसारखी प्रचंड उद्याने आहेत. एवढी मोठी उद्याने तर मला अमेरिकेत देखील पहाण्यास मिळाली नाहीत. मात्र पूर्वेकडील सिंगापूर, हाँगकाँग, टोकियो शहरे देखील सौंदर्यदृष्ट्या लक्षात राहतील अशी आहेत. विशेषत: सिंगापूर शहराची रचना अवर्णनीय आहे. सर्वत्र हिरवे गालिचे पसरलेली, रस्त्याच्या दुतर्फा सुंदर वनराजी. टोकियो जुने शहर असूनही ठिकठिकाणी सुंदर बगीचे आहेत. मोकळी मैदाने आहेत आणि जपानच्या राजांचे जुने राजवाडे आहेत. त्यांच्या आसपास अत्यंत नयनरम्य वनराजी आहे. लंडनच्या ह्या उद्यानांना फेरी मारावयाची म्हटली तर सहज दहा मैल चालावे लागेल. फुला-पल्लवांनी नटलेली, छोट्या छोट्या पाणलोटाच्या संचयानं विखुरलेली, पुरातन वृक्षांच्या छायानं सदैव आच्छादलेली ही विशाल उद्यानं म्हणजे खरोखर लंडनचं खरं वैभव आहे. लांबवर पसरलेल्या मखमली हिरवळींच्या गालीच्यावरून चालताना माणूस देहभान हरवून जातो. थकल्याभागलेल्यांचं हुकमी विश्रांती स्थान, आशुक माशुकांचं भेटण्याचं संकेत स्थळ, राजकीय नेत्याचं कंठरवानं ओरडण्याचं नित्याचं ठिकाण अशी नानाविध रूपं घेऊन ही उद्यानं शहराची शान राखीत आहेत. मी राहत असलेल्या ठिकाणाहून जवळच हायगेट स्टेशनच्या बिळातून बाहेर आलं की प्रचंड झाडी लागते. मोठमोठे पुरातन वृक्ष हाता हाताच्या अंतरावर दाटीदाटीनं उभे आहेत. महाबळेश्वरच्या अरण्यांतही एवढी जवळजवळ दाट वनराजी दिसणार नाही. मुद्दाम हायगेट स्टेशनवर उतरून पुष्कळ लोक पायवाटा तुडवीत ह्या अरण्यांतून घरी जातात. 'झाडे वाढवा' असे नारे न लावता आणि वार्षिक 'वृक्षारोपण' चे नाटक न

करताच इंग्रज माणसानं ह्या नैसर्गिक संपत्तीत भर घालून ती काळजीपूर्वक जोपासली आहे आणि प्रदूषण बंदोबस्त आणि सौंदर्यवाढ ही दोन्ही सांभाळली आहेत. झाडांवरील प्रेम हे देखील इंग्रज माणसाचं क्रिकेट एवढेच दुसरे वेड आहे.

## सर्व कसं शांत शांत !

विरळ लोकवस्ती हे जसं पहिलं वैशिष्ट्य येथे जाणवतं तसं दुसरं वैशिष्ट्य म्हणजे भयाण शांतता. कोठेंही आवाज म्हणून कसा तो नाही. मोटारींचा प्रवाह अखंड वाहात असतो पण कोठे मोटारीचा हॉर्न म्हणून ऐकू येत नाही. बसेसचा तर हॉर्न वाजत नाहीच पण कंडक्टरची घंटीही वाजत नाही. प्रवासी उतरून गेले की ड्राय-व्हरच दारे बंद करण्याचे बटन दाबतो, दारे बंद होतात आणि बस पुढे चालू लागते. हॉर्नचा वापर न करण्याचे मुख्य कारण म्हणजे पादचारी फुटपाथवरून चालतात हे एक आणि दुसरे म्हणजे रस्त्यांचं अप्रतिम नियंत्रण. पुष्कळसे रस्ते एकमार्गी आहेत तेथे वाहातूक एकाच दिशेने चालू असते आणि तीही गाडीच्या वेगमाना-नुसार निरनिराळ्या चाकोरीतून. अगदी उजवी लेन मंदगती वाहानांकरता, मधली लेन त्यापेक्षा जास्त वेगानं जाणाऱ्या गाड्यांकरता आणि सर्वात डावीकडील लेन सर्वात वेगानं जाणाऱ्या गाड्यांकरता राखून ठेवलेली असते. म्हणून एकादी लॉरी आस्ते जाते आहे, तिच्या पुढे जाण्याकरता हॉर्न वाजवावा लागत नाही. तो त्याच्या मंदगतीच्या चाकोरीतून जात असतो. जलद जाणाऱ्यानं मधल्या अथवा डाव्या चाकोरीतून जावं म्हणजे त्याला कोणताच अडथळा येत नाही. बैलगाड्या, हात-गाड्या वगैरे वाहानं त्यांनी कधीच मोडीत काढली आहेत, त्यामुळे गल्लीच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत एकाद्या बैलगाडीच्या मागे कासवाच्या गतीने मोटार चालविण्याची मौज त्यांना अनुभवता येत नाही. पादचारी रस्ता ओलांडण्याच्या आखून दिलेल्या कक्षेतच रस्ता ओलांडीत असल्यामुळे ट्रॅफिक लाईटवर सर्व गाड्यांचे व माणसांचे नियंत्रण होत असते. म्हणून हॉर्न वाजविण्याची वेळच येत नाही. कोणी माझ्यासारखा ‘गव्वार’ आदमी चुकून रस्ता भलत्या ठिकाणी ओलांडू लागला तरच हॉर्न वाजतो आणि काहीतरी भयंकर घडल्यासारखं सर्वजण इकडे तिकडे बघू लागतात. ही भीषण शांतता भंग पावते ती फक्त अग्नीनाशक मोटारींच्या किंवा रुग्णवाहिकांच्या ‘चिव चिव’ भोंग्यानं. ‘शिंग वाजवीत’ त्यांचा बंब धावत नाही पण एक ‘क्यॉंव क्यॉंव चिव चिव’ सारखा आवाज काढीत आगवाले रस्त्याच्या मधून मिळेल तसा मार्ग काढून गाडी जोरात घेऊन जातात, त्यावेळी सर्व वाहातूक आपोआप थांबलेली असते. अमेरिकेतही असाच आवाज काढीत अग्नीनाशक दलाच्या गाड्या, रुग्णवाहिका सुसाट धावत असतात. त्यांच्या जोडीला पोलिसच्या गाड्याही अमेरिकेत दिसतात. पण लंडनमध्ये पोलिसच्या गाड्या फारशा दिसल्या नाहीत. शांततेला आणखी कारण म्हणजे लाऊड स्पीकरचा अभाव. कोठेंही कोणत्याही

कारणानं तेथे लाऊड स्पीकर वापरावयाला बंदी आहे, हॉटेलमधील संगीतही बाहेर रस्त्यावर ऐकू येणार नाही. अमेरिकेत व कॅनडात तर मी मोठमोठी कार्निव्हलस पाहिली पण कोठेही लाऊड स्पीकरचा वापर नाही. टोरोंटो (कॅनडा) मध्ये वैमानिक कवाईत आणि उड्डाणाचा जागतिक खेळ (Air show) पाहिला. लाखो लोकांचा अथांग समुद्र साधारणपणे पाच मैलाच्या परिसरात पसरला होता. त्यांना समजावे म्हणून कॉमेंट्री चालू होती. त्याकरता ठिकठिकाणी प्रक्षेपण भोंगे बसविले होते. त्यातून शक्य तितक्या मंद आवाजात फक्त निवेदक सांगत असलेली माहिती ऐकू येत होती. संगीताचे तेथे प्रयोजन नव्हते म्हणून दोन शोच्यामध्ये मोकळ्या वेळीही फिल्मी गाणी लावून रसभंग आणि शांतता बिघडविली जात नव्हती. त्यांचेकडे आपल्याकडल्या सारखे उत्सव नाहीत. सत्यनारायण पूजा नाहीत बारसं किंवा बारावं वाजत गाजत उरकीत नाहीत. ह्या उलट आपल्याकडे एक ना एक उत्सव वर्षभर चालू असतो. त्याच्या जोडीला गल्ली बोळातून सार्वजनिक पूजा चालू असते. कोणाच्या ना कोणाच्या तरी जयंत्या नाहीतर पुण्यतिथ्या धूमधाम चालू असतात. उद्घाटन समारंभ, सत्कार समारंभाला फार मोठं कारण लागत नाही. बस कंडक्टरनं चुकून राहिलेली बॅग इमाने इतबारे परत केली तरी त्याचा सत्कार करावयास मंत्र्यापेक्षा कमी पदाचा अधिकारी चालत नाही. उद्घाटने कशाची करावी ह्याला काही मर्यादा नाही. पूलाच्या उद्घाटनापासून मागास वर्गाच्या महिलांच्या पापड लाटण्याच्या वर्गापर्यंत काहीही निमित्त उद्घाटनाला पुरतं. आमच्या शहरांच्या आणि खेडयांच्या कानाकोपऱ्यात कर्णकर्कश प्रक्षेपण भोंगे रात्रंदिवस वाजत असतात. खेडेगावात चार चार दिवस लग्नं, बारशी गर्जत असतात ' मेहबुबा मेहबुबा ' चा आकांत ऐकून डोकं उठतं पण कोण लक्ष देणार ? पाण्याच्या, हवेच्या प्रदूषणापेक्षा आवाजाचे प्रदूषण किती भयंकर असतं हे कोणी कोणाला सांगावयाचं !

## स्वतःवर लादून घेतलेली शिस्त

लंडनमध्ये तिसरे वैशिष्ट्य सहज जाणवते ते म्हणजे इंग्रज माणसाच्या अंगात भिनलेली स्वयंशिस्त. त्याला कोणते कपडे घालावे, कोठे बसावे, कोठे बसू नये, कोठे सिगरेट ओढावी किंवा ओढू नयें, रस्ता कोठे ओलांडावा, बसच्या किंवा कोणत्याही सार्वजनिक गर्दीच्या जागी रांग कशी धरावी हे सांगण्यास मागे पोलिस उभा राहावा लागत नाही. किंवा ठिकठिकाणी पाटचा लावाव्या लागत नाहीत. ' बागेत फुले तोडणारावर खटला भरला जाईल ' किंवा अलिकडच्या ' बागेतील फुले तोडून शोभा कमी करू नका ' अशा, म्हटलं तर कायदा म्हटलं तर उपदेश, अशा पाटचा तेथे पाहावयास मिळणार नाहीत. नागरिक म्हणून आपण काही पथ्यं पाळावयाची असतात ह्यांचं बाळकडू त्याला जन्मतःच मिळालेलं असतं. म्हणून

इंग्रज माणूस स्वतः शिस्त पाळतो आणि दुसऱ्याकडून शिस्तीची अपेक्षा करतो. लंडनचा 'बॉबी' हा सर्वांच्या कुतुहलाचा, आदराचा विषय झाला आहे, त्यामागे इंग्रज माणसाची स्वयं शिस्त आहे. तो दंडुका घेऊन येथे उभं राहू नका, येथे रांगा लावा सांगत फिरत नाही. त्याचं अस्तित्वच जाणवत नाही. कारण तो कोठेतरी आडोशाला उभा असतो आणि तुम्ही काही गैरवर्तन केलेत किंवा कायद्याचं उल्लंघन केलंत तरच तो एकदम आकाशातून टपकावा तसा तुमच्यापुढे येऊन उभा राहील. तुम्ही कायद्याचं पालन करणारच अशी त्याची खात्री असते, तुम्हांला मुद्दाम जाणीव करून द्यावयास पाहिजेच असं नाही हे त्याला पक्के माहीत असते. आपण जनतेचे सेवक आहोत ह्याचे भान तो सोडीत नाही. म्हणून तो तुमच्या मदतीला धावून येतो. परदेशी प्रवाशांना बॉबीइतका भरवशाचा मदतगार नाही. बॉबीचे हे सर्व गुण म्हणजे इंग्रज माणसाच्या स्वभावाचं बोलकं प्रतिक आहे.

मी माझा टेरीलीन शर्ट आणि गरम पुलाव्हर धुवून खाली अंगणात वाळत घातला होता. संध्याकाळी परत आल्यावर ते कपडे वर आणले. जे आपले नाही त्याला चुकून लहान मुलंसुद्धा हात लावत नाहीत आणि अशा लहान सहान चोऱ्या करण्यात इंग्रज माणसाला इन्टरेस्ट नाही. चोरी करावयाचीच तर बँकेवर दरोडा घालायचा, एरवी कोणाची मोटार सुद्धा चोरून न्यावयाची नाही. आधी कळविल्या-शिवाय कोणाकडे जाणार नाहीत किंवा कोणाची सहसा भेट घेणार नाहीत. भेट ठरल्यावर घड्याळाच्या काट्यावर हजर होतील. त्याला वाट पाहावयास लावणार नाहीत. 'काय वासवा,' करीत हातातील रिकामी पिशवी हालवीत वेळी अवेळी टपकणारे विमूभाऊ किंवा शंकरराव तेथे नाहीत. सार्वजनिक जीवनात काटेकोर शीस्त पालन, आचारात शिस्त, विचारात शिस्त, स्वतःची स्वतःवर लादून घेतलेली शीस्त. स्वयं-शीस्त (Self discipline) हा इंग्रज माणसाच्या स्वभावाचा स्थायीभाव जागोजागी जाणवतो.

चौथे वैशिष्ट्य डोळ्यांत भरणारे ते आधीच विस्तारानं सांगितलं आहे. ते म्हणजे कमालीची स्वच्छता, सार्वजनिक जीवनातील स्वतः पाळावयाची स्वच्छता हा त्याच्या स्वयंशिस्तीचा अविभाज्य भाग आहे. स्वच्छता त्याच्या नसानसातूनच वाहात असते. म्हणून त्याला 'स्वच्छता पाळा' येथे कचरा टाकू नका सांगावे लागत नाही. स्वच्छता हे तर सर्वप्रथम जाणवणारं खास वैशिष्ट्य म्हणून त्याचा उल्लेख सर्वांआधी केला आहे.

सिंगापूर हे जगातील सर्वात स्वच्छ शहर आहे. हाँगकाँग टोकियो ही शहरे मुंबई पुण्या सारखीच माणसांनी गजबजलेली शहरे आहेत. तरीही अत्यंत स्वच्छ आहेत. सिंगापूरला रस्त्यावर कचरा टाकल्यास रु. ५०० दंड, हाँगकाँगला रु. २५० दंड आहे. टोकियात दंड नाही परंतु इंग्रज माणसासारखीच शिस्त त्यांच्या नसा-नसातून वाहात आहे.

## प्रचंड दुकाने

स्वच्छता, भीषण शांतता, स्वयं-शीस्त आणि विरळ लोकवस्ती ही चार ठळक वैशिष्ठ्ये मनात रुजल्यावर लंडन शहरात आपलं कोठे काही आडत नाही. १३४ नंबरच्या बसनं टॉटनहॅम कोर्टला उतरावयाचं. तेथून ऑक्स्फर्ड स्ट्रीटवर पायी चालावयाचं. मोठमोठ्या दुकानांच्या काचेच्या तावदानामागे असंख्य वस्तू आपल्याला खुणावीत असतात. कपड्यांची दुकानं, बुटांची दुकानं, रेडियो, टी. व्ही. ची दुकानं, शिलाईयंत्र, बागकामाची अवजारं, फर्निचर, काचसामान, ग्रामोफोन रेकार्डस, टेप रेकार्डस, स्वयंपाक घरात लागणाऱ्या विजेरी गॅगड्या, ओव्हन, कुकींग रेंजपासून कपवशा धुण्याच्या साबण पावडरीपर्यंत असंख्य वस्तू. वस्तूच वस्तू मला उचलून घ्या म्हणून आपल्याला बोलावीत आहेत असा भास होतो. ऑक्स्फोर्ड स्ट्रीटवर जास्त करून कपड्यांची दुकाने जास्त आहेत. 'मार्क आणि स्पेन्सर' 'सी अँड ए' 'मदरकेअर' 'वुलवर्डस्' हे जगातील प्रथमश्रेणींचे डिपार्टमेंटल स्टोअर्स. येथे काही मिळत नाही, असं नाही. चार चार मजले कपड्यांनी आणि उपयुक्त वस्तूंनी भरलेली आहेत. तळमजल्यावर मुलांचे, पहिल्या मजल्यावर स्त्रियांचे दुसऱ्यावर पुरुषांचे आणि तिसऱ्यावर फर्निचर आदी वस्तू नीट लावून ठेवलेल्या. त्यावर किमतीच्या चिठ्ठ्या. '२० पौंडाची वस्तू १५ ला देता का नाहीतर तुमचंही जाऊ द्या आणि आमचंही जाऊ द्या १८ ला देता का बोला' ही भाषा नाही. किमती लावलेल्या आहेत, पटलं तर घ्या. नाहीतर चालू लागा. मला खास असं काही तूर्त घ्यावयाचं नव्हतं पण किमती वाचून. १० पौंड म्हणजे गेला बाजार १७० रुपये झाले की. असा मनातल्या मनात हिशेब करण्याचा मला चाळा लागला. रुपयाच्या हिशेबात वस्तूचं मूल्य ठरवायला लागलं तर एकही वस्तू घेऊन होणार नाही. लोक विजेरी जिने चढत होते, उतरत होते खाकोटीला घेतलेला माल काऊंटरवर आणून टाकत होते. खडाडखड् कॅशरचं यंत्र बेरीज करीत होतं. वस्तू पिशवीत भरल्या जात होत्या. मी उगाचच जिन्यानं खालीवर करीत होतो. माझ्यावर कोणाची पाळत तर नसेल ना, मनात उगीचच शंका सतावीत होती. तेथे टी. व्ही चे कॅमेरे तुमच्यावर देखरेख करीत असतात. उगाचच मला त्याचं भय वाटलं. कोणी आपणाला हटकण्या आधीच काढता पाय घ्यावा म्हणून जवळच्या दिसणाऱ्या दरवाज्यातून बाहेर पडलो तो रस्त्याच्या दुसऱ्या टोकाला निघालो ! म्हणजे तो स्टोअर निदान फर्लांग भर तरी मोठा होता तर ! सध्या 'समर सेल' चालू असल्यामुळे लंडनभर सगळ्या मोठ्या स्टोअर्समध्ये 'सेल'च्या पाट्या लागलेल्या आहेत आणि जगातले लाखो प्रवासी सेलवर तुटून पडत होते. जागतिक प्रवाशांची दररोजची आवक एकट्या लंडन शहरात एक लाखाहून अधिक आहे असं वाचल्याचं स्मरतं. असं बाहेरच्या बाहेर खरेदी (Window Shopping) करीत फिरणं हा माझ्या लंडन मुक्कामातील आवडता खेळ झाला होता.

## विलायती कबुतरखाना

ट्राफलगार स्क्वेअरचं चित्र जितकं मनोहारी वाटतं तितका काही हा स्क्वेअर मला आवडला नाही. वाटर्लुची लढाई जिंकणाऱ्या नेलसनचा दोनशे फूट उंचीवर उभा केलेला पुतळा, त्याच्या भोवती एक मोठा चौक, त्याच्या पायऱ्यांवर बसून कबूतरांना दाणे घालणं हा इंग्रज आबालवृद्धांचा आवडता छंद. त्यात विशेष असं काही नाही. आमच्या दादरच्या कबुतरखान्यात ह्यापेक्षा जास्त कबुतरं गोळा होतात. कचरा जसा एका कोपऱ्यात गोळा करून ठेवावा तशी निरुद्योगी माणसं ट्राफलगार स्क्वेअरमध्ये किंवा पिकॅडेलीच्या चौथऱ्याभोवती जमतात, मन मानेल तेवढा वेळ पडून राहण्याकरता. त्याच्या पाठीमागे असलेली आर्ट गॅलेरी तर मला अगदीच टुकार वाटली. एकामागून एक ३४ दालनं पालथी घातली पण पाय थबकतील अशी एकही कलाकृती वाटली नाही. त्यातल्या त्यात एक बरं होतं. ती मॉडर्न आर्ट नव्हती. माणूस माणसासारखाच दिसत होता आणि घोडा खरा घोडा वाटत होता ! ह्या वर्षाच्या आमच्या लंडनच्या दुसऱ्या भेटीत आम्ही पुन्हा ह्या आर्ट गॅलरीत गेलो. तेव्हा आधीच्या अनुभवावरून नेमकी कोणती चित्रे पहावयाची तेवढीच जास्त निरखून पाहिली. त्यांची निसर्ग चित्रे (Land Scape) फारच सुंदर आहेत. रंगाची मुक्त उधळण आणि रंगसंगती मंत्रमुग्ध करणारी आहे, ह्याची प्रचिती आली.

## लंडनचे पिलाहाऊस–नव्हे रेडहाऊस की निळेहाऊस !

पिकॅडली सर्कस म्हणजे लंडनचे पिला हाऊस. बहुतेक सिनेमागृहं, नाट्यगृहं ह्या भागात आहेत. रात्री पिकॅडली नटूनथटून चमकत असते. रात्र झाल्यावर येथे दिवस उजाडतो. लंडनला मौज मजा करण्यास आलेल्या मंडळींची मक्का मदिना ती हीच. असंख्य रंगी बेरंगी दिव्यांच्या झगमगाटात पिकॅडली सर्कस न्हावून निघालेली असते. येथे शेक्स्पीअरची नाटकं जशी वर्ष वर्ष चालतात तशीच कामज्वर पीडीतांकरता स्वैर सेक्सी चित्रपटही चालतात. इंग्लंडमध्ये सेंसॉरशीप नाममात्रच आहे. त्यामुळे १८ वर्षांवरील कोणालाही हे रतीक्रिडायुक्त चित्रपट पहाता येतात. आणखी एक तेथं बरं आहे. केव्हांही तुम्ही थिएटरात जाऊन बसा आणि पाहिजे तेवढा वेळ बसा. खेळ सुरू होण्याच्या आणि संपण्याच्या वेळा नाहीतच. कंटाळा येईपर्यंत बसावे आणि मनमानेल तेव्हा चालू लागावे. कित्येक ठिकाणी एकाच्या डोक्यावर एक अशी तीन सिनेमा गृहे असतात. आणि तेथे निरनिराळी चित्रपट चालू असतात. दुपारच्या वेळी गर्दी फारशी. नसते '‘हे’ असलं' आपल्याकडे पहावयास मिळणार नाही म्हणून मी दोन 'असले' चावट चित्रपट पाहीले. एका तर 'टॅक्सी ड्रायव्हरचे अनुभव 'Adventures of a Taxi Driver' चित्रपटात चांगली गोष्टही होती

आणि भरपूर चावटपणाही '. पिकॅडलीला मी रात्री दुरूनच नमस्कार केला होता. त्यामुळे लंडनचे ' नाईट क्लब ' कॅबेरे वगैरे मला माहीत नाहीत.

## लंडन टॉवर

अलबर्ट हॉलवरून पुढे गेलं की लंडन टॉवर लागतो. जगातल्या सर्वात मोठ्या हॉलमध्ये अलबर्ट हॉलची गणना होते. ६॥ हजार माणसं बसण्याची त्यात सोय आहे. ध्वनीक्षेपण अत्यंत निर्दोष आहे. इतके की हॉलच्या कानाकोपऱ्यापर्यंत स्पष्ट ऐकू जाते. मोठमोठे गायक वादक ह्या हॉलमध्ये कार्यक्रम करण्याकरता धडपडत असतात. मी गेलो त्या सुमारास नेहरू स्मारक निधीकरता लता मंगेशकरचे तीन दिवस ओळीने कार्यक्रम झाले. तिन्ही दिवस ' हाऊस फूल ' होऊन शेकडो माणसं बाहेर उभी होती. एका कार्यक्रमालाही सबंध हॉल कधी भरत नाही असं म्हटलं जातं, पण लताच्या स्वर्गीय गाण्याकरता तीन्ही दिवस हॉल पूर्ण भरल्याने त्या हॉलच्या इतिहासात एक सोनेरी पान म्हणून उल्लेख करावा लागेल. मी त्या कार्यक्रमाला गेलो नव्हतो, परंतु टी. व्ही. वर मी तो सर्व कार्यक्रम पाहीला. आपल्याकडील सर कावसजी जहांगीर हॉल ही त्याचीच छोटी आवृत्ती आहे असं म्हणतात.

लंडन टॉवर हा इंग्लंडच्या हजार वर्षांची साक्ष देणारा भुईकोट किल्ला आहे. ह्या वास्तूनं अनेक राजांचे आणि राण्यांचे कारावास पाहिले आहेत. शिरच्छेद पाहिले आहेत. इंग्लंडचा बहुतेक इतिहास घडला तो ह्या किल्ल्यात, म्हणून त्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. किल्ल्यासभोवताली खंदक आहे आणि उत्तरेकडे चिकटून थेम्स नदी वाहात आहे आणि लंडनचा सुप्रसिद्ध टॉवर ब्रीज खडा आहे. जगातले लंडनला आलेले बहुतेक प्रवासी लंडन टॉवर पाहण्यास गर्दी करतात, त्यामुळे येथे तिकीटाकरता रांगाच रांगा लागलेल्या असतात. आत प्रवेश केला की जुन्या काळातील लाल डगले घातलेले आणि उंच टोप्या घातलेले रखवालदार आपले स्वागत करतात. तेथील एक पहारेकरी एकाच जागी पुतळ्यासारखा, जराही चेहरासुद्धा न हालविता तास न तास उभा असतो. गटागटात लोकांना आपल्या भोवती जमा करून टॉवरची माहिती सांगतात. पहिल्या चार्लसपासून सर वॉल्टर स्कॉट, क्वीन मेरी वगैरे सर्व जुना इतिहासाचा पाढा वाचतात. कोणाला कधी कोठे कैदेत ठेवले होते, कोणाला कोठें सुळी दिले वगैरे माहितीत मला फारसा रस नसल्यामुळे मी टॉवर ओलांडून मुख्य किल्ल्याच्या आत प्रवेश केला. शस्त्रास्त्रे, पुरातन कालापासून अद्यावत काळापर्यंतची पाहिली. जुनी शिरस्त्राणे, राजे राण्यांचे पोशाख, चिलखते व इतर युद्धोपयोगी साधने ह्यांचे भांडार पाहिले. पण मुख्य पाहाण्याचा भाग म्हणजे खजिनासंग्रह. खजिना महाल हा भाग जमीनीखाली खूप बंदोबस्तात आहे. जाड लोखंडी भिंती आड

बंदिस्त आहे. चोहो बाजूंनी बंदूका घेतलेले पहारेकरी तुमच्यावर नजर ठेवून असतात. शिवाय टी. व्ही. कॅमेरे माणसांच्या हालचाली टिपत असतात. इंग्रजांनी कित्येक वर्षे बहुतेक जगावर राज्य केलं आणि आपल्या साम्राज्यातून बहुमोल हिरे माणके सोने नाणे भरभरून आणून त्यांचा ह्या किल्ल्यात संग्रह केला बंदुकीच्या गोळीला न जुमानणाऱ्या काचेच्या बंदीस्त पेटचांतून ह्या सर्व खजिना लोकांना बघण्याकरता खुला आहे. पूर्वीच्या राजांच्या राजवाडचातील अनेक सोन्याच्या सुबक वस्तू येथे आहेत, सोन्याची मोठमोठी भांडी नक्षीकाम केलेली, भोजन टेबलावरील जेवण्याची भांडी, ताटं, वाटचा, पेले, मोठाले बाऊल, रक्षा पात्र, अनेक प्रकारचे राजदंड, सर्व शंभर नंबरी सोन्याचे. प्रत्येक वस्तूवर त्याचे तोळचात वजन लिहिले आहे. नुसता सोन्याचा पत्रा चढविलेले पात्र असले तर तसे त्यावर लिहिलेलं असेल. पण त्याकरता एकूण किती तोळे सोने लागले ह्याचा आकडा लिहिलेला असेल. त्या सोन्याच्या राशी पाहून आपण अलीबाबांच्या गुहेत तर आलो नाही असं वाटतं. पण त्याहून आश्चर्य पुढेच आहे, जेव्हा तुम्ही राजघराण्याचे दागदागिने बघू लागता तेव्हा. ते हिऱ्या माणिकांचे, पाचूचे असंख्य दागिने, ते नाना तऱ्हेनं नटविलेले हिरेजडीत राजमुकुट पाहून माणूस थक्क होतो. त्यातच एलिझाबेथ राणीच्या राजमुकुटावर असलेला सुप्रसिद्ध कोहीनूर हिरा आहे. सर्व हिऱ्यात दैदीप्यमान, आपल्या तेजानं तळपणारा तो कोहिनूर हिरा बाकी सर्व हिऱ्यात उठून दिसतो. त्याच्यावरून नजर काढाविशी वाटत नाही. तो एके काळी आपला होता म्हणून त्याची प्रसंशा करावी असं नाही. हिऱ्याची पारख नसलेला कोणीही तो एकदा पाहिल्यावर त्याला विसरू शकणार नाही. मग रत्नपारखी त्याची किती किंमत करीत असतील त्याचीं कल्पनाच करता येत नाही. एवढा मोठा सोन्याचा साठा आणि एवढा मोठा हिरेमाणकांचा खजिना पाहिल्यावर माणसाची सोन्याची लालसा आणि आसक्ती संपुष्टात न आली तरच नवल, एकादी पक्वान्नाची रास पाहूनच अन्नावरील वासना उडावी तशी. अमेरिकेच्या दुसऱ्या भेटीत (Natural History Museum) ह्या वॉशिंग्टन मधील भव्य म्युझियममध्ये जडजवाहिर दालन पाहिले. त्यात खाणीतून काढलेल्या मौल्यवान धातूच्या राशीच्या राशी पाहिल्या. सोन्याची माती व त्यातून काढलेले शुद्ध सोने, पाचू, माणके, त्यांचे प्रचंड खडे पाहून आपण अवाक होतो. जगातील सर्व हिऱ्याच्या खाणीतील हिरे तेथे पाहावयास मिळतात, काही ओबडधोबड तर काही पैलू पाडलेले, लंडनच्या किल्ल्यात अजूनही उत्खनन चालू आहे. अजूनही जुने अवशेष सापडत आहेत. जमिनीखाली खूप खोलवर तळघरे आणि भुयारे असल्याचा शोध लागला आहे.

किल्ल्याच्या एका टोकाच्या तटावरून पूर्वी कैद्यांना ठार मारून नदीत टाकून दिलं जात असे. एके काळी नदीचं पात्र किल्ल्याच्या तटाला भिडलेलं होतं. आता ते बरेच दूर हटविले आहे. किल्ल्यातून बाहेर पडल्यावर आपण थेम्स नदीच्या

काठावर येतो. तेथून टॉवर ब्रीजचे जवळून दर्शन होतं. साधारण ८।१० मजले उंचीच्या दोन टॉवरमध्ये हा पूल पुरातन काळी बांधलेला आहे. पुलाचा मधला भाग उंच होतो व त्या खालून मोठमोठ्या बोटी जा ये करीत असतात.

## जगविख्यात मेणाचे पुतळे

लंडनमधील आणखी एक वस्तू परदेशी पाहुणे न विसरता पाहातात ती म्हणजे मादाम टुसाचं मेणाच्या पुतळ्यांचं प्रदर्शन. ट्यूबनं बेकर स्ट्रीटवर उतरून किंवा बसनं मार्बल आर्च येथे उतरल्यावर जवळच हे मादाम टुसाचे जगप्रसिद्ध म्युझियम आहे. व त्याचेवर प्लॅनिटोरीयम आहे. दोनशे वर्षांपूर्वी मादाम स्टुसा (टुसा) ही फ्रेंच बाई फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळी फ्रान्समधून पळून येथे आली आणि तिनं मेणाच्या बाहुल्या बनविण्यास सुरवात केली. त्यांतूनच तिच्या वंशजांनी हे आजचे भव्य म्युझियम उभे केले आहे.

प्रवेशद्वारापाशीच प्रथम ' बॉबी ' आपल्याकडे रोखून पाहातो. म्हणून आपण त्याच्याकडे टक लावून पहात राहातो, एवढा तो खरा वाटतो. पहिल्याच चौकात कारंजं आहे. त्याच्या कट्ट्यावर काही जोडपी थुईथुई उडणाऱ्या पाण्याकडे एकटक बघत बसलेली दिसतात. त्यातच एक म्हातारा गळ टाकून मासे पकडण्यात मग्न झालेला दिसतो. ह्या सर्वांचे चेहरे इतके बोलके आहेत, त्यांनी घेतलेल्या पोझेस इतक्या खऱ्या वाटतात की काही क्षण आपण तेथेच थबकून उभे राहातो. त्यानंतर दालनामागून दालनं लागतात, आणि जगातल्या यच्चयावत आजी आणि माजी नेत्यांचे, कलाकारांचे दर्शन घडते. ते अवर्णनीय आहे. फक्त मुखवटे, हात आणि पाये आणि शरीराचा जेवढा उघडा भाग असेल तेवढाच मेणाचा, बाकी भाग सुटा-बुटात अथवा झग्यात झाकलेला. मात्र चेहरे इतके आकर्षक आहेत की काही पुसू नका. केसांची ठेवण, चेहऱ्यावरील सुरकुत्या, आपल्या डोळ्यांशी भिडणारे डोळे, फार काय हाता पायावरील नसा देखील हुबेहूब त्या वयालाच दिसणाऱ्या. प्रत्येक पुतळा स्थीतप्रज्ञासारखा निःश्चल उभा नाही तर त्याची गतीदर्शक पोझ आहे, की ज्यातून त्या व्यक्तीचं स्वभावदर्शन व्हावं. चेहऱ्यावरील भाव आणि त्यानं घेतलेली पोझ ह्यांचा सुरेख संगम झाल्यामुळेच ते पुतळे, पुतळे असूनही जिवंत माणसं वाटतात. चर्चीलची करारी मुद्रा, केनडीचा हास्यवदन चेहरा, स्टॅलीनचा पोलादी, गूढ मुखवटा, हिटलरच्या क्रूर चेहऱ्यातून आणि आग ओकणाऱ्या डोळ्यांच्या स्फुल्लिंगातून त्या व्यक्ती आपल्यापुढे सजीव उभ्या राहातात. गांधींचा पुतळा फार जुना आहे, बराच तरुणपणाचा आहे म्हणून तो एवढा पटत नाही. परंतु अलिकडेच इंदिरा गांधींच्या पुतळ्यातून एक करारी, जगाला आव्हान करणारी, ताठ मानेची असामान्य स्त्री नजरेसमोर येते. राजघराण्यातील सर्व आजी माजी राजपुरुषांचा आणि राण्यांचा तेथे दरबार भरलेला आहे. काही इतिहासकालीन प्रसंग जिवंत

होऊन तोच 'खेळ' पुन्हा करून दाखविल्याचा भास होतो. मादाम टुसाच्या नजरेतून इतिहासातील कौर्य, भीषण हत्या, हिटलरचा नरमेध, खुनी, दरडेखोर हेही सुटलेले नाहीत. ह्या म्युझियमच्या तळघरात 'हॉरर सेल' म्हणून जो भाग आहे त्याचे प्रवेशद्वारी हिटलरचा पुतळा आहे. आणि आतमध्ये कुप्रसिद्ध खुनी, क्रूर राजे आणि त्यांनी घेतलेले बळी, सुळावर चढविलेले राजे आणि राण्या ह्यांचे त्यावेळच्या प्रसंगानुसार पुतळे आहेत. ते पाहून भीतीनं थरकाप होतो आणि मन उदास होतं. भीतीदायक व गूढता वाढविणाऱ्या भन्नाट संगीतानं आणि चित्रविचित्र आवाजानं आपलं डोकं सुन्न होतं.

पुढे हॉलीवूडला असेच एक मेणांच्या पुतळ्यांचे प्रदर्शन पाहिले. तेथे जुने नट नायिकांचे व जुन्या चित्रपटावर काही प्रसंग चित्रीत केलेले आहेत पण त्याला ह्या मादाम टुसाची सर नाही. मात्र ह्या सर्वांवर कडी केली आहे ती डिसनेलँड मधील अब्राहम लिंकनच्या बोलत्या पुतळ्याने. पण त्यासंबंधी नंतर.

## युरोपची धावती सफर बोटीचा प्रवास

लंडनला येऊन आठ दिवस झाले होते. आता मध्येच युरोपचा दौरा करावा. व पुन्हा लंडनला यावे म्हणून मी युरोपला जाण्याच्या तयारीला लागलो.

माझ्या सर्व प्रवासात युरोपचा प्रवास कंटाळवाणा आणि जिकरीचा ठरला. आधी कोणत्याही प्रवासी कंपनीचं तिकिट मिळेना. मोठ्या मुश्कीलीनं मिळालं ते फक्त फ्रान्स, बेलजियम व हॉलंड हे तीनच देश बघण्याचं. ह्या तिन्ही देशांचा व्हिसा माझा मलाच काढावा लागला कारण, आयत्या वेळी आलेल्यांची व्हिसाची जबाबदारी कंपनी आपल्या अंगावर घेत नाही. सकाळी ७। वाजता व्ही. टी. स्टेशनवरून 'कॉसमॉस' ह्या सुप्रसिद्ध प्रवासी कंपनीची स्पेशल ट्रेन सुटली ती फक्त दीड तासात १०० मैल डोव्हर येथे पोहचली. गाडीला सर्वचे सर्व डबे पहिल्या वर्गाचे व प्रत्येकाची जागा 'सुरक्षित' त्यामुळे कोणताच त्रास झाला नाही. त्यानंतर कस्टम व इमिग्रेशन बॅरीकेडचे सव्यापसव्य. कारण, आम्हांस बेलजियमच्या ऑसडेन बंदराला पोहोचवायचे होते. आम्हांला नेणारी बोट तयारच होती. त्याने आम्ही साडेतीन तासात ऑसडेनला पोहोचलो. आतल्या चांगल्या मऊ मऊ गाद्यांवर बसण्याऐवजी फाजील उत्साहानं आम्ही (मी व दिल्लीचे दोन व्यापारी मित्र) भाड्याच्या घडीच्या खुर्च्या घेऊन डेकवर बसलो आणि पस्तावलो, कारण अंगाला वारा झोंबत होता. थंडी मी म्हणत होती. पण आता आत जाऊन बसण्यास जागा नव्हती. ह्यावर उपाय म्हणून आम्ही दोघे चहा फराळाचे आणण्याच्या निमित्तानं जे रेस्टारंट पाशी गेलो ते तेथेच दीडतास रमलो. डेकवरील आमचा तिसरा म्हातारा मित्र खुर्च्या व सामान सांभाळीत बसला होता. तो आम्ही परत येईपर्यंत खुर्च्या उचलून आडोशाला आला होता. आम्ही ऑसडेनला आलो तेव्हा दुपारचे बारा वाजले

होते. किनाऱ्यावर अनेक बसेस व त्यांचे गाईड आमची वाट पहात उभे होते. दुसऱ्या कंपन्यांच्या एक दोन बसेस तर 'कॉसमॉस' कंपनीच्या २५ चे वर बसेस हारीनं उभ्या होत्या. त्या निरनिराळ्या दिशेनं जाणार होत्या. कॉसमॉसच्या वाटाड्यांनी अर्ध्या तासात सर्व प्रवाशांना आपल्या बसमध्ये बसविले. आणि त्या सर्व बसेस चारी दिशेस पांगल्या. आमची 'टूर' आयत्यावेळची 'जादा' होती म्हणून आमची बस तेथेच रेंगाळली. तास झाला तरी हलेना. ऊनही जाणवू लागलं तेव्हा आम्ही एकच गिल्ला करण्यास सुरुवात केली.

## आमचा मामा केला

आमचा 'कोरीयर' व ड्राईव्हर दोघेही नवीन होते आणि पुढे ते ठिक-ठिकाणी वाट चुकत व बस पुन्हा मागे आणत. ऑसडेन शहरातून बाहेर पडायलाच त्यांना रस्ता सापडेना. आम्ही पुन्हा पुन्हा त्याच त्या चौकात परत येत होतो. शेवटी मोठ्या रस्त्याला लागून बस भरधाव पळू लागली तेव्हा तीन वाजून गेले होते. बोटीवर जो काही चहा फराळ केला तेवढाच. त्यानंतर घशाला कोरड पडली तरी काही पेय नाही. मी मात्र पाण्याची बाटली बरोबर घेतली होती, कारण मला सल्ला मिळाला होता की युरोपमध्ये सर्व काही मिळेल पण पाणी मिळणार नाही. आम्हाला संध्याकाळपर्यंत पॅरीस गाठावयाचे होते पण ते आता अशक्य वाटू लागले. वाया गेलेला वेळ भरून काढण्याकरता ड्रायव्हर गाडी न थांबविता तशीच हाणीत होता. शेवटी लोकांनी पुन्हा गिल्ला केल्यावर गाडी एका मोटेलपाशी थांबली आणि आम्ही सुस्कारे सोडीत उपहारगृहाकडे धाव घेतली. बोटीवर जवळच्या पौंडांचे रुपांतर बेलजियमच्या नोटात करून घेतले होते. त्यात हजार, पाचशे, शंभर अशा आकड्यांच्या नोटा होत्या म्हणून मी पुष्कळ पैसे असल्याच्या खुषीत होतो. पण दोन सँडविचेस चहा घेतल्यावर त्यातील दोन नोटा गायब झाल्या ! पुढे तर चहा घेतल्यावर चिल्लर नाणी मूठ भरून पुढे करावी तर बहुतेक सर्व उचलून घेतली जात. नंतर युरोपच्या देशोदेशीच्या चलनाचं रुपांतर नीट झालं आहे की नाही हे बघण्याचा नाद मी सोडून दिला. देतील तेवढ्या नोटा अथवा नाणी मुकाट खिशात घालावयाची आणि उपहारगृहात मूठभर त्यांचे पुढे करावयाची अशी सवय करून घेतली. साहेब फसविणार नाही ह्या हिशोबानं. माझं 'चलन फुगवटा' 'आंतर-राष्ट्रीय नाणेबाजार' वगैरे मौलिक ज्ञान ह्या चलन हस्तांतरात फार थिटं पडलं हेच खरं ! पुढे पुढे तर आमच्या लक्षात आलं की आमचा 'कोरीयर' विशिष्ट उपहारगृहातच आपली नाणी बदलून घ्या असे पुन्हा पुन्हा आग्रहानं सांगावयाचा आणि उपहारगृहाच्या चालकाशी हात मिळवणी करून आमचा 'मामा' करा-यचा ! युरोपमधील हा अनुभव फारसा उत्साहजनक नाही.

बेल्जियमच्या हद्दीतून जाताना पश्चिमकिनाऱ्याजवळ डंकर्क लागलं. हिटलरच्या

तुफानी फौजांनी इंग्रज पलटणींना कोंडीत पकडून त्यांची कत्तल केली ते हे डंकर्क. इंग्लंडच्या तोंडचं पाणी पळाले होतं आणि सर्व जग हिटलरच्या नेत्रदीपक मुसंडीनं हृतवल झाले होते ते हृया 'डंकर्क'च्या अमानुष कत्तलीनं. डंकर्क हृया उंचसखल आणि कालव्यांनी वेष्टिलेल्या भूप्रदेशातून जाताना हिटलरच्या झंझावती हल्ल्यांचा आणि इंग्लंडच्या दीनवाण्या प्रतिकाराचा चित्रपट माझ्या डोळ्यांपुढून सरकला.

## मोहमयी पॅरिस आणि नंगा नाच

पॅरीसला आम्ही पोहोचलो तेव्हा रात्रीचे साडेदहा वाजले होते. आमची बस हॉटेलजवळ थांबून आणि आम्ही आपआपल्या खोल्यांच्या किल्ल्या हस्तगत करी-पर्यंत रात्रीचे ११ वाजले. माझ्यासारख्याकरता सिंगल खोली नव्हती म्हणून माझ्यावरोबरच्या एका सहप्रवाशावरोबर मी भागी केली. हमीद नावाचा तो पोलीस ऑफिसर मलेशियातून स्कॉटलंडयार्ड मध्ये प्रशिक्षण घेण्याकरता आला होता. त्याला इंग्रजी येत होते पण तो वोले ते 'च्याऊं चुयी' सारखे, चीनीभाषे-सारखे वाटे. तो मितभाषणी होता म्हणून ठीक होतं नाहीतर, त्याच्याशी संभाषण करणं कठीणच. निरनिराळ्या देशातून आलेल्या त्या परदेशी पाहुण्यात इंग्रजी बोलणारे फारच थोडे. आपला भारतीय माणूस त्या मानानं फारच चांगलं शुद्ध इंग्रजी बोलतो आणि 'सुसह्य' उच्चार करतो. अमेरिकेत माझ्यावरोवर प्रवास करणाऱ्या एका इस्त्राईल वाईनं तर मी इंग्रजीचा प्रोफेसर आहे का असं विचार-ल्यावर मी चक्क लाजलो! डिनरची वेळ टळून गेली होती. ते मिळणे शक्यच नव्हते. माझ्या लोटच्यात लाडू होते. लोटच्यात हळूच हात घालून बचकभर गोळा तोंडात टाकला आणि बाटलीतील पाणी प्यालो. नको नको म्हणतानाही मिसेस जोशींनी लाडू दिले होते ते असे कामाला आले, 'तहान लाडू भूक लाडू' का म्हणतात ते मला आज समजलं. खोलीत सामान टाकून 'रात्रीचे पॅरीस' व कॅबेरे पाहाण्याकरता पुन्हा वसमध्ये बसलो. गाडी निरनिराळ्या चौकांना वळसा घालून जात होती. काही वेळानं दिव्यांचा झगमट वाढला. सिनेमागृहे, नाटचगृहे रंगी-बेरंगी दिव्यांच्या रोषणाईत न्हावून निघाली होती. शेवटी आमची बस एका गजबजलेल्या चौकात येऊन उभी राहिली. आणि आम्ही आमच्या 'कोरियर'च्या पाठीमागून जाऊ लागलो. आता हृया ठिकाणी सर्व कॅबेरेगृहेच आहेत. त्यातील लिडो नावाचे प्रख्यात. दुतर्फा नटलेल्या, तोंडाला रोंगण लावलेल्या आणि अंगावर नाममात्र कपडे असलेल्या (की नसलेल्या) वारांगना परदेशी पाहुण्यांना खुणावीत होत्या. आम्ही त्यांच्या अंगावरून एक छोटचा कॅबेरेगृहात गेलो तेथे खेळ सुरू झालेलाच होता. एका अर्धवर्तुळावर पोरी नाचत होत्या. झींग आणणारं संगीत चालू होतं. पत्त्यांच्या हातचलाखीचे खेळ झाले, वर्तुळाकार कडी एकात एक अडकवण्याचे आणि ते पुन्हा सुटे करून दाखविण्याचा खेळ झाला. पुन्हा एकदा अर्धनग्न मुलींचा नाच

झाला, स्त्रीपुरुषांचा बॅले झाला, सर्कशीतील उड्या झाल्या आणि शेवटी फनाले म्हणून एका संपूर्ण कपडे घालून आलेल्या बाईचा एक एक कपडा उतरवीत संपूर्ण नग्न होईपर्यंत नाच झाला. आणि खेळ संपला. यातील एकही प्रकार करमणूक करणारा, सुखावणारा, गुदगुल्या करणारा, खऱ्या अर्थानं शृंगारिक, उद्दीपक किंवा कामवासना जागृत करणारा नव्हता. कारण जे पाहिलं ते सामान्य दर्जाचं होतं. पैसे टाकून जे नग्न स्त्रीचे दर्शन झाले ते त्यापूर्वी वाटेत पैसे न देताच सहज घडलेलं होतं ! मात्र ह्या कॅबरे ' मध्ये एकच आयटेम असा होता की त्याची गोडी अवर्ण-नीय होती. ते म्हणजे एका युवतीचं गाणं. पायाच्या घोटचापर्यंत पसरलेला शुभ्र झगा घालून ती सुंदर युवती माईकपुढे उभी राहिली तीच अशा ऐटीत की मी नुसत्या आवाजानं ह्या लोकांचं भान हरवून टाकीन, मला माझ्या अंग प्रत्यंगाचं नागडं उघडं प्रदर्शन करण्याची जरूर नाही. ' गाऊन गाऊन तिचा आवाज बसला होता, पण तिच्या गळ्यातून निघणाऱ्या सुरांचा स्रोत, तिचा दिलचस्प ठेका, अंगाची मोहक हालचाल, तिच्या चेहऱ्यावर उमटणारे आणि क्षणाक्षणाला बदलणारे भाव, डोळ्यांची उघडझाप आणि दोन्ही हातांची लयबद्ध नाजुक हालचाल, फ्रेंच भाषेतील मधाळ टिपकणारे शब्द ऐकणाराला जणू कवेत घेऊन हळूच त्याच्या कानात ओतावेत म्हणजे त्याच्या अंगावर जसे रोमांच उठावेत तसे वाटले. फक्त तीन वाद्यांच्या धुंद साथीत तिनं गायलेली ती तीन गाणी म्हणजे बडे गुलामअल्लींचा ' मालकौंस ' अमीरखांचा ' दरबारी ' आणि रसूलनबाईची ठुमरी ! अजूनही ती रुपगर्विता गाणं संपवून अभिवादन करीत व तरंगत, तरंगत, ऐकणाऱ्याच्या अंतःकर-णाला मऊ मऊ पदस्पर्श करीत अदृश्य झालेली दिसते ! ' रात्रीचं पॅरिस ' म्हणून मिटक्या मारीत सांगणारे आतापर्यंत ऐकत होतो. आज ते प्रत्यक्ष पाहिल्यावर मला त्याची शिसारी आली. पॅरिसला दुनियेला देण्यासारखं फक्त एवढेच असावं, उजेड दिसला काय तो येथेच. बाकी सर्व अंधार. ना कधी धड स्थिर सरकार, ना काही आर्थिक उन्नती, की औद्योगिक प्रगती. दुनियेला उल्लू बनवून त्याला ' रात्रीचं पॅरिस ' दाखवून त्याच्या खिशावर डल्ला मारावयाचा हाच पॅरिसचा मुख्य उद्योग असावा. एक ग्लास शॅंपेनच्या मोबदल्यात बारा पौंड मोजून फोरास रोड बघणारे आम्हीही उल्लूच !

## फाजील नटवी गाईड

' रात्रीचं पॅरिस ' झाल्यावर सकाळचं पॅरिस ओघानेच आलं. सकाळी ९ वाजता आमची बस पुन्हा सज्ज झाली. आता आमच्या बॉबी कोरीयरच्या ऐवजी एक फ्रेंच बाई आमची गाईड म्हणून गाडीत चढली. तिचे इंग्रजीचे उच्चार फ्रेंच लोण्यात तळलेले असल्यामुळे मराठी भाषा रोमन लिपीत लिहिल्यावर वाचणारा जसे वाचील तशी ती इंग्रजी बोलत होती. बाई जरा ' जादा ' होती आणि तिला ठिकाणावर आणण्याचं अप्रिय काम मलाच करावं लागलं. तेव्हा मी क्षणात हिरो

बनलो, कारण सर्वांनीच माझं म्हणणं उचलून धरलं. बस् रस्त्यामागून रस्ते आणि चौकांमागून चौक ओलांडीत होती. नॉतरडॅम आतून बाहेरून पाहिला. पॅरिसच्या अनेक जुन्या इमारती पाहिल्या पण फ्रेंच हे जगात स्थापत्य शास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत ह्याचा कोठे ठसा उमटलेला दिसला नाही. पॅरिसचं मोठे आकर्षण म्हणजे एफ्. एल. टॉवर. आम्हांला वर जाऊन बघण्यास अवसर नव्हता पण स्थापत्य शास्त्राचा एकमेव पुरावा म्हणून 'जगातल्या नऊ आश्चर्यां' पैकी एक म्हणून ह्याचा उल्लेख करावा लागेल. पॅरिसमध्ये कालवेच कालवे आणि झाडांच्या पंक्ती आहेत. (८०० कालवे आणि एक लाख दहा हजार झाडे इति ती फाजील गाईड) पण नंतर पाहिलेल्या अमरस्टरडॅम आणि हेगच्या मानानं काहीच नाही. दुपारी लंचला मोठ्या उपहारगृहात न जाता आम्ही रस्त्याच्या आजूबाजूला असलेल्या छोट्या कॅफेमधून सँडविचेस वगैरे घेऊन खाल्ली. येथे जेथे तेथे टीप द्यावी लागते. टॉयलेटमध्ये गेलो तरी तेथे ठाण मांडून बसलेली बया आमच्यापुढे हात पसरून उभी राहिली. एकंदरीत, पॅरिसबद्दल काही चांगलं मत झालं नाही. त्यामुळे मोना लिसा' सारखं जगप्रसिद्ध चित्र पाहावयास जाण्याचा उत्साह राहिला नाही. येथे मर्सेडीज गाड्या बहुतकरून टॅक्सीमध्ये आहेत. बाकी रस्ते बेकार, म्युनिसिपाल्टीचे नळ वाहात आहेत. रस्त्यावर कचऱ्याचा ढीग आणि त्यातूनच वाट काढीत प्रेमी युगलं गळ्यात गळा घालून भर दुपारी हिंडत आहेत.

आता आमची बस ब्रुसलच्या वाटेकडे दौडू लागली. रस्त्याच्या दोन्ही बाजूला लांबवर पसरलेली शेतं, त्यातून वाहणारे कालवे आणि त्यात गळ टाकून बसलेले म्हातारे हे दृश्य आल्हाददायक होते. आता पुन्हा आमचा मूळ कोरीयर बॉबीनं सूत्रं आपल्या हातात घेतलेली असतात. तो सारखा नकाशा चाळवीत असतो म्हणून मी त्याला विचारल्यावर तो म्हणाला 'मी लंडन विद्यापीठाचा विद्यार्थी आहे. समरमध्ये सुटीत असा जॉब करून मी माझी फी बाहेर काढतो. माझी ही पहिलीच ट्रीप आहे. 'तुमची गैरसोय झाली त्याबद्दल मला क्षमा करा.' तेव्हा त्याला माफ करून माझ्या पाठीमागच्या सीटवर काय 'हंगामा' चालला आहे ते पाहू लागलो. माझ्या पाठीमागच्या दोन रांगांवर इराणी कुटुंब होती. मध्यपूर्व आणि अरब राष्ट्रांजवळ तेलाच्या वाढत्या किंमतीमुळे अफाट पैसा आला आहे. तो उडविण्या-करता ही मंडळी मुलाबाळांसह अलिकडे युरोप अमेरिकेचे दौरे करतात. पोषाख कसाही केला तरी इराणी माणसं तात्काळ ओळखता येतात, ती एकूण नऊ माणसं निरनिराळ्या ठिकाणी बसली होती आणि गाडी चालू असतानाही एकमेकांजवळ लगट करून थट्टा विनोद करीत होती. मध्येच एक ओसाड प्रदेश लागला तेव्हा बॉबीनं आपण वाटर्लूमधून जात आहोत असं सांगितलं. आम्हांला लगेच नेपोलियन बोनापार्ट आठवला. एका भग्न गढीकडे बोट दाखवून येथेच वाटर्लूची लढाई झाली असं म्हणाला. खरं खोटं देव जाणं.

## ब्रुसेल्स–डबल रोटी डबल चिकन

फ्रान्सची हद्द ओलांडून आम्ही ब्रेल्जियमच्या हद्दीत पुन्हा प्रवेश केला. कस्टमचे सोपस्कार लवकरच आटोपले आणि आम्ही चहा करता एका मोटेलपाशी थांबलो. युरोप, इंग्लंड आणि अमेरिकेत हमरस्त्यावर ठिकठिकाणी मोटारी थांबण्याकरता आणि चहा जेवण करण्याकरता मोटेल्स आहेत. प्रवाशांना येथे रात्री मुक्काम करण्याचीही सोय आहे. आम्ही चहा घेऊन निघालो ते सायंकाळी ६ वाजता ब्रुसेल्स शहरात पोहोचलो. बस शहराच्या मध्यभागातून गेल्यामुळे बहुतेक ब्रुसेल्स शहर पाहून झालं म्हणून रात्री पुन्हा ब्रुसेल्स पाहण्यास निघालेल्या बसमधून आम्ही (दोघे पंजाबी मित्र आणि मी) हॉटेलातच थांबलो आणि डिनरची वेळ झाल्यावर पोटभर जेवण घेतले. पंजाबी मित्रांपैकी एकाला चिकन एवढे आवडले की तो टेबल बदलून पुन्हा जेवला ! रात्री पायी पायी चालत 'नेत्रखरेदी', (Window Shopping) केली. दुकानांमागून दुकाने न्याहळीत जा, त्याला पैसे पडत नाहीत. तेथील ट्रॅम मुंबईच्या जुन्या ठणठण करीत जाणाऱ्या ट्रॅमसारख्या आहेत. शहर स्वच्छ आहे. आणि रस्तेही रुंद आहेत.

## नयनरम्य हॉलंड–आग्रह करून खाऊ घालणाऱ्या डच युवती

सकाळी ७॥ वाजता ब्रेकफास्ट झाल्यावर आमची बस हॉलंडकडे मार्गस्थ झाली. दहा वाजता एके ठिकाणी चहा झाल्यावर आम्ही दुपारी एक वाजण्याचे सुमारास ॲमस्टरडॅम मुक्कामी पोहोचलो. वाटेत व्हिसा तपासणे वगैरे विधी झाले. ॲमस्टरडॅमला जेथे आम्ही दुपारच्या जेवणाकरता थांबलो ते हॉटेल अतिशय सुंदर होते. एका बाजूनं समुद्र भिडलेला, दुसऱ्या बाजूला कालवे आणि त्यात असंख्य रंगीबेरंगी बोटी नांगरलेल्या, समोर, एक समुद्राकडे चढत गेलेला बोळकंडीवजा रस्ता आणि त्या रस्त्याला दुतर्फा नानाविध वस्तुंची छोटी छोटी दुकानं. त्या दुकानांभोवती डच युव-युवती यांच्या पूर्वापार चालत आलेल्या पोशाखात तुमचेबरोबर फोटो काढून घेण्यास, नाचण्यास उत्सुकतेने वाट पहात असलेल्या पाहून फार गंमत वाटली. हे शहर सुंदर तशी येथील माणसही सुंदर, रसरसलेली. एका मोठ्या हॉलमध्ये आमची स्पेशल पंगत पार्वतीपते म्हणून जेवायला बसली. सूप, मार्कोनी, चिकन, तळलेले मासे, नानाप्रकारचे आणि रंगाचे चीजचे चक्ते खाऊन 'वरण भात त्यावरी लिंबू, केशरीभात जिलेबी पक्वान्ने पाच, डाव्या बाजूला चटण्या कोशिंबीर बहुत' वगैरे पेशवाईतील मेजवानी जेवल्याची ढेकर आली आणि नसलेल्या उदबत्त्यांचा सुवास नाकात दरवळला ! हॉलंडमध्ये दुधदुभतं भरपूर. माणसं दिलदार, फ्रेन्च माणसासारखी कद्रू नाहीत. घरी आलेल्या पाहुण्याला किती खायला घालू आणि किती नको ही आमची भारतीय परंपरा त्या वाढप करणाऱ्या डच युवतींच्या तोंडावरून ओसंडत होती.

आम्ही तृप्त होऊन त्या बाजारात चांगले दोन तास सैरभैर फिरत होतो. देशोदेशींच्या आलेल्या, चित्रविचित्र पोशाख केलेल्या प्रवाशांचे तांडेच्या तांडे इतस्थतः फिरत होते. डच युवक युवती नाचून, नकला करून, रंगीबेरंगी पोशाख करून सर्वांची करमणूक करीत होते. हे पहाण्यात मौज होती. अशी 'मजा पुन्हा न मिळे पाहण्या नरा.'

संध्याकाळी ६ वाजता आम्ही हेग मुक्कामी पोहोचलो. येथेही आमचे हॉटेल समुद्रकिनाऱ्यावर होते. हॉटेलमध्ये बॅगा टाकल्या आणि आम्ही तिघे त्या लांबच लांब पसरलेल्या किनाऱ्यावर फिरावयास गेलो. असा लांबच लांब पसरलेला किनारा गोव्याला कोळवा बीच आहे आणि अलिबागलाही आहे. पण तो उपेक्षित राहिला आहे. आम्ही थोडा वेळ चाललो आणि मग आम्हांला परत फिरावे लागले कारण वारा तोंडावर मारीत होता आणि थंडीही वाढत होती. हॉटेलमध्ये परत आलो तो बॉबी आमचीच वाट पहात होता. आम्हांला रात्रीच्या जेवणाकरता दुसऱ्या एका हॉटेलात जावयाचे होते म्हणून आमची वरात निघाली. पंधरा मिनिटांच्या रस्त्यावर बॉबी आम्हांला आमच्या जेवणाच्या हॉटेलमध्ये घेऊन गेला. येथेही जेवण उत्तम होते. वाढणाऱ्याही. एकंदरीत उच्च अगत्य आणि डच सुंदरी ह्यात सरस नीरस ठरविणं कठीणच !

परत येताना वारा अंगाला झोंबत होता आणि थंडी मी म्हणत होती. कसे बसे हॉटेलला परत आलो आणि बोलता बोलता गाढ झोपी गेलो.

## वारुळातून मुंग्या बाहेर आल्या !

सकाळी ७॥ वाजता ब्रेकफास्ट घेऊन आम्ही हॉलंडचा निरोप घेतला आणि पुन्हा ओसडेन बंदराकडे कूच केले. आता आम्ही बेल्जियमच्या समुद्रपट्टीकडून जात होतो. दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास एक खाडी ओलांडावयाची होती. फेरीबदर जवळ आल्यावर मोटारीच्या रांगाच रांगा दिसू लागल्या. सर्वांनाच पलिकडे जावयाचे होते. आता येथे खूप खोटी होणार असं वाटत होतं, परंतु काय आश्चर्य! सर्वच्या सर्व गाड्या,बसेस ट्रक त्या बोटीच्या पोटात गडप झाल्या. किमान २०० गाड्या तरी त्या बोटीच्या तळावर रांगेत उभ्या होत्या. आम्ही बसमधून उतरून वर डेकवर गेलो आणि बोट सुरू झाली. सुमारे पाऊण तासात बोट पैलतीराला पोहोचली. आम्ही पुन्हा बसमध्ये चढलो. आणि वारुळातून मुंग्या बाहेर पडाव्या तशा त्या सर्व मोटारी बाहेर पडल्या आणि रस्त्याने चालू लागल्या. पूर्वी धरमतरच्या खाडीवर पूल झाला नव्हता तेव्हाची गोष्ट आठवते. आम्ही वडखळ नाक्यावर दहीपोहे खात बसलो होतो. तेवढ्यात कोणी तरी सांगितले 'साहेब, लवकर खाडीवर जा नाहीतर 'तर' एकदा का पलीकडे गेली तर परत येणं कठीण.' पोह्याचा घास आमच्या घशातच अडकला आणि आम्ही खाडीकडे धाव घेतली. वेळ

सूर्यास्ताची आणि खरंच 'तर' पलीकडे गेलेली. नावाड्याच्या नावानं खूप हाका मारल्या तेव्हा कोठे तासाभराने 'तर' आमच्या किनाऱ्याला आली, तोपर्यंत नावाडी मात्र 'पैलतीराला' पोहोचला होता !

आम्ही ओडसेन शहरात आलो तेव्हा दुपारचा एक वाजला होता. एका हमरस्त्यावरील हॉटेलसमोर आम्ही गाडीतून उतरलो आणि आमचा कोच गेला, तो कायमचाच. कारण आमचा बसचा प्रवास आता संपलेला होता. येथेही आम्ही हॉटेलमध्ये न खाता स्वयंसेवा (Self service) कॅफे मधून ब्रेड बटर सॅलाड वगैरे घेऊन खाल्ले. ह्यात पाहिजे ते मागून खाता येते आणि पैसे पुष्कळच वाचतात. त्यांच्या लंच किंवा डिनरमधला एकही पदार्थ आपण आवडीने खाऊ शकत नाही आणि पैसे आणि टीप खिशाला न परवडणारी. ऑसडेन शहर ॲमस्टरडॅमच्या खालोखाल सुंदर आहे. तसेच कालवे, भुयारी रस्ते, रंगीबेरंगी बोटी आणि वाखाणण्या जोगी स्वच्छता. येथूनच आम्ही पुन्हा परतीची बोट पकडली तेव्हा दुपारचे २–३० वाजले होते. ही बोट फारच शानदार होती. बसण्यास प्रशस्त मऊ मऊ गाद्या, प्रत्येक चार खुर्च्यामागे एक टेबल. ह्यावेळी आम्ही मागील चूक दुरुस्त केली आणि एका कोपऱ्यातल्या खुर्च्या अडवल्या. ७ वाजता डोव्हरला आल्यावर पुन्हा कस्टम आणि इमिग्रेशनची 'जाँच' झाली आणि आम्ही लंडनला येणाऱ्या व आमच्याकरता राखून ठेवलेल्या स्पेशल ट्रेनने रात्री ठीक ९ वाजता व्ही. टी. स्टेशनवर पोहोचलो.

## पासपोर्ट हरवला !

जोशी कुटुंब मला पोचविण्यास आले होते. तसेच आता मला घेण्यासही येणार होते. स्मिथच्या दुकानाजवळ थांबावयाचे अशी खूण ठरली होती. पण जोशी तेथे दिसेनात म्हणून स्मिथच्या खालीच तळघरात टॉयलेट रुममध्ये गेलो. तोंडावर पाणी मारलं, तोंड पुसलं आणि ओले हात गरम करण्याकरता तेथे प्रत्येक ठिकाणी गरम वाफेरे असतात त्याखाली हात धरले आणि माझी हातपिशवी आणि दुसरी एक प्लॅस्टिकची पिशवी उचलून वर आलो. स्मिथच्या दुकानापाशी पुन्हा पाहिले तरी जोशी नाहीत. तेवढ्या थोड्या अंतरावर मला तसेच दुसरे एक स्मिथचे दुकान दिसले. दोन्ही पिशव्या हातात घेऊन गडबडीने मी तिकडे धावलो. तेथेही जोशी नव्हते. तेवढ्यात मला आठवले की माझी चामड्याची हँडबॅग जिच्यात माझा पासपोर्ट होता, पैसे होते आणि सर्वांचे पत्ते असलेली डायरी होती ती मी टॉयलेट रुममध्येच विसरून आलो आहे. माझ्या अंगावर काटा उभा राहिला, पाय लटपटू लागले आणि मी जिवाच्या आकांतानं टॉयलेट रुमकडे धावलो. माझी बॅग जशीच्या तशीच आरशाजवळ उभी होती. आधी पासपोर्ट बघून घेतला आणि एखाद्या मातेने हरविलेलं मूल परत मिळाल्यावर त्याला कवटाळावं, परत परत त्याची चुंबनं

घ्यावी तसं मी बॅगेला घट्ट कवटाळून घेतलं आणि जोशींच्या शोधात पळत सुटलो. तेवढ्यात जोशी दुसऱ्या स्मिथच्या दुकानात दिसले आणि म्हणाले, ' मी केव्हा-पासून तुमची वाट पहात आहे. ' स्मिथचं आणखी तिसरं दुकान होतं आणि तेथे ते वाट पहात होते !

बॅग विसरण्याचं कारण असं. आतापर्यंत माझ्या हातात एक हातपिशवी आणि एक हातात ठेवावयाची चामड्याची बॅग होती. बोटीत येताना व्हिस्कीच्या बाटल्या आणि सिगरेटच्या पेट्या ड्यूटी फ्री मिळतात त्या घेतल्यानं त्यांची एक प्लॅस्टीकची बॅग वाढली. आणि माझ्या हातात आता तीन बोजे झाले होते, त्याची सवय न झाल्यानं नेहमीप्रमाणे मी दोन पिशव्या उचलल्या आणि नेमकी महत्त्वाची बॅग घेण्यास विसरलो.

हा भयकर अनुभव आल्यापासून मी माझा पासपोर्ट जानवे अडकवावे तसा कायम अंगावर वाळगला. तो प्रसंग आठवून अजूनही अंगावर काटा उभा राहतो.

हे संकट टळल्याचा आनंद साजरा करायला हवाच होता. मी आणलेली स्कॉच ' वॅट ६९ ' च्या चार घोटात माझा चार दिवसाचा अखंड प्रवासाचा शीण दूर झाला. मला ४ दिवस चांगलं जेवण मिळालं नसेल म्हणून वंदनानं मुद्दाम खिचडी, दही, पापड असा बेत केला होता त्यावर आम्ही हसत खेळत तुटून पडलो आणि माझ्या युरोपच्या ट्रीपचं ' मावंदं ' साजरं केलं.

## अमेरिकेचे वेध

युरोपला जाण्यापूर्वी मी माझं तिकीट देऊन जोशींना माझे न्यूयॉर्कचं रिझ-र्वेशन करण्यास सांगितले होते. परत आल्यावर २–३ दिवसात लंडनचा मुक्काम हलविण्याचा माझा विचार मी त्यांना बोलून दाखविला होता, परंतु त्यांना तो मंजूर नव्हता. त्यांनी रिझर्वेशन आणखी १०–१२ दिवस मिळत नाही म्हणून थाप मारली. आणि पुढल्या शुक्रवारी म्हणजे आणखी ९ दिवसांनी माझा आणखी एक कार्यक्रम नक्की करून ठेवला.

माझ्या प्रयाणाचा त्यांनी आणखी घोळ घातला आणि माझं लंडनचं राहणं आणखी वाढलं तर बहुधा माझी अमेरिका येथेच बारगळेल म्हणून दुसऱ्याच दिवशी मी स्वतःच एअर इंडियाच्या ऑफिसमध्ये जाऊन ७ ऑगस्टचे म्हणजे आणखी ९ दिवसांनंतरचे माझे रिझर्वेशन करून टाकले.

दुसऱ्या दिवशी शनिवार असल्यामुळे जोशी कुटुंबाबरोबर मार्केटींग केले. सर्व मोठे डिपार्टमेंटल स्टोअर्स ऑक्सफर्ड स्ट्रीटमध्ये म्हणजे शहराच्या मध्यभागी असल्यामुळे दूरवर अफाट पसरलेल्या नगरवाशांच्या सोयीकरता आता उत्तरेला आणखी एक प्रचंड डिपार्टमेंट स्टोअर्सचा एकत्रित समूह उभा राहिला आहे. बहुतेक नाणावलेल्या स्टोअर्सच्या येथे शाखा आहेत. अफाट पार्कींग लॉट आहे.

त्यामुळे गाड्या पाहिजे तेवढा वेळ उभ्या करता येतात आणि सर्व मोठे स्टोअर्स एकाच ठिकाणी पाहाण्यास मिळाल्यामुळे वस्तूंच्या किंमतीतील फेरफार चटकन लक्षात येतात व मार्केटींग किफायतशीर होते. अशा प्रचंड डिपार्टमेंटमध्ये मनमुराद हिंडणं हे खरेदी करण्याइतकंच आनंददायक असतं. शिवाय दर शनिवारी काही ठिकाणी आठवड्याचा बाजार भरतो तोही आम्ही पाहिला. हा बाजार उघड्यावरच असतो आणि तेथील किंमती पुष्कळच कमी असतात. पण मालाची खात्री नसते. कारण कोणत्याही नामांकित कंपनीच्या लेबलचा माल तेथे नसतो. दुपारी हा बाजार ओसरतो.

## अभयारण्य – एक थरारक अनुभव

रविवारी आम्ही लंडनपासून ४० मैलांवर असलेल्या 'सफारी पार्क' बघण्यास गेलो. विंडसर कॅसलशेजारी सुमारे १० मैलांच्या टापूत हे अभयारण्य आहे. येथे सर्व वन्य प्राणी मुक्त संचार करीत असतात. वाघ, सिंह, हत्ती, कोल्हे, माकडं, पाणघोडे कळपाकळपानं इतस्ततः फिरत असतात. ह्या कक्षेतून जात असताना गाड्यांच्या काचा बंद करून घ्याव्या लागतात. येथे कोठेही गाडी थांबविता येत नाही. हाताहातावर रक्षक बंदुकी रोखून उभे असतात, शिवाय फिरत्या वायरलेस जीप गाड्यांतून पोलीस रक्षक निरीक्षण करीत फिरत असतात. वाघ, सिंह वगैरे हिंस्त्र प्राणी कळपात असतात तोवर त्यांना तुमच्या आस्तित्वाची फिकीर नसते. पण एकादा प्राणी कळपातून चुकून मागेपुढे झाला तर बिथरतो आणि गाडीवर झडप घालतो. अशा वेळी त्याला काबूत आणण्याकरिता बंदुकीच्या गोळीनं गुंगीचं औषध टोचलं जातं, म्हणून बंदुकीच्या गोळीनं तो प्राणी मरत नाही. गुंगी येऊन बेशुद्ध पडतो. तथापि, पोलीस अतिशय दक्ष असतात आणि काठीनं आणि इतर सवयीचे इशारे करून 'चुकलेल्या वाटसरू' ला त्याच्या 'धर्मशाळेत' जावयास लावतात. ह्या नयनरम्य परिसरातून वाघसिंहांच्या इतक्या नजिक लगट करून जाताना अंगावर रोमांच उभे राहतात. हे थ्रिल काय आहे ते प्रत्यक्ष अनुभवल्याशिवाय कळणार नाही. वाघ सिंह सहसा जवळ येत नाहीत, माकडं तुमच्या गाडीवर झेप घेण्याचा प्रयत्न करतात आणि हत्ती सोंड वर करून जणू तुच्छतेनं दर्शवितो 'वत्सा, मुकाट्यानं आल्या वाटेनं परत जा. नाहीतर, तुझ्या शानदार गाडीची ऐट मी क्षणात नष्ट करून टाकीन.' हा हिंस्त्र जनावरांचा दोन तीन मैलांचा टापू 'सफारी पार्क' च्या इतर 'मवाळ' भागापासून काटेरी कुंपणानं अलग केलेला आहे, तरीही मी तेथे असताना एक सिंह पहारेकऱ्यांची नजर चुकवून पळून गेल्याचे व तो संभाव्य कोठे गेला असेल त्याची इशारेवजा बातमी छापून आली होती.

ह्या जीवघेण्या प्राण्यांच्या आवारातून बाहेर पडल्यावर आपण 'मवाळ' प्राण्यांच्या उद्यानात येतो. हरणांचे कळप तुमच्या गाडी पुढून उड्या मारीत रस्ता

ओलांडतात. रानडुकरं, पाणघोडे, थंड प्रदेशातील वनगाया, जिराफ, उंट, झेब्रा वगैरे प्राणी इतस्ततः फिरत असतात अथवा पाण्यात डुंबत असतात. नानाविध जातीचे आणि रंगाचे पक्षी चित्रविचित्र आवाज करीत झाडांवरून उडताना सप्तरंगी इंद्रधनुष्य उभं करतात. खास बांधलेल्या तलावात रंगीबेरंगी रंगाचे आणि विविध आकाराचे मासे पाण्यात उड्या मारीत असतात. कासवं स्वस्थ पडून असतात, आणि मगरी, सुसरी मध्येच वर डोकं काढून मुलांची करमणूक करीत असतात. ' डॉलफीन ' आणि व्हेल माशांचे तर तिकीट लावून खेळ चालतात.

जलाशयात विहार करण्याकरता बोटी भाड्यानं मिळतात. लहान मुलांकरता चित्रविचित्र आकाराच्या घसरगुंड्या आहेत. चहा, फराळाकरता प्रशस्त उपाहारगृह आहे. संबंध दिवस ह्या वनप्राण्यांच्या सहवासात आणि रम्य वनश्रीच्या कुशीत घालविण्याकरता येथे लोकांची रीघ लागलेली असते.

## विंडसर कॅसल

वाटेत येताना विंडसर कॅसल पाहिला. इंग्रज राजा राण्यांची जी ३।४ निवासस्थाने आहेत त्यापैकी हा एक जुना किल्ला. आम्ही गेलो त्या दिवशी राणीचा मुक्काम ह्या किल्ल्यात होता, कारण राणी जेथे असेल तेथे युनियन जॅक फडकविण्याची प्रथा आहे. ज्यांनी दिल्ली, आग्राचे किल्ले पाहिले आहेत त्यांना विंडसर कॅसलची मातबरी वाटणार नाही. बघण्यासारखं हे की हजार वर्षांच्या ह्या किल्ल्यात कमालीची स्वच्छता आहे, काल बांधला आहे एवढी त्याची तंदुरुस्ती आहे आणि गेल्या हजार वर्षातील राजा राण्यांचे गाठीभेटीचे दिवाणखाने, शयनगृहे वगैरे वस्तू त्यातील सर्व सामानसुमानासह सुरक्षीत जशाच्या तशाच आहेत. इंग्रज माणसाला पुरातन वास्तुचा केवढा अभिमान आणि ती जतन करून ठेवण्याची केवढी धडपड. नाहीतर आपल्याकडे नुसताच अभिमान, अगदी छाती पुढे काढून गप्पा पण ज्या शनिवार वाड्यात मराठे शाहीचे झेंडे अटकेपार गेल्याचा उज्ज्वल आणि सोनेरी इतिहास घडला त्याची नाव निशाणीही असू नये ह्याचा ना कोणाला खेद ना खंत !

## अगत्यशील बी. बी. सी.

लंडनची बी. बी. सी. हा इंग्रज माणसाचा मानबिंदू; लोकशाहीचं प्रतीक. बी. बी. सी. वर जाण्याचा योग आला. तो १५ ऑगस्टच्या कार्यक्रमाच्या निमित्तानं. वसंत पोतदार हा अवलिया फिरस्ता लंडनमध्ये मुक्काम ठोकून होता. १५ ऑगस्टच्या होणाऱ्या कार्यक्रमात त्याचा ' स्वातंत्र्याचा संग्राम– १८४७ ते १९४७, हा गाजलेला कार्यक्रम सामील करावा म्हणून जोशींनी खटपट करून तो घडवून आणला. त्या करता वसंत पोतदार ह्यांना घेऊन आम्ही ठीक ३ वाजता दुपारी बी. बी. सी. च्या कार्यालयात गेलो. डॉ. गौतम हे इंडियन इमिग्रंट करता आखून दिलेल्या कार्य-

क्रमाचे प्रोडयुसर आहेत. ठरल्यावेळी ते स्टुडियोत अडकले असल्यामुळे त्यांनी आपल्या पत्नीला आमचे स्वागत करण्याकरता दरवाज्यापाशी उभी ठेवली होती. तिने आम्हांस रीतसर नोंदणी करून आत घेतले आणि प्रतीक्षा कक्षालयात नेऊन वसविले. तेथे आणखीही अनेक मंडळी होती. गौतमसाहेब आले तेच सर्वांकरता चहा कॉफीचा ट्रे घेऊन. उशीरा आल्याबद्दल दिलगिरी व्यक्त करून मुद्दाम बोलाविलेल्या त्या मंडळीची सभा सुरू झाली. १५ ऑगस्टच्या कार्यक्रमाला लंडनमध्ये आगळे महत्त्व आहे. कारण, तो सर्व भारतीय मंडळींचा मिळून कार्यक्रम असतो आणि त्या कार्यक्रमाला लंडनमधील भारतीय तर गर्दी करतातच परंतु परदेशच्या दूतावासांचे कार्यालयांतील अधिकारी, भारताचे ब्रिटीश मित्रही हजर असतात. कार्यक्रम कसा असावा, किती वेळेचा असावा, त्यात विविधता आणण्याकरता काय करावे वगैरे चर्चा झाली. वसंत पोतदारांच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या कथनात काही गाणी घालावी असं ठरलं. ती म्हणण्याकरता एक बंगाली युवती आली होती. कार्यक्रमाचा तपशील ठरल्यावर लागलीच गाणी बसवावी असं ठरलं. इस्माईल नावाचा बी. बी. सी. चा एक तबलजी व दुसरा एक सारंगिया तेथे हजर होते. त्यांनी आपआपली वाद्ये आणली. टेबल खुर्च्या मागेपुढे करून तेथेच स्टुडियो तयार झाला. आणि पहिल्या गाण्याची चाल पोतदार ह्यांनी गुणगुणून दाखविली आणि त्या बंगाली बाईस म्हणण्यात सांगितले. पण ती म्हणेना, कारण हार्मोनियम पाहिजे असा तिचा आग्रह होता. लागलीच हार्मोनियम आणण्यात आली पण वाजविणार कोण म्हणून गौतम सर्वांकडे बघू लागले. तेवढ्यात जोशींनी माझं नाव सुचविलं आणि मी हार्मोनियम पुढ्यात घेऊन सारंगीबरोबर वाजवू लागलो. तबल्याच्या साथीत आमचं गाणं बसले परंतु त्या बंगाली बाईचा मूड लागेना. शेवटी दोन दिवसांनंतर गौतम ह्यांचे घरी रात्री जमण्याचे ठरले आणि आम्ही पांगलो. मी १५ ऑगस्टपर्यंत राहावे व पेटीची साथ करावी असा त्यांचा आग्रह होता माझा स्वतंत्र वादनाचा कार्यक्रमही बी. बी. सी. करता रेकार्ड करतो असे ते म्हणत होते. परंतु मी ७ ऑगस्टचे न्यूयॉर्कचे रिझर्व्हेशन केलेले असल्यामुळे १५ ऑगस्टपर्यंत थांबू शकलो नाही. गौतम जातीने आम्हास गाडीपर्यंत पोहोचविण्यास आले होते. बी. बी. सी. च्या प्रोडयुसरचं एवढं अगत्य पाहून मला उगीचच मुंबई रेडियोची आठवण आली, 'सन्माननीय परीक्षक' म्हणून तेथे जात होतो त्या वेळची.

लंडनमधील पुष्कळ वेळ लागणारी व आतून बघण्याची, मादाम टुसा, लंडन टॉवर वगैरे ठिकाणे बघून झाली होती. आता राहिली होती ती फक्त बाहेरून बघण्याची पण महत्त्वाची ठिकाणं. वसंत जोशींनी ती गाडीतून हिंडवून व काही ठिकाणी थांबून दाखविली. लंडन ब्रीज, त्या खालून वाहणारी थेम्स नदी, तिच्या दोन्ही किनाऱ्यावरचे हिरवे गालीचे, त्या पलिकडे असलेला रॉयल फेस्टिव्हल हॉल

जेथे गायन वादनाचे जलसे करण्याकरता मोठमोठे कलाकार धडपडत असतात तो पाहिला. त्या हॉलचं वैशिष्टय हे की ध्वनिक्षेपणाशिवाय तेथील व्यासपीठावरचा आवाज हॉलच्या दूरच्या कोपऱ्यापर्यंत सहज ऐकू जातो. खाडीच्या पाण्यातून असंख्य बोटींची, गलबतांची सतत जा ये चालू असल्यामुळे पाण्यावर तेलाचे तवंग दिसतात. नदीच्या अलिकडच्या किनाऱ्यावर पार्लमेंट हाऊस आहे.

## 'बीगबेन' घड्याळ आजारी ! सारा देश चिंतातूर

त्याला लागूनच लंडनच्या सुप्रसिद्ध घडाळयाचा टॉवर 'बीगबेन' आहे आम्ही गेलो तेव्हा घडाळयात ५-४० झाले होते. आम्ही पाहून आल्यावर दुसऱ्याच दिवशी ते घड्याळ बिघडले. आणि अनेक महत्त्वाचे भाग तुटून पडल्यामुळे ते पुढे कित्येक महिने नादुरुस्त राहाणार होते. 'बीगबेन' च्या इतिहासात ते कधी बिघडल्याचे ऐकवात नव्हते म्हणून दुसरे दिवशी एकाद्या मोठया नेत्याचे निधन व्हावे तशी ही बातमी ठळक टाईपात छापली होती. आमचा पायगूण ! पार्लमेंटची इमारत खूप जुनी असली तरी चांगल्या स्थितीत आहे. तेथे पार्लमेंटचा सेशन संध्याकाळी सुरू होतो. व मध्यरात्री पर्यंत चालतो. कित्येकदा एकादा कायदा तातडीनं संमत करून घ्यावयाचा असतो तेव्हा पार्लटमेंचे कामकाज संबध रात्र चालते.

## पंतप्रधानांचे निवासस्थान झावबाच्या वाडीत !

तेथून जवळच इंग्लंडच्या पंतप्रधानांचे निवासस्थान '१० डाऊनिंग स्ट्रीट' पाहिले. तेथे उभं राहून फोटो काढले. एवढया मोठया पंतप्रधानांच्या निवास व कार्यालयावर पहारा करावयास फक्त एक बंदूकधारी शिपाई पाहून अंचबा वाटला. त्यानं जोशींच्या मुलांबरोबर हस्तांदोलनही केले. इंग्लंडचा पंतप्रधान, होम सेक्रेटरी, चॅन्सेलर ऑफ एक्स्चेकर. ( आपला फायनान्स मिनिस्टर ) अगदी सामान्य घरात, चार चौघांसारखे रहातात. तेथे कोणताही बडेजाव नव्हता. दुसऱ्या दिवशी मात्र तो रस्ता लोकांना बंद केला होता, कारण किसिंजर बोलणी करण्याकरता आला होता, त्याच्या सुरक्षिततेसाठी म्हणून.

## चेंज ऑफ गार्ड-एक रोजचा खेळ

त्यानंतर वेस्ट मिनिस्टर अॅबे आणि बॅकिंमहॅम पॅलेस बाहेरूनच बघितली. आपले राष्ट्रपती भवन, त्यापुढील अॅव्हेन्यू जेथे २६ जानेवारीला फौजी कवायत होते. ही बॅकिंगहॅम पॅलेसपेक्षा मोठी. तेथे सकाळी ११ वाजता पहारे बदलण्याचा (Change of Guards)शानदार कार्यक्रम असतो. परंतु सकाळचे भोजन आटोपून ११ चा मुहूर्त साधणे शक्य नव्हते 'अन्न हें परब्रह्म' व ते 'यज्ञकर्म' जाणल्याने ते चुकवून मी ह्या भानगडीत पडलो नाही. मात्र आमच्या लंडनच्या दुसऱ्या भेटीत आम्ही हा समारंभ साधला आणि कॅमेऱ्याने टिपला देखील रोजचा हा

'खेळ' वर्षानुवर्षे चालू आहे. परंतु त्याची नवलाई अजून संपलेली नाही, हा खेळ करणाऱ्यांना आणि देशीविदेशी पर्यटकांना. लॉर्डस्चे एम्. सी. सी. चे ग्राऊंड पहाण्यास मुद्दाम गेलो होतो. आपल्या ब्रेबॉर्न स्टेडियमच्या मानानं ते अगदीच हिंदू जिमखाना ग्राऊंड वाटले. फक्त बंदिस्त आहे इतकेच. मात्र लॉर्डस् ग्राऊंडला जे प्रसिद्धीचे वलय आहे त्याची सिडनीच्या प्रचंड स्टेडियमलासुद्धा सर नाही. ते पाहून ब्रॅडमन पोन्सफोर्ड, किपॅक्स ऑस्ट्रेलियाचे झुंझार क्रिकेटवीर इंग्लंडच्या हॅमंड, सटक्लीफ लाखुडशी 'ॲशेश' जिंकण्याकरता खेळलेल्या अटीतटीच्या सामन्याची आठवण झाली.

सहज जाता जाता. मुंबईस प्रथम आलो तेव्हा 'कापाचं' मैदान (आताचे एस्प्लेनेड मैदान) पाहून मला नायडू, देवधर, जाय, नवले, परदेशी, चंदाराणा डोळ्यांपुढे आले होते!

लंडनची सर्व मोठी 'पाच चांदा'ची हॉटेलं, एम. सी. सी. ग्राऊंड टाकल्यावर दुतर्फा दिसतात. हिल्टन हॉटेलपेक्षाही महाग हॉटेले लंडनमध्ये आहेत. ज्यांचे दर फक्त एलिझाबेथ टेलर आणि रिचर्ड बर्टनसारख्या नटांनाच परवडतात.

संपूर्ण लंडन शहर आणि त्याच्या सभोवतालचा शंभर मैलांचा परिसर नीट पाहून झाल्यावरही मला दोन जागा पाहण्याचं औत्सुक्य होतं. एक म्हणजे आजीबाईची खाणावळ आणि दुसरी म्हणजे ज्याचा आजकाल गाजावाजा होत आहे तो साऊथ हॉल भाग.

## आजीबाईची खाणावळ

आजीबाई बनारसे म्हणजे एके काळी हिंदी माणसांचं, विशेषतः मराठी लोकांचं माहेरघर मानलं जाई. अमरावतीकडील एक सामान्य स्त्री कोणा लखपती बरोबर मोलकरीण म्हणून आली आणि स्थायिक झाली. मराठी लोकांना आश्रय द्यावयाचा. त्यांना आपलं भारतीय जेवण करून घालावयाचं आणि त्यातून आपली गुजराण करता करता आजींनी आज लंडनमध्ये चांगल्या वस्तीत सहा घरे विकत घेतली आहेत. आजीबाई आता थकल्या आहेत. त्यांनी आता निवास तर बंद केलाच आहे पण भोजनपसाराही आवरता घेतला आहे. आम्ही गेलो तेव्हा आजीबाई त्यांच्या 'मंदिरा'त प्रवचन ऐकत बसल्या होत्या. सभोवताली १५–२० स्त्रीपुरुष होते आणि एक उत्तर हिंदुस्थानी हिंदीत प्रवचन करीत होता. आजीबाईचं माणसांचं वेड आता ओसरलं आहे. त्यांनी घराचं 'मंदिर' केलं आहे आणि त्यात तेहेतीस कोटी नाही तरी गणपती, शंकरपार्वती, राधाकृष्ण, विठ्ठलरखुमाई, विष्णू आणि त्यांच्या जोडीला साईबाबा, सोन्यारूप्याच्या अलंकारांनी आणि उंची वस्त्रप्रावरणांनी सजवून बसविले आहेत. त्यांची गणपतीची आरास पाहिल्यावर आपण तुळशीबागेचा गणपती पाहत असल्याचा भास झाला. मात्र

आजीबाई आता लंडनवासियांच्या मनातून उतरल्या आहेत. कारण आता पूर्वीचं अगत्य राहिलं नाही असं त्यांचं म्हणणं.

## हिंदवासियांचे साऊथ हॉल – एक ज्वलंत प्रश्न

साऊथ हॉल ह्या भागात ९० टक्क्यांहून अधिक भारतीय व पाकिस्तानी रहिवाशी आहेत. येथे इंग्रज परका वाटतो एवढा हा भाग हिंदी लोकांनी गजबजलेला असतो. बहुतेक सर्व दुकानं हिंदी किंवा पाकीस्तान्यांची. त्यात लोणची पापडापासून बनारसी शालूपर्यंत सर्व मिळते. भारतीयांत पंजाबी व शीख लोकांचा भरणा जास्त. स्वतःचे उद्योगधंदे असलेले थोडे. बाकी सर्व सुतार, लोहार, गवंडी, बस ड्रायव्हर, कारखान्यात अकुशल व कुशल काम करणारे मजूर आहेत. लंडन विमानतळावर उतरल्यावर प्रथम कोणती गोष्ट घृणास्पद वाटत असेल तर ती पंजाबी मुली निळी सलवार खमीज घालून व तसाच निळ्या कपड्यांचा रुमाल डोक्याला बांधून झाडू मारीत असलेल्या पाहिल्यावर. त्यांना त्याचं काही वाटत नाही. त्या खुशाल पंजाबी गाणी नाहीतर फिल्मी गाणी म्हणत हसत खिदळत झाडू मारीत असतात. इंडियन इमिग्रंटचा कायदा ज्यावेळी आजच्या एवढा कडक नव्हता त्या वेळी पंजाबी, शीख लोकांची जथाबंद आवक ब्रिटनमध्ये झाली. येथे हिंदुस्थानात रु. १० ते १२ रोजगार मिळविणाऱ्याला तेथे रोजी ७०-१०० रुपये मिळू लागले. ब्रिटनमध्ये, किंबहुना सर्वच पाश्चात्त्य देशात मजुरी फार महाग पडते, त्यामुळे कमी पैशात मिळणारा आणि कोणतेही हलके काम करण्यास तयार असलेला हिंदीभाई तेथे सहज नोकऱ्या मिळवू शकला. आकडेवारी लक्षात नाही पण कित्येक लाख हिंदी मजूर आज ब्रिटनमध्ये स्थायिक झाल्याचं सांगण्यात येतं. त्यातच दक्षिण आफ्रिकेतून हाकललेले आणि ब्रिटिश पासपोर्ट असलेल्या हजारो हिंदीवासियांनी ब्रिटनची शहरे भरून टाकली. ह्या दक्षिण आफ्रिकेतून आलेल्यांजवळ पुष्कळ पैसाही होता. त्यामुळे त्यांनी अनेक दुकाने खरेदी करून ब्रिटिश व्यापारातही हात घातला. गुण्यागोविंदानं राहत होते तोपर्यंत ब्रिटिश सरकारनं त्यांना कोणत्याही प्रकारचा अटकाव केला नाही. परंतु केवळ संख्याबळाच्या जोरावर आणि ब्रिटनच्या 'मुक्त' धोरणाच्या बळावर ते आता मन मानेल तसं वागू लागले. कायद्याचं उल्लंघन, कमालीची अस्वच्छता आणि अरेरावीच्या वागणुकीमुळे खटके उडू लागले नसते तरच नवल. आपले हिंदीभाई त्यांच्या जीवनप्रवाहात कधीच मिसळून गेलेले नाहीत. त्यांनी आपला सवतासुभा आणि अलिप्तता राखली आहे. पण तेही एकवेळ समजण्यासारखं आहे. पण रस्त्यावर दुकानं मांडून भेळपुरी खाऊन आणि पानतंबाखूच्या पिचकाऱ्या मारीत रस्त्यावरच ठाण देऊन बसणं, कचरा रस्त्यावरच टाकणं, मोटार सायकलवर बसणारांनी शिरस्त्राण घालणं कायद्यात आवश्यक असताना त्याविरुद्ध आंदोलन करणं व

कायदे मोडणं. ह्यातून भडका उडाला आणि खून मारामाऱ्या होऊ लागल्या. आता पंतप्रधानांनी आणि मजूरपक्षानं कोणताही जातीयभेद केला जाणार नाही आणि इमिग्रंटस्‌ना समान वागणूक दिली जाईल असं जाहीर आश्वासन दिलं असलं तरी वातावरण तंग आहे आणि त्याचा पुन्हा भडका उडण्याचा संभव आहे. आता इमिग्रेशन कायदा फारच कडक केला आहे. स्थायिक होऊ पाहणाऱ्या हिंदी, पाकिस्तानी लोकांची आवक ह्यापुढे संपूर्णत: थोपवून धरण्यात आली आहे. साऊथ आफ्रिकेत पिढ्या न् पिढ्या राहिलेले हिंदीवासीही तेथल्या जीवनधारेत मिसळून गेले नाहीत. भरपूर पैसे मिळवावयाचे आणि आपल्या ' देश 'मध्ये पाठवून द्यावयाचे एवढेच काम त्यांनी वर्षानुवर्षे केलं आणि शेवटी हाकलून देण्याची नामुश्की पत्करून त्याच मतलबी धोरणानं त्यापैकी बहुतेक आता ब्रिटन किंवा अमेरिकेत स्थायी होऊ पाहत आहेत. जेथे आपण संपत्ती मिळवितो तेथल्या लोकांचं आपण काही देणं लागतो ह्या कृतज्ञतेच्या भावनेनं आणि त्यांच्या जीवनाशी एकरूप झालेली आफ्रिकेतून निवृत्त होऊन आलेले डॉ. कर्वे ह्यांच्यासारखी माणसं विरळा.

लंडनचं आंतरबाह्य निरीक्षण करून मी तृप्त झालो होतो. हॅमस्टेडच्या सुप्रसिद्ध शंभर वर्षाच्या जुन्या ' पब 'मध्ये विअरचे घुटके घेत इंग्रजी संस्कृतीचं जवळून दर्शन घेत मनमुराद रेंगाळलो होतो. आता पाहण्यासारखं आणि मुद्दाम लिहिण्यासारखं फारसं काही राहिलं नव्हतं. तरीही लंडनवासियांपुढे आज उभ्या असलेल्या एका यक्ष प्रश्नाचा उल्लेख केल्याशिवाय लंडनच्या माझ्या भेटीचं वर्णन अपुरं राहिलं असतं. लंडनमध्ये जे अनेक वर्षे स्थायिक झालेले आहेत त्यांच्यापुढे एक गंभीर समस्या उभी आहे.

## हिंदी मुलामुलींची समस्या

त्यांची मुलं आज मोठी झालेली आहेत. त्यांच्यावर कितीही आपले भारतीय विचार आचार बिंबविण्याचा त्यांनी सातत्यानं प्रयत्न केला तरी ती मुलं इंग्रजी संस्कृतीत वाढली आहेत हे विसरून चालणार नाही. गोऱ्या लोकांच्या स्त्रीपुरुष संबंधी कल्पना पुष्कळ सैल आहेत. तरुण मुलामुलींनी ' डेटींग ' करणं ह्यात त्यांना काही गैर वाटत नाही. किंबहुना तो एक जीवनाचा आवश्यक भाग आहे अशी त्यांची धारणा आहे. एवढ्या तेवढ्यावरून घटस्फोट घेणं ही त्यांच्या मते क्षुल्लक बाब आहे. जोशींच्या पलीकडच्या अपार्टमेंटमध्ये राहणारा पन्नाशी उलटून गेलेला रिचर्ड, बायको एकाएकी निघून गेल्यामुळे आपल्या दोन लहान मुलांना दीनवाण्या मुद्रेनं विजारी चढविताना आणि त्यांना शाळेत बोट धरून नेताना मी पाहिला होता तेथेच राहणारी एक फ्रेंच बाई आपल्या मुलांना दुसरी मुलं दुस्वास करून वागवितात म्हणून आक्रसताळा, तमाशा करून जीव देते म्हणून आपल्या दोन मुलांना जोश्यांच्या दारात सोडून निघून गेलेली मी पाहिली होती. कोणाची बायको घटस्फोट घेऊन दुसऱ्या पुरुषाचं बोट धरून निघून गेलेली किंवा पुरुष

बायकोला एकटी सोडून दुसऱ्या स्त्रीबरोबर निघून गेल्याची अनेक उदाहरणं मी डोळ्यांनी पाहिली होती. अशा संस्कृतीत वाढलेल्या आमच्या १५ ते २२-२३ वर्षांपर्यंतच्या मुलांची एक सभा जोशींच्या घरी एके दिवशी भरली होती. एक-मेकाला 'हाय' म्हणत आपली केसांची झुलपं अथवा झिंग्या उडवीत ती मुलंमुली लंडन महाराष्ट्रमंडळाकडून त्यांच्या स्वैर वागण्याला संमती आणि आर्थिक सहाय्य मागण्यास आली होती. तेथे बसण्यास आमच्यासारख्या 'म्हाताऱ्यांना' आणि तेथे आलेल्या मुलांच्या पालकांना परवानगी नव्हती म्हणून आम्ही उठून माडी-वरच्या दुसऱ्या खोलीत गेलो. खाली कडाक्याचे वादविवाद आम्हांला ऐकू येत होते. त्याचा तपशील जोशींनी नंतर सांगितला तो असा. त्यांना 'डेटींग'ची ऑफिशियल परवानगी हवी होती, तीही कोणत्याही मुलामुलींबरोबर. मग तो गोरा इंग्रज असो नाहीतर काळा निग्रो किंवा वेस्ट इंडिजचा असो. 'डेटींग' करण्यामागे लग्नाची भावना असायला हवी असं बंधन नसावं. 'डीस्को' पद्धतीचं अंगाला अंग भिडवून नाचण्याची मुभा असावी व त्याकरता महाराष्ट्र मंडळानं आपल्या खर्चानं त्यांना हॉल मिळवून दिले पाहिजेत. 'आमचे आईवडील मंडळाचे सदस्य आहेत तेव्हा मंडळाकडून ही 'सेवा' आम्ही अपेक्षिली तर त्यात काय चूक आहे. आम्ही येथेच वाढलो. त्यांचे खाणे पिणे व इतर संस्कार आमच्या अंगात मुरले आहेत मग आता आमचे जीवनाचे साथीदार आमचे आम्हांसच त्यांच्या पद्धतीनंच निवडू द्या. त्याचे बरेवाईट परिणाम भोगण्यास आमचे आम्ही समर्थ आहोत.' असा त्यांचा म्हणण्याचा सारांश होता. परदेशात स्थायिक झालेल्या लोकांनी आपण त्यांच्या जीवनाशी एकरूप झालं पाहिजे असं म्हणतो त्याचा एवढा व्यापक अर्थ आजची तरुण पिढी लावील याची ऑफिसला जाताना आणि सकाळ संध्याकाळ देवापुढे आवर्जून हात जोडणाऱ्या जुन्या पिढीला काय कल्पना !

लंडनवासीयांना ह्या गंभीर समस्येचं उत्तर अजून सापडलेले नाही.

मधू जोशींच्या घरचं माझं पेटीवादन म्हणजे निरोपाचे विडे देण्याचाच कार्यक्रम ठरला. दुसऱ्या दिवशी मी न्यूयॉर्कला रवाना होण्याकरता माझं लंडन-मधील प्रस्थान हलविणार होतो. ह्या जाणिवेनं मी अस्वस्थ झालो होतो. घेण्या-सारखं लंडनमध्ये खूप पाहिले होते पण त्यापेक्षा जास्त तेथल्या मराठी मंडळींच्या आगत्यानं मी भारावून गेलो होतो.

## जोशी कुटुंबाचे अगत्य

बुल्गानिनसारखी दाढी ठेवलेला, घाऱ्या डोळ्यांचा, लंडनमध्ये वीस वर्षे राहूनही अजून 'होय का; केलंनी आणि गेलंनी' अशी खास राजापूरी भाषा बोलणारा, अघळपघळ गप्पा मारणारा वसंत जोशी; त्याची सुविद्य पत्नी वंदना, गोरी, उंच, सडपातळ, थोडी नाकेली पण देखणी, डोळ्यांची पाखरं फडफडविणारी आणि बोलताना मध्येच डोळ्यांवर येणाऱ्या केसांच्या बटा अलगद मागे सारणारी,

सदा हसतमुख, माझं आगत्यपूर्वक हवं नको करणारी, आणि त्यांची ती गोजीरवाणी मुलं, सात वर्षांचा आशीश आणि ४ वर्षांची नीना, किती गोंडस आणि लाघवी. सर्व माझ्या डोळ्यांपुढून हालेनात. देखणा आशीश आजच पुरा साहेब झाला आहे, आपली झुलपं उडवीत नीनाच्या खोड्या काढण्यात पटाईत. सध्या त्याला लोकर विणण्याचा छंद लागला आहे. त्यानं पायमोजा म्हणून विणल्यावर त्याची माकडटोपी होते आणि ती नीनाच्या बाहूलीच्या डोक्यावर जाऊन बसते. नीना तर कमालीची गोड पोरगी आहे. तितकीच लाघवी. सकाळी उठल्यावर माझ्या कुशीत शालजोडीच्या उबेत बसून टी. व्ही. वरचा मुलांचा कार्यक्रम पाही. तिचं एकच डोळा मिटून मिस्कील हास्य म्हणजे ' मिलीयन डॉलर ' किंमतीचं. आणि बोलणं, मधाचे थेंब टिपकावेत असं गोड. वसंत जोशी, त्याची पत्नी वंदना आणि त्यांच्या दोन बच्छ-ड्यांचा मला विलक्षण लळा लागला होता. त्यांच्या संगतीत घालविलेले सोनेरी क्षण मी आठवून आठवून पुन: प्रत्ययाचा आनंद घेत होतो तर त्यांच्या अगत्यानं गुदमरून जात होतो. त्यांनी माझ्याकरता एवढं केलं आणि मी त्यांच्याकरता काहीही करण्यास असमर्थ होतो, ह्याची जाण मला सतावीत होती म्हणून त्यांच्या ऋणाचं ओझं मला आता पेलवेनासं झालं होतं. शेवटचे चार दिवस मी चार निर-निराळ्या कुटुंबात घालवावे अशी सर्वानुमते माझी वाटणी झाली होती. म्हणून त्यादिवशी जोशी संध्याकाळी घरी आल्यावर मला दुसऱ्या मित्राकडे घेऊन जाणार होते. तो संबंध दिवस मी घरात बसून होतो. माझं कशात म्हणून लक्ष लागत नव्हतं. आज आपण हे घर कायमचे सोडणार ह्या कल्पनेनं मी विलक्षण अस्वस्थ झालो होतो. दुपारी टी. व्ही. बघत मी एकटाच घरात होतो. आणि आतापर्यंत कसेबसे दाबून ठेवलेले कढ माझ्या डोळ्यांतून ओसंडू लागले. मी लहान मुलासारखा मुसमुसून रडू लागलो. मी फारसा भावनाप्रधान नाही. निदान, मनात आलेली संवेदनउर्मी बांध फोडून बाहेर पडू न देण्याइतका माझ्या मनावर ताबा असतो. पण आता हा बांध आवरणं माझ्या आटोक्याबाहेर होते. संध्याकाळी जोशी आले तेव्हा मी गप्प गप्पच होतो. आणि त्यांना विचारल्यावर हा रोखून ठेवलेला बंधारा पुन्हा कोसळला. ' मी आज जाणार नाही. लंडन सोडीन ते येथूनच ' असं कसंबसं म्हणून मी डोळे पुसले. जोशीचे वंदनाचेही डोळे भरून आले. जोशींनी सर्वांना फोन करून मी फक्त जेवावयास येईन असे कळविल्यावर मी दोन्ही मुलांना पोटाशी घट्ट धरून त्यांचे पापे घेतले.

त्या रात्री ठरल्याप्रमाणे वसुधा-विसुभाऊ केळकरांकडे भोजनास गेलो, पण त्यांच्या मुद्दाम केलेल्या पुरणपोळी वरणभात लिंबूच्या मेजवानीत माझं लक्ष नव्हतं. तसंच त्यानंतरच्या तीन दिवसात माझं जेवणाकडे लक्ष नव्हतं.

' रक्त पाण्यापेक्षा घट्ट असतं ' अशी म्हण आहे. पण रक्ताच्या नात्यापेक्षाही आधिक घट्ट नाती असू शकतात ह्याचा मी अनुभव घेत होतो. नाहीतर, एक संपूर्ण

अपरिचित माणूस केवळ १५।२० दिवसांच्या अल्प परिचयात एका कुटुंबांशी एवढा जोडला जातो, कोणाचा काका, कोणाचा 'आजोबाबा' कोणाचा भाऊ होतो, ह्याचा अर्थ कसा लावावयाचा. ह्या ऋणानुबंधाच्या पूर्वजन्मीच्या गाठी असाव्यात आणि त्या ऋणांची परतफेड अशी होत असावी असा विश्वास बळावतो.

मी रोज जा ये करणाऱ्या बस नंबर १३४ चा देखील मला निरोप घ्यावयाचा होता. शेवटच्या दिवशी बसमध्ये बसल्याबसल्या मी गुणगुणू लागलो–

ऑगस्टची ७ तारीख उजाडली. माझी सामानाची आवराआवर झाली. माझी चामडी बॅग आणि पिशवी माडीवरून खाली आली. निघण्यापूर्वी, मी मुद्दाम करण्यास सांगितलेला पिठलंभात खाऊन झाला. निघण्याची तयारी झाली. जोशी पती पत्नीनं वाकून नमस्कार केला, मुलांनाही नमस्कार केला आणि 'किशी' दिली. पुर्नगमनायच म्हणून माझ्या हातावर दही घातलं, पुन्हा फोटो काढले गेले आणि मी जोशींच्या निवासस्थानाचा निरोप घेतला.

विमानतळावर जोशी कुटुंबाचा अखेरचा निरोप घेताना पुन्हा गलबलून आलं पण ते मी कसंबसं आवरलं आणि मागे वळून न पाहाताच कस्टमच्या दाराआड त्यांच्यापासून दूर झालो, पुन्हा कधी भेटू न भेटू ह्या साशंक विचारात आमच्या विमानानं आकाशात झेप घेतली आणि काही क्षणातच लंडन शहर दृष्टीआड झालं.

## FARE WELL TO BUS 134

1) Bus One Thirty four
Takes me to Totanham Court
On to Oxford Street . .... .
For a shopping spree
' Marks & Spencer, ' ' C. & A '
' Mothercare ' and many other stores
Up and down the escalator
Out on the street I come
Mused & gazed

2) Bus One Thirty four
Takes me to Picadally and Trafalgar Square
For pegion feeds and birdies paradise
For glittering lights of London by night
Brings me back to Maswell Hill

3) Oh ! Bus One Thirty four !
I bid you good bye
With tearful eyes and memories for life !

# श्रीमंतीचे पहिले दर्शन–न्यूयॉर्क

लंडन न्यूयॉर्क कागदावरील अंतर तीन तासाचे असले तरी प्रत्यक्षात साडे-आठ नऊ तासांचे आहे. मुंबई–लंडन, साडे पाच तास आणि लंडन न्यूयॉर्क, पुन्हा तेवढेच, म्हणजे साडेपाच तास, घड्याळाचे काटे मागे सरकवावे लागतात. तसेच अमेरिकेच्या पश्चिम टोकाला, सानफ्रन्सिसकोला पोहोचल्यावर आणखी तीन तास मागे जावे लागते. म्हणजे मुंबईपासून कॅलिफोर्नियाचा पश्चिम किनारा एकूण चौदा तास पाठीमागे आहे. काही वेळातच विमान तीस पस्तीस हजार फुटांवर पांढऱ्या शुभ्र ढगांवर आरूढ होऊन दृत लयीत तरंगू लागले. खालील अथांग पसरलेल्या अटलांटिक महासागराच्या पाण्याचे प्रतिबिंब ढगांवर पडल्यामुळे ते पांढरे ढग चकमकत असतात. हवाई सुन्दरी खिडक्यांचे पडदे ओढून घेतात आणि दुपारच्या भोजनाची ताटं आमच्यापुढे आणून ठेवतात. आता दुसरं काही करण्यासारखं नसतं म्हणून मंडळी चवीनं जेवणावर हात मारतात. एअर इंडिया, एरवी कशीही असेल, जेवण देण्याच्या बाबतीत त्यांची बरोबरी कोणी करू शकणार नाही. सकाळपासून रात्रीपर्यंत काहीना काही खाण्याचं समोर येतंच असतं आणि प्रवासी सारखे चरत असतात. चवीनं खात बसण्यासारखी चांगली करमणूक नाही, याचा मला येथे अनुभव आला. भोजन संपल्यावर सिनेमा सुरू झाला। मात्र त्या मूक चित्रपटाला 'टॉकी' करण्याकरता 'काननळ्या' भाडं मोजून घ्यावा लागतात. तिकीटाचं एवढं भाडं मोजल्यावर विमान कंपनी एवढी कंजुषी का करते ते समजत नाही. अमेरिकन व सिंगापूर एअर लाईन्समध्ये ह्या 'काननळ्या' आपल्या आसनावर आधीच ठेवलेल्या असतात. आपण त्या वाटल्यास वापराव्या. विमानतळ आल्यावर हवाई सुन्दऱ्या त्या गोळा करून घेऊन जातात.

आम्ही न्यूयॉर्क विमानतळावर उतरलो तेव्हा भयंकर उष्मा जाणवत होता. न्यूयॉर्कचा जॉन एफ. केनडी विमानतळ हा अलिकडेच बांधण्यात आला आहे. तो जगातील सर्वात मोठा विमानतळ मानला जातो. येथून फक्त विदेशी येणाऱ्या जाणाऱ्या विमानांचेच उड्डाण होते. अमेरिकेच्या इतर शहरांकडे जाणाऱ्या चिल्लर विमानांकरता 'लागडा' विमानतळ तेथून १० मैलांवर आहे. न्यूयॉर्क विमानतळावर प्रवाशांची कसून तपासणी होते. विशेषतः हिंदुस्थानातून आलेल्या प्रवाशांच्या हातातील पिशव्याही उलटचा करून बघितल्या जातात. कारण, भारतातून गांजा, चरस, हशीश वगैरे अमली पदार्थांची मोठ्या प्रमाणावर आवक होत असते. अमेरिकेची सर्वात लहान पिढी आज अमली पदार्थ सेवन करून 'हिप्पी' संप्रदायाकडे वळत आहे आणि युवा पिढीची ही भयावह वाटचाल कशी बंद करावी ही अमेरिकन नेत्यांची गंभीर समस्या आहे. कोणतेही नाशवंत पदार्थ उघडे नेण्यास तेथे बंदी आहे. विड्याची अथवा दुसरी कोणतीही पानं, फळं, पालेभाज्या सुटी मिठाई

अथवा अन्य खाद्य पदार्थ, मसाले वगैरे तेथे कस्टमचे अधिकारी काढून घेतात आणि आपल्या डोळ्यांसमोर नष्ट करून टाकतात. मात्र सीलबंद वस्तू नेता येतात. कदाचित ह्या खबरदारी मुळेच अमेरिकेत झाडांवर अथवा फुलांवर कीड पडलेली सहसा दिसावयाची नाही. रोगजंतूची आवक तेथे संभवनीय नाही. अलिकडच्या *आमच्या दुसऱ्या भेटीत* कॅलिफोर्नियात फळांवर कीड पडल्यामुळे एकच हाहाःकार माजला होता. वर्तमानपत्रांचे रकानेच्या रकाने ह्या रोगजंतूंची लागण कोठून आली असावी व आता त्यावर तात्काळ उपाय योजना काय करावी ह्या संबंधी माहितीनं भरलेले असत. शहराबाहेर जाणाऱ्या गाड्यांची कसून झडती घेतली जाई आणि एकादे फळ जरी गाडीत असले तरी ते मेलेल्या उंदीरासारखे अलगद उचलून पोलीस काढून घेत. ह्याकरता एक समिती नेमली होती. तिने निष्कर्ष काढला की ही लागण पेरू ह्या देशातून जे बी बियाणे मागविले होते त्या मधून आली होती. तात्काळ उपाय योजना जारी करण्यात आली आणि एक महान अरिष्ट टळल्याचा सुस्कारा सर्व देशभर ऐकू आला ! जम्बो जेटचं 'जमीन सोडणं' आणि 'जमिनीला पाय टेकणं' फक्त बाहेर बघूनच जाणविण्याइतकं अलगद असतं आणि एकंदर प्रवास अतिशय सुखाचा आणि बहुतांशी वेळेवर होतो. परंतु जंबोमधून ४०० प्रवासी बाहेर पडतात आणि मधाचं पोळं फुटावं तसं कस्टमभोवती रांगा लावतात तेव्हा शिणलेला प्रवासी वैतागतो. आधीच आपलं सामान मिळविण्यात वेळ जातो. त्यात तीन चारशे माणसांची रांग आणि कस्टमची कसून तपासणी हे सर्व सोपस्कर होईपर्यंत आम्हांस तास दीड तास लागला. उन्हाळा मी म्हणत होता. जीव मेटाकुटीस आला होता. मुंबईपासून मोटारीनं चिंचवडपर्यंत अगदी सुखाचा प्रवास व्हावा आणि त्यानंतर शिवाजीनगरपर्यंत सायकली, स्कूटर, ट्रक्स आणि पादचाऱ्यांच्या ताशेवाजंत्र्यात आपली वरात निघावी म्हणजे जी शरीराची आणि मनाची दयनीय अवस्था होते, ती अनुभवीत हाय, हुश्श करीत मी एकदाचा बाहेर पडलो. आदल्या रात्री फोन केल्याप्रमाणे जोशींचे मित्र, शेणोलीकर दांपत्य उतरवून घेण्यास आले होते. त्यांच्या गाडीतून आम्ही फ्लशिंग क्वीन्स ह्या न्यूयॉर्कच्या पूर्व भागात त्यांच्या निवासस्थानी येऊन पोहोचलो, तेव्हा संध्याकाळचे पाच वाजले होते.

लंडनची हवा बारमाही थंड. त्यांचा 'समर' म्हटला तरी आपल्या 'विन्टर' पेक्षा जास्त थंड. त्यामुळे लंडनची घरं बंदिस्त. मीच केव्हातरी माझ्या खोलीतील वरचे शटर उघडे करून ठेवी, हवा खेळती राहावी म्हणून, आणि एक रग जास्त घेऊन निजे. एअरकंडिशनरची तेथे आवश्यकता नाही. पण 'हिटर' प्रत्येक खोलीत ठेवलेले असतात. न्यूयॉर्कमध्ये आल्यावर 'समर'ही काय चीज आहे ते जाणवलं. तेथे आपल्या मे महिन्यापेक्षा रखरखीत उन्हाळा. पण घाम येत नाही, नुसतीच अंगाची लाही लाही होते. त्यामुळे अमेरिकेच्या पूर्व भागातील न्यूयॉर्क, फिलाडेल्फिया, वॉशिंग्टन, शिकागो, बोस्टन, डेट्रॉईट, तसेच खाली

ओक्लाहामा वगैरे शहरांत भयंकर उन्हाळा असतो आणि दिवसरात्र वातानुकूल हवा ठेवावी लागते. दुसऱ्या वेळी आम्ही ऑक्टोबरमध्ये न्यूयॉर्कमध्ये राहिलो, तेव्हा पाऊस आणि थंडगार वाऱ्यानं आम्ही हैराण झालो. वेळी अवेळी पाऊस पडे पण वेधशाळेने त्याचे अचूक भविष्य आदले दिवशी वर्तविल्या बरहुकूम !

दुसऱ्या दिवशी सकाळपासून माझी भ्रमंती सुरू झाली. आधी मला स्टेट बँक ऑफ इंडियात जाऊन कॅलिफोर्नियातल्या माझ्या भावाकडून पाठविलेले पैसे घ्यावयाचे होते. शेणोलीकरांनी सांगितल्याप्रमाणे 'सबवे' गाडीने मी ग्रॅन्डसेंट्रल स्टेशनवर उतरलो. तेथून मॅडीसन एव्हेन्यूतून रस्त्यामागून रस्ते ओलांडीत ४२ व्या रस्त्याला बगल देऊन पार्क एव्हेन्यूच्या ५७ व्या रस्त्यावरील ४६० नंबरच्या दुसऱ्या मजल्यावरील स्टेट बँकेत गेलो आणि पैसे घेतले. तेथे सर्व तरुण तरुणी भारतीय पाहून क्षणभर मुंबईतील एकाद्या ऑफिसात आल्याचा आनंद झाला. तेथे गद्रे नावाचे मुख्य अधिकारी आहेत ते त्यावेळी रजेवर होते. पण त्यांनी सांगून ठेवल्यामुळे दुय्यम अधिकारी अय्यर ह्यांनी माझं चांगलं स्वागत केलं. तेथूनच एअर इंडियाच्या कारखानीसांना फोन केला व त्यांच्या आमंत्रणावरून त्यांचेकडे चहाला गेलो. त्यांचे ऑफिस जवळच ५२ व्या रस्त्यावर ३२ व्या मजल्यावर आहे. त्यांचे मुंबईतील अनेक मित्र माझ्या ओळखीचे निघाल्यामुळे गप्पा रंगल्या. तेवढ्यात तुफान वादळ होणार असल्याचे रेडियो, टी. व्ही. वृत्त आले. 'न्यूयॉर्क टाईम्स' व 'टाईम' मॅगेझिनच्या इमारतींवर बातम्यांची विजेरी अक्षरं धावत सारख्या बातम्या सांगत असतात. त्यांतही १२० मैलांच्या वेगाने रात्री येणाऱ्या वादळाचा इशारा सारखा सांगितला जात होता. कारखानीसांनी मला लवकर घरी जाण्यास सांगितले, आपल्या कर्मचाऱ्यांना उघडलेली तावदानं बंद करण्यास सांगितले व आपणही स्वतः घरी परतण्याच्या तयारीला लागले.

मी 'सबवे' पकडून कसा-बसा मुक्कामाजवळच्या स्टेशनाच्या बाहेर पडलो आणि मुसळधार पाऊस पडण्यास सुरवात झाली. सरीवर सरी, श्रावण सरी कोसळत होत्या. मी आडोशाला उभा राहिलो. मध्येच थोडा पाऊस कमी झाला असं वाटून चार घरं पुढे जावं, पुन्हा आडोशाला उभं राहावं असं करण्यात रात्र झाली. पण पाऊस थांबण्याचे लक्षण दिसेना. माझ्या हँडबॅगेत बँकेतून आणलेले पुष्कळ पैसे होते. जवळ निग्रो धटिंगण उभे होते. न्यूयॉर्कमध्ये काळे लोक एक डॉलर करताही खून करतात असं ऐकत होतो. हे लक्षण काही टीक नाही म्हणून मी धावत एका मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये शिरलो आणि एक ओव्हरकोट विकत घेऊन तो डोक्यावर धरून व हँडबॅग पोटाशी धरून जवळ जवळ धावतच शेणोलीकरांच्या घरी पोहोचलो.

रात्री भाकीत केल्याप्रमाणे मुसळधार पावसानं आणि ताशी शंभर मैल वेगाच्या वादळानं थैमान घातलं पण त्यातून न्यूयॉर्क शहर बचावलं. तडाखा बसला तो

तेथून ३० मैल अंतरावरच्या किनारपट्टीला. दहा बिलीयन नुकसान होईल त्याऐवजी चार बिलीयनवरच भागलं. ह्या निश्वासात न्यूयॉर्कची सकाळ पुन्हा उजाडली.

न्यूयॉर्कची हवा मोठी लहरी आहे. दिवस दोन दिवस खूप उन्हाळा होतो. मग अकस्मात मुसळधार पाऊस पडतो. दुसऱ्या दिवशी थंडी पडते आणि पुन्हा उन्हाळा होतो. मी आता तीन दिवस येथे होतो आणि परतीच्या प्रवासात पाच–सहा दिवस न्यूयॉर्कमध्ये काढले त्यापैकी निम्मे दिवस पावसात धुवून गेले.

## ऐश्वर्याचा भस्मासूर

न्यूयॉर्कला उतरल्यापासून आपण एका समृद्ध शक्तिमान देशात आल्याचं जाणवू लागतं. तो प्रचंड विमानतळ, ते सहासहा लेन असलेले एकमार्गी रस्ते, त्यावरून सुसाट धावणाऱ्या मोठमोठ्या गाड्या, रस्त्याच्या दुतर्फा गगनचुंबी इमारती पाहून आपण दिङ्मूढ होतो. मॅडिसिन रस्त्यावरून जाताना दोन्ही बाजूला एकाला एक चिकटून बहुतेक सर्वत्र आकाशाला भिडणाऱ्या इमारती आहेत. त्यामुळे रस्ते मोठे असूनही लहान वाटतात, मोटारी मोठ्या असूनही खेळण्यातील वाटतात आणि माणूस लिलोपुटसारखा स्वतःचा स्वतःलाच लहान दिसू लागतो, एक क्षुद्र जीव किड्या मुंगीसारखा. मानवनिर्मित उभा राहिलेला हा आक्राळ विक्राळ भस्मासूर आपल्याला गिळून तर टाकणार नाही ना अशी अकारण भीती वाटते. उंच, अधिक उंच आकाशाला पोहोचणाऱ्या इमारती उभ्या करण्याच्या हव्यासात माणसानं आपली उंची गमावली आहे ह्याचं भान त्याला नाही. ह्या रस्त्यावरून जाताना मला सारखं गुदमरल्यासारखं होत होतं. एम्पायर स्टेट बिल्डिंगची १०२ मजली इमारत झाल्यापासून ही उंची वाढविण्याची लागण आणि स्पर्धा सुरू झाली आणि बोलता बोलता न्यूयॉर्क शहरात शेकडो गगनचुंबी इमारती उभ्या राहिल्या. वर्ल्ड ट्रेड सेंटरची इमारत १०६ मजली आहे म्हणून शिकागोचा सीअर्स टॉवर ११० मजली आहे. अलिकडेच अमेरिका कानडा स्पर्धेत टोरोंटोला ह्याहूनही उंच टॉवर बांधण्यात आला आहे. आणि त्याचं वैशिष्ट हे की वादळी वाऱ्यामुळे तो फूट दीड फूट झुलतो मी शिकागोला १०२ मजली व टोरोंटोला ९६ मजल्यावर जाऊन आलो. वर पोहोचण्यास फक्त अर्धं मिनिट लागतं ! मात्र खाली येताना हवेच्या दाबामुळे कानात दडे बसतात. न्यूयॉर्कच्या एम्पायर स्टेट बिल्डिंगमध्ये जाऊनही वर गेलो नाही कारण पाऊस पडत होता आणि खराब हवेमुळे वरून काही एक दिसणार नाही असं मला सांगण्यात आलं. दुसऱ्या वेळी मात्र आम्ही एम्पाअर स्टेट बिल्डिंगच्या सर्वोच्च गॅलेरीतून न्यूयॉर्कचे विहंगम दृश्य पाहिले. प्रत्येक इमारतीत शेकडो कचेऱ्या असल्यामुळे तेथे बाहेरच्या बाजूला पाट्या लावण्याची पद्धत नाही. लिफ्टजवळ तळमजल्याला लहान अक्षरात सर्व कचेऱ्यांची नावे व मजले 'लिहिलेले असतात. मात्र ज्याच्या मालकीची इमारत असेल त्याच्या नावाची विजेरी अक्षराची

पार्टी इमारतीच्या मध्यावर असते, पॅनएम, लिव्हर ब्रदर्स, सिटी बँक वगैरे. परंतु रस्त्याच्या नावावरून आणि प्रत्येक इमारतीवरील ठळक अक्षरातील घर नंबरावरून आपणास हवे ते ठिकाण सहज शोधता येते. अमेरिकेतील सर्व शहरांची नगररचना बहुतेक एकाच प्रकारची असते. पूर्व पश्चिम जाणारे ते सर्व रस्ते नंबरानं ओळखले जाणारे, १ पासून १०० पर्यंत. दक्षिण उत्तर जाणारे ते एव्हेन्यू. ह्या एव्हेन्यूपैकी काहींना नावे आहेत जसे पार्क एव्हेन्यू, मॅडिसिन एव्हेन्यू, मात्र हे अपवादात्मक. नाहीतर बहुतेक ४२ वा स्ट्रीट पाचवी एव्हेन्यू या नावानेच नेमके ठिकाण सापडते. आपल्यापेक्षा ही पद्धत सोपी आणि सोयीची आहे. नाहीतर न्यूयॉर्क शिकागो सारख्या अफाट शहरात पाहिजे ते ठिकाण शोधणे फार कठीण झालं असतं. तसेच ज्याला 'डाऊन टाऊन' म्हणतात तो शहराचा मुख्य भाग, बहुधा शहराच्या मध्यभागीच असतो त्यामुळे संध्याकाळी कचेऱ्या सुटल्यावर लोक चारी दिशेने पांगू शकतात. सार्वजनिक वाहनांवरील ताण विभागला जातो, आणि फारशी रेटारेटी न होता लोक आपापल्या घरी पोहोचतात.

## ब्रॉडवेवरील लैंगिक चित्रपट आणि रतिक्रीडांचें प्रात्यक्षिक

मी ह्यावेळी तीन दिवस व परतताना ६ दिवस व दुसऱ्या खेपेस १० दिवस न्यूयॉर्कच्या रस्त्यांवरून स्वैर फिरत होतो. माणसांचं, दुकानातल्या वस्तूंचं निरीक्षण करीत, फिरण्यात दिवस संपे पण पाय थकत नसत, ह्याचे आश्चर्य वाटते. युनोची बिल्डींग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, रॉकफेलर सेंटर, कलाकारांचे आवडते लिंकन सेंटर नॅचरल हिस्टरी म्युझियम वगैरे ठिकाणे वर वर बघितली. 'स्वातंत्रदेवी' चा भव्य पुतळादेखील लांबूनच बघितला. माझी आवडती ठिकाणे म्हणजे टाईम्स स्क्वेअरला उतरून ब्रॉडवेवरून मनमुराद भटकणे. पोर्ट ॲथॉरिटी बिल्डींगच्या आजूबाजूला फिरणे. असंख्य जगप्रवासी ह्या भागातच गर्दी करून फिरत असतात. त्यांना न्याहाळणं हा माझा आवडता छंद आहे. कोण कोठून आला असेल त्याचा अंदाज करीत त्याची चालण्या बोलण्याची, वस्तू खरेदी करण्याची पद्धत, रस्त्यावरील छोट्या हॉटेलात बसून खाण्याची तऱ्हा बघण्यात मौज आहे. ह्या भागात लंडनच्या पिकॅडिलीसारखी एकजात सिनेमा, नाट्यगृहे एकाला एक लागून आहेत. बहुतेक सिनेमाचित्रे, भयंकर क्रौर्य, खून, मारामारीची तरी नाहीतर ज्याला पोर्नोग्राफी (Pornography) म्हणतात ती संभोग चित्रे. न्यूयॉर्क हे बकाल शहर आहे आणि अमेरिकेत सेंसॉर बोर्डच नसल्यामुळे उत्तान शृंगाराची, बीभत्स आणि अनैसर्गिक संभोगाची सर्रास चित्रे येथे दाखविली जातात. बाहेरच्या पोस्टर्सवर उघडी नागडी चित्रे असतात आणि निग्रो मुलं मुली लोकांना आवाहन करीत असतात. ज्यांना परवडत नाही व पुष्कळ विविधता हवी त्यांच्याकरता 'पीपशो' म्हणजे २५ अथवा ५० सेंटचे नाणे टाकून बघावयाचा सिनेमा. एक एका दुकानात असे २०–२५

'पीपशो' ची व्यवस्था असते. जवळच लैंगिक वाङ्मय फुकट बघण्याची आणि वाचण्याची सोय असते.

'पीपशो' ची वरची पायरी म्हणजे प्रत्यक्ष संभोगक्रीडादर्शन (Live Show) पुन्हा कधीही हा 'खेळ' पाहण्यास मिळणार नाही म्हणून मी देखील हा 'पीपशो' बघितला आणि दोनदा सिनेमालाही जाऊन बसलो ! येथेच अनेक 'सेक्स शॉप' आहेत ज्यात स्त्रीपुरुषास एकमेकांशिवाय रतिसुख मिळविण्याकरता अनेक उपकरणी विक्रीस ठेवलेली आहेत. अमेरिकेत वेश्याव्यवसायाला बंदी आहे. परंतु कायदा ऑफिस थाटून 'कॉल-गर्ल' पुरविण्यास, त्यांना फिरण्याकरता गाडी मिळवून देण्यास पूर्ण मुभा आहे ! अशी अनेक 'ऑफिसे' ब्रॉडवेच्या आजूबाजूला आहेत आणि निग्रो लोक हमरस्त्यावर जाहिराती वाटून त्यांना गिऱ्हाईके आणून देतात. अमेरिकेत लैंगिक स्वातंत्र्य बेसुमार असल्यामुळे अनेक मोठ्या हॉटेलातून 'टॉपलेस-बॉटमलेस' मुली वाढप्याची कामे करतात ! तशा चक्क पाट्या हॉटेल बाहेर लावलेल्या असतात म्हणून मला माहिती ! समक्ष जाऊन हा 'आंबट शोक' करून खिसा हलका करण्यात मला रस नव्हता. ह्या भागात फिरणारास पैशाचं पाकीट घरात ठेवून यावं हे बरं. नाहीतर माणूस ह्या मोहनगरीत फसेल तरी किंवा निग्रो धटींगण त्याचा केव्हा खिसा उडवतील ते कळणार नाही.

## 'ग्रेहाऊंड' बस—एक अचाट परिवाहन संस्था

अमेरिका जवळून पहावयाची असेल तर विमानापेक्षा 'ग्रेहाऊंड' बसनं जाणं चांगलं असा येथील लोकांचा सल्ला मिळाल्यामुळे पोर्ट ॲथारिटी ह्या 'ग्रेहाऊंड' च्या मुख्य डेपोमध्ये जाऊन तिकीट काढले. 'ग्रेहाऊंड' बस सर्व्हिसचं जाळं संबंध अमेरिकेभर पसरले आहे व कॅनडाच्या सर्व भागातही ग्रेहाऊंडनं जाता येते. रेल्वेपेक्षा स्वस्त आणि आरामशीर प्रवास करावा तर ग्रेहाऊंडनं. त्यांच्या गाड्या टाईमटेबलप्रमाणे सुटतात आणि एका रात्रीत हजार मैलांचा प्रवास करून ठरल्यावेळी ठिकाणावर पोहोचतात असा त्यांचा लौकीक आहे. 'स्वातंत्र्याच्या द्विशतक' सोहळ्याच्या निमित्तानं त्यांनी काही सवलतीची तिकीटे ठेवली होती. त्यापैकी १७५ डॉलरचे एक महिना चालणारे व अमेरिकेच्या व कॅनडाच्या कोणत्याही ठिकाणी प्रवास करता येणारे तिकीट मी काढलं. मात्र मला १७५ डॉलर ऐवजी २५० डॉलर द्यावे लागले. कारण हा सवलतीचा दर परदेशात हे तिकीट घेणाऱ्यांकरताच आहे. त्यांची सर्व माहितीपत्रके आणि टाईम टेबलं माझ्याजवळ होती पण त्यात कोठेही असं स्पष्ट शब्दात छापलेले नाही. पण हुज्जत घालण्यास मला वेळ नव्हता म्हणून मी २५० डॉलर देऊन तिकीट काढले, दुपारची दोन वाजताची बस पकडली आणि वॉशिंग्टनच्या मार्गाला बस चालू लागली.

न्यूयॉर्क वॉशिंग्टन हे अंतर २५० मैल आहे, ते ग्रेहाऊंड बस फक्त ४ तास

वीस मिनिटात काटते. ह्यावरून बसच्या वेगमर्यादेचा आणि वेगानं चालणाऱ्या वाहतुकीकरता कार्यक्षम रस्त्याची कल्पना यावी. बस न्यूयॉर्कच्या खाडी खालील काही मैलांच्या भुयारातून बाहेर पडते तीच शहराची हद्द पार करून. बसचा वेग कोठेही कमी होत नाही. किंवा तिला कोठे थांबावे लागत नाही. चार दोन ठिकाणी 'टोलनाक्या' वरही काही सेकंदात बसचा ड्रायव्हर टोल चुकता करून मार्गस्थ होतो. वाटेत फिलाडेल्फियाचा फाटा लागतो व बाल्टीमूरच्या तर बस शहराला चिकटून जाते. न्यूयॉर्क टाकल्यापासून दोन्ही बाजूला प्रचंड कारखाने आहेत. साधारणतः पिंपरी चिंचवडचे ४१५ कारखाने एकत्र केल्यास त्यांच्या पेक्षाही जास्त मोठे क्षेत्रफळ एका एका कारखान्याचे आहे. आवारात कच्च्या मालाचे अथवा तयार झालेल्या मालाचे प्रचंड साठे उघड्यावर पडलेले दिसतात. असंख्य ट्रक-लॉरींची अखंड वाहतूक चालू असूनही आपल्या चिंचवड पिंपरी सारखी वाहनांची कोंडी तेथे होत नाही, कारण एकमार्गी सहा सहा लेन असल्यामुळे जो तो आपल्या वेगमर्यादेनुसार आपल्या लेनमधून जात असतो. अलिकडे अपघाताचे प्रमाण वाढल्यामुळें व तेलाच्या किंमती वाढल्यामुळे कायद्याने जास्तीत जास्त वेगमर्यादा ५५ मैल ताशी ठरवून दिली आहे. तथापि, ह्या 'फ्रीवे' वर ह्याहूनही जास्त वेगाने जाणाऱ्या गाड्या दिसल्या. बस, डिझेलवर चालत असल्यामुळे बसला हा नियम लागू नसावा, अन्यथा ४ तास वीस मिनिटात २५० मैल अंतर कापणं कसं शक्य व्हावं ?

## मोटारींचे ढीग !

काही ठिकाणी उघड्या मैदानावर असंख्य मोटारी वेड्या वाकड्या, एकावर एक रचलेल्या दिसतात. अफाट संपत्तीच्या जोरावर अमेरिकन माणसाला वर्ष दोन वर्ष जुनी झालेल्या गाडीचा कंटाळा येतो. तो ती सरळ रस्त्यावर सोडून देतो आणि नवीन विकत घेतो. आता रस्त्यावर गाडी सोडण्यास कायद्यानं बंदी आहे म्हणून लोक 'भंगार' म्हणून येथे आणून टाकतात. अशा लाखो गाड्या, ज्यात पुष्कळशा सुस्थितीत असतात अथवा आपल्या मते नव्याच असतात, येथे आणून एकावर एक रचून ठेवलेल्या असतात. त्यानंतर त्यांचे क्रोमीयम, प्लॅस्टिक भाग काढून घेण्यात येतात आणि एका पावरयंत्राखाली त्या दाबून त्याचा चपटा पत्रा होतो तो पुन्हा मोटार कारखान्यात रवाना होतो अगर दुसऱ्या कामी खर्च होतो. न्यूयॉर्क शहरात अशा अनेक गाड्या सोडून दिलेल्या मी पाहिल्या. निग्रो लोक त्यातून पाहिजे ते सामान काढून नेतात आणि तीन दिवसानंतर म्युनिसिपालीटीची खास गाडी येऊन त्या तेथल्या तेथेच चपट्या करून उचलून नेते. 'जुन्या' मोटारी, एकदा पंक्चर झालेले टायरांचे ढीग कसे नष्ट करावयाचे ही अमेरिकन शासनाची डोकं-दुखी आहे.

## ‘मोटार थांबे’–अकरा मजली

वॉशिंग्टनला माझ्या ओळखीच्या सौ. मालूताई जोगळेकर मला उतरवून घेण्यास आल्या होत्या. चहा पिण्याच्या मोहानं मी तेथे उतरल्यावर उपहार गृहात काही वेळ घालविल्यामुळे त्यांना बस डेपोभोवती प्रदक्षिणा घालीत बसावे लागले, कारण अमेरिकेत कोणत्याही हमरस्त्यावर एक मिनिटभर देखील गाडी थांबविता येत नाही. ठिकठिकाणी ‘पार्कींग लॉट’ आहेत तेथेच पैसे टाकून गाडी ठेवता येते. काही इमारतीत पहिले चार पाच मजले गाड्या ठेवण्याकरता असतात. एका इमारतीत तर पहिले अकरा मजले गाड्यांकरताच आहेत! आपण पहिल्या मजल्यापासून गोल गोल फिरावयास सुरवात करावयाची आणि जागा मिळेपर्यंत मजले चढत राहावयाचे जागा मिळाल्यावर तेथे गाडी ठेवावयाची आणि लिफ्टनं खाली यावयाचं.

## वॉशिंग्टन-एक आगळे शहर

वॉशिंग्टन हे पूर्वयोजनेनुसार रचित (प्लॅन्ड) शहर आहे. अमेरिकेची ती राजधानी असल्यामुळे वॉशिंग्टन हे सर्व शहरात वेगळं वाटतं. सुमारे ३।४ मैल गेल्यावर प्रशस्त मैदाने, नदी किनारा आणि त्याच्या दुतर्फा हिरवे गालिचे दिसू लागले. त्यानंतर तर वृक्षराई दिसू लागल्या आणि काही मैल गेल्यावर तर निबिड अरण्यातून गाडी जाऊ लागली. शहरापासून केवळ पंधरा मैल अंतरावर महाबळेश्वर सारखी झाडी आणि निसर्गाचं एवढं रम्य दर्शन घडावं ह्याचा मला अचंबा वाटला. डॉ. हेमंत व मालूताई जोगळेकरांचं घर ज्या ‘बेथेस्डा’ भागात आहे त्या भागात सर्व बडे लोक राहातात. डॉ. जोगळेकरांच्या आजूबाजूच्या बंगल्यात सिनेटर्स आणि जागतिक बँकेचे डायरेक्टर राहातात.

आमची गाडी बंगल्याच्या आवारात आल्याबरोबर गॅरेजचा दरवाजा धाडकन वर गेला, अलीबाबानं ‘उघडतिळा’ म्हणताच जसा गुहेचा दरवाजा उघडावा तसा! ‘रिमोट कंट्रोल’ स्विचमुळे लांबूनही दरवाजा उघडता येतो ही इलॅक्ट्रॉनिकची किमया. आता अशा अनेक अद्‌भुत गोष्टी पाहावयाच्या होत्या.

## अमेरिकन घर

डॉ. जोगळेकरांचा बंगला मी राहिलेल्या सर्व घरात सर्वात मोठा आणि प्रशस्त. प्रवेश केल्यावर दोन्ही हाताला दोन दिवाणखाने, उजव्या हाताचा अद्यावत फर्निचरनं व सुंदर वस्तूंनी सजवलेला. त्याचा वापर फक्त परदेशी पाहुणे अथवा बाहेरचे कोणी बडे आल्यास त्यांच्याकरता. डाव्या हाताला तेवढाच अथवा थोडा मोठाच दररोजच्या वापराकरता. त्यात टी. व्ही. कोचांच्या शेजारी लोड तक्के. त्यातच जणू चुरमुऱ्यांची पोती. ती कशाकरता म्हणून विचारलं असता त्यावर

बसून बघा म्हणून त्यांनी सांगितलं. ती काही तरी मऊ वस्तू भरलेली होती व त्यावर बसल्यावर आपण बसू तसा त्याला आकार येई. म्हटलं तर साधी खुर्ची, म्हटलं तर आराम खुर्ची ! पाठीमागच्या अंगाला जेवणघर व जेवणाची व्हरांडावजा खोली. अमेरिकन गृहीणींचं स्वयंपाकघर पहाण्यासारखं असतं. मध्यभागी ज्याला 'कुकींग-रेंज' म्हणतात ती विजेची चूल, शेगडी, त्याखाली ओव्हन म्हणजे गरम तवा, भाजलेले पदार्थ तयार करण्याकरता. केक बिस्किटापासून मक्याची कणसं भाजण्याकरता. पाहिजे तो कच्चा पदार्थ ह्या पेटीत बंद करून ठेवला तरी करपत नाही कारण पेटीबाहेर उष्णतेची आच नियंत्रण करण्याकरता नियंत्रक यंत्रे असतात. हात धुवावयाच्या 'वॉशबेसीन' मध्ये गरम थंड पाण्याचे नळ असतात. डाव्या हाताचा गरम व उजव्या हाताचा थंड हा अलिखित नियम आहे. दांडा डाव्या हाताला नेला व नंतर उजव्या हाताला नेला की समशीतोष्ण पाणी येते. हे शास्त्र समजून घ्यावे लागते. कारण आंघोळीच्या टबमध्ये तसेच नळ असतात व ते फिरवण्याची कळा प्रत्येक ठिकाणी निरनिराळ्या असतात. तसेच दरवाजे बंद करण्याची कळा प्रत्येक ठिकाणी निराळ्या. आता गॅस पेटवण्यास काडी लावावी लागत नाही. किल्ली फिरवली की ज्वाला तुमच्या समोर हजर. फ्रीजमध्ये ब्रह्मांड भरलेलं असतं. दुधाची तीन चार गॅलनची खोकी– हो, दूध गॅलनच्या मापानं मिळते, फक्त ४० सेंट गॅलन ह्या भावानं. दह्याचे कागदी गोल कॅन, चीज फळे, भाज्या अंडी ह्यांनी फ्रीज भरलेला असतो. शिवाय चिकन मटन वगैरे अक्षम्य भक्षणाच्या चिजा व घाऊक प्रमाणावर घेतलेल्या अनेक नाशिवंत वस्तूकरता तळघरात 'डीप फ्रीज'ची प्रचंड पेटी असते. मिक्सर, ग्राईंडर तर असतातच परंतु बशा धुण्याच्या पात्रात भाजी चिरलेली डेखं, सालपटं, खरखटं अन्न यामुळे नळ चोंदू नये म्हणून खाली ग्राईंडर बसविलेला असतो. तो क्षणात सर्वांचं पीठ करून टाकतो आणि सर्व घाण पाण्याबरोबर वाहून जाते. बहुतेक कडधान्ये अर्धवट शिजवलेली असतात आणि तिखट मीठ घालून काही क्षणात सुंदर मटाराची उसळ तयार होते. आपल्याकडील बहुतेक सर्व भाज्या स्वस्त आणि मुबलक मिळतात. जेवण झाल्यावर सर्व बशा व भांडी ओटयाच्या टोकाला असलेल्या एका कपाटात टाकून द्यायची. कपाट बंद करून चावी द्यावयाची, काही मिनिटात सर्व भांडी स्वच्छ झालेली असतात. तिकडे नोकर मिळत नाहीत म्हणून ह्या अत्याधुनिक सुविधांचा जन्म झाला आहे आणि गृहिणींचा सर्व वेळ वाढा रांधा, उष्टी काढा करण्यात जात नाही. शिवाय नवरोजीही स्वयंपाक घरात लुडबुडत असतात आणि आपल्या परीनं गृहिणींना मदत करीत असतात.

वर जिना चढून गेलं की तीन शयनगृहे. एक यजमानांचे, एक मुलांचे व एक पाहुण्यांचे. प्रत्येकाची बाथरूम निराळी. शिवाय एक स्वतंत्र खोली, गायनवादन अभ्यास करण्याकरता खालच्या दोन दिवाणखान्यांच्या खाली सबंध बंगल्याच्या लांबी रुंदीचे तळघर. त्यात 'डिप फ्रीज, सबंध घराकरता एअर कंडिशन मशीनरी,

हीटिंग मशिनरी, त्याचे बाजूला पाळलेल्या मांजरीची स्वतंत्र खोली व बाथरूम व बाकीच्या मोकळ्या जागेत टेबल टेनिसचे टेबल व आड चीज वस्तू. परवा परत त्यांचेकडे जाण्याचा योग आला तेव्हा तळघराचा कायापालट झालेला पाहिला. गानलुब्ध जोगळेकर दांपत्यानं स्वत: खपून त्या तळघराचा मैफलीचा हॉल बनविला आहे. सुंदर भारतीय बैठक, भिंतीलगत मोजक्याच खुर्च्या. गायक वादकांकरिता एक वेताचा उंच मंचक आणि कोपऱ्यात कॉफीचा काऊंटर. येथेच आमची पार्टी झाली व नंतर गायन वादनाचे कार्यक्रम. गॅरेजच्या बाजूनं आत येण्यास चार पाच पायऱ्या चढाव्या लागतात. बाहेरून साधे दिसणारे-अमेरिकन घरे आपल्या मानानं बाहेरून साधीच दिसतात– हे घर चार लेव्हलमध्ये आहे. येथे सर्व घरात भिंती-पासून भिंतीपर्यंत गालिचे घातलेले असतात अगदी बाथरुममध्ये सुद्धा. शनिवार, रविवार सुटीचे म्हणून शुक्रवारी संध्याकाळी पंत घरी आल्यावर प्रथम बाहेरचे लॉन कापण्यास धावतात आणि बाईसाहेब व्हॅक्यूम क्लिनरनं सर्व घराचे गालिचे साफ करतात. घरापुढे कंपाऊंड घालण्याची पद्धत नाही म्हणून घरापुढील हिरवळीचा गालिचा थेट रस्त्याच्या फुटपाथपर्यंत पसरलेला असतो आणि त्याची मशागत ज्याची त्यालाच करावी लागते. मागील दारी मात्र कम्पाऊंड असते. लांववर हिर-वळ असते. एका कोपऱ्यात भाज्या लावलेल्या असतात, फुलझाडं असतात आणि लांवच्या वेशीजवळ फळांचे वृक्ष असतात. त्याला इंचाइंचावर ॲपल वगैरे फळे लागलेली असतात. एका कोपऱ्यात मुलांकरता झोपाळा, घसरगुंडी असते आणि दुसऱ्या कोपऱ्यात 'बार्वेक्यू' म्हणजे बगीच्यात बसून भाजून खाण्याकरता एक विजेरी भट्टी आणि त्या शेजारी जाडया लाकडाचे ओवड धोवड भोजन टेबल व त्या भोवती जाडी जाडी बाकडी. उन्हाळयात पुष्कळ लोक रात्रीचे भोजन येथे बसून घेतात. काही ठिकाणी मागील दारी पोहण्याचा तलाव असतो. त्याचा उप-योग उन्हाळयांत पोहण्याकरता आणि थंडीत बर्फावरचे स्केटींग करण्याकरता होतो. परंतु अलीकडे पोहण्याच्या तलावाला जास्त जागा लागत असल्यामुळे त्या ऐवजी साधारण आठ फूट परीघ असलेली प्लॅस्टीकची टँक वापरतात. त्यात पाणी भरले की तलाव होतो. त्याची खोली ४ ते ५ फूट असल्यामुळे त्यात चांगले डुंबता येते व नको असेल तेव्हा तो गुंडाळूनही ठेवता येतो. झाडांना पाणी घालणं येथे श्रमाचं नाही. ठिकठिकाणी 'स्प्रिंकलर्स' लावून ठेवलेले असतात. त्यांच्या चाव्या घरातच असतात. हिरवळीवर चौफेर पाणी, फुलझाडांना एकाच दिशेनं त्यांच्या उंचीप्रमाणे उंच पाणी व मागच्या मोठ्या वृक्षांकरता उंचच उंच फवारे उडतात. झाडांच्या शेंडयापासून झाड न्हाऊन निघतं. गुलाबांच्या झाडांना मात्र त्यांच्या बुध्यांवरच पाणी शिंपडले जाते, फुलांच्या पाकळ्या गळू नयेत म्हणून. सकाळी उठल्यावर थुईथुई नाचणारी कारंजी पाहणं हा माझा आवडता छंद होता. प्रेशर कमी जास्त करून ह्या फवाऱ्यांची उंची कमी जास्त करता येते. जमीन अती

सुपीक असल्यामुळे भाजीपाले मुबलक होतात. दुधी, लाल भोपळे कंपाऊंडच्या आतून बाहेरून लटकलेले होते, परंतु कुणी काढून नेत नाही म्हणून त्यांची वाणं वाटावी लागतात ! साधारणपणे घरटी दोन तरी मोटार गाड्या असतात. मुले मोठी असली तर त्यांची निराळी गाडी असते. पुरुषाची व बायकोची गाडी निरनिराळी असते. दोन गाड्यातील किमान एक तरी गाडी जपानी बनावटीची असते.

## वॉशिंग्टन भ्रमंती– प्रेक्षणीय स्थळे

डॉ. जोगळेकरांबरोबर सकाळी ब्रेकफास्ट घेऊन मी त्यांच्याबरोबर त्यांच्या एअरकंडीशन्ड गाडीतून भ्रमंती करण्यास निघे. डॉक्टरांना गाण्याची आवड. त्यांच्या घरी अनेक मोठ्या कलाकारांचे कार्यक्रम ते करीत असतात, त्यांच्या टेप्स ऐकत ऐकत आम्ही त्यांच्या हॉस्पिटलमध्ये जात असू. तेथे ते अर्ध्या तासात काम लावून देऊन पुन्हा मला घेऊन बाहेर पडत आणि ७-८ मैलांवर असलेल्या शहराच्या मुख्य ठिकाणी, वॉशिंग्टन मेमोरिअलच्या पायरीपाशी मला सोडीत व तेथूनच संध्याकाळी मला घेण्यास येत. योगायोगानं मला तेथील एक मोठं हॉस्पिटल पहाण्याचा लाभ झाला. मी प्रतीक्षा कक्षालयात बसत असे. त्या वेळी माझ्या लक्षात आलं की येथील हॉस्पिटलात कमालीची शांतता असते. इकडून तिकडे जाणाऱ्या परिचारिकांच्या बुटांचा थोडाफार आवाज आणि ध्वनिक्षेपणावरून डॉक्टरांना आणि वैद्यकीय विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सूचना सांगणाऱ्या बाईच्या आवाजाशिवाय दुसरा आवाज नाही, कोठे रुग्णाचं कण्हणं नाही की कोठे त्यांच्या नातलगांचा गोंगाट नाही. जो तो निमूटपणे आपआपल्या कामात गर्क. डॉक्टरांच्या खिशात एक छोटा ट्रान्समीटर असतो. ते ज्या वार्डात असतात तेथे त्यांना सूचना ऐकता येतात. हॉस्पिटलाच्या आवारात राहणाऱ्या डॉक्टरांना तर त्यांच्या घरात बसून ट्रान्समीटरमार्गे बोलता येते व सूचना देता येतात. शिकागोला मी ज्यांचेकडे राहिलो होतो त्या डॉ. सौ. पिनाकिनी शिवदेना तर झोपता झोपता बोलावणे आल्यामुळे परत हॉस्पिटलमध्ये जावं लागलं आणि मध्यरात्र उलटल्यावर त्या केव्हातरी घरी परत आल्या.

वॉशिंग्टन मेमोरियलपासून एक मैलाच्या अंतरावर सर्व प्रेक्षणीय स्थळे आहेत. प्रेसिडेंटचे निवासस्थान-व्हाईट हाऊस, सिनेट आणि कॉंग्रेस हाऊस, स्मिथसोनियन म्युझियमचे नॅचरल हिस्टरी आणि टेक्नॉलाजी म्युझियम, स्पेस म्युझियम, आर्ट आणि शिल्प म्युझियम, सुप्रीम कोर्ट व इतर अनेक. त्यापैकी प्रत्येक वास्तू एवढी भव्य आणि प्रेक्षणीय आहे की सकाळपासून संध्याकाळपर्यंत फिरलं तरी सर्व बघून वर दशांगुळे पुरून उरतेच. म्हणून त्याचा सर्व तपशील देणं केवळ अशक्य आहे.

सर्वप्रथम वॉशिंग्टन डी. सी. चे वेगळेपण जाणवते ते त्या शहराच्या रचनाकौशल्यात. हे शहर मुद्दाम वसविलं आहे आणि ते देशाची राजधानी आहे. म्हणून त्याला वेगळं महत्त्व आहे. न्यूयॉर्कच्या गगनचुंबी इमारतींच्या पार्श्वभूमीवर येथल्या सर्वच्या सर्व इमारती लहान असलेल्या पाहून आपण सुखावतो. इमारती लहान असण्याचं कारण सर्वोच्च मानाचं स्थान जे सिनेट व कॉंग्रेस हाऊस (पार्लमेंट) त्यापेक्षा कोणतीही इमारत उंच असता कामा नये, प्रेसिडेंटचे व्हाइट हाऊस हे देखील ह्या नियमाला अपवाद असता कामा नये आणि सिनेट हाऊस फक्त तीन मजले असलेली पण भव्य इमारत आहे. म्हणून सर्व इमारती त्याहून ठेंगण्या! येथील सर्वच शहरांतील रस्ते समांतर रेषेत असतात, कोठेही वाकडी वळणे नसतात. पण वॉशिंग्टनमधील सर्व रस्ते जास्त रेखीव. दोन रस्त्यांमध्ये विस्तीर्ण मैदाने त्यावर हिरवळीचे मखमली गालीचे पसरलेले, कडेकडेने दुतर्फा वृक्षवल्लीच्या पंक्ती आणि मनोहारी फुलांचे ताटवे. ठिकठिकाणी ठेवलेल्या बाकांवर आणि हिरवळीवर दमले भागलेले प्रवासी बरोबर आणलेल्या 'भाकऱ्या' सोडून खात असतात. अथवा लोळत असतात. येथे जगप्रवाशांची झुंबड उडालेली असते. त्यातच खुद्द अमेरिकेच्या निरनिराळ्या लांब लांबच्या स्टेटस्‌मधून जथाबंद मुलांना घेऊन बसेस आलेल्या असतात पण कोठे घाण नाही की गोंगाट नाही. खाल्लेल्या पदार्थांची वेष्टणे व पेयांचे रिकामे डबे जो तो ठिकठिकाणी ठेवलेल्या कचऱ्याच्या डब्यात नेऊन टाकतो. ह्या भागात साध्या पोलिसांच्या जोडीला घोडेस्वार रक्षकही असतात. त्यांचे उमदे घोडे पहाण्याकरता मुले त्यांच्याभोवती गोळा होतात.

प्रथम मी स्पेस म्युझियम बघितले. अंतराळ विज्ञानाचा अद्‌भुत आणि मनोरंजक संपूर्ण आलेख म्हणजे हे म्युझियम. अंतराळ संशोधनाच्या प्रगतीचे सर्व टप्पे येथे पाहावयास मिळतात. पहिले अंतराळवीर नील हार्वे आणि आर्मस्ट्रॉंग ज्या यानातून प्रथम चंद्रावर उतरले ते 'जेमिनी' यान येथे जसेच्या तसेच ठेवले आहे. यानात ते ज्या पोशाखात बसले असतील तो पोशाख घातलेले त्यांचे 'डमी' सर्वांग पट्ट्यांनी जखडलेल्या आणि संकुचित जागेत बसल्यामुळे आखडलेल्या अवस्थेत ठेवलेले आहेत. त्या यानाची सर्व यंत्रणा तसेच ज्या अग्नीबाणानं (रॉकेट) ते अंतराळात उडविले गेले त्याची यंत्रणा आपणास जवळून पहाण्यास मिळते. त्यांनी आणलेले चंद्रावरील दगड आपणास हात लावून बघण्यास मिळतात. तसेच अलीकडेच अमेरिकेचे 'अपोलो' आणि रशियाचे 'सोयुझ' ह्यांची युती झाली ती दोन्ही याने येथे ठेवलेली आहेत. त्यांचे 'डॉकिंग' असे झाले व त्यांनी एकमेकांच्या यानात कसा प्रवेश केला ह्या चित्तथरारक प्रसंगाचं दर्शन येथे होते आणि अमेरिकेनं अंतराळविज्ञानात केलेल्या नेत्रदीपक प्रगतीनं आपण थक्क होतो, दिपून जातो.

# नासा जॉन्सन स्पेस सेंटर

ह्यूस्टनच्या मुक्कामात दक्षिण टोकाला असलेल्या नासा स्पेस सेंटरला भेट दिली. एका विस्तीर्ण शोभिवंत परिसरात ६ इमारतीत हे अंतराळ उड्डाण केंद्र आहे. ते दाखविण्याकरता तुकड्या करून फिरवून माहिती दिली जाते. प्रतीक्षा केंद्रात आपण जमतो तेथे 'मर्क्युरी' व 'अपोलो १७' ह्या प्रत्यक्ष अंतराळ भ्रमण करून आलेल्या यानांचं दर्शन होतं. त्यानंतर उड्डाणवीरांच्या शिक्षण केंद्रात त्यांना कशा प्रकारचं शिक्षण दिलं जातं त्याची माहिती. 'मिशन कंट्रोल सेंटर'मध्ये कॉम्प्युटर्सच्या साहाय्यानं प्रत्यक्ष उड्डाणाचं संयोजन व नियंत्रण ह्याची माहिती यंत्रांच्या सहाय्यानं सांगण्यात येते. त्यानंतर गेल्या वर्षी मानवासहित पाठविलेल्या स्पेस शटलच्या वीरांना द्यावयाची उपकरणी, कपडे व त्यासंबंधीचं शिक्षण देणारी शाळा. लुनार सँपल इमारतीत चंद्रावरून आणलेले दगड,इतर धातू माती वगैरेची तपासणी करणारी लॅबोरेटरी. त्यानंतरच्या इमारतीत हवाविरहीत खोलीत अंतराळात उड्डाणवीरांना निसर्गाशी टक्कर देण्याची तयारी म्हणून प्रशिक्षण. प्रखर उष्णता प्रखर दाब आणि हवा विरहीत अंतराळात तरंगण्याचं अत्यंत कठीण काम येथे करवून घेतलं जातं. त्यांचं खाणंपिणं पाणीविरहीत अगदी छोट्या औषधांच्या गोळ्यांसारखं असतं. मात्र दाढी करण्याची उपकरणी, टूथपेस्ट, ब्रश अशा सर्व सुविधा असतात. टी. व्ही. च्या व स्पेशल चित्रपटांच्या द्वारे आतापर्यंतचा त्यांच्या प्रगतीचा आलेख बघावयास मिळतो. रॉकेटस्, त्याच्यात बसविलेली वेगवेगळी अवजारे व ती बरहुकूम सुटी होण्याच्या कळा, तसेच अग्निबाण, यानं वगैरे पहावयास मिळतात.

अंतराळ विज्ञानाचे त्यांचे सर्व ज्ञान आणि शोध त्यांनी जगापुढे खुले करून ठेवले आहेत आणि जणू जगाला आव्हान केले आहे की 'येथे या, बघा, पाहिजे तेवढे शिकून घ्या तरीही तुम्ही आमची बरोबरी करू शकणार नाही !' त्यांचा हा अभिमान रास्त नाही असं कोण म्हणेल ? ह्या अद्‌भुत, अतर्क्य नगरीत फिरून झाल्यावर अमाप संपत्ती आणि अपार कष्ट करून अमेरिकेनं मिळविलेल्या ह्या अतुलनीय यशानं आणि कीर्तीनं आपण नतमस्तक होऊन म्हणतो 'येथे कर माझे जुळती'

शेजारीच असलेले नॅचरल हिस्टरी आणि टेक्नॉलॉजी म्युझियम असेच थक्क करून सोडणारे आहे. गेल्या दोनशे वर्षांत अमेरिकेत झालेल्या विज्ञान प्रगतीचे क्रमानुसार टप्पे येथे पाहावयास मिळतात. हेनी फोर्डची १९०८ मधली पहिली मोटारगाडी प्रथम तुमचे स्वागत करते. त्यानंतर अद्यावत मोटारींचा भाग. भले-मोठे पुढले चाक असल्यापासून आजच्या दोन्ही सारख्या चाकाच्या सायकली, रेड इंडियनच्या काळातील अरण्यातून दोन घोड्याच्या भल्या मोठ्या घोडागाडीपासून

राणीच्या आजच्या बग्गीपर्यंतची वाटचाल, १७५६ च्या पॅसिफिक रेल्वेचे इंजिन आणि डबे जसेच्या तसे तेथे आणून ठेवलेले आहेत. ते प्रचंड धूड तेथे कसे आणून ठेवले असतील हा प्रश्न पडतो म्हणून तेथे खुलासा केलेली पाटी आहे की आधी ते इंजिन व डबे तेथे आणले आणि नंतर भिंती बांधण्यात आल्या. ' ते इंजिन जणू खरे आहे असं वाटावं म्हणून मधून मधून त्याची शिटी वाजते, धूर सोडल्याचा आणि सुस्कारे टाकीत गाडी सुरू झाल्याचा आवाज होतो आणि गाडीनं वेग घेतल्यावर ' तराणा ' सुरू होतो त्याचे कानठळ्या बसविणारे आवाज ध्वनिपट्टी-वरून ऐकविले जातात. एवढेच काय, गाडीच्या डब्यांच्या रचनेत आणि सुखसोईत गेल्या दोनशे वर्षांत कसे बदल होत गेले ते प्रत्यक्ष तसे डबे ठेवून पहावयास मिळते. नौकानयनातील प्रगती अशीच. शिडाच्या गलबतापासून आजच्या आधुनिक यंत्र-सामग्रीयुक्त सुखसोयींच्या प्रचंड आगबोटीपर्यंत निरनिराळ्या मॉडेलमधून बघण्यास मिळते. विमानाच्या प्रगतीचे तर स्वतंत्र दालनच आहे. त्यांत ' आर १०१ ' ह्या बलूनपासून अटलांटिक महासागर प्रथम पार करणाऱ्या राईट बंधूंच्या विमानापर्यंत आणि त्यानंतर झपाट्याने सुधारलेल्या विमानांपासून आजच्या जेट युगापर्यंतच्या सर्व विमानांची मॉडेल्स ' त्यांच्या संपूर्ण ' माहितीसह ठेवलेली आहेत. युद्धशास्त्र हा स्वतंत्र विभाग आहे आणि त्यात लढाऊ आगबोटी, पाणबुड्यापासून अद्यावत् लढाऊ विमाने व मिसल्स् आहेत. तसेच पूर्व कालापासून आजच्या आधुनिक शस्त्रास्त्रां-पर्यंत सर्व युद्धाची आयुधे पहावयास मिळतात. त्यांत हात बॉम्ब, स्फोटक मोठे बॉम्ब, बोटीतून व पाणबुडीतून सोडावयाची क्षेपणास्त्रे होती. फक्त ॲटमबॉंब अथवा अन्य अणू स्फोटक (न्यूक्लिअर) शस्त्रास्त्रे नव्हती. जगापासून लपवून ठेवलेले तेवढेच एकमेव गुपित. त्यानंतर छपाईच्या यंत्राच्या प्रगतीचा आलेख, फोटोग्राफी आणि छाया चित्रपट ह्यांच्या प्रगतीचे टप्पे, त्यानंतर इलेक्ट्रॉनिकनं निर्माण केलेली भुल-भुलाई दुनिया पाहाता पाहाता थक्क होऊन आपण म्हणू लागतो की अमेरिकेने विज्ञान शास्त्रात उच्चांक गाठला आहे. आता नवीन काही शोध लावण्याचे शिल्लक नाही. सर्व भौतिक सुख सोयींची साधनं त्यांनी केवळ कळ दाबून आपल्या पाया-पाशी आणून ठेवली आहेत. अगणित संपत्ती, अचाट बुद्धिमत्ता आणि अफाट परिश्रम यांच्या त्रिवेणी संगमातून आजची अमेरिका जगाच्या शिखरावर उभी आहे. उद्या नुसती फुंकर मारून अथवा मनातल्या मनात विचार करून हवी ती वस्तू ते आपल्या समोर हजर करू शकले तर त्यात आश्चर्य वाटणार नाही.

त्यांचे कला, शिल्प, म्युझियम पाहून मात्र अमेरिका ह्या विषयात उणी वाटते. प्रवेशद्वारासमोरच्या उद्यानात एक सुंदर कारंजं आहे. त्यातून स्फटिकासारखं शुभ्र पाणी निरनिराळे आकार घेत उंच उडत असतं. त्याचे तुषार आपल्याला सुखावत असतात. त्या कारंज्या सभोवताली असंख्य दगडी धातूची शिल्पं ठेवलेली आहेत. त्यातील काही चटकन समजणारी म्हणून संतोषजनक असतात पण

बाकीचे बहुतेक पुतळे वेड्यावाकड्या आकाराचे, ओबडधोबड, दुर्बोध वाटतात. काहींचा अर्थ समजतो, नाही असं नाही. आणि मग त्यांचं सौंदर्य पाहून आपण चकित होतो. पण सामन्यतः त्यांची ती कला न पटणारी कुरूप नसली तरी सुंदर म्हणता येणार नाही. आपल्याकडील काही 'हाय ब्रो' कलाकार तेथल्या ह्या मूर्ती पाहून स्फूर्ती घेऊन येथे येत असावेत. मुंबईच्या हाजीअलीच्या वर्तुळाजवळ उभे असलेल्या कावळ्यांनी घाण करून ठेवलेले आणि झोपडपट्टीच्या लोकांनी वाळत घातलेल्या गोधडीखाली लपलेले जे 'शिल्प' आहे ते पाहून मला उगीचच शंका आली !

दालनामागून दालनं ओलांडीत विजेरी जिन्यावरून खालीवर करीत मी असंख्य तैलचित्रे, जलचित्रे पाहिली. पण येथेही माझी निराशाच झाली. विषयांची विपुलता आणि रंगाची उधळण ह्या शिवाय नेत्रसुख देईल अशी किंवा अंत:-करणाला भिडेल अशी एकही कलाकृती मला दिसली नाही. निदान ह्या एका दालनात तरी आपण भारतीय श्रेष्ठ आहोत ह्याची जाणीव होऊन उगाचच माझी मान ताठ झाली. म्हैसूरच्या म्युझियममध्ये असलेली आमच्या रविवर्म्याची चित्र अजूनही ताजी टवटवीत आणि नितांत सुंदर वाटतात. बाबूराव पेंटरांची 'ओलेती' अजूनही आपणास आकर्षित करते आणि तालीमांची जे. जे. स्कूलच्या प्रवेश द्वारापाशी लामण दीप हातात घेतलेली नऊवारी साडी नेसलेली सुवर्णालंकार ल्यालेली आणि आपल्या सुंदर नयनांनी प्रतिक्षा करणारी ती शालीन मराठमोळ युवती पाहून आपले पाय जागच्या जागीच थबकतात. 'मॉडर्न आर्ट' च्या नादी लागून आणि पाश्चात्यांचं सगळंच चांगलं ह्या भ्रामक कल्पनेनं आपण असल्या सर्वांगसुंदर कलेला पारखे होत चाललो आहो हे केवढे दुर्दैव्य !

## व्हाइट हाऊस

द्विशतक महोत्सवानिमित्तानं अमेरिकेच्या प्रेसिडेंटचे निवास स्थान—व्हाइट हाऊस आम जनतेला खुले ठेवण्यात आले आले आहे. लंडनमधला '१० डाऊनिंग स्ट्रीट' ह्या पंतप्रधानांच्या निवासाइतके सामान्य नाही तरी आपल्या राष्ट्रपती भवनासारखे किंवा आपल्या पंतप्रधानांच्या निवास स्थानाएवढे देखील 'व्हाइट हाऊस' डोळ्यांत भरत नाही प्रेसिडेंट तेथे राहातो म्हणून त्याला 'ग्लॅमर' आहे एवढेच. ग्वालेर, बिकानेर महाराजांचे मुंबईतील पॅलेसदेखील ह्यापेक्षा मोठे आहेत. तेथे विभूती पूजा नाही. जॉर्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन आणि थॉमस जाफरसन हीच काय ती त्यांच्या दोनशे वर्षाच्या अध्यक्षीय इतिहासात मानाची दैवते. त्यात आता भर पडली ती फक्त केनेडीची. बाकी अध्यक्ष आले आणि गेले त्यांची जनता फारशी दखल घेत नाही. आता एकादा निक्सनसारखा 'नाव कमावून' जातो हा भाग वेगळा ! व्हाइट व्हाऊसच्या सभोवती प्रशस्त उद्यान आहे त्यावर काही प्रसंगी

प्रेसिडेंट 'संध्याकाळची पार्टी' देतात. आत दालनामागून दालने आहेत. रूझव्हेल्टची रेड रूम, आयसेन हॉव्हरची ब्ल्यू रूम, कोणाची तरी यलो रूम असे दिवाणखाने आहेत. रेडरूममधील गालिचे लाल, बसावयाची आसनं लाल, दारं खिडक्यांचे पडदे लाल आणि फुलेही लाल; तर निळ्या रूमचे सर्व काही निळे. अनेक आकाराच्या शोभिवंत हांड्या झुंबरांनी व रंगी बेरंगी फुलांनी सजलेली प्रेसिटेंडची भोजन कक्षा मात्र डोळ्यात भरण्यासारखी होती. त्यात १४० पाहुणे बसतील एवढे मोठे एकच एक लांब रुंद टेबल आणि शानदान नक्षीच्या खुर्च्या मांडलेल्या होत्या आणि टेबलावर अनेक मौल्यवान फुलदाण्या, रक्षापात्रे होती. व एक भला मोठा मौल्यवान 'चॅन्डलर' आहे. व्हाइट हाऊसला आतून बाहेरून पांढरा शुभ्र रंग आहे. उत्तम चारित्र्याचे तर ते प्रतीक नसेल !

## कामाची विचारपूर्वक आखणी

मला 'व्हाइट हाऊस' पेक्षा जास्त आवडली ती त्यांची व्हाऊट हाऊस दाखविण्याची रेखीव पद्धत. स्वयं-शिस्त हा जसा इंग्रज माणसाचा ठळक गुण म्हणून उल्लेख करावा लागेल तसे प्रत्येक गोष्टीत लहान सहान तपशील, सर्व संभाव्य अडचणी लक्षात घेऊन केलेली योजनाबद्ध आखणी हे अमेरिकन माणसाचे वैशिष्टय मानावे लागेल. द्विशतक स्वातंत्र्य महोत्सवानिमित्तानं व्हाइट हाऊस जनतेला खुलं केल्यामुळे जगाच्या कानाकोपऱ्यातून प्रवासी येणार आणि गर्दी करणार हे लक्षात घेऊन त्यांना खोळंबा न होता, कोणत्याही तऱ्हेनं चेंगराचेंगरी न होता व्हाइट हाऊस पहाता यावे ह्याकरता बारीक विचार करून त्यांनी उभी केलेली यंत्रणा वाखाणण्याजोगी होती. व्हाइट हाऊस समोरच्या पलिकडेच्या रस्त्यावर एक मोठे सार्वजनिक उद्यान आहे. त्याच्या दूरच्या टोकाला तीन-चार बूथमधून प्रथम विना-मूल्य प्रवेशिका घ्यावयाची. त्या प्रवेशकार्डावर टूर नंबर व रांग नंबर असतो. ते घेऊन आपण मैदानात मुद्दाम उभारलेल्या शोभिवन्त मंडपात बसावयाचे. मैदानाच्या मध्यभागी एका भव्य व्यासपीठावर अहोरात्र काही ना काही कार्यक्रम चालू असतात ते पहात आपल्या टूरची वाट पहात थांबावयाचे. दर दहा मिनिटांनी स्टेजच्या कडेला एका मोठ्या बोर्डावर टूरचे नंबर सरकत असतात. आपल्या टूरचा नंबर लागल्यावर आपण उठावयाचे व आपल्याला दिलेल्या रांगेत उभे रहावयाचे. तोपर्यंत आपल्या आधीच्या टूरचे लोक रस्त्याच्या कडेपर्यंत पुढे सरकून वाट पहात असतात. त्यांच्या पुढील टूरचे लोक व्हाइट हाऊसच्या गेटपर्यंत पोहोचले की आपल्या पुढच्या टूरच्या मंडळींना रस्ता ओलांडण्याकरता दोन मिनिटे रस्ता वाह-नांना बंद होतो. लाल डगले घातलेले खास पोलिस ह्याचे नियंत्रण करतात. आपल्या पुढील रांग रस्ता ओलांडून पलिकडे जाते त्यावेळी गेटजवळची रांग आत प्रवेश करते आणि त्याच वेळी एक रांग मागच्या दरवाजाने बाहेर पडत असते

अशा तऱ्हेने हजारो माणसांचा ओघ अखंड चालू रहातो. त्यात कोठे खंड पडत नाही. रांगा विस्कळीत होऊन गोंधळ होत नाही. आतमध्ये सुद्धा त्याच पद्धतीने रांगा पुढे सरकत असतात. आरडाओरडा करून 'पुढे सरका' सांगावं लागत नाही. नाहीतर आमच्या महालक्ष्मीच्या देवळातील नवरात्रातील झुंबड पहावी. पाय उंच केल्याशिवाय आणि उड्या मारून दुसऱ्याच्या डोक्यावरून पाहिल्याशिवाय देवीचं दर्शन नाही. नाही म्हणायला आपल्याकडे खिसा पाकीट साफ झाल्याचा 'प्रसाद' मिळतो ती 'गंमत' तेथें नाही! परवा सपत्नीक गेलो होतो म्हणून पुन्हः व्हाईट हाऊस पहाण्यास गेलो. ह्यावेळी फक्त ९ ते १२ एवढीच वेळ होती. त्यामुळे लांब रांगेतून पुढे सरकत आम्ही मुख्य दरवाज्यापाशी आलो आणि एक आश्चर्याचा धक्का बसला. आम्ही मुख्य दारातून प्रवेश करीत असता मुख्य द्वारपाल आमचेकडे पाहून काहीतरी मोठ्याने म्हणाला. आम्हाला वाटलं आम्ही रांग सोडून आलो की काय किंवा आमची काही चूक झाली असावी म्हणून तो ओरडून काहीतरी म्हणाला असावा. पण मग लक्षात आलं की तो आम्हांला विचारीत होता 'आप कैसा हय!' भारतीय साडी पाहून आम्ही भारतीय आहोत हे त्यानं ओळखलं आणि त्यानं आमची गंमत केली. 'बिलकूल ठीक हय' असं म्हणून आम्ही पुढे सरकलो.

स्मिथसोनियन आर्ट आणि इंडस्ट्रीज म्युझियम. तसेच 'नेशन ऑफ नेशन्स' म्युझियम ही एवढी भव्य आणि मन थक्क करून टाकणारी आहेत की त्याचे तपशीलवार वर्णन थोडक्यात करणं केवळ अशक्य आहे. अमेरिकन राष्ट्र अनेक देशातून विशेषत: इंग्लंड व युरोपीय देशांतून आलेल्या लोकांनी निर्माण केलं. त्याला जगातील सर्वश्रेष्ठ बनविण्यात ह्या सर्वांचा भाग तर आहेच पण त्याहूनही मोठा 'सिंहाचा वाटा एतद्देशीय रेड इंडियन लोकांचा आहे' हे नम्रतापूर्वक, कृतज्ञतापूर्वक अमेरिकन सरकार मानतं. 'नेशन ऑफ नेशन्स' मध्ये ह्या परदेशातून येथे येऊन स्थायिक झालेल्या लोकांची त्यावेळची राहणी, रीतीरिवाज, पोशाख, त्यांची आयुधे, शेतकीची अवजारे, त्यांची घरे, घरांतील स्वयंपाक करण्याची त्यावेळची भांडी कुंडी वगैरे पहावयास मिळतात. आफ्रिकेतून निग्रो गुलाम म्हणून आणले गेले आणि रेड इंडियन जमातीचा हळूहळू नि:पात झाला. परंतु राष्ट्र उभारण्यात त्यांनी केलेल्या अपार कष्टाचा ठायी ठायी उल्लेख आहे आणि त्यानंतरच्या अब्राहम लिंकन आणि जाफरसन ह्यांच्या प्रयत्नानं आणि नवीन मानवतावादी सहिष्णू उदारमतवादी धोरणानं निग्रो जमातीची गुलामगिरीतून मुक्तता झाल्याचा आणि सर्वांस समान हक्क मिळण्यापर्यंतचा इतिहास चित्ररुपानं पहावयास मिळतो.

सिनेट व काँग्रेस हाऊस, सुप्रीम कोर्ट, यू. एस्. कॅपिटॉल, लिंकन व जाफरसन मॉन्युमेटस्, जॉर्ज वॉशिंग्टन युनिव्हर्सिटी, नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्स वगैरे

अनेक अमेरिकेची लेणी दुरूनच पाहिली. वॉशिंग्टन मॉन्युमेन्टच्या पायऱ्यांपाशी मी रोजच थांबत असे. परंतु सकाळी घेतलेल्या प्रवेश कार्डावरही संध्याकाळी ६ चे सुमाराची वेळ दिलेली असे. त्यामुळे ते पहाणे शक्य झाले नाही पण दुसरे वेळी पाहिले. डॉ जोगळेकर मला येथूनच संध्याकाळी ४–५ वाजता घरी घेऊन जात.

अलिकडेच बांधलेलं जॉन एफ. केनेडी थिएटर अत्यंत प्रेक्षणीय आहे. आणि रात्रीच्या रंगीबेरंगी दिव्यात तर ते अतिशयच सुंदर दिसतं. अमेरिकेच्या सांस्कृतिक जीवनाचं ते केन्द्र मानलं जातं. डॉ. जोगळेकर मला घरी नेताना रोज निरनिराळ्या भागातून नेत. त्यामुळे वॉशिंग्टन शहराचं संपूर्ण दर्शन मी घेऊ शकलो. वाटेत नदीच्या काठी वॉटरगेट बिल्डिंग आहे. ती जवळून पाहिली. माजी प्रेसिडेंट निक्सन ह्यांच्या कुटील कारवायातून घडलेलं 'रामायण' अमेरिकन माणसाप्रमाणेच सर्व जग अजून विसरलं नाही. म्हणून वॉटरगेट बिल्डिंग हे देखील एक प्रेक्षणीय स्थळ झाले आहे. एका रस्त्याच्या दुतर्फा चाणाक्यपुरी वसली आहे. भारताच्या दूतावासांच्या दोन इमारती आहेत. एकात आपला राजदूत व त्याची कचेरी व दुसऱ्यात इंडिया लायब्ररी व माहिती केन्द्र आहे. भारताच्या मानानं पाकिस्तानी दूतावास इमारत लहान आहे. मात्र सर्वच इमारती, इतर सरकारी इमारतींप्रमाणे, कॉंग्रेस हाऊसपेक्षा लहान आहेत.

सकाळपासून तीन चार तास सतत भ्रमंती केल्यावर मी दुपारचा थोडा-वेळ बगीच्यात बसून बरोबर आणलेली सँडविचेस, दही, फळे खाई. माझी यज-मानीण सौ. मालुताई सकाळी निघताना रोज निरनिराळे खाद्यपदार्थ व लहान मुलांना देतात तशी पाण्याची बाटली घालून पिशवी तयार करून देई. ते खाऊन झाल्यावर माझी पुन्हा संध्याकाळी डॉक्टरमजकूर मला परत घेण्यास येईपर्यंत भ्रमंती चालू असे.

वॉशिंग्टनमध्ये डॉक्टर जोगळेकरांच्या घरी माझा हार्मोनियम वादनाचा एक कार्यक्रम झाला. पंचवीसहून अधिक मित्रमंडळी आली होती. श्री. सुभाष करमरकर ह्या तेथील नावाजलेल्या तबलियाच्या साथीत कार्यक्रम रंगला. त्याचे श्रेय माझ्या कुशल वादनापेक्षा बऱ्याच दिवसांनी पोटभर नाट्यसंगीत ऐकावयास मिळाले ह्या त्यांच्या उत्स्फूर्त ' दादी ' ला द्यावे लागेल

## सेंट लूईची प्रचंड कमान

डॉ. जोगळेकरांनी बसमध्ये बसवून दिले आणि माझा दीर्घ पल्ल्याचा ' ग्रेहाऊंड ' बसचा प्रवास सुरू झाला. पूर्ण तीस तासांचा दीर्घ प्रवास करून मी साधारण मध्यावर असलेल्या ओक्लाहामा स्टेट मधला तुळसा ह्या शहरी पोहो-चलो. वाटेत सहा तासांनंतर पिटसबर्गला बस बदलावी लागली आणि मध्यरात्री केव्हा तरी सेंट लुई हे मोठे शहर लागले. सेंट लुई शहराच्या मध्यभागी एक प्रचंड

कमान आहे. तिची माहिती ड्रायव्हरनं सांगितली ती अशी. ही कमान संपूर्ण स्टेनलेस स्टीलची आहे. त्याची उंची ६३० फूट आहे. त्यावर ६५ फूट रुंदीची वर्तुळाकार गॅलेरी आहे. वर पोहोचण्याकरता आठ लांबट आकाराच्या बंद बाटल्यांची विजेरी गाडी आहे. कमानीच्या पोटातून वेडीवाकडी होत ही गाडी अतिशय वेगाने कमानीच्या माथ्यावर पोहोचते आणि एकावेळी प्रत्येक ' बाटलीत ' ५ या प्रमाणे ४० माणसे वरच्या गॅलरीत आणून सोडते. तेथे १०० माणसांना एकाच वेळी बघता येईल अशा १६ खिडक्या आहेत. त्यातून श्वास रोखून धरावा असा तीस मैल, थेट मिसीसिपीपर्यंतचा भूभाग दिसतो. पॅरिसच्या एफ्. एल्. टॉवरवर ही मात आहे असं मानायला हरकत नाही. त्यानंतरचा कित्येक तासांचा प्रवास उजाड वाळवंटातून होतो. कित्येक मैलात कोठे झाड नाही की झुडप नाही, कित्येक मैलात कोठे गाव लागत नाही की कोठे माणसाचं अस्तित्व जाणवत नाही. हाच तो ' टेक्सास ' म्हणतात तो भाग. हा भाग उजाड वाटला तरी येथे सहारासारखं नुसतंच वाळवंट नाही. येथल्या खनिज संपत्तीवर तर अमेरिकेचे मोठमोठे कारखाने चालतात. येथे तेलाच्या प्रचंड खाणी आहेत आणि ते उपसण्याचे व शुद्धीकरणाचे कारखाने जगात मोठे समजले जातात. रस्त्यापासून बऱ्याच अंतरावर हे कारखाने दिसतात. त्यांच्या धुराडयांतून निघणारे पिवळे-निळे धुरांचे लोट, मोठमोठे टँकर्स, ट्रक्स व मोटारींची ये जा आणि लहान लहान घरातून राहणारे कामगार ह्यांचं अस्तित्व एकाद्या ठिपक्याप्रमाणे त्या अफाट माळरानावर भासतं. असा एकादा ठिपका सोडला की पुन्हा कित्येक मैल सामसूम आणि परत दुसरी धुराडी दिसू लागतात. अमेरिकेला लागणारा ७० टक्के तेल पुरवठा ह्या खाणीतून होतो. फक्त ३० टक्के तेल त्यांना आयात करावे लागते. आणि त्याची किंमत आता अरब राष्ट्रांनी वाढविल्यामुळे अमेरिकेत ' तेल बचत योजना ' आखल्या आहेत. ताशी ५५ मैल वेगमर्यादा घालण्यात आली आहे. कॅनडाकडून आयात होणाऱ्या तेलाची किंमतही अरब राष्ट्रांच्या बरोबरीनं वाढली आहे, म्हणून अमेरिकेचे कॅनडाबरोबरचे संबंधात तणाव आला आहे. अधिक तेल उत्पादन करणाऱ्या योजना कार्यान्वित झाल्या आहेत. अध्यक्ष फोर्डनं म्हणल्याप्रमाणे १९८० चे आत अमेरिका तेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल ह्यात शंका नाही.

' टेक्सास ' चा हा तीनचारशे मैलांचा वालुकामय ओसाड प्रदेश सोडल्यानंतर उभी शेतं दिसू लागतात. मैलच मैल लांबवर पसरलेली शेतं. त्यात एखादा अवाढव्य ट्रॅक्टर, एकादं शेत कापण्याचं यंत्र आणि एखादं औषध फवारणारं, आकाशात घिरट्या घालणारं हेलिकॉप्टर दिसतं. येथे शेतीची सर्व अवजारे विजेच्या सहाय्याने यंत्रानं चालतात. कापलेल्या धान्याच्या रोपांपासून ते मळणी करून धान्य एकत्र करण्याचं काम यंत्रानं होतं. येथे लहान हा शब्दच त्यांच्या ज्ञानकोशात नाही. सर्व काही अतिमोठं (Biggest) केवळ १० टक्के लोक शेतमजुरी करूनही

एवढे धान्य पिकते की त्यांना पुरं पडून दशांगुळे शिल्लक रहाते, ते अविकसित देशांना वाटले जाते अथवा समुद्रात बुडविलं जातं.

आदल्या दिवशी दुपारी दोन वाजता निघाल्यापासून दुसऱ्या दिवशी रात्री ८-३० वाजेपर्यंत प्रवास करून मी एकदाचा तुळसाला पोहोचलो. येथे पहाण्यासारखं काही नाही. तथापि येथे राहणारे डॉ. नंदापूरकर कुटुंब माझे स्नेही असल्यामुळे व दरवेळी भारतात आल्यावर एकदा तरी आमचेकडे येत असल्यामुळे अमेरिकेत आल्यावर वाकडी वाट करून त्यांना भेटणे अगत्याचं होतं. त्यांचे घरही खूप मोठे, वातानुकूल आणि सर्व सुखसोयींनी युक्त. डॉ. नंदापूरकर एका मोठ्या कारखान्यात मोठ्या हुद्यावर आहेत. सौ. चंपाताई आदर्श गृहिणी आहेत. त्या शिवणटिपणात आणि बागेत असंख्य भाज्या लावण्यात मग्न असतात. त्यांचा एकुलता एक चिरंजीव सतीश स्कॉलर आहे आता तो बोस्टन येथे मोठी शिष्यवृत्ती मिळवून कॉलेजात आहे.

आता डॉ. नंदापूरकर कुटुंब तुळसा सोडून सान अन्टानियो ह्या दक्षिण अमेरिकेत स्थायिक झाले आहे. दुसऱ्या वेळी आम्ही त्यांचा पाहुणचार घेतला तेव्हा ते तात्पुरते एका अपार्टमेंट मध्ये राहात होते, कारण त्यांचे नवे घर बांधून व्हावयाचे होते. टेक्साससारख्या वालुकामय, दगड तेलाच्या भागातही सान अन्टा-नियो केवळ दगडातून कोरलेले एक सुंदर शहर आहे. केवळ दगड वापरून एका निसर्गप्रेमी माणसाने एक प्रचंड बगीचा नागमोडी-कालवा व त्याला जोडून दुतर्फा दगडांनी बांधलेल्या पायवाटा काढल्या आहेत. ते दृश्य रमणीय आहे

मी तेथे असताना रेगन व फोर्ड ह्यांच्यात रिपब्लिकन पार्टीचे नामिनेशन करता शिकागोला कन्व्हेंशन चालू होते. त्याचं प्रत्यक्ष दर्शन आम्ही टी. व्ही. वर घेत होतो. हा अत्यंत चुरशीचा सामना होता आणि कोण जिंकेल ह्याचा अंदाज करणं शेवटपर्यंत कठीण होतं. बारा वर्षांचा सतीश फाड फाड इंग्रजीतून आपल्या वडिलांशी हुज्जत घालताना पाहून अमेरिकन मुलंदेखील राजकारणात किती रस घेतात ह्याचा अचंबा वाटला. अमेरिकन अध्यक्षाची निवडणूक ही किती लोकशाही पद्धतीनं चालते ह्याचं जवळून दर्शन घेण्याचा योग मला अकस्मात आला. रेगनचे हजारो पाठीराखे मोठेमोठे बॅनर्स उंचावून आणि नानाविध वाद्ये वाजवून आपली ताकद दाखवित होते. आणि फोर्डचे तेवढेच अनुयायी आपली फळी उभारून फोर्डचा जयजयकार करीत होते. फोर्ड व रेगन ह्या दोघा उमेदवारांना त्या सभेत येण्यास बंदी होती म्हणून ते दोघेही आपआपल्या हॉटेलात टी. व्ही. बघून 'गौरीहार' पुजीत होते ! तर त्यांच्या बायका मुले लोकात मिसळून त्यांच्याशी हस्तांदोलन करीत, क्वचित त्यांचे बरोबर पिंगा घालीत नाचत संमेलनात हिंडत होते. एकेका स्टेटचे रिझल्ट येऊ लागले तसे ज्या पार्टीचं पारडं जड असेल त्या पार्टीचे लोक धिंगाणा घालू लागत. एकदा तर पुरी ४५ मिनिटे रेगनच्या लोकांनी

निदर्शने चालू ठेवली, तेव्हा कामकाज बंद ठेवावे लागले. अशी जोरदार निदर्शने चालू असताना 'वॉशिंग्टन पोस्ट' 'न्यूज वीक' सारख्या वजनदार पत्रांचे प्रतिनिधी चर्चा करीत व अंदाज बांधीत. त्यांची टी. व्ही. चा खास प्रतिनिधी मुलाखत घेई. रात्री बारा वाजेपर्यंत हा धिंगाणा तीन रात्री चालला होता आणि शेवटच्या दिवशी तर पहाटेपर्यंत. रेगनने आपला व्हाईस प्रेसिडेंट नॉमिनी आधीच जाहीर केला होता. फोर्डने मात्र सहा निरनिराळ्या स्टेटच्या प्रतिनिधींची नावे जाहीर केली होती व सर्वांना मधाचे बोट लावून ठेवले होते. फोर्डनेही आपला व्हा. प्रेसिडेन्ट नॉमिनी प्रत्यक्ष नॉमिनेशन पूर्वी २४ तास आधी जाहीर करावा अशी रेगनच्या पक्षानं पार्टीच्या घटनेत दुरुस्ती मांडली होती आणि प्रथम त्याचेवर मतदान झाले, प्रत्येक स्टेटचा पार्टीलीडर माईकपुढे येऊन आपली किती मते घटना दुरुस्तीच्या बाजूनं आहेत आणि किती विरुद्ध आहेत ते सांगी. त्याची नोंद ताबडतोब बोर्डावर होई. ह्यात शेवटी शेवटी रेगन ७८ मतांनी हरल्यामुळे दुसऱ्या दिवशी होणाऱ्या प्रत्यक्ष नॉमिनेशनचे चित्र स्पष्ट झाले. त्यामुळे प्रत्यक्ष नॉमिनेशनच्या रात्री तेवढे कुतुहल राहिले नाही तरी तणाव कायम होता आणि रेगनच्या लोकांनी शेवटचा 'बेंडबाजा' मनसोक्त वाजवून घेतला. नॉमिनेशन झाल्यावर दुसऱ्या रात्री फोर्डचे भाषण, रिपब्लिकन पार्टी अभेद्य राखण्याचे आवाहन आणि आपल्या व्हा. प्रेसिडेंट नॉमिनीचे नाव जाहीर करणे कार्यक्रम झाला. रेगन 'गले पडून' हात-मिळवणी झाली आणि नव्या जोमानं रिपब्लिकन पार्टी जिमी कार्टरच्या डेमाक्रेटिक पार्टीच्या तोफा झेलण्यास सिद्ध झाली.

हे सर्व विस्तारानं सांगण्याचं कारण त्यात 'थ्रिल' तर तर होतेच परंतु लोकशाहीच्या चौकटीत राहून विद्यमान अध्यक्षाचे वाभाडे काढण्यात आणि त्याचेशी दोन हात करून अटीतटीचा सामना खेळून अमेरिकन जनता लोक-शाहीची कशी बूज राखते ते समजावे हाही हेतू होता.

ह्या पराभवाचा वचपा दुसऱ्यावेळी रेगननं भरून काढला व तो अमेरिकेचा प्रेसिडेन्ट झाला हा ताजा इतिहास आहे.

तुळसामध्ये एक ओरल रॉबर्ट युनिव्हर्सिटी सोडली तर पहाण्यासारखे काही नाही. ओरल रॉबर्ट नावाच्या एका श्रीमंत माणसानं लक्षावधी डॉलर खर्चून ही वास्तू उभी केली आहे. सुंदर उद्यानं, त्याहून सुंदर आणि स्थापत्यशास्त्रदृष्टचा आकर्षक इमारती व मध्यभागी अभिनव व एकमेव ठरावा असा उंचच उंच टॉवर हे ह्या युनिव्हर्सिटीचं वैशिष्टय. आलेल्या अतिथींना एका छोटचा थिएटरमध्ये स्लाईड्सच्या सहाय्याने ह्या वास्तुंची माहिती सांगितली जाते.

आता माझा पुढील टप्पा पुन्हा तीस तास प्रवासावर लॉस एॅन्जेलस, कॅलि-फोर्निया होता. परंतु एवढा तापदायक प्रवास नको म्हणून पंधरा तासावर दुसऱ्या दिवशी सकाळी मी फ्लॅगस्टाफ ह्या छोटचा गावी उतरलो. प्रथम शौचमुखमार्जन

करून घेतले. आरामशीर वसून ब्रेकफास्ट घेतला आणि दुसऱ्या एका बसनं ७८ मैलांवर असलेल्या जगातील एक चमत्कार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ग्रँड कॅनियन ह्या ठिकाणी पोहोचलो.

## जगातील सर्वात खोल दरी–ग्रँड कॅनियन

'ग्रँड कॅनियन' म्हणजे जगातील सर्वात खोल दरी–निसर्गाची किमया. हजारो वर्षांच्या काळात डोंगर कपारी धुपत जाऊन त्याची खोल दरी झाली आहे. ११० मैल लांब ३६ मैल रुंद आणि एक मैल खोलीची ही प्रचंड दरी म्हणजे निसर्गाची अद्‌भुत करणी आहे. ह्याच्या तळातून कोलोराडो नदी सापासारखी वळणं घेत वाहात आहे. पृष्ठभागावर नदीचं पात्र लहान आहे पण आत काताळ कापीत भन्नाट वाहणाऱ्या ह्या नदीचं पात्र खूप मोठं आणि खोल आहे. पुष्कळ प्रवासी रात्री येथे मुक्काम करून पहाटेस खेचरावर बसून आणि रेड इंडियन लोकांना वाटाडे करून नदीच्या पात्रापर्यंत खाली उतरतात. जगातल्या असंख्य प्रवाशांची येथे रीघ लागलेली असते. प्रवाशांकरता येथे अनेक लहानमोठी निवास-स्थाने आहेत. उपहारगृहात एकच झुंबड उडते म्हणून येथे आधी नंबराची चिठ्ठी काढावी लागते आणि त्या अनुक्रमानं खाद्यपदार्थ काऊंटरवर जाऊन घेता येतात. त्यामुळे अफाट गर्दी असूनही त्रास न होता आपण फराळाचे पदार्थ घेऊ शकतो. प्रत्येक लहान गोष्टीतही त्यांची योजनाबद्ध आखणी दिसून येते. त्यामुळे कोठेही धांदल, गोंधळ, पाडापाड होत नाही. येथे रेड इंडियन लोकांनी बनविलेल्या वस्तू विक्रीस ठेवलेल्या असतात पण त्यांच्या किमती बेसुमार जास्त असतात. 'येथे एक रेड इंडियन लोकांनी बनविलेल्या व पुरातन वस्तुंचं प्रदर्शन आहे. सभोवतालचा परिसर स्वच्छ आणि निसर्ग रम्य आहे. येथेच हॉलिवुडच्या स्टुडियोची छोटी आवृत्ती आहे. 'वेस्टर्न' म्हणून ओळखली जाणारी आणि 'सुंऽऽई, सुंऽऽई' करीत गोळ्या झाडणारी आणि कडे कपारीतून लपालपी करणारे चित्रपट येथेच तयार होतात. तंग विजारीवर चामडी, पट्ट्यात पिस्तुल अडकवलेले, गळ्याला लाल रुमाल बांधलेले आणि डोक्यावर उंच पसरट हॅट घातलेले 'काऊबॉईज' इतस्तत: फिरताना येथे दिसतात. संध्याकाळी पुन्हा त्याच बसने ७८ मैलांचा प्रवास फक्त दीड तासात करून फ्लॅगस्टाफ स्टेशन गाठले आणि रात्रभर प्रवास करून सकाळी साडेसहा वाजता अमेरिकेचे अभिमान स्थान असलेल्या त्या लॉसएन्जेलसला पोहोचलो.

वाटेवर लास व्हेगास हा जुगाऱ्यांचा अड्डा लागला. तेथे जगातील सर्व जुगारी जमत असतात. लास व्हेगासला रात्र कधी होतच नाही. दिव्यांच्या झग-मगाटात आणि फेसाळणाऱ्या दारूच्या पेल्यात कोट्यावधी डॉलरची 'हातसफाई' रोज तेथे होत असते असं म्हणतात. मला त्यात रस नसल्यामुळे मी तेथे थांबलो नाही.

## लॉस एंजेल्स

कॅलिफोर्नियाच्या भव्यतेची आणि सौंदर्याची लॉस एंजेलसला उतरल्यापासूनच सुरुवात होते. न्यूयॉर्क वॉशिंग्टनचा उन्हाळा येथे नाही. हवा बारमाही थंड. लंडन-एवढी नसली तरी पुष्कळ थंड. येथे बर्फ कधीच पडत नाही पण हवा सदैव आल्हादकारक. फळफळावळ आणि ताजा भाजीपाला व फुलांचे ताटवे सर्वत्र दिसतात. शहराला साजेसा प्रचंड बस डेपो आहे. त्याच्या तिसऱ्या मजल्यावर २१ नंबरच्या गेटपाशी बस थांबली आणि मी विजेरी जिन्यानं तळमजल्यावर आलो. तेथून माझ्या मित्राची मुलगी भारती व तिचे यजमान श्री. अशोक प्रधान ह्यांना फोन करून मी सहाव्या रस्त्यावर, टॅक्सी उभ्या रहातात तेथे वाट पहात आहे म्हणून कळविले. त्यांनी विचारले सहाव्या रस्त्याच्या कोणत्या दिशेला ते मला सांगता येईना म्हणून त्यांनी माहिती केंद्राजवळ उभे राहण्यास सांगितले. साधारण पंधरा मिनिटांत ती पतिपत्नी मला त्यांच्या खूप मोठ्या गाडीतून घेऊन आपल्या घरी आली.

न्यूयॉर्कप्रमाणे येथील बहुतेक आपली मंडळी अपार्टमेंटमध्येच राहतात. स्वतंत्र बंगले नाहीत. प्रधानांचे तीन शयनगृहे असलेले मोठे अपार्टमेंट आहे. खाली गाडी ठेवावयाला जागा आहे आणि मधल्या चौकात प्रशस्त पोहण्याचा तलाव आहे. आता प्रधानांचे स्वतःचे घर आहे. सभोवती बगीचा आहे. गेल्या वर्षी आम्ही त्यांच्या नव्या घरात राहिलो. चहाखाणं करून व स्नान आटोपून प्रधानांनी मला हॉलिवुड दाखविण्यास नेले.

## हॉलिवुड

हॉलिवुड हा लॉस एंजेल्सचा एक भाग आहे. तेथे चित्रनगरी बरोबरच अनेक सिनेमा थिएटरे व मोठमोठी दुकाने आहेत. चित्रनगरी एका टेकडीवर आहे. तीवरच सिनेमानटांचे बंगले आहेत. युनिव्हर्सल स्टुडियो बघण्यास निराळे तिकीट काढून जावे लागते. तेथे पूर्वी झालेल्या फिल्मचे अवशेष राखून ठेवले आहेत 'शूटींग' कसे करतात ते प्रत्यक्ष दाखविण्यात येते. अनेक 'फंटसी' अद्‌भुत चित्रांचे सेट तेथे तसेच ठेवण्यात आले आहेत. दुसऱ्या वेळी गेलो तेव्हा आम्ही 'युनिव्हर्सल टूर' मधून हालिवूडच्या भुलभुलय्या नगरीचं जवळून दर्शन घेतले. क्षणात पाऊस वादळवारा, बस नदीपार होताना पाणी दुभंगणे व पुन्हा पूर्ववत होणं 'जॉ' चित्रपटातील प्रचंड व्हेलमाशाचा आमच्या बसवर अचानक हल्ला ट्रिक फोटोग्राफी वगैरेंचे प्रात्यक्षिक पाहिले. आम्ही सर्व परिसर ४०-५० मैल फिरून पाहिला. तेथेच एक मेणाच्या पुतळ्यांचे प्रदर्शनही पाहिले. त्यात नव्या जुन्या नटांचे पुतळे, काही चित्रांचे सीन आणि 'हॉरर' भयानक पुतळेही पाहिले, परंतु मॅडाम स्टुसाच्या मेणाच्या पुतळ्यांच्या मानानं हे फार सामान्य वाटलं. प्रवेश फी मात्र तीन डॉलर

आहे ती जास्त वाटली. नटनटयांचे बंगले प्रशस्त मोठे आहेत. त्या सभोवती मोठे बगीचे आहेत. परंतु त्यात खास काही जाणवलं नाही. जवळच्या एका चिनी छापाच्या चित्रपटगृहाच्या आवारात बसविलेल्या दगडी लाद्यांवर सर्व विख्यात नटनटयांच्या सह्या कोरल्या आहेत. येथे नटनटया बघावयास गर्दी होत नाही. एलिझाबेथ टेलर, रिचर्ड बर्टन, बर्ट लँकेस्टर किंवा हेडी लामारसारख्या नटी सोडून बाकीचे नट-नटी बाजारात खुशाल फिरू शकतात. त्याचेकडे किंवा त्यांच्या अलिशान गाडयांकडे कोणी फिरकूनही बघत नाही. येथील लोक एकंदरीत अरसिकच. नाहीतर आपल्याकडे नटनटयांना बघावयास कोण झुंबड !

## श्रीमंतीच्या तोऱ्यात – क्वीनमेरी बोटीची खरेदी

विश्रांतीनंतर संध्याकाळी आम्ही पुन्हा बाहेर पडलो ते क्वीन मेरी बोट व लॉस एंजेल्स रात्रीच बघण्याकरता, इंग्लंडची प्रख्यात ऐटदार बोट क्वीन मेरी अमेरिकेनं विकत घेतली आणि येथे खाडीत आणून ' प्रेक्षणीय वस्तू ' म्हणून ठेवली आहे (Riverside) नदीकिनारा हा भाग १५-२० मैलांवर आहे. तेथे ती बोट उभी करून ठेवली आहे. प्रथम दिसतो तो तिचा अजस्र पंखा, सुटा करून ठेवलेला त्याचे वजन काही टन आहे. नंतर बोटीचे मजल्यामागून मजले आपण पहातो. प्रतीक्षालय, त्याच्या उजव्या हाताला वर जाण्याचा शानदार मुख्य जिना. त्यानंतर नाच करण्याचा मोठा हाल. आता त्याचा उपयोग भाडं घेऊन नाचाचे कार्यक्रम करण्याकडे होतो. आम्ही गेलो त्यावेळीही तेथे वाद्यांच्या संगतीत नाच चालू होता. त्याच्या दोन्ही बाजूला उघडा डेक, त्याच्या वरच्या मजल्यावर भाडयानं घेतलेल्या दुकानांचे गाळे. बहुतेक केबीन मात्र बंद होत्या. आम्ही दोन-तीन तास त्या बोटीवर हिंडलो. दूरवर दिसणाऱ्या शहराची रोषणाई आणि रस्त्याच्या दुतर्फा दिव्यांच्या मोत्याच्या लडी पाहून मरीन लाईन्सच्या ' मोत्याच्या हारा 'ची आठवण आली. बोटीवर एवढ्या भाडयाच्या जागा देऊनही लॉस एंजेलसच्या म्युनिसिपालटीला ह्या पांढऱ्या हत्तीवर अफाट खर्च करावा लागतो आणि त्याची वादंगं पेपरमधून वाचावयास मिळतात. आता लंडन टॉवरही अमेरिकेनं विकत घेतला असल्याचे ऐकिवात आहे. तो लंडनमधून उचलून आणून एका वाळवंटात ठेवण्याचा त्यांचा विचार आहे !

## डिस्नेलँड–अद्‌भुत नगरी

लॉस एन्जेलचा केन्द्र बिंदू आहे तो मात्र ' डिस्नेलँड '. तसं म्हटलं तर ' डिस्नेलँड ' हा अमेरिकेचा मानबिंदू आहे कारण, अशी अद्‌भुत नगरी उभारणं जगाला अजून शक्य झालेलं नाही. शहरापासून सुमारे चाळीस मैलांवर ही नगरी वसली आहे. प्रथम नजरेत भरतो तो त्यांचा कारपार्क. अंदाजे दहा हजार गाडया मावतील एवढा मोठा आहे. त्याचे A. B. C. D. वगैरे भाग केलेले आहेत. आपण

कोणत्या भागात गाडी ठेवली आहे ते नीट लक्षात ठेवावयाचे, नाहीतर परत आल्यावर गाडी सापडणं कठीण. तेथील सर्वच गाड्या मोठ्या आणखी सारख्या दिसतात. त्यामुळे ओळखणं कठीण. ह्या 'कारपार्क' चा विस्तार तीन मैलांचा आहे म्हणून तेथून जाण्याकरता ट्रॅम्स आहेत. त्याला तिकीट पडत नाही. ती ट्रम तुम्हांला प्रवेशद्वारापाशी सोडून पुन्हा कारपार्कला चक्कर मारण्यास निघून जाते. प्रवेशद्वाराजवळ तिकीट काढण्याकरता ४।५ तिकीट घरे आहेत. पावणेसात डॉलरला साधारण ४० कुपनचे बुक मिळते. त्यात तांबडी, पिवळी, पांढरी कुपन्स असतात ती आत बघण्याच्या निरनिराळ्या ठिकाणी द्यावयाची असतात. तुम्ही आत गेल्यावर तुम्हांस बस घोडागाडी किंवा मोटारगाडीने विनामूल्य आत नेण्यात येते.

'डिस्नेलँडचे मुख्य तीन विभाग आहेत. 'कालचे जग', 'आजचे जग' आणि 'उद्याचे जग' प्रथम तुम्ही कालच्या जगात वावरता. खेचरांनी ओढणाऱ्या प्रचंड घोडागाडीला, पितळी कंदील असलेल्या ५०।६० वर्षांपूर्वीच्या मोटारी, पहिल्या वहिल्या बसेस, आपल्या सेवेला हजर असतात. त्यांचे सारथी देखील जुन्या पद्धतीचे पोशाख करून आपले स्वागत करतात. रस्ते जुन्या पद्धतीचे, त्यांचे दुतर्फा असलेली दुकाने पुराणकालीन. मध्येच एखादे फायर इंजिन घंटा वाजवित जाते. मोटारींचे जुन्या काळातील हार्न अथवा फुगे, घोड्याच्या गाड्यांचा घंटा नाद व त्या काळचे रक्षक आपल्याला एकदम ६०।७० वर्षे मागे घेऊन जातील. मध्येच एकादी रंगीबेरंगी पोषाखातील माणसांनी भरलेली 'सर्कस ट्रेन' आपल्या अंगावरून जाते. त्यानंतर आपल्या जवळची कुपनं देऊन आपण मूक चित्रपट पाहू शकतो. किंवा 'स्लिपींगब्युटी' 'अलाईस अँड वंडरलँड किंवा मिकीमाऊस पाररेट वगैरे फिल्म पीटर पॅन' 'कपबशी' मध्ये बसून जलविहार करू शकतो. प्रथम आम्ही बेल कंपनीचा स्टॉल पाहिला, त्यात टेलिफोनचा शोध लागल्यापासून आधुनिक टेलिफोन पाहिले. कॉम्पुटरच्या सहाय्याने किती वेगानं एकाच वेळी किती 'लाईनी' जोडल्या जातात ते बटण दाबून अनुभवलं. अमेरिकेत केव्हाही बोर्डावर 'एन्गेज' लागत नाही ह्यांचे इंगीत कॉम्पुटरचा प्रभाव. (बाय दी वे, अमेरिकेत 'लाईन एंगेज' म्हणत नाहीत, 'लाईन बिझी' म्हणतात. इंग्लडमध्ये मात्र आपल्याप्रमाणेच 'एन्गेज' म्हणतात तसेच, इंग्लंडमध्ये बाथरूम-संडासला 'टॉयलेट रुम' म्हणतात. तर अमेरिकेत त्यालाच 'रेस्ट रूम' म्हणतात आणि कॅनडात त्याला 'वॉशरूम' म्हणतात.) त्यानंतर सर्कारामा पाहिला. एका वर्तुळाकार खोलीत मध्यभागी आपण उभं रहातो. आणि आपल्या भोवती गोलाकार स्क्रीनवर चित्रपट दिसतो. त्यावरून आम्ही १५ मिनिटात संबंध अमेरिकेचा प्रवास करून आलो. स्क्रीन एवढी मोठी आहे आणि फोटोग्राफीचे कौशल्य असे की आपण जागेवरच स्थिर असूनही हवेतून, पाण्यातून, मोटारीतून अत्यंत जलदगतीने दऱ्या खोऱ्यातून जात आहोत असा भास

होतो. पूर्वी मुंबईत कित्येक वर्षापूर्वी हा 'सार्करामा' पाहिल्याचे आठवते पण तो स्क्रीन फारच लहान होता. येथे हा अनुभव 'थ्रिलींग' होता.

त्यानंतर आपण खऱ्या 'अद्‌भुत नगरीत' प्रवेश करतो. कोठेही आपणास चालावे लागत नाही ते शक्यही नाही आणि एवढा या नगरीचा विस्तार मोठा आहे. प्रथम आपण परींच्या देशात छोटचा छोटचा बोटीत बसून फेरफटका करतो. यच्चयावत सर्व देशांच्या बाहुल्या एकाच वेळी हातवारे करून गात असतात, वाद्ये वाजवीत असतात. भुयारातून खेळविलेल्या पाण्यातून आपली बोट हळूहळू पुढे जात असते आणि आपण त्या बाहुल्यांच्या समूहगीतानं, त्यांच्या अंगविक्षेपानं आणि डोळयांच्या हालचालीनं थक्क होतो. त्यानंतर दुसऱ्या एका भुयारातून तशाच छोटचा छोटचा बोटीतून भूत पिशाच्चच्या नगरीत जातो. तेथे दुतर्फा माणसांची नुसती मुंडकीच किंवा हात एका एकी वर येतात आणि अक्राळविक्राळ आवाजानं आपल्याला घाबरवून सोडतात. एखादे प्रेत थडग्यातून उठते आणि हातवारे करीत मोठमोठयानं हसू लागते, एखादे रडू लागते, त्या सर्वांनी एकच आकांत मांडलेला असतो. दिव्यांच्या उघडझापांनी आणि भयाण, भन्नाट आवाजांनी हा भाग दणाणून गेलेला असतो. आणि आपल्या अंगात कापरं भरतं. लहान मुलं तर घाबरून ओरडू लागतात. त्यानंतर मोटार लाँचमधून आपण आफ्रिकेच्या जंगलातून फेरफटका करतो. निबीड नैसर्गिक अरण्य ठिकठिकाणी वाहणारे पाण्याचे लोट, पक्षांची चिवचिव आणि हिंस्र-पशुंच्या डरकाळयांनी आपण खरोखरच आफ्रिकेच्या जंगलात आहोत असा भास होतो. मध्येच एखादी मगर आ करून आपल्या मोटारबोटी जवळ येते. काही पाण्यात पडून असतात. हत्तींचे कळप पाण्यात डुलत उभे असतात. त्या पैकी एकादा सोंड वर करून चित्कार करून आपलं स्वागत करतो. एखादा हिंस्रप्राणी आपल्या बोटीवर झडप घालण्याकरता झेप घेतो, त्याला बोटीचा नावाडचा पिस्तुलाचे बार करून परतवितो. अधून मधून नदीच्या किनाऱ्यावर काही पुरातन शिल्पं पहावयास मिळतात. त्यात अतिपूर्वेकडील एका गणपतीची भव्य मूर्ती फारच सुंदर होती. आपल्याकडे गणपतीच्या अनेक मूर्ती आपण पहातो परंतु तशी मूर्ती मी अजून पाहिलेली नाही. कॅमेराच्या अभावी तसं दुर्मिळ चित्र मला टिपता आले नाही हयाची हळहळ वाटली. दुसऱ्या खेपेस मात्र ही मूर्ती कॅमेऱ्याने टिपली. कोलंबस् ज्या गलबतानं पृथ्वी प्रदक्षिणा करण्यास निघाला ते प्रचंड गलबत, त्याला असलेली अनेक शिडं व डोलकाठचा व त्या शेजारी दुसरी लहान गलबते, होडचातून जाऊन पाहिली. 'सबमरीन' (पाणबुडी) प्रवास हाही एक आठवण राहणारा अदभूत अनुभव. पाण्याखालील प्रचंड मासे, इतर नानाविध आकाराचे प्राणी, शिंपले, पाण्याखालच्या वनस्पती, पाणबुडीतून प्रवास करून पाहाता येतात. त्यानंतर १८ अस्वलांनी वाजविलेला बॅन्ड, एकाच रुळावरून वेगानं जाणारी मोनोरेल आगगाडी, लोखंडी दोरखंडाच्या सहाय्यानं आकाशातून जाणारी 'रोप कॅरेज' आम्ही त्यात बसून

डिस्नेलँडचे एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जाऊन आलो व सर्व डिस्नेलँडचे विहंगम दृश्य पाहिले. अशा अनेक गमती जमती आहेत परंतु त्या सर्वांचा परामर्ष येथें घेणे केवळ अशक्य आहे. तरीही आणखी तीन चार गोष्टींचा उल्लेख केल्या-शिवाय 'डिस्नेलँड' ची महती पुरी होणार नाही. 'डिस्नेलँड' सभोवती जाणारी एक 'फ्रॉन्टीयर मेल' आहे. तिला ५।६ स्टेशने आहेत. आपण कोणत्याही स्टेशनवर वसा, पुन्हा तेथेच येतो. गाडीचे डबे उघडेच आहेत व त्यात लांबच लांब बाकं आहेत. त्या गाडीतून 'ग्रँड कॅनियन' चे दर्शन होते. मी समक्ष तेथे जाऊन आल्या-मुळे मला पुन्हः प्रत्ययाचा आनंद झाला. ते दृश्य इतके प्रत्ययकारी होते की मूळ 'ग्रँड कॅनियन' आणि हे कृत्रिम ह्यांत तसूभरही फरक नव्हता. त्यानंतर ती गाडी अनेक बोगदे पार करीत व चढ उतार करीत आफ्रिकेच्या जंगलातून जाते. हे जंगल मात्र खरे होते. उंच उंच झाडं आणि रानटी झुडपं मुद्दाम वाढविलेली आहेत. मात्र त्यात माना उंचावून गर्जणारे वाघ, सिंह, हत्ती खोटे. असे अनेक सुंदर देखावे पहात गाडी पठारावरून पुन्हा मूळ ठिकाणी येते. गाडीचा ड्रायव्हर, शिटी देणारा गार्ड आणि स्टेशनाचे आवार पुराण्या पहाडी रेल्वेचा भास करून देते. दुसरी अदभुत गोष्ट म्हणजे 'टिकीरूम.' चिनी आचाराचा आणि चिनी पद्ध-तीनं सजविलेल्या या घरात २२५ पक्षी आहेत. प्रथम प्रकाशाच्या झोतात आपणास एका फांदीवर ४।५ पक्षीच दिसतात ते दुसऱ्या एका फांदीवरच्या पक्षांबरोबर बोलत असतात. पक्षांची भाषा जरी आपणास समजली नाही तरी त्यांच्या मोहक हालचालींवरून व शब्दांच्या कमी जास्त आवाजावरून त्यांचे भांडण चालले आहे हे समजते. नंतर हे पक्षी गाऊ लागतात. प्रकाश वाढतो आणि तो दुसऱ्या एका पक्षाच्या गटावर केन्द्रित होतो. तेही पक्षी गाऊ लागतात, बोलता बोलता सर्वच पक्षी गाऊ लागतात. काही झाडांच्या फांद्यांवर बसलेले, काही भींतींच्या आडोशाला लपलेले, काही कोनाड्यातून, काही खुराड्यातून, काही लोंबत्या पिंजऱ्यातून त्यांचे समूहगायन सुरू होते. दारावर बसलेली माकडं आणि खिडकीत बसलेली घुबडं वाद्य वाजवून ताल धरतात. पक्षांचे पंख फडफडणे, दोन्ही पाय एकमेकाला जोडून ताल धरणं, त्यानंतर वाढत्या लयीबरोबर त्यांच्या हालचालींची वाढती गती होणं, वाढत्या श्रेणीनं आवाज उंचावणं आणि शेवटी ताल सुरांचा परमोच्च शेवट गाठून 'नादब्रह्मात' विलीन होणं, सर्वच अकलनीय, डोकं सुन्न करून टाकणारं असतं. झाडांच्या फांद्या आणि पानंफुलं देखील डोलून त्या जल्लोषाला दाद देतात! जीवंत पक्षांकडून जे होणार नाही ते माणसानं आपल्या बुद्धीचातुर्यानं साकार करून दाखवलं आहे, हे पाहून आपण थक्क होतो.

पण 'उस्से भी ज्यादा' आश्चर्य पुढेच आहे. 'उद्याचं जग' अणुयुग असणार आहे हे सांगावयास ज्योतिषाची जरूर नाही. माणूस मंगळावर तोपर्यंत पोहोचलेला असेल आणि पृथ्वीवरील माणसं मंगळावर हळू हळू वस्ती करू

लागतील. डिसनेलँडमध्ये 'मंगळाची सफर' आणि अंतराळातील परिमाणू बघण्या-करता ' अंतराळ भ्रमण ' अशा दोन सफरी आहेत. आम्ही ' बिजेरी बकेटा ' तून अंतराळ भ्रमण करून आलो. आपण बसण्यापुरतेच ते 'यान ' लहान असते. पोटावर पट्टा घट्ट आवळून व आपल्या समोरच्या दांड्याला घट्ट धरून आपण बसावयाचे एका उंच पोकळीतून आपले 'यान' गिरक्या घेत अंतराळात भ्रमण करू लागते. सर्वत्र अंधार असतो. फक्त लुकलुकणाऱ्या चांदण्यांचा आणि सूर्यग्रहांचा जो प्रकाश पडेल तेवढाच उजेड. अवकाशात असंख्य परिमाणू इतस्तत: विखुरलेले असतात तेही स्वयंप्रकाशित असतास. कित्येकदा आपले ' यान ' उलटे फिरते पोकळीच्या कडेला आपटते आणि आता आपण उलटून पडणार अशी भिती वाटते. पण त्या अंधुक प्रकाशात आपले सोबतीही तसेच लटकलेले दिसतात आणि आपल्याला थोडा धीर येतो. ' मॉरि-क्युल्स् ' ' पार्टिकल्स ' आणि त्यातून निघणारा ' अणू ' हे समजून घेण्याच्या मन-स्थितीत आपण नसतो, अतिशय वेगानं वेडवाकडं होत आपलं यान वर वर जात असतं आणि आपल्याला जे जे होईल ते ते पहावे ' म्हणण्याशिवाय काही गत्यंतर नसते. शेवटी आपले यान ' सुखरूप जमीनीवर पाय टेकते आणि आपण कोंडलेला श्वास सोडतो ! '

सर्वात शेवटी आपण ' डिस्नेलँड ' चे सर्वात मोठे आकर्षण जो लिंकनचा पुतळा तो पाहाण्यास जातो. त्या करता आपण एका छोटया थिएटरात जातो. मंद संगीत आपलं स्वागत करतं आणि थोडया वेळात स्टेजवरचा मखमली पडदा दूर होतो. स्टेजवर संपूर्ण काळोख असतो. ध्वनिक्षेपणातून अब्राहम लिंकनची माहिती सांगण्यास सुरुवात होते, प्रकाश वाढतो आणि आपल्या डोळ्यांपुढे त्याच्या जीवनाचा चित्रपट हळूहळू दिसू लागतो. त्याचे बालपण, त्याचे आईवडील, त्याचे शाळेतले दिवस, त्यानं लाकूड काप्याची केलेली मोलमजुरी त्याची निग्रो जमातीबद्दलची प्रेमाची सहिष्णुता व त्यातून निर्माण झालेला संघर्ष आणि त्यातून तावून सुलाखून निघाल्या-वर १८५० साली त्याला अमेरिकेचा अध्यक्ष निवडला आहे ही वार्ता त्याचे घरी येऊन त्याला सांगणारे त्याचे सिनेट मित्र येथपर्यंतचा चित्रपट पाहून झाल्या-नंतर पुन्हा काळोख होतो. काही क्षण निशब्द शांतता होते आणि पडद्यासमोरील एक आकृती हलक्या आवाजात बोलू लागते. पुन्हा प्रकाश पसरतो आणि ती आकृती आपणास स्पष्ट दिसू लागते. लांब कोट व विजार घातलेली, उंच मानेची, रूबाबदार चेहऱ्याची आणि वृद्धापकाळामुळे रुपेरी केश सांभार असलेली ती व्यक्ती म्हणजेच अमेरिकेला मानवता देणारा गेल्या शतकातील त्यांचा अध्यक्ष अब्राहम् लिंकन. प्रथम तो हळू आवाजात खुर्चीत बसून बोलत असतो. मधूनच मानेची हालचाली आणि हातांची चाळवाचाळव करतो. प्रकाश अधिक प्रखर होतो आणि तो खुर्ची-तून मंद मंद पावले टाकीत पुढे येतो. आता त्याच्या आवाजाला धार आलेली असते. हात उंचावून तो आपलं म्हणणं लोकांपुढे मांडत असतो. आणि त्याच्या

डोळ्यांतून, चेहऱ्याच्या हालचालीतून तो लोकांवर किती परिणाम झाला आहे ते अजमावीत असतो. आता तो उंच पुरुष अधिकच उंच भासू लागतो. एकादा पट्टीचा वक्ता आवाज लहान मोठा करून, हातांच्या चेहऱ्याच्या व डोळ्यांच्या हालचालीतून जसं आपण भाषण श्रोत्यांच्या गळी उतरतो. तीच सर्व आयुधे वापरून ह्या व्यक्तीने सभा जिंकलेली असते; तो आपले भाषण आवरतं घेतो व पुन्हा मंद पावले टाकीत आपल्या खुर्चीच्या दोन्ही हातावर हात टाकून स्तब्ध बसतो, पुन्हा काही वेळ सर्व काही शांत शांत आणि मग पुन्हा तो मखमली पडदा खाली सरकतो.

प्रेक्षकांना खुर्चीत खिळवून टाकणारा तो प्रयोग पाहून मनात विचार येतो खरंच का तो लिंकनचा पुतळा होता की एखादा माणूस त्याचा वेष घालून ते 'सोंग' उतरवीत होता. अमेरिकेत काहीही शक्य आहे. बिलीयन डॉलर खर्च करून अशी १०।५ माणसं मिळविणं काही कठीण नाही. पण तो खरोखरच लिंकनचा पुतळा होता. लंडनच्या मादाम स्टुसाचे मेणाचे पुतळे पाहून आपण थक्क होत होतो पण येथे तर अब्राहम लिंकन पुन्हा जिवंत होऊन हातवारे करून आपल्यासमोर भाषण करीत होता. अमेरिकेला सर्वात मोठ्या ( Biggest ) आणि सर्वात भव्य गोष्टी करण्याचा हव्यास आहे. त्यापैकी काही गोष्टींची बरोबरी इतर देशांनी केली असेल ही पण सबंध 'डिस्नेलँड' आणि त्यातल्या त्यात बोलणाऱ्या लिंकनच्या पुतळ्याची बरोबरी कोणी करू शकणार नाही.

दिवस संपत आला होता तरी अजून किती गोष्टी पहावयाच्या राहून गेल्या होत्या. आमची बरीच कुपने अजून शिल्लक होती. रात्रीचे असे काही खास कार्यक्रम शिल्लक होते. परंतु आता थकल्याभागल्या शरीराने पण तृप्त मनानं आम्ही घराकडे परतत होतो. वाटेत पुन्हा त्या पों ऽ पों ऽ मोटारगाड्या आणि घोडागाड्या आणखी माणसं आत सोडतच होत्या. 'मिकी माऊस आणि हेड अस्वलांचे वेष घालून फिरणाऱ्या सोंगाड्यांतून वाट काढीत आम्ही प्रवेशद्वारातून बाहेर पडलो, ट्रॅम पकडली आणि आमच्या गाडीच्या दिशेने चालू लागलो. परवाच्या पुनर्भेटीतील एक लक्षणीय आठवण. आम्ही दोघे विश्रांतीसाठी एका बाकावर बसलो असता त्या गर्दीतून एक आवाज कानी आला. 'आपण मुंबईहून आला का ? आम्ही वळून बघू लागलो तो सिनेस्टार डेव्हिड अब्राहम आमचे पुढे उभे ! पत्नीची साडी पाहून त्यांनी आम्हांस ओळखलं असावं. मराठीतून त्यांनी मुंबईच्या माणसांची भारतीय राजकारणाची आवर्जून चौकशी केली. मराठी बोलण्यास मराठी माणूस भेटल्याचा आमच्यापेक्षा त्यांनाच जास्त आनंद झाला होता. 'एकला चलो रे' करीत आला तसाच तो त्या अथांग जनसागरात विरघळून गेला. त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहून ह्या माणसाला भारताबद्दल किती प्रेम होतं आणि आपल्या मातृभूमीचा वियोग त्याला किती असह्य होत आहे. ह्याची आम्हांस

हळहळ वाटली, परवा हा एकांडा ' शिलेदार ' एकाएकी वारल्याचं समजलं आणि वरील त्याची भेट पुन्हा आठवून दुःख झालं.

अलिकडे अमेरिकेच्या दक्षिण टोकाला फ्लॉरिज येथे असेच ' डिस्नेलँड ' उभे केले आहे. पण ते लहान प्रमाणावर आहे. लॉस एॅन्जेलचं ' डिस्नेलँड ' ही अमेरिकेच्या विज्ञान प्रगतीचा उच्चांक गाठणारी, सुरस चमत्कारिक आणि अद्भुत गोष्टींनी भरलेली ' मायानगरी ' आहे. तिची बरोबरी करण्यास कोणतेही पुढारलेले राष्ट्र अजून धजावलेले नाही. अमेरिकेचं सर्वश्रेष्ठ स्थान अढळ आहे.

## सानफ्रान्सिस्को

त्याच रात्री मी दहा वाजता लॉस एॅन्जेल्स सोडले आणि सकाळी सहा वाजता ओकलंड येथे येऊन थडलो. एक्स्प्रेस बस, एका रात्रीत ८०० मैल अंतर नाममात्रच २।३ ठिकाणी स्टॉप घेऊन काटते. आधी फोन केल्याप्रमाणे बसस्टॉपवर माझा मामेभाऊ मनोहर आपटे मला घेण्यास आला होता.

मनोहर आपटे ह्यांचे घरही डॉ. नंदापूरकरांप्रमाणे प्रशस्त आहे. मात्र त्याला तीन ' लेव्हलस् ' आहेत. दर्शनी दिवाणखाना, त्याचे मागे भोजनगृह. त्याचे बाजूस ४।६ पायऱ्या उतरून गेलं की तळघरांत एक शयनगृह, बाथरूम व त्याचे पलिकडे वॉशिंग मशीन व इतर सामान ठेवण्याची खोली व त्या खोलीतून एक दरवाजा गराजमध्ये व एक बगीच्यात जातो. माडीवर दोन शयनगृहे व बाथरूम. येथील सर्वच गराजमध्ये दोन गाड्यांची जागा असते. परंतु लहान मुलांच्या गाड्या, बागेची अवजारे आणि इतर सामानांनी त्याचा निम्मा भाग व्यापलेला असतो. म्हणून एक गाडी बहुधा बाहेरच ठेवावी लागते. इतर बंगल्यांप्रमाणेच त्यांचे बंगल्यासमोर फूटपाथपर्यंत पसरलेली हिरवळ आहे. बंगल्याला खेटून काही फुलझाडे आहेत. लिंबाची झाडं पिवळ्या रसरशीत लिंबानी लहडलेली आहेत पण कोणीही वाटसरू त्यांचेकडे ढुंकुनही पहात नाही. मागील दारी प्रशस्त हिरवळ गुलाबाची ताटवे आणि त्यापलिकडे एक लहान दरी व त्यात एक लहान ओढा. दरी पलिकडे टेकाडावर सफरचंदाची झाडं व इतर मोठे वृक्ष आहेत. मागच्या हिरवळीवर ' बारबे क्यू ' आहे. मागील परिसर अतिशय नयनरम्य आहे.

## प्रचंड ग्राहकपेठ

कॅलिफोर्नियाचा हा भाग फारच श्रीमंत मानला जातो. खाडीच्या एका किनाऱ्यावर ऑकलंड व बर्कले ही शहरे व दुसऱ्या किनाऱ्यावर सानफ्रान्सिस्को शहर वसले आहे. माझ्या सबंध प्रवासात माझ्या नात्याची अशी ही एकमेव व्यक्ती मनोहर आपटे. त्यामुळे त्याचेकडे मी दहा दिवस राहिलो. सोमवार ते शुक्रवार ह्या त्याच्या ऑफिसच्या दिवसात पूर्ण विश्रांती घेतली. मात्र सकाळी त्याच्या पत्नी-बरोबर, शीलाबरोबर बाजारहाट करण्यास बाहेर पडे. येथे बाजारहाट करणं हाही

एक ' अनुभव ' आहे. ' सेफवे '(Safeway) नावाचे प्रचंड ग्रोसरीचे डिपार्टमेंटल स्टोअर्स आहेत. त्याच्या शाखा सर्व देशभर पसरलेल्या आहेत. त्यांचा कारभार एवढा मोठा आहे की आजूबाजूच्या खेड्यापाड्यातून भाजीपाल्याच्या व इतर खाद्यपदार्थांच्या वॅगन्स त्यांच्या शहराबाहेर असलेल्या गुदामात माल आणून टाकतात आणि तेथून तो वितरित केला जातो. मालगाडीचा तर एक धक्काच त्यांच्याकरता सुरक्षित केलेला आहे. ह्या स्टोअर्समध्ये माल पहिल्या प्रतीचा, ताजा मिळतो आणि त्यांच्या किंमतीही माफक असतात. त्यांच्या स्वतःच्या पार्किंग लॉट मध्ये गाडी ठेवून आपण स्टोअर्समध्ये जावयाचे. तेथे ठेवलेल्या गाड्यांपैकी एक ढकल गाडी घ्यायची व निरनिराळ्या भागांतून हिंडून आपणास पाहिजे असतील त्या वस्तू गाडीत टाकावयाच्या. चीज, बटर, दुधाचे गॅलनचे डबे, दह्याचे (Yogurt) डबे, दह्यात फळे घातलेले सीलबंद डबे, अंडी,' मटन, चिकन वगैरे एका ठिकाणाहून, अर्धवट शिजवलेली कडधान्ये, वाटाणा वगैरे सीलबंद पाकिटे, नारींगी, द्राक्षे वगैरे फळांच्या ताज्या रसाचे डबे, अनेक जातीच्या चटण्या आणि टामाटो वगैरेंचे 'केचप' दुसऱ्या भागातून घ्यावयाच्या. तसेच भाज्यांच्या भाग निराळा असतो. त्यात फुलावर, कोबी वांग्यापासून कोथींबिरीपर्यंत सर्व भाज्या असतात टवटवीत ताज्या. कलिंगडे साधारणपणे आपल्याकडे मिळणाऱ्या मोठ्यात मोठ्या कलिंगडांच्या दुप्पट आकाराची. उभी कापून दोन भाग करून ठेवलेली असतात त्यावर प्लॅस्टिकचं आवरण असतं. चिबूड तीन चार प्रकारची व काकड्या तीन चार प्रकारच्या लहान मोठ्या असतात. भाजीपाला नगावर विकला जातो परंतु कांदे बटाटे वजनावर विकले जातात. पाच पौंडाच्या पिशव्या बांधून ठेवलेल्या असतात. परंतु आपणास कमी हवे असेल तर आपले आपण वजन तेथे ठेवलेल्या काट्यावर करून घ्यावयाने. चहा, कॉफी, ओव्हलटाईन, जॅम व डबाबंद अन्नपदार्थांचा भाग निराळा आहे. त्यानंतर साबण, तेले, हात व मोरी धुवावयाचे द्रवरूपी सावण पावडरी, कपवशा, काटे चमचे, मोरी धुण्याचे ब्रश, झाडू वगैरे विभाग, त्या पलिकडे कापडी टॉवेल, जेवणाच्या टेबलावरील कागदी टॉवेल व कागदी ट्रे वगैरे, तसेच चाकू, कात्र्या, विजेचे दिवे, सिलोफीन टेप, नित्योपयोगी औषधे आणि ग्राईंडर, मिक्सर वगैरे स्वयंपाक घरात लागणारी यंत्रे ह्यांनी स्टोअर्स भरलेला असतो. प्रत्येकावर किंमतीच्या चिठ्ठ्या असतात. असं अक्षरशः ' गाडीभर ' सामान घेऊन आपण बाहेर पडण्याच्या दरवाजाजवळच्या कॅशर मुलींकडे जावयाचे. त्या सर्व सामान काढून टेबलावर ठेवतात. त्यांच्या किंमतीची बेरीज मशिनवर करून बिल तुमच्या हातावर ठेवतात. त्या बिलावर तुम्ही दिलेले पैसे, प्रत्यक्ष झालेली रक्कम वजा करून उरलेली रक्कमही दाखवलेली असते. आपण पैसे चुकते करून तिने पिशव्यात घालून दिलेला माल पुन्हा हातगाडीत टाकावयाचा व गाडी आपल्या गाडी पर्यंत ढकलीत न्यावयाची. माल काढून आपल्या गाडीत टाकावयाचा व ती ढकल-

गाडी तेथेच एका कोपऱ्यात, दुसऱ्या तशाच गाड्या एकात एक अडकविलेल्या असतात त्यात अडकवून ठेवावयाची.

ह्या ढकलगाडीत लहान मुलाला पाय सोडून बसण्याची निराळी सोय असते. माझ्या भावाच्या मुलानं, निखिलनं आमचा डोळा चुकवून ओव्हलटाईनची मोठी बाटली उचलली आणि ती खाली पडून फुटली. आम्ही काचांचे तुकडे गोळा करू लागलो. तो एक मुलगी धावत आली आणि आम्हांला 'तसेच राहू द्या हात लावू नका' सांगून आत गेली आणि तशीच ओव्हलटाईनची दुसरी बाटली आणून तिनं आमच्या गाडीत ठेवली. फुटलेल्या बाटलीची किंमत तिनं आमच्याकडून वसूल केली नाही असली सवय नसल्यामुळे मला कसंकसंच वाटलं !

हे एवढं विस्तारानं सांगण्याचा हेतू बाजारहाट करणं किती सोपं आणि मजेचं केलं आहे ह्याची कल्पना यावी हा आहे.

एका संध्याकाळी तेथेच जवळ असलेले 'मिरॅमन' देऊळ पाहिले. प्रोटॅस्टंट व कॅथोलिक ह्यांच्या मधला हा मिरॅमन पंथ त्यांचे सर्वात मोठे देऊळ सॉल्टलेक येथे आहे. ह्या पंथाच्या प्रसार अमेरिकेत वाढत आहे.

## बर्कले विद्यापीठ

त्यानंतर आम्ही बर्कले युनिव्हर्सिटी पाहण्यास गेलो, अमेरिकेतल्या स्टॅनफोर्ड, हॉवर्ड कोलंबिया व आणखी एक अशा पाच युनिव्हर्सिटीमध्ये बर्कले युनि. चा नंबर पहिला लागतो. एक सबंध डोंगर ह्या युनि. ने व्यापला आहे. प्रशस्त हिरवळीवर विद्यार्थी अभ्यास करताना दिसले, प्रत्येक फॅकल्टीची स्वतंत्र बिल्डिंग आहे. व मध्य-भागी मुख्य ऑफिस आहे. त्याचा टॉवर लांबून दिसतो. सर्वत्र शांतता पसरलेली. कोठे गोंगाट नाही की विद्यार्थ्यांची आपसात कुजबूज नाही. मोटारीच्या आवाजानं शांतता भंग पावेल म्हणून येथील आवारात मोटारीच्या रस्त्यावर ठिकठिकाणी 'स्पीड ब्रेकर्स' उंचवटे घातलेले आहेत. त्यावरून मोटारी वेगाने जाऊच शकणार नाहीत. विद्यार्थ्यांची निवासस्थाने थोड्या अंतरावर आहेत व तेथेच एक आंतर-देशीय विद्यार्थी वसतीगृह आहे. त्यात फक्त पदवीत्तर विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळतो. जवळच एक विद्यार्थ्यांकरता भोजनगृह आहे. त्यात त्यांना कमी आकारात भोजन मिळते. ह्या युनिव्हर्सिटीत हुशार स्कॉलर मुलांनाच प्रवेश मिळतो.

अशीच सुप्रसिद्ध दुसरी युनिव्हर्सिटी स्टॅनफोर्ड येथून ४० मैलांवर आहे. तेथील गणिताच्या प्रोफेसर प्राध्यापिका देवल आम्हांस भेटण्यास आल्या होत्या.

बर्कले युनि. पाहून झाल्यावर आम्ही एका मेक्सिकन उपाहारगृहात रात्री भोज-नास गेलो होतो. मेक्सिकन जेवणात आपल्यासारखे मसाले घातलेले चमचमीत असते. चायनीज हॉटेलमध्ये गेल्यावर जसे विराळेच वातावरण डोळ्यांत भरते तसे मेक्सिकन हॉटेलात त्यांची विशिष्ट लाकडी टेबलं खुर्च्या, भोजन पात्रे आणि

रोषणाई पाहून वाटते. येथील हॉटेलात मुलांना बसण्याकरता निराळ्या उंच खुर्च्या असतात.

दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही खाद्यपदार्थ घेऊन मोटारीने सान्फ्रान्सिस्को शहराच्या आसपासचा सुमारे १०० मैलांचा दौरा केला. ऑकलंड व सान्फ्रान्सिस्कोला जोडणारा ' वे ब्रीज ' खूप मोठा आहे. त्याची लांबी ७ मैल व दोन्ही बाजूचे भराव धरून दहा मैल होईल. त्यावरून खाली व वर मिळून प्रत्येकी एकमार्गी सहा लेन्स आहेत. जकात नाक्यावर एकाच वेळी एकाच दिशेनं जाणाऱ्या गाड्यां-करता १७ टोल खिडक्या आहेत. प्रत्येकी ५० सेंट टोल चुकवून जराही खोटी न होता गाड्या भरधाव पुलावरून जात असतात. अलिकडे पेट्रोल बचत योजने-नुसार तीन अथवा अधिक माणसे गाडीत असली तर टोल पडत नाही. मात्र हा नियम सुटीच्या दिवशी लागू नसल्याने आम्हांस टोल द्यावा लागला. टोलच्या उत्पन्नातून ह्या पुलाचा खर्च कधीच निघाला आहे तरीही टोल अजून घेतला जातो, म्हणून आता आणखी दुसरा पूल बांधण्याच्या येथील कॉर्पोरेशनच्या ठरावाला लोकांचा सक्त विरोध आहे. ह्या पुलाला अनेक कमानी आहेत व शिवाय जाड्या लोखंडी दोरखंडांनी त्याला अधिक मजबूती दिली आहे. मुख्य शहर डाव्या हाताला ठेवून आम्ही एका उंच पहाडावर गेलो. वेडीवाकडी वळणे घेत गाडी एका उंच पठारावर जाऊन थांबली. तेथून सुमारे २० मैलांच्या परि-सराचे विहंगम दृश्य दिसते. शहराच्या उंच उंच इमारती, त्यामधून जाणारे मोटारींनी वाहणारे लांबच लांब रस्ते. एका बाजूला खाडी, त्यातून जाणाऱ्या प्रचंड बोटी, शिडाची गलबते आणि लहान लहान होड्या, त्या पलिकडे बर्कले व ऑकलंड शहरे व त्या पलिकडचा विस्तीर्ण भूप्रदेश व दुसऱ्या हाताला नीळाशार अथांग पसरलेला पॅसिफिक महासागर पाहून आपल्या डोळ्यांचं पारणं फिटतं. ह्या डोंगराच्या पायथ्याशीच जगातला वैज्ञानिक चमत्कार म्हणून ओळखिला जाणारा ' गोल्डन गेट ब्रीज ' आहे. ह्या भागात विलक्षण धुकं असल्यामुळे त्याचे सुळके तेवढे अधून मधून सूर्यकिरणात चमकताना दिसले. झोंबरा वारा आणि हुडहुडी भरविणारी थंडीमुळे बेजार झाल्यामुळे आम्ही फार वेळ तेथे उभे राहू शकलो नाही. परंतु खाली आल्यावरही त्या घोंघावणाऱ्या वाऱ्याचा आणि महासागराच्या प्रचंड लाटा किनाऱ्यावर आपटल्याचा आवाज आमच्या कानात भरून राहिला होता.

## अधांतरी टांगलेला पूल

' गोल्डन गेट ब्रिज ' हे एका वेड्यात काढलेल्या, झपाटलेल्या माणसाचं एकट्याचं कर्तृत्व आहे. लोखंडी दोरखंडाच्या सहाय्यानं पूल अधांतरी उभा करता येईल हे त्याचं स्वप्न येथे त्यानं साकार करून दाखविलं आहे. तीन फूट परिघ असलेल्या ' दोरखंडा 'त त्याने सुमारे २५ हजार लहान लहान लोखंडी तारा घातल्या आहेत. आणि यंत्रात त्या एकत्र, एकजीव केल्या आहेत. अशा त्या प्रचंड

दोरखंडाच्या आधारानं पूल वरच्यावर लोंबत आहे. हे दोर खेचून धरण्याकरता जमिनीत २०० फूट खोल दोन्ही बाजूला दोन मनोरे आहेत. त्यांची उंचीही २०० फूट आहे आणि सर्वात आश्चर्य म्हणजे ह्या दोन मनोऱ्यातील अंतर दोन मैलांचे आहे ! म्हणजेच दोन मैल लांबीवर ह्या पुलाला मध्ये दुसरा कोणताही आधार नाही. खाडीच्या दोन्ही अंगाला सिमेंट कॉन्क्रीटचे कठडे बांधून त्यावर ह्या दोरखंडांना तणाव दिला आहे. हा पूल बांधून आता ३०।३५ वर्षे झाली व त्यावरून अहोरात्र मोटारींची, जड वाहनांची वाहातूक चालू असते. परंतु बांधला तेव्हा तो नक्की पडणार ह्या समजूतीनं टी. व्ही. चे कॅमेरे ते चित्र टिपण्याकरता सज्ज ठेवले होते असे म्हणतात. पाण्यापासून १५० फूट उंच असल्यामुळे व मध्ये खांबांचा अडथळा नसल्यामुळे मोठमोठ्या आगबोटी त्याचे खालून सानफ्रान्सिस्को बंदराला लागतात. कोलंबस ज्या मार्गानं प्रथम अमेरिकेच्या किनाऱ्यावर लागला व येथेच त्याला सोन्याच्या खाणी सापडल्या म्हणून ह्या पुलाला गोल्डन गेट ब्रिज म्हणतात व त्याचा रंगही सोनेरी आहे.

पुलाच्या पलिकडेच्या अंगाला ह्या माणसाचा भव्य पुतळा उभा केला आहे आणि त्याने शोधून काढलेल्या आणि ह्या पुलाला वापरलेल्या दोरखंडाचा एक भाग सर्व माहितीसह येथे ठेवण्यात आला आहे.

एवढा मोठा भव्य झुलता पूल जगात अन्यत्र नाही म्हणून हा पूल म्हणजे अमेरिकन माणसाच्या टोपीतील आणखी एक तुरा मानला जातो.

## आंबे, फणसाचे विलायती कोकण

ह्या पुलावरून आम्ही बोटॅनिकल गार्डन पाहाण्यास गेलो. जगातील सर्वोत्कृष्ट म्हणून या गार्डनचा उल्लेख करण्यात येतो. येथे उंच सखल भागावर सर्वत्र मऊ मखमली गालीचे पसरलेले, मध्येच फुलांचे ताटवे आणि सभोवती निरनिराळ्या जातीचे प्रचंड पुरातन वृक्ष दिसतात. प्रथम आम्ही तेथील प्रसिद्ध 'ट्रॉपिकल गार्डन' पहाण्यास गेलो. एका गोल घुमट असलेल्या काचेच्या घरात वातानुकूल हवेत ही गार्डन आहे. त्यात हिंदुस्थान आफ्रिका आदी उष्ण कटीबंधातील देशांची फुलझाडे, वनस्पती आहेत. केळीचे घड लागलेल्या केळीचं बन, फळे लागलेले आंब्याचे वृक्ष, पपये, फणस वगैरे तर आहेतच परंतु आपल्याकडील सर्व प्रकारच्या फुलांच्या रंगीबेरंगी ताटव्यांनी ही बाग विलक्षण सौंदर्याने नटली आहे. अशी सुंदर फुलं पाहून आपल्या देशात उटीजवळ कन्नानूर म्हणून एक गाव आहे तेथल्या गुलाबांच्या ताटव्यांची आठवण येते. तेथील सर्व भाग वातानुकूल असला तरी काही काही भागात, आवश्यक त्याप्रमाणे, कमी अधिक उष्णता खेळवली आहे. पाणी देण्याचेही शास्त्र आहे त्याप्रमाणे कमी अधिक पाणी नळातून ह्या झाडांवर सोडलं जातं. ह्या बागेतून पाय निघता निघत नाही एवढे त्यात आपण रमून जातो. बाहेर एक फुलांचा गालिचा आहे त्यावर 'फ्लॉवर शो-ऑगस्ट १३ ते २३

आपले स्वागत असो ' अशी फुलात काढलेली रंगीबेरंगी अक्षरे होती. बागेत व ह्या गालिच्या समोर उभं राहून मनोहरनं आमचे फोटो काढले. निसर्गाच्या कुशीत बसून, लोळून आम्ही आमचे दुपारचे भोजन व विश्रांती घेतली आणि तेथून जवळ असलेल्या ' जपानी उद्यानात ' गेलो. अनेक लहान लहान झुलत्या पुलांवरून व एक जवळ जवळ अशक्यप्राय असा पूल चढून आम्ही ह्या जपानी बगीच्याजवळ पोहोचलो. दर्शनीच जपानी पद्धतीच्या प्रवेशद्वारापाशी बुद्धाचा प्रचंड पुतळा आहे. त्या खाली उभं राहून फोटो काढले आणि चढ उतार करीत बगीचात फिरलो. येथील वैशिष्ट्य म्हणजे एकजात ठेंगणी झाडं आणि तरीही त्यांना फळं लोंबलेली असतात. असे म्हणता येईल की, जपानी माणसाचा ठेंगूपणा त्यांच्या झाडाझुडपातही दिसतो. ह्याची गंमत वाटली.

## ३०० फूट उंचीचे रेडवूड वृक्ष

' मूर वुड फॉरेस्ट ' ही निसर्गाची आणखी एक अमेरिकेला बहाल केलेली अजब देणगी. ह्या अरण्यात जाण्याकरता तिकीट काढावे लागते व त्यात फिरत असताना विडीसिगरेट ओढण्याची सक्त मनाई आहे. पायवाटेनं आपण जसं जसं आंत आंत जाऊ लागतो तस तशी झाडी वाढीत जाते. येथे मुद्दाम जोपासलेले 'रेड वूड ' वृक्ष आहेत, एकापेक्षा एक उंच आकाशाला भिडणारे. त्यांची उंची १०० फूटांपासून ३०० फूटांपर्यंत आहे असं आम्हांस सांगण्यात आलं. युरोप अमेरिकेच्या थंड प्रदेशात सर्वच झाडं आडवी वाढत नाहीत, उंचीने वाढतात. पॅरिसमध्ये त्या फ्रेंच युवतीनं अभिमानानं ह्या शहरात एक लाख दहा हजार वृक्ष आहेत असं सांगितलं तेव्हा ते आपल्या इकडील झाडांच्या विस्तारानं साधारण २५ हजार आहेत असा अंदाज करावयास हरकत नाही. ह्या ' रेडवूड ' सारखी उंच झाडे जगात कोठे असतील असं वाटत नाही. एक झाड तर एवढे उंच आणि रुंद होते की त्याच्या बुंध्याच्या पोकळीतून मोटारगाड्या जाण्याचा रस्ता होता असं म्हणतात. ते झाड आता पडले पण त्याचा एक सेक्शन कापून तेथे व्यवस्थित ठेवलेला आहे. त्यावर त्याचा परिघ ४७ फूट असल्याचे व ते झाड १५० वर्षांचे असल्याचा, व त्याच्या प्रत्येक वर्तुळाकार कंगोऱ्यावर लिहिलेल्या वर्षावरून हे पडताळून पहाता येईल असा उल्लेख आहे. निसर्गानं छप्पर फाडून दिलं तरी त्याचा संभाळ माणसानंच करावयास हवा. ह्या मूर फॉरेस्टची जोपासना एकाद्या लहान मुलासारखी येथे केली जाते. झाडावर कीड पडली तर तेवढाच भाग जाळून व औषधे मारून निकामी करण्यात येतो व बाकीचा वृक्ष सुरक्षित रहातो. येथे अनेक झाडांच्या बुंध्यात अशा उपायांचे परिणामी पोकळी पाहिली. कोठेही कचरा पालापाचोळा नाही एवढे हे अरण्य स्वच्छ ठेवले आहे. आगीपासून संरक्षणाची तयारी ठेवलेली आहे आणि ही एक देशाची संपत्ती म्हणून त्याची काळजी घेतली

आहे. उष्ण कटीबंधात वृक्ष जास्त चांगले वाढतात, फोफावतात मग आम्ही ह्या संपत्तीला पारखे का ? ह्याचं उत्तर कोणी कोणाला द्यावयाचं ? इंग्लड अमेरिकेत वृक्षांची लहान मुलासारखी जोपासना होते म्हणून शंभर दीडशे वर्षांची झाडं तेथे अजून ताठ मानेनं उभी आहेत, आम्ही अरण्ये कापून उजाड केली आणि आता 'वृक्षारोपणा' चा तमाशा करीत आहोत, ह्याला काय म्हणावे ?

आता संध्याकाळ झाली होती. गार वारे अंगाला झोंबत होते आणि थंडीनं कुडकुडण्याची वेळ आली होती, म्हणून आम्ही परतलो. प्रथम तेथल्याच एका ठिकाणी गरम चहा घेतल्यावर अंगात ऊब आली आणि आम्ही रात्रीपर्यंत घरी परतलो.

## बोटीची सफर

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा 'भाकऱ्या' बांधून घेऊन खाडीपार करून बोटींच्या धक्यावर पोहोचलो. कशीवशी पार्कींग लॉटमध्ये जागा मिळवून गाडी ठेवून आम्ही खाडी किनाऱ्याच्या सहलीकरता एका शोभिवंत बोटीत चढलो. मुंबईच्या 'गेटवे' वरून फक्त लहान लहान मोटारबोटी अथवा पडाव सहलींची जा ये करतात. पण येथे रेवस धरमतरला जाणाऱ्या बोटी एवढ्या मोठ्या बोटी असतात. त्यात बसल्यावर आपण एकादा लांबचा प्रवास करणार आहोत असं वाटतं. कारण त्याचा कप्तान व इतर खलाशी त्यांच्या युनिफॉर्ममध्ये असतात. बोट प्रथम अति खालच्या म्हणजे बर्कलेला जोडणाऱ्या पुलापर्यंत जाते. तेथून वळून नंतर गोल्डन गेट ब्रिज खालून जाते, त्यावेळी त्या पुलाच्या उंचीची व बांधणीची कल्पना येते. कप्तान दूरध्वनी क्षेपकावरून सर्व माहिती सांगत असतो. त्यानंतर आगबोट किनाऱ्या किनाऱ्याने बे ब्रिज म्हणजे मुख्य वाहातुकीच्या पुलापर्यंत येते. उजव्या हाताला एका बेटावर काही ओसाड बिल्डिंग्ज दिसतात तेथे पूर्वी जन्मठेपेचे कैदी ठेवीत असत. त्यावरून अंदमानची आठवण आली दुसऱ्या महायुद्धात तेथील कैदी हलविले गेले आणि त्यांची मिलिटरी बरॅक करण्यात आली. आता त्या इमारती ओस पडल्या आहेत. बोटीतून शहराच्या उत्तुंग इमारती आणि सर्व टी. व्ही मिळून एकच एक उंच टॉवर दिसतो. अशी ही दोन तासाची सफर करून आम्ही शहराचा समुद्र किनारा जो 'मरीना' त्या भागात गेलो. तेथे हिरवळीवर बसून प्रथम बरोबर आणलेल्या 'भाकऱ्या' खाल्ल्या आणि खाडीत चाललेले खेळ पाहिले. लहान लहान शिडाच्या होड्यांतून दूरवर जाणारे 'रगेटा' वीर, 'मोटार बोटी' पाठीमागे एका फळीवरून फरफटत जाणाऱ्या युवयुवतींचा खेळ, आजवर सिनेमातच पहात होतो, तो पाहून त्यांच्या साहसाचं कौतुक वाटलं. एक युवती तर एका फळकटीवर उभी राहून शिडाच्या सहाय्यानं एवढ्या वेगाने खाडी पार करीत होती की विचारायची सोय नाही. खाडीच्या दुसऱ्या टोकापासून आम्ही बसलो

होतो तेथपर्यंत ती सारख्या चकरा मारीत होती. तिचे शीड खाली कोसळे व ती पाण्यात पडे परंतु पुन्हा मध्येच ती ते शीड उभे करी आणि वेगानं पुढे जाई. वाऱ्याच्या प्रचंड प्रवाहामुळे तिला सर्व शक्तीनिशी दोन्ही हातांनी शीड अंगावर खेचून ठेवून व तोल सांभाळीत कसरत करावी लागत होती ती अवर्णनीय आहे. तिने अंगात डोक्यापासून पायापर्यंत अंगाला घट्ट बसणारा काळ्या प्लॅस्टिकचा वेश घातलेला होता त्यात तिची सुरेख सुदृढ शरीरयष्टी अधिकच सुरेख दिसत होती. येथेच खाडीचा किनारा संपून पॅसिफिक महासागराचा खोल किनारा सुरू होतो. तेथील वादळीवारे अंगाला झोंबत असल्यामुळे तेथे जास्त न थांबता किनारपट्टीने आम्ही गाडीतून एका जुन्या इटालियन वास्तुपाशी आलो. रोमच्या पुराण्या संस्कृतीचे अवशेष दाखविणारे तेथे पडके मिनार, तुटक्या भिंती दिसतात. त्या जुन्या वास्तूच्या प्रवेशद्वारातून आम्ही आत प्रवेश केला. प्रवेश द्वाराच्या उंच मनोऱ्यावर आठ दिशेला तोंड केलेल्या 'अष्टनायिका' होत्या. त्यांच्या वेश-भूषेवरून त्या इटालियन संस्कृतीचं प्रतीक वाटत होत्या. तेथे उद्यानात ठेवलेली अनेक शिल्पं पाहून आल्यावर आम्ही त्याच्या शेजारीच असलेल्या एका 'फिजिक्स' म्युझियम मध्ये गेलो. विज्ञान शास्त्रातील 'फिजिक्स' च्या शास्त्रातील अनेक गमती जमती तेथे पहावयास मिळतात. पेंडुलियमने होणारे अनेक प्रयोग, डोळ्यांच्या रेटीनावर प्रकाश किरणानं होणारे फसवे प्रयोग, आरशाच्या भिंगावर उजेडाची प्रक्रिया करून समोरासमोर बसणाऱ्या माणसांना एकाचवेळी दोघेही दिसणे आणि एकाचवेळी एकटाच दिसणे, सूर्य किरणातून सप्तरंगी इंद्रधनुष्य आणि रंगाची आतषबाजी करणारं स्पेक्ट्रम,' छायाप्रकाशाच्या उघडझापीनं स्टेजवरील मुलं भूत होऊन नाचणं इत्यादी असंख्य प्रयोग आम्ही पाहिले. हे म्युझियम अलिकडेच बांधण्यात आले आहे. म्हणून अजून ते एका मोठ्या पत्र्याच्या आच्छादना-खाली आहे. ह्यातच दोन तास निघून गेल्यामुळे इलेक्ट्रिसिटी आणि इलेक्ट्रॉनिक हा भाग पहाण्याचा राहून गेला. मात्र तो किती अद्भुत असेल, ह्याची, जे पाहिले होते त्यावरून कल्पना करता येईल. मुलांना विज्ञानाची गोडी लागण्याचे दृष्टीनं ह्या म्युझियमचं महत्त्व निराळं सांगावयास नको.

## जगातील सर्वात वाकडा रस्ता

त्यानंतर शहराच्या मुख्य भागातून आम्ही फेरफटका केला. सानफ्रान्सिस्को शहर टेकडीच्या उंचीवरून खाली किनाऱ्याकडे उतरत आलं आहे. त्यामुळे तेथील घरे चैत्रगौर मांडल्यासारखी दिसतात. खालपासून थेट वरपर्यंत रस्ते सरळ एका रेषेत असतात हे येथल्या रस्त्यांचे खास वैशिष्ट्य. गाडी चढणीला अथवा उतरणीला लागली की मध्ये कोठे वाकडी वाट नसल्यामुळे मोटारींना एका दमात वर गेले पाहिजे अथवा खाली आले पाहिजे. तेथील गाड्या मजबूत आणि अधिक अश्व-

शवतीच्या असतात म्हणून अपघात होत नाहीत. आपल्याकडे असे रस्ते असले तर मोठाच अनर्थ होईल. जणू एवढ्यानेच समाधान न झाल्यामुळे तेथे एक अतिशय वेडा वाकडा रस्ता मुद्दाम बांधला आहे. साधारण ५०० फुटांवरून हा रस्ता एका-मागून एक नागमोडी वळणे घेत पायथ्याशी येतो. ह्या रस्त्यावर फक्त वरून खाली येता येते, खालून वर जाणे बहुधा अशक्यच असेल म्हणून त्याला बंदी आहे. तसेच पादचाऱ्यांना व मोटारींखेरीज इतर कोणत्याही वाहनांना ह्या रस्त्यावरून जाण्यास बंदी आहे. पादचाऱ्यांना एका बाजूने पायऱ्या चढून थेटपर्यंत वरती अथवा खाली जाता येते. परंतु सहसा कोणी एवढ्या पायऱ्या चढण्या उतरण्याचा व्यायाम करीत नाही. ह्या रस्त्याला 'जगातील सर्वात वाकडा रस्ता' Crookedest road in the world म्हणतात. अमेरिकन माणसाची, ह्या सर्वाहून भव्य, दिव्य सर्वाहून मोठेपणाची ( Biggest ) ची भूक एवढी पराकोटीला गेली आहे की ' सर्वात मोठे लहान शहर ' Biggest small town in the world, आमच्या देशात आहे म्हणण्यापर्यंत त्यांनी आपलं हसं करून घेतलं आहे ! शहराच्या पूर्व भागात त्यांचे ' डाऊन टाऊन ' म्हणजे मुख्य बाजारपेठ आणि सिनेमा नाटचगृहे, ' नाईट क्लब ' वगैरे आहेत. आता रात्र झाल्यानं आम्ही त्या भागात हिंडलो, तेव्हा हा सर्व भाग दिव्याच्या लखलखाटानं न्हाऊन निघाला होता. ' पॅरिसच्या वरचढ येथील ' नाईट क्लब ' व ' नाईट लाईफ ' आहे असं जाणते लोक म्हणतात. आम्ही अनेक ' नाईट क्लब ' च्या दिव्यांच्या रोषणाईत चमकणाऱ्या पाट्या पाहिल्या व तेवढ्या-वरच समाधान मानले. चिनी जपानी लोक ह्या भागात तर मोठ्या संख्येनं दिसतात, कारण त्यांच्या देशातून पॅसिफिक महासागर ओलांडून आल्यावर हेच अमेरिकेचे मोठे शहर लागते. त्यांचा ' चायना टाऊन ' म्हणून एक मोठा रस्ता आहे. त्यात तर सर्व दुकाने चिनी जपानी लोकांची आहेत आणि त्यांची मांडणी त्यांच्या पद्धतीची असल्यामुळे क्षणभर आपण टोकियो किंवा हाँगकाँगला आल्यासारखे वाटते.

## झोपडपट्ट्यांची कलात्मक रचना

रात्री तेथूनच १० मैल अंतरावर माझे ओळखीचे एक मित्र प्रभाकर आपटे ह्यांच्याकडे रात्रीच्या भोजनाकरता गेलो. वाटेत डाव्या हाताच्या टेकडीवर कमी उत्पन्नाच्या आणि गलिच्छ वस्ती निर्मूलन करून वसविलेल्या कॉलनी लागल्या. ' नेत्रकंटाळा ' (Eyesour) येऊ नये म्हणून प्रत्येक कॉलनीची गृहरचना निर-निराळ्या पद्धतीची केली आहे आणि इमारती एका पाठीमागे दुसरी अशी न बांधता काही वर्तुळाकृती व काही कमळाकृती बांधून विविधता आणली आहे.

## संपूर्ण स्वयंचलित ट्रेन (BART)

दुसऱ्या दिवशी दुपारी आम्ही येथे नुकतीच सुरू झालेली एक विशेष रेल्वे-गाडी बघण्यास गेलो. तिला 'बार्ट' (Bart) म्हणतात. ही गाडी संपूर्णतः कॉम्प्युटरच्या सहाय्याने नियंत्रित होते. आम्ही आमची गाडी एका 'पार्किंग लॉट' मध्ये उभी करून स्टेशनात पोहोचलो. तेथे सर्वत्र सामसूम होती. ना कोणी रेल्वेचे कर्मचारी ना कोणी उतारू. तिकीट खिडकीजवळ रेल्वेचा मोठा नकाशा लावलेला आहे. प्रत्येक स्टेशनवर वर्तुळात ह्या स्टेशनापासून दुसऱ्या स्टेशनपर्यंत लागणाऱ्या तिकिटाचे पैसे लिहिलेले आहेत. आम्हांस जावयाच्या स्टेशनवर ९० सेंट लिहिलेले होते म्हणून परतीच्या आकारासह आम्ही प्रत्येकी १ डॉलर ८० सेंटची तिकीटे घेतली. ते कार्ड स्टेशनात शिरताना दरवाज्याच्या फिरतपट्टीजवळ असलेल्या फटीत घालून 'पंच' केल्यावर फिरतपट्टी उघडली गेली व आम्ही स्टेशनात प्रवेश केला. थोड्याच वेळात गाडी आली. तिच्या सर्वात पुढल्या डब्यात आम्ही चढलो. ठराविक वेळ थांबून गाडीचे डबे आपोआप लागले आणि गाडी सुरू झाली. गाडी चालविणारा कोणीही सारथी नव्हता मात्र एक निग्रो त्या बारक्या केबिनमध्ये बाजूला उभा होता. ती स्वयंचलित गाडी थोडावेळ इमारतीच्या समांतर अथवा माथ्यावर उंचावरून जात होती ती हळूहळू खाली खाली जाऊ लागली आणि ताशी १०० मैलाच्या वेगानं सात मैल लांबीच्या खाडीच्या खालच्या बोगद्यांतून जाऊन सान्फ्रान्सिस्कोच्या एका स्टेशनात जाऊन उभी राहिली. पुन्हा तिकीट पंच करून आम्ही बाहेर पडलो तेव्हा त्या कार्डावर ९० सेंट वजा होऊन ९० सेंट बाकी दाखविलेली होती. परत येताना पुन्हा कार्ड पंच करून आम्ही स्टेशनात आलो व गाडी पकडून आमच्या मुक्कामाच्या स्टेशनबाहेर पडताना कार्ड पंच केल्यावर ते गायब झालं, कारण त्यावरील पैसे संपले होते. जरी ५ सेंट जास्त भरलले असते तरी ते कार्ड परत बाहेर आपल्या हातात आले असते. पूर्ण पैशाचे तिकीट न घेता कोणी बाहेर पडण्याचा प्रयत्न करील तर ती फिरत पट्टी त्याला जाऊ देत नाही. जेवढे कमी पैसे असतील तेवढे टाकून कार्ड पुन्हा पंच करूनच त्याला गेटमधून बाहेर पडता येते. कॉम्प्युटरच्या सहाय्यानं संपूर्णतः माणसाशिवाय उतारूंची ये जा व गाड्यांचं नियंत्रण ही अजब गोष्ट आपल्या कल्पनाशक्तीच्या आटोक्याबाहेरची आहे. अमेरिकेच्या पराकोटीला पोहोचलेल्या विज्ञान प्रगतीची ही पावती म्हणावी लागेल. दुसऱ्या वेळी आणखी एक अनुभव घेतला. तिकीट घेण्याकरता नोट आंत सरकवावयाची तीही नोटेच्या दर्शनी बाजूकडूनच केली पाहिजे. अन्यथा नोट परत बाहेर फेकली जाते. तसेच फार जुनी नोट आत खेचली जात नाही ह्याचाही आम्ही अनुभव घेतला.

जपानमध्ये ह्यापेक्षा जलदगती धावणाऱ्या गाड्या आहेत पण ह्या 'बार्ट' ट्रेनची गंमत काही औरच.

# ‘टॉवरिंग इन्फर्नो’ मधील हॉटेल

येथून आम्ही एका बँकेच्या ९२ व्या मजल्यावर गेलो. तेथून दुर्बिणीच्या सहाय्यानं सभोवतालचा भूप्रदेश पाहिला. तेथून ‘चायना टाऊन’ ला वळसा घालून आम्ही एका मोठ्या हॉटेलच्या इमारतीत शिरलो. त्या हॉटेलचे नाव ‘हॅट रीगल.’ तेथे एक बरं आहे, कोणी कोणाला विचारीत नाही, हटकीत नाही. तुम्ही खुशाल वाटेल तेवढा वेळ तेथे रेंगाळा, तुम्हांला कोणी आडकाठी करीत नाही. नाहीतर आपल्याकडे कामाशिवाय ‘ताजमहाल किंवा ओबेरॉय’ मध्ये उगाचच रेंगाळण्याची काय प्राज्ञा आहे. तेथला पठाण वस्सकन अंगावर येईल, ह्या भीतीनं मी अजून ताजमहालची किंवा ओबेरॉयची पायरी चढलेलो नाही. हॉटेलच्या गगनचुंबी टॉवर खालून प्रवेश केल्यावर आपण विजेरी जिन्यानं वर एका मोठ्या चौकात येतो. चौकाच्या एका बाजूचा टॉवर सोडून बाकीच्या तीन बाजूच्या इमारतीच्या बाल्कनी एकेक जिना पुढे आलेल्या आहेत. म्हणजे दुसऱ्या मजल्याची बाल्कनी पहिल्या मजल्याच्या बाल्कनीपेक्षा थोडी पुढे ह्याप्रमाणे वरच्या सर्व बाल्कन्या एकापुढे एक सरकत इमारतीच्या तिन्ही बाजूच्या बाल्कनी शेवटच्या मजल्यापर्यंत निमूळत्या होत होत एकमेकाला चिकटल्या सारख्या वाटतात व सबंध खालच्या चौकाला त्याचे छप्पर झाल्यासारखे वाटते. चौकात एका बाजूला एक मोठे उपाहारगृह आहे त्याची कक्षा इतर भागापासून रसरसलेल्या ताज्या फुलांच्या कुंड्यांनी निराळी केली आहे. प्रत्येक ऋतुत त्या त्या वेळची ताजी फुलं तेथे असतात असं म्हणतात. त्या कुंड्या फुलझाडांच्या नसून फुले घातलेल्या फुलदाण्या असतील तर एवढ्या मोठ्या फुलदाण्या आणि त्यात भरगच्च ताजी एकाच रंगाची फुले असलेल्या, इतरत्र कोठे पहावयास मिळणार नाहीत. चौकाच्या मध्यभागी एका संगमरवरी चौथऱ्यावर बसून आम्ही लोकांचं व त्या हॉटेलचं निरीक्षण करीत होतो. आमच्या समोरच इमारतीच्या तिसऱ्या बाजूला एक सुंदर कारंजं होतं. संगमरवरी दगडाच्या अष्टकोनी कोंदणात पाण्याचे फवारे उडून जे पाणी खालच्या चौकटीत पडत होते ते इतके नितळ, पारदर्शक व दगडाला चिकटून खाली पडत होते की जणू त्या कारंज्याला काचा बसविल्याचा भास व्हावा. निरनिराळ्या आकाराची कारंजी आपण सर्वत्र पहातो परंतु त्यातून खाली पडणाऱ्या पाण्याची गती एवढी नियंत्रित ठेवून त्यातून सौंदर्य निर्माण केलेले मी प्रथमच पहात होतो. टॉवरवर जाण्याकरता बाहेरच्या अंगानी विजेरी लांबट आकाराचे पारदर्शक पिंजरे खालीवर जात येत होते. त्यांचा वेग एवढा होता की काही सेकंदातच ते १०० मजले जात येत. हे पिंजरे उघड्यावरूनच जात असल्यामुळे आम्हांला आमच्या बसल्या जागेवरून ते खालीवर जाताना दिसत होते.

जाता जाता, अलिकडेच ‘टॉवरींग इन्फर्नो’ हा चित्रपट पाहिला. त्याचं

सर्व 'शूटींग' ह्या शहरात झालं आहे. ज्या टॉवरला आग लागते तोच तो 'हॅट रिगल' हॉटेलचा टॉवर व तेच ते विजेरी पिंजरे. ह्या चित्रपटात 'गोल्डन गेट ब्रीज' व शहराच्या इतर भागाचेही दर्शन होते.

आम्ही तासाहून अधिक वेळ तेथे घालवून आमची ट्रेन पकडण्याकरता स्टेशनची वाट धरली. येथील ट्रॅम मात्र जुन्या पद्धतीच्या आणि त्यात बसणारांची ही गर्दी. एवढ्या आधुनिक शहरात एवढी जुनी ट्रॅम विसंगत वाटली. बहुधा, सर्व लोक आपआपल्या मोटारीतून प्रवास करीत असल्यामुळे ट्रॅमचं आधुनिकीकरण करणं त्यांना आवश्यक वाटत नसावे. आता आतापर्यंत रेल्वेही तेथे नव्हती. परंतु अमेरिकेत, विशेषत: सान्फान्सिस्कोमध्ये गाडी पार्क करणं जिकिरीचं आणि खर्चाचं झाल्यामुळं ऑफिसला येणारे लोक गाडी घरीच ठेवून आता 'बार्ट' ह्या गाडीनं प्रवास करतात.

सानफ्रान्सिस्को शहर आणि त्याच्या परिसरातील अनेक प्रेक्षणीय स्थळं पाहावयाची राहून गेली होती, ती आम्ही दुसऱ्या वेळी पाहिली. त्यांतील फक्त दोनाचाच उल्लेख करतो. मरीन वर्ल्ड यु. एस. आफ्रिका आणि योझेमाईट नॅशनल पार्क. दोन्ही स्थळे संपूर्ण दिवस घालविल्याशिवाय पाहाता येत नाहीत. डिस्नेलॅन्डसारखेच मरीन शोचे विस्तीर्ण आवार आहे आणि त्यात नानाविध खेळ सबंध दिवस चालतात. व्हेल व डॉल्फिन माशाचा खेळ. त्यांचे इशाऱ्यावर उड्या मारणं, कसरतीचे प्रयोग करणे वगैरे. एक व्हेल मासा तर हत्तीएवढा प्रचंड होता आणि महाभयंकर होता. त्याच्याजवळ जाण्याची कोणाची प्राज्ञा नव्हती, एवढा तो खवळून अंगावर धावून येत होता. असंख्य जातीचे आणि रंगाचे मासे, आणि बोटीतून सफर करताना दोन्ही किनाऱ्यावर इतस्तत: विहार करणारे पाणघोडे, माकडे, हत्ती, उंट, घोडे, जिराफ आणि आफ्रिकेतल्या जंगलातील विविध पशुपक्षी व हिंस्त्र वाघ, सिंह इत्यादी प्राणी भेटले. शिकवलेल्या पोपटांची आणि कुत्र्यांची कामे लाजबाब पहावयास मिळाली. तसेच त्यांचा पाण्यातील 'स्की' शो अत्यंत थरारक होता. एका ताशी १५० मैल वेगाने धावणाऱ्या बोटीच्या मागे दोरानं फरफटत पाण्यावरून ओढले जाणाऱ्या युव–युवती व त्यांची एवढ्या प्रचंड वेगमर्यादेत पाण्यावरच्या कसरती, तसेच तळ्याच्या मध्यभागी उंचच उंच उभ्या केलेल्या मंचावरून तेवढ्याच वेगानं उडी मारून पलिकडे जाण्याचे त्यांचे कसब डोळ्यांचं पारणं फेडणारं होतं.

## योझेमाईट पार्क

सानफ्रान्सिसकोपासून १८० मैल दूर योझेमाईट नॅशनल पार्क आहे. आम्ही सकाळीच निघालो. वाटेत कॅलिफोर्नियाच्या सुप्रसिद्ध फळांच्या बागा दुतर्फा लागतात. दर १०।२० मैलांवर गावाच्या ठिकाणी फळाफुलांचे ढीग अगदी स्वस्त किमतीत विकण्यास ठेवलेले असतात. अशा निसर्गरम्य वाटेनंतर चढ सुरू होतो.

आणि डोंगरांची वळणं घेत घेत गाडी योझेमाईट पार्कच्या वेशीवर येते. तेथून पुढे ४० मैल पार्क पसरला आहे. दुतर्फा उंचचउंच झाडं आणि खाली मखमली हिरवेगार गालिचे. पण येथें मुख्य पहावयाचे ते उंचचउंच पांढरे पहाड व त्यावरून खाली कोसळणारे धबधबे. काही पहाड तर २००० फुटांहून उंच आहेत, एकसंधी एकच एक प्रचंड पांढरा दगड, ना त्यावर कोठे हिरवळ ना झाडं. निसर्गाची ही किमया अवर्णनीय आहे. आम्ही गेलो तेव्हा झरे आटल्यामुळे धबधबे फारसे दिसले नाहीत. साऱ्या जगाचे प्रवासी तेथे लोटले होते. त्यांना दुपारचे भोजन करण्याकरता ठीक-ठिकाणी चुली व बसण्यास बाके ठेवलेली आहेत. व पिण्याच्या पाण्याची ठिकठिकाणी सोय आहे. नागमोडी वळणं घेत व चढउतार करीत आम्ही अनेक पॉइंट बघितले. आणि तृप्त होऊन संध्याकाळी परतीचा रस्ता धरला. घरी परतल्यावर फार रात्र होईल म्हणून अर्ध्या वाटेवर आम्ही रात्रीचे भोजन उरकून घेतले. एका मोठ्या हॉटेलात इटालियन ' पिझा ' आणि सालड व त्याबरोबर आंबटगोड, तिखट सॉस, एवढा मस्त होता की त्याची चव अजून जिभेवर रेंगाळत आहे. अन्यत्र एवढा चांगला ' पिझा ' पुन्हा खाण्यास मिळाला नाही. एका दिवसात ५०० हून अधिक मैल प्रवास झाला पण थकवा मुळीच आला नाही.

सानफ्रान्सिसकोचा निरोप घेण्यापूर्वी मनोहर आपटे ह्याच्या नवीन घराचा उल्लेख करणं आवश्यक आहे. आधी आलेले वर्णन त्यांच्या जुन्या घराचं आहे. आता त्यानं ऑकलंड सोडून मोरेगा ह्या जवळच असलेल्या एका खेडेवजा शहरात १ लाख साठ हजार डॉलर्सला एक अलिशान घर घेतले आहे. येथे फक्त हजार-बाराशे बड्या लोकांचे बंगले आहेत. आणि त्यांनी त्यांच्या पुरतेच ते गाव सीमित केले आहे. दोन बँका, एक पोस्ट ऑफिस, दोन पेट्रोल पंप, दोन मोठे स्टोअर्स, एक चर्च बस्स ! शाळा त्यांच्यापुरतीच, उत्तम शिक्षक असलेली, पोहण्याचा तलाव व त्याला जोडून बगिचा, त्यांच्याकरताच फक्त. मैलावर एक निविड अरण्य व डोंगर. इतर, विशेषत: काळ्यांना ते तेथे येऊ देत नाहीत, एवढेच काय, स्टेट हायवे त्यांच्या गावातून नेण्याची योजनाही त्यांनी फेटाळून लावली, कारण रस्त्याबरोबरच बजबजपुरी माजेल ही भिती.

## ' घरकाम ' करणारी तरुणी

अशा त्यांच्या ' सुरक्षित' घरी आम्ही बारा दिवस राहिलो. आणि त्या शांत आगळ्या गावातून मुक्त फिरलो. त्याच्या मुलांना सकाळी आईवडील आपल्या-बरोबर घेऊन जातात व शाळेत सोडतात. परंतु दुपारी ३ वाजता त्यांना शाळेतून आणण्यास त्यांनी एक मुलगी ठेवली आहे. ख्रिस्तीना तिचं नाव. ती आपल्या आईच्या गाडीतून मुलांना शाळेतून परत आणी, आणि ताबडतोब स्वयंपाकघर आवरण्यास घेई. मुलं आपलं खाणं घेऊन टी. व्ही. पुढे बसत अथवा अंगणात खेळण्यास जात.

तोपर्यंत ख्रिस्तीना धुलाई यंत्रातून कपडे धुवून टाकी व उरला वेळ स्वतः अभ्यास करीत कोचावर बसे. अथवा आमच्याशी गप्पा मारी. ती १७ वर्षांची असली तरी आपल्या २०।२१ वर्षांच्या मुलीएवढी आहे. ती एके दिवशी एक जवळ जवळ नवीन वाटणारी जपानी डाटसन गाडी घेऊन आली, तेव्हा मी विचारल्यावर तिने ती स्वतःच्या पैशातून घेतल्याचे सांगितले. कारण, आईची गाडी तिला हवी असते. ती १२ वी चा अभ्यास करीत आहे व त्यापुढील कॉलेज शिक्षण ती स्वतःच्या पैशातूनच करणार आहे. तिला सुमारे मासिक रु. ५००० ह्या 'बेबी सिटींग' बद्दल मिळतात. आम्ही आमचा मुक्काम हलविण्याच्या आदल्या दिवशी तिचा निरोप घेतला कारण जाण्याच्या दिवशी ती भेटणार नव्हती. ती म्हणाली मला माहीत आहे, 'उद्या आपली भेट होणार नाही.' म्हणून मी आज कॅमेरा घेऊन आले आहे. चला मी तुमचे फोटो घेते आणि तुमचा प्रवास सुखाचा होवो अशी आशा व्यक्त करते.' तिने आमचे, तिच्या गाडीजवळ उभं राहून फोटो घेतले. आणि आमचा निरोप घेतला. ती गुलाबी गोरी, तारुण्यानं मुसमुसलेली अदबशीर बोलणारी आणि वागणारी ख्रिस्तीना 'माणसाच्या शोधात' असलेल्या आम्हा दोघांच्या आठवणीत कायम राहील.

आता कॅलिफोर्निया हा सर्वांगसुंदर, अत्याधुनिक व संपन्न भाग यथासांग पाहून झाला होता. दहा दिवस एकाच ठिकाणी रहाणं झालं होतं त्यामुळे प्रवास करण्याची गती मंदावली होती. पुन्हा रुक्ष प्रदेशातून बसनं २५०० मैल प्रवास करणं जिवावर आलं होतं म्हणून बसचा पास असूनही मी विमानाचे १२० डॉलर्सचे तिकीट काढून शिकागोच्या विमानात बसलो. शहराचा विमानतळ एवढा मोठा आहे की मी ज्या गेटनं विमानात प्रवेश केला त्याचा नंबर ४६ सी होता. रात्री ११ वाजता अमेरिकन एअरलाईन्सचे ७३७ जातीच्या जेट विमानानं तळ सोडला आणि सकाळी ५-२० वाजता शिकागोच्या, त्याहीपेक्षा मोठ्या विमानतळावर येऊन पोहोचलो.

## शिकागो विमानतळावर प्रतीक्षा

माझ्या ओळखीचे डॉ. गोडबोले आधी फोन केल्याप्रमाण मला उतरवून घेण्यास येणार होते. परंतु ते रात्री हॉस्पिटल ड्यूटी असल्यामुळे दोन तास उशीरा म्हणजे ७॥ ते ८ वाजेपर्यंत येणार होते. मी खरं तर त्यांच्याकडे जाण्यास फारसा उत्सुक नव्हतो, कारण फोनवर माझ्या मराठी प्रश्नांना ते सर्रास इंग्रजीत उत्तर देत होते हे एक आणि त्यांची पत्नी अमेरिकन असल्यामुळे माझ्यासारख्या 'भटा' चा तेथे कसा निभाव लागेल ह्याबद्दल मी साशंक होतो. परंतु माझ्या धाकट्या भावाची मेहुणी, डॉ. शिवदे हिने आयत्या वेळी आदल्या दिवशी संध्याकाळी

आपल्या गाडीचे ट्रॅफिक सिग्नलस् विघडल्यामुळे विमानतळापर्यंत ४० मैल लांब गाडी आणणं शक्य नसल्यामुळे ती येऊ शकत नसल्याचे कळविल्यामुळे शेवटच्या क्षणाला मी डॉ. गोडबोले ह्यांना फोन केला होता.

मी माझ्या बॅगेचा ताबा घेऊन जवळच एका बाकावर येऊन बसलो. आता दोन तास मार्गप्रतीक्षा करण्यावाचून उपाय नव्हता. थोड्याच वेळात सर्व प्रवासी निघून गेले आणि तेथे नावालाही कोणी चिटपाखरू उरले नाही. पहाटेची थंडी सुटाच्या आतूनही अंगाला झोंबत होती. चहाचं हॉटेल वरच्या मजल्यावर होतं पण सामान घेऊन जाणं जिवावर आलं. म्हणून तेथेच 'घटका गेली, पळे गेली तास वाजे ठणाणा' म्हणत गडकऱ्यांच्या धुंडीराजासारखा बाकावर, नसलेलं उपरणं गुडघ्याला गुंडाळून, पलाठी मारून बसलो. मात्र मला कोणी घनश्याम भेटला नाही हे माझे नशीब ! थोड्या वेळानं पुन्हा वर्दळ सुरू झाली. झाडूवाले हातगाडीवर आपली आयुधं टाकून झाडू मारू लागले. काऊंटर पुसणारे व दप्तर नीटनेटके ठेवणारे येऊन आपआपली कामे करू लागले. त्यानंतर आल्या ठमाबाई, उमाबाई. आल्या आल्या त्या 'वेणीफणी' करू लागल्या. मग 'लिपस्टीक, रुज व भिवया कोरणं झालं, मग पर्स मधून सिगरेटी काढून त्या त्यांनी शिलगावल्या. सिगरेटच्या धुरात गप्पा झाल्यावर मग ठीक सात वाजता त्या कामाला लागल्या. त्यानंतर मात्र मी त्यांना उगाच रेंगाळताना पाहिले नाही. आता साडेसात वाजून गेले होते. डॉ. गोडबोले कोणत्याही क्षणाला येतील म्हणून मी चौफेर नजर फिरवीत होतो. पण आता गर्दी वाढत होती. त्यातच आता एकामागून एक विमाने येऊ लागली होती व त्यांचे प्रवासी तेथेच आपल्या बॅगा घेण्याकरता जमत होते. आठ वाजले तरीही डॉक्टरांचा पत्ता नव्हता. स्वत:ची गाडी घेऊन येणारा, प्रवाशांना येथेच घेण्यास येतो ह्याची खात्री करून घेतली. नाहीतर एवढ्या मोठ्या विमानतळावर चुकामूक होण्याचा संभव. साडेआठ वाजले तेव्हा मी साशंक झालो, आता बहुधा डॉक्टर येत नाहीत. आणि आता त्यांना किंवा शिवदेबाईंनाही फोन करण्यातही मतलब नव्हता, कारण एव्हाना ते हॉस्पिटलमध्ये निघूनही गेलेले असतील. आणखी थोडावेळ वाट पहावी, नाहीतर येथूनच पुढे डेट्रॉईटला फोर्डचा कारखाना पहाण्यास निघून जावे, नाहीतरी शिकागोमध्ये असं काय आपलं पुरून ठेवलं आहे असा एक भेकड विचार मनात डोकावून गेला. एक हिंदी भाईसारखा दिसणाऱ्या माणसापाठीमागे जाऊन मी हळूच 'डॉ. गोडबोले' म्हणून ओरडून पाहिले पण त्याने मागे वळूनही पाहिले नाही ! दुसऱ्या एकाला नक्की ते हेचं समजून असाच हटकला. पण तो बेटा स्पॅनिश निघाला. स्पॅनिश आणि भारतीय माणसात पुष्कळ साम्य आहे. म्हणून माझा घोटाळा झाला. नऊ वाजून गेले आणि मी डॉक्टरांचा नाद सोडून दिला आणि डेट्रॉईटकडे जाणारी बस कोठे मिळेल ह्याचा विचार करू लागलो. तेवढ्यात एक ठेंगणा 'टी' शर्ट घातलेला तरतरीत, नाकेला गृहस्थ

लगबगीनं माझ्या अंगावरून सरळ विजेरी जिन्याकडे धावला आणि तितक्याच लगबगीनं दुसऱ्या जिन्याने खाली येऊन बाहेर पडणार तेवढ्यात मी ओरडलो 'डॉ गोडबोले !'

ह्यावेळी ते डॉ. गोडबोलेच होते. त्यांनी घाईघाईनं माझ्या बॅगा उचलल्या व धावत जाऊन गाडीत टाकल्या व मला शेजारी बसवून तेथील पोलिसाला थँक्यू म्हणून गाडी भरधाव सोडली. त्यांना उशीर झाला होता व गाडी पार्कींग लॉट-मध्ये ठेवण्यास वेळ नव्हता म्हणून पोलिसाच्या मेहरबानीनं त्यांना दोन मिनिटे गाडी रस्त्यावर ठेवण्यास परवानगी मिळाली होती. पण पोलिसानं निक्षून सांगि-तलं होतं 'फक्त दोन मिनिटं, एकही मिनिट जास्त नाही' (Just two minutes & not a minute more ') म्हणून त्यांनी मला दोन मिनिटांत 'उचलले' होते!

वाटेत जाताना आपणास एक अर्जंट केस बघण्यास जावे लागल्यामुळे उशीर झाला असा खुलासा करून त्यांनी दिलगिरी व्यक्त केली. वाटेतच त्यांना ९। वाजताची आणखी एक अपाईंटमेंट होती ती उरकून घेतल्यास पुन्हा १५–२० मैल परत ह्या बाजूस यावयास नको व नंतर सबंध दिवस दुसरे काही काम नसल्याचे सांगून त्यांनी माझी संमती मागितली. एवीतेवी खूप उशीर झालाच होता त्यात आणखी थोडी भर. 'चालेल' असं म्हणून मी त्यांना आपले काम आटोपून घेण्यास सांगितले. त्यांची अपाईंटमेंट दुसऱ्या एका डॉक्टरकडे होती. आम्ही त्याच्या बंगल्याच्या आवारात गेलो तेव्हा ९ वाजले होते. म्हणून गाडी लांब उभी करून आम्ही बसून राहिलो. ठीक ९। वाजता ते वृद्ध डॉक्टर एका म्हाताऱ्या बाईला पोहोचविण्यास बाहेर आले आणि त्यांनी डॉ. गोडबोले ह्यांना आत बोलवून घेतले. तेथून अर्ध्या तासाने ते बाहेर आले व आम्ही डॉ. गोडबोले ह्यांच्या घरी पोहोचलो तेव्हा ११ वाजून गेले होते.

## अमेरिकन सासूबाई

डॉ. गोडबोले ह्यांचा बंगला इतर सुखवस्तू भारतीयांच्या बंगल्यासारखाच प्रशस्त होता. त्यांनी मला ब्रेकफास्ट विचारल्यावर मी त्यांना फक्त किटलीभर चहा द्या सांगितले. पहाटेपासून थंडीत कुडकुडत मी चहाशिवाय वेळ काढला होता. त्यांच्या अमेरिकन सासूबाईंनी लागलीच चहा व बिस्किटे माझ्यापुढे आणून ठेवली. तेवढ्यात सौ. गोडबोले टेनिस खेळून आल्या सर्वांचे परिचय सोपस्कार झाल्यावर मी प्रातर्विधी स्नान करून घेतले तोपर्यंत दुपारचे १२ वाजले होते. डॉ. गोडबोले ह्यांनी बाहेर भारतीय हॉटेलमध्येच जेवण करू या असे सुचविल्यामुळे आम्ही बाहेर पडलो. तेथील गोडार्ड ह्या भारतीय हॉटेलात प्रथम ड्रिंक्स घेऊन आम्ही तंदूरी चिकनवर हात मारला. सौ. गोडबोले ह्यांनी मात्र पुरी भाजी खाल्ली. त्यांना भारतीय पदार्थात पुरी भाजी फार आवडते असं त्या म्हणाल्या.

# शिकागो-सरोवरांचे शहर

भोजन करून आम्ही शिकागोची सफर करण्यास निघालो. दुपारी एक वाजल्यापासून संध्याकाळी सहा वाजेपर्यंत त्यांनी एवढे दाखविले की एरवी चार दिवसांतही पाहून झाले नसते. प्रथम आम्ही शहराच्या गजबजलेल्या भागातून हिंडलो. अमेरिकेच्या कोणत्याही मोठ्या शहरातील गगनचुंबी इमारतींप्रमाणे इमारती, सिनेमा थिएटरे, नाट्यगृहे असल्यामुळे मला त्याचे अप्रुप वाटले नाही. नंतर आम्ही शहराच्या बाहेरच्या अंगाला गेलो. प्रथम कॉर्पोरेशनची एक आर्ट म्युझियम व लायब्ररी पाहिली. स्वामी विवेकानंदांनी ज्या ठिकाणी आपले पहिले भाषण करून जगाला थक्क करून टाकले ते ह्या म्युझियममध्ये दिलेल्या भाषणाने म्हणून त्याचं महत्त्व. त्यानंतर अनेक सरकारी इमारती बघत आम्ही मिशीगन सरोवरावर पोहोचलो. त्याची लांबी ११० मैल आणि रुंदी ५६ मैल आहे. खरंतर तो एक समुद्रच आहे. फक्त त्याचे पाणी गोडं आहे आणि त्याला समुद्रासारखी भरती ओहटी नसल्यामुळे सरोवराच्या पात्रापर्यंत हिरवीगार हिरवळ आहे आणि पाण्याला चिकटून घरे आहेत. अमेरिकेत अशी मोठी सरोवरे अनेक आहेत. त्यात लेक सुपीरियर हे सर्वात मोठे. ही सर्व सरोवरे एकमेकाला कालवे खणून जोडली गेलेली आहेत आणि त्यातून मोठाल्या बोटी जाऊ शकतात. पॅसिफिक महासागरातून अटलांटिक महासागरात जाण्याकरता मोठ्या बोटींना ह्या सरोवरातून आरपार जाता येते. मात्र ह्या सर्व सरोवरांची पाण्याची उंची सारखी नाही. लेक सुपीरियरची उंची मिशीगन सरोवरापेक्षा जास्त असल्यामुळे त्यांना जोडणाऱ्या कालव्यावर बंधारे आहेत व उघडझापेच्या दरवाजाने ती एकमेकांपासून अलग ठेवली आहेत. ते दरवाजे काढून टाकले तर एका दिवसात शिकागोचं 'पानशेत' होईल. ह्या सरोवरामुळे ह्या शहराला आगळं सौंदर्य लाभलं आहे. ठिकठिकाणी बोटक्लब आहेत आणि लोक बोटी घेऊन सहल करीत असतात, मासे पकडीत असतात व निरनिराळ्या प्रकारचे पाण्यातले खेळ करीत असतात. काही लोकांच्या स्वतःच्या लॉन्चेस आहेत त्या येथे सांभाळण्याकरता 'गराज' आहेत. हिवाळ्यात बर्फ पडल्यावर त्या बाहेर काढून सुरक्षित जागी ठेवल्या जातात. तसेच येथे स्वतःची विमाने व हेलिकॉप्टर चालविणाऱ्याकरता एक छोटा विमानतळ आहे. श्रीमंत लोक लांबून विमाने, अथवा हेलिकॉप्टरमधून येथे येतात व मोटारी घेऊन शहरात कामाला जातात. शिकागोमध्ये स्वामी विवेकानंदांचे स्मारक मंदिर व आश्रम आहे. तेथे व्याख्याने प्रवचने चालतात पण ती वास्तू पहाण्यास मला मिळाली नाही. त्यानंतर आम्ही सीअर्स टॉवर ही सर्वांत मोठी इमारत पहाण्यास गेलो. ती १०८ मजली आहे असं म्हणतात. आम्ही मात्र त्याच्या १०२ व्या मजल्यापर्यंतच गेलो व तेथील ऑब्झर्व्हेटरी पाहिली. तेथे ठेवलेल्या दुर्बिणीतून सुमारे ५० मैलांपलिकडचा भूप्रदेश

दिसतो. मिशीगन सरोवराच्या ५६ मैलांपलीकडील घरं आम्ही पाहू शकलो. शिकागो हे अफाट पसरलेले शहर आहे. त्याची ८० उपनगरे आहेत. ज्याला 'फ्रीवे' म्हणतात ते हमरस्ते एका रेषेत लांबवर गेलेले आहेत आणि त्यांनी ही उपनगरे मुख्य शहराला जोडलेली आहेत. ह्या सीयर्स टॉवरवरून खाली कारपार्क मधील गाड्या आगपेटया एवढ्या लहान दिसतात आणि एका समूहात ठेवलेल्या असल्यामुळे त्या खेळण्यातील मोटारीसारख्या वाटतात. मोठमोठ्या इमारती ह्या टॉवरपुढे ठेंगण्या वाटतात. त्यांच्या सर्वात वरच्या मजल्यावर पोहोण्याचे तलाव आहेत. आणि त्यात पोहणारी माणसं ठिपक्या एवढी लहान वाटतात. ह्या टॉवरच्याच शेजारी कॉम्प्युटरची मुख्य कचेरी आहे. त्यात अणू संशोधनात वापरण्यात येणारे कॉम्प्युटर आहेत. ही इमारत बॉम्बहल्यापासून अथवा वादळवारा, भूकंपाचे धक्क्यांपासून संरक्षीत आहे. अशी ही सुमारे १०० मैलांची सफर करून आम्ही संध्याकाळी ६ वाजता घरी परतलो.

## कोकणकन्या पण अमेरिकन

डॉ. गोडबोले नावाप्रमाणेच गोडबोले आहेत. त्यांच्याबद्दल माझा विनाकारण गैरसमज झाला होता. अनेक वर्षे येथे राहिल्यामुळे व घरात 'गोरीबाई' असल्यामुळे त्यांची मराठी बोलण्याची सवय सुटली आहे. परंतु आपला भारतीय माणूस भेटल्यावर त्यांच्यातील अस्सल इंदोरी अगत्य जागं झालं आणि त्यांनी माझी मनापासून सरबराई केली. त्यांची पत्नी, पोरगेलीशी, निळ्या डोळ्यांची चुणचुणीत वाटली. तिला नाकात बोलण्याची सवय आहे. सर्वच अमेरिकन लोक पुष्कळसे नाकात बोलतात. पण हिचं बोलणं जास्तच. ती जर मराठीत बोलती तर ती कोकणकन्या आताच राजापूराहून आली आहे असं वाटलं असतं. तीही डॉ. गोडबोल्यांप्रमाणे मनमिळाऊ आणि बोलकी होती व दोघेही मला आणखी राहण्याचा आग्रह करीत होते. तिची आई मात्र एकदाच बाहेर आली. जावयापुढे सासूबाई फारशी पुढे येत नाही ही भारतीय रुढी अमेरिकेतही आहे तर! संध्याकाळी माझ्या नात्यातील डॉ. पिनाकिनी शिवदे हिचा भाऊ अशोक शिवदे व त्यांची पत्नी डॉ. गोडबोले ह्यांच्याकडे आले. त्यांच्या समवेत ड्रिंक्स घेऊन मी गोडबोले कुटुंबाचा निरोप घेतला.

## एक भारतीय बालरोग तज्ज्ञ डॉ. पिनाकिनी शिवदे

खरं तर आता शिकागो शहरात पाहण्यासारखं काही राहून गेलं नव्हतं. परंतु डॉ. पिनाकिनी शिवदेकडे एक दिवस तरी राहणे अगत्याचे होते. तिचं घर ४० मैलांवर एका उपनगरात आहे. अपार्टमेंट हॉस्पिटलच्या आवारातच असल्यामुळे एक पाय घरी आणि एक पाय हॉस्पिटलमध्ये अशी तिची दिवसरात्र धावपळ

चालू असते. वालकांच्या जन्मजात रोगाची ती तज्ज्ञ आहे. अपुऱ्या दिवसात बाळंत झालेल्या पौंड दीड पौंड वजनाचं मूल वाचविण्यात तिला यश आलं आहे. आणि डॉ. ख्रिस्त कम्युनिटी हॉस्पिटल, जेथे ती काम करते, ते सवंध अमेरिकेत नावा-रुपाला येण्यास तिचा सिंहाचा वाटा आहे. तिचे तीन शयनगृह असलेलं मोठं अपार्टमेंट आहे. प्रत्येक शयनगृहात टी. व्ही. आहे आणि सर्व सुख साधनांनी घर भरलेले आहे. मात्र त्याचा उपभोग घेण्यास तिला सवड नाही. तिचे यजमान काही व्हिसासंबंधी तांत्रिक अडचणीमुळे गेले वर्षभर भारतात अडकून पडले आहेत म्हणून त्यांच्या तीन वर्षांच्या मुलीला सबंध दिवस 'बेबीसिटर' च्या स्वाधीन करावे लागते. तिचा मोठा भाऊ फेलोशीप घेऊन दोन वर्षांकरता येथे आला आहे. त्याची पत्नी काहीवेळ ह्या मुलीला सांभाळते. मिसेस शिवदेनं आता स्वतःची प्रॅक्टीस सुरू करून खूप नाव मिळविले आहे.

संध्याकाळी तिनं स्वतः गाडीचे सिग्नल ठीक नसतानाही मला ४० मैल गाडी चालवून बस स्टँडवर आणून सोडले आणि मी कॅनडाच्या दिशेनं मार्गस्थ झालो.

## कॅनडात प्रवेश

रात्री केव्हातरी आम्ही अमेरिकेच्या हद्दीवर आलो आणि कॅनडात प्रवेश करताना कस्टम अधिकाऱ्यांनी कसून झडती घेतली. इमिग्रेशन ऑफिसमध्ये जाऊन कार्ड घेण्यास लावले. परंतु माझा 'मल्टीपल व्हिसा' असल्यामुळे काही अडचण आली नाही. अमेरिकेचा व्हिसा घेणारांनी कॅनडातही चालणारा मल्टीपल व्हिसा घेणे अगत्याचे आहे, कारण त्याचेअभावी एकदा अमेरिकेची हद्द सोडली की पुन्हा परत येण्यास अडचणी येतात. सामान्य व्हिसा असला तर फक्त एकदाच जा ये करता येते पण 'मल्टीपल व्हिसा' असला तर वाटेल तेवढ्या फेऱ्या करता येतात. मात्र त्या वेळी कॅनडाच्या इमिग्रेशनकडून आपणास जेवढे दिवस राहावयाचे असेल तेवढ्या मुदतीचे कार्ड मागून घेणे आवश्यक आहे. अमेरिकेची हद्द एक मोठी खाडी पार केल्यावर संपते. खाडीखालून मोटारी जाण्याकरता बोगदा आहे. त्या बोगद्याच्या टोकाला कॅनेडियन चेकनाका व इमिग्रेशन ऑफिस आहे. आजकाल अमेरिका व कॅनेडामध्ये तेलाच्या किंमतीवरून तणाव असल्यामुळे जाता येता दोन्ही वेळा कॅनेडियन हद्दीवर प्रवाशांची कसून तपासणी होते. ह्या कारणाकरता माझे कॅनडाचे मित्र आपली गाडी कॅनेडीयन हद्दीत आणण्यास नाखूष होते. रात्रीची एक्स्प्रेस बस आवश्यक तेवढेच स्टॉप घेते. मध्यरात्री विश्रांती घेण्याकरता बस एका मोटेलजवळ थांबली, तेव्हा तेवढ्या रात्रीदेखील प्रवासी खाण्यावर तुटून पडलेले पाहून मला आश्चर्य वाटले. पाश्चात्त्य प्रवासी मिळेल तेथे आणि हवं तेवढं पोटभर रात्री बेरात्रीसुद्धा खात असतात. त्यांचेकडे बघूनच आपले पोट भरते

मला काही खावयाचे नसल्याने मी तेथेच हिरवळीवर येरझाऱ्या घालीत होतो, परंतु रात्रीची थंडी व गार वारा सुटला असल्यामुळे मला बसमध्ये परत येऊन गप्प बसण्याशिवाय दुसरा उपाय नव्हता. शहरांमागून शहरं मागे टाकीत बस भरधांव जात होती. पहाटेस एक मोठे शहर लागले. दिव्यांच्या झगमगाटात ते फारच मोठे आणि सुंदर भासले. त्याचे नाव 'लंडन' इंग्लंडमधील पुष्कळशा शहरांची नावे येथील शहरांना आहेत. कारण, येथील मूळ लोक इंग्लंडमधून येऊन येथे स्थायिक झालेले आहेत.

## टोरोंटो– पुणेरी टांगेवाल्याचा गोरा भाऊ !

पहाटेस ठीक ५–३० वाजता आमची बस टोरोंटो शहरात येऊन विराम पावली. माझ्या बॅगा घेऊन प्रथम उपहारगृहात गेलो व चहा घेतला तेव्हा डोळ्यांवरील झोप व थंडी पळाली. एवढ्या पहाटेस माझ्या मित्राला फोन करणे योग्य होणार नाही म्हणून दाढी, शौचमुखमार्जन करण्यात वेळ घालविला व नंतर माझा मित्र रहात असलेलं शहर ओकव्हीलची बस कोठे मिळेल त्याची चौकशी केली. 'रस्त्याच्या ठीक पलीकडे जा (Go right across the road, down there) असे एकाने सांगितल्यावरून बाहेर रस्त्यावर येऊन बघू लागलो तर मला काही कोठे दुसरा बस डेपो दिसेना. टॅक्सीवाल्याला विचारले तर त्याने गाडीचे दार उघडून आत बसा असे सांगितले.तेवढ्यात मला हवा असलेला बसडेपो दिसला ! येथेही पुणेरी टांगेवाले आहेत हे पाहून मला एक जुनी आठवण आली. पुण्यास प्रथमच आलो होतो व सदाशिव पेठेतील कोणत्यातरी एका हॉटेलात उतरलो होतो. संध्याकाळी बाहेर पडलो असताना मला ते हॉटेल काही सापडेना म्हणून टांगा केला. टांगेवाल्याने माझ्याकडे एकदा निरखून पाहिले. टांगा बऱ्याच गल्ली-बोळातून फिरविला आणि नंतर एका ठिकाणी उभा करून 'हे पहा तुमचे हॉटेल' म्हणून मला खाली उतरविले, तेव्हा मी टांगा केला त्याच मूळ जागी परत आलो होतो ! मला दोन रुपयाला गंडवणारा तो पुणेरी टांगेवाला एवढ्या वर्षानंतरही माझ्या चांगल्या आठवणीत आहे. आज त्याचाच गोरा भाऊ माझा 'मामा' करीत होता. येथून तेथून माणसं सारखीच हेच खरं.

माझा मित्र विजय देशपांडे ४० मैलांवर ओकव्हील येथे रहातो. सकाळी नोकरीवर लवकर जावे लागत असल्यामुळे आपणास एवढ्या दूर टोरोंटोला मला उतरवून घेण्यास येता येणार नाही असं त्यानं मला कळविलं होतं. मात्र तेथून 'गोगो' ट्रेन घेऊन युनियन स्टेशनवर उतरल्यावर तेथे मला घेण्यास त्याची पत्नी शोभा येईल असे त्याने सांगितले होते. समोरच बस मिळाल्यामुळे मी गोगोट्रेनच्या ऐवजी 'गोगो' बसने त्याचेकडे गेलो. गोगो म्हणजे गव्हर्नमेंट ऑफ ओन्टारियो. रेल्वे व बसेस सरकारी मालकीच्या असल्यामुळे त्यांना गोगो बस किंवा गोगो ट्रेन म्हणतात.

कॅनडा देश इंग्लंड अमेरिकेपेक्षाही थंड. येथे बारा महिने थंडी असते. पैकीसहा महिने बर्फाच्छादित थंडीचे असतात. सकाळची वेळ होती. त्यामुळे थंडी जास्तच जाणवत होती. थंडीमुळे येथील स्त्रीपुरुष गुलाबी गोरे असतात. आणि शरीरानंही जास्त सुदृढ वाटतात. ठीक दीड तासानं बस ओकव्हील शहरात आली मी बस डेपोजवळ वाट पहात उभा असेन व बस ठीक ८–३० वाजता तेथे पोहचेल' असे बसने निघण्यापूर्वी मी फोनवरून कळविले होते. त्यामुळे ड्रायव्हरने मला ज्या ठिकाणी उतरविले तेथेच रस्त्यावर शोभाची वाट पहात उभा राहिलो. मात्र तो बस डेपो नव्हता, बसस्टॉप होता. परंतु तेथे दुसरा बस डेपो नसल्यामुळे मला तेथेच थांबावे लागले.

## कॅनेडियन विठाबाई–ताराबाई !

मी ज्या ठिकाणी वाट पहात उभा होतो तो रस्त्यांचा 'तिकटा' होता. त्यामुळे चारी बाजूने येणाऱ्या जाणाऱ्या मोटारी मी न्याहाळीत होतो. एवढ्यात एक लाल नवी गाडी माझेजवळ येऊन उभी राहिली. त्यातून एक गोरापान देखणा गृहस्थ उतरला, 'गोखले' म्हणून त्याने मला हाक मारली आणि काही क्षणातच त्याने मला माझ्या सामानासकट 'उचलून' गाडीत बसविले. 'माझे नाव शास्त्री, मी विजय देशपांडे ह्यांचा मित्र. त्याला सकाळी लवकर ऑफिसला जावे लागत असल्यामुळे मित्रकार्य म्हणून मी तुम्हांस घेण्यास आलो आहे' अशी त्यानं आपली ओळख करून दिली. सुमारे १५ मिनिटे आमचे गाडीला घरापर्यंत येण्यास लागली, तेवढ्या वेळात त्याला विचारल्यावरून त्यानं सांगितले, 'आमचे आजोबा शास्त्रीबुवा, आमचे पिता शास्त्रीबुवा त्यामुळे आमचे घराण्यात संगीत वर्ज्य. मी मात्र लहानपणापासून इकडेच वाढलो. माझे लहानपणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत सर्व शिक्षण इंग्लंडमध्येच झाले. त्यानंतर आता कित्येक वर्षे कन्सल्टिंग इंजिनिअर म्हणून मी कॅनडात काम करीत असतो. माझ्या बायकोचे नाव विठाबाई आणि मुलीचे ताराबाई आहे.' शास्त्री खूप बोलके आणि विनोदी गृहस्थ वाटले. लहानपणापासून येथेच आयुष्य घालवूनही त्यांच्या बोलण्यात एकही इंग्रजी शब्द येत नव्हता ह्याचे मला अजूनही नवल वाटते. पुढे मला समजले की त्यांचे मूळ नाव जोशी आहे, त्यांची पत्नी अमेरिकन आहे, तिचं नाव व्हिटा आहे आणि मुलीचं नाव 'टेरा' त्यावरून शास्त्रींनी त्यांची नावे विठाबाई व ताराबाई ठेवली आहेत. मला देशपांड्यांच्या घरी सोडून शास्त्री जे गेले त्यांची पुन्हा भेट झाली नाही. तरी ती प्रसन्न विनोदी व्यक्ती माझ्या आठवणीत कायमची राहिली आहे.

## एकमेकांसाठीच फक्त !.

विजय देशपांडे यांच्या घराचे वर्णन करण्यात आता काही मतलब नाही. कारण, मी राहिलेल्या इतर सुखवस्तू मंडळींच्या घरासारखेच ते प्रशस्त होते, सर्व सुखसोयींनी भरलेले होते. विजय देशपांडे मूळचे इंदोरचे. परंतु त्यांचे बहुतेक आयुष्य इंग्लंड अमेरिकेतच गेलेले आहे त्यामुळे चाळीशीच्या अथवा त्याचेही पुढे वय

असूनही ते तिशीचे तरुण वाटतात. त्यांची पत्नी शोभा, त्यांना अनुरूप, उंच, देखणी आणि विलक्षण तेजस्वी डोळ्यांची. त्यांना एकच अपत्य आहे, तीन वर्षाचे. त्याचे नांव नवीन. आठनऊ वर्षांपूर्वी आमचे मुंबईचे विन्हाडी ह्या दोघांनी रात्री ११ वाजता आमचे दार ठोठावून आम्हास आश्चर्याचा धक्का दिला होता. विजय आपल्या नवपरिणीत पत्नीला घेऊन पाया पडण्याकरता आला होता. दोघेही उंच, सडपातळ, सुंदर, नखशिखांत सुंदर, उंची पोशाखात अधिकच सुंदर दिसत होते. त्या असाधारण जोडप्याकडे पाहून माझ्या तोंडून उदगार निघाला. 'एकमेकांकरताच विधात्यानं निर्माण केलेला जोडा' (Made for each other). अजूनही तेच लावण्य, तोच शरीराचा बांधेसूदपणा व ओसंडणारं तारुण्य आणि उत्साह पाहून मला वरील उद्‌गाराची पुन्हा आठवण आली. एक दिवस संध्याकाळी आम्ही ओकव्हीलपासून ५।६ मैलांच्या अंतरावर असलेली विजय देशपांडे ह्यांची इंजिनियरींग रिसर्च इन्स्टिटयूट पाहिली ह्या भाग संशोधन करणाऱ्या लॅबोरेटरीकरता राखून ठेवला आहे. येथे सर्व मोठ्या उद्योगधंद्यांच्या स्वतःच्या लॅबोरेटरीज आहेत. गुडीयरटायर, लिव्हर बंधू, सिन्थेटिक रबर, प्लॅस्टिक वगैरेची संशोधन केंद्रे आहेत. येथेच कॅनडाचे सुप्रसिद्ध अणु संशोधन केंद्र आहे. येथूनच आपल्या अणूभट्टयांना लागणारा युरेनियम आपणास मिळत असे. आता त्यांनी तो देण्याचे नाकारले आहे, हे जाहीर आहे. एकाच ठिकाणी सर्व संशोधन केंद्रे असल्याचे मी इतरत्र अमेरिकेत देखील पाहिले नाही.

येथून जवळच 'रिव्हर क्रेडिट पोर्ट' अथवा तत्सम नांव असलेली नदी आहे. दोनशे वर्षापूर्वी रेड इंडियन ह्या नदीच्या काठी बाजाराला येत व आपल्या चीजवस्तू गहाण ठेवून येथून मीठ मिरची घेऊन जात म्हणून ही नदी रिव्हर क्रेडिट पोर्ट ह्या नावानं ओळखली जाते.

मी कोणत्या चांगल्या मुहुर्तावर प्रवासाला सुरवात केली होती कोण जाणे. माझ्या कुंडलीतील सर्व शुभग्रह माझ्या पाठीशी शेवटपर्यंत राहून म्हणत असावेत, 'वत्सा तुझा जय असो'. कधी नव्हे ती विजयला तीन दिवसांची सुटी आली होती. ६ सप्टेंबर हा अमेरिका कॅनडामध्ये 'कामगार दिन' (लेबर डे) मानला जातो व त्यादिवशी सार्वत्रिक सुटी असते. ती सुटी ह्या वर्षी शनिवार रविवारला जोडून सोमवारी आल्यामुळे त्यांना तीन दिवसाची लांब सप्ताह सुटी' (Long weekend) मिळाली व ते तिन्ही दिवस त्यांनी माझ्याकरता राखून ठेवले होते. त्यामुळे जेवढे मी ८।१५ दिवस राहूनही पाहू शकलो नसतो तेवढे मी तीन दिवसात पाहिले.

माझं आणखी भाग्य असं की कॅनडातील वार्षिक 'जागतिक हवाई प्रदर्शन' (Air show) नेमका ह्या तीन दिवसात आला. तेव्हा पहिल्या दिवशी 'एअर शो' व जत्रा, दुसऱ्या दिवशी टोरोंटो शहराची सफर व त्यापलिकडे असलेल्या बेटावर

सहल व तिसऱ्या दिवशी नायगारा धबधबा असा आमचा कार्यक्रम ठरला.

## एअर शो

'एअर शो' ओकव्हील पासून ४० मैल टोरोंटोच्या उत्तरेला होणार होता. देशपांड्याचा शेजारी पॅट ह्यालाही जावयाचे होते. म्हणून पॅट व त्याची पत्नी व कन्या विजय व शोभा देशपांडे, त्यांचा मुलगा नवीन, व मी असे पॅटच्या मोठ्या स्टेशन वॅगनमधून सकाळी नऊ वाजता निघालो. दोन्ही गृहिणींनी खाण्याचे डबे, फळाच्या रसांचे डबे व पाण्याच्या बाटल्या घेतल्या होत्या. आम्ही एक तासानं, दहा वाजता तेथे पोहोचलो तेव्हा तेथील एक मोठे मैदान मोटारींनी पूर्ण भरून गेले होते. लाल डगले घातलेले पोलीस गाड्यांचे नियंत्रण करीत होते. एक मैदान पूर्ण भरल्यावर आता दुसऱ्या मैदानात गाड्या पार्क होत होत्या. किमान ५० हजार तरी गाड्या तेथे आल्या असाव्यात. पण कोठे वाहतूक खंडित होत नव्हती की पार्किंगची अडचण भासत नव्हती. सर्व रहदारी अत्यंत शिस्तबद्ध सुरळीत चालू होती. पूर्व नियोजित, किती गर्दी होईल ह्याचा अंदाज घेऊन वाहतूक नियंत्रण कसे करावे ह्याचा तो वास्तुपाठ मानावा लागेल.

ह्या इंटरनॅशनल 'एअर शो' ला आगळं महत्त्व आहे. कारण, देशोदेशींची अत्याधुनिक विमाने ह्यात चुरशीनं भाग घेतात. त्याची आधीपासून कित्येक दिवस जाहिरात होत असते. त्यामुळे सहज तीन चार लाख लोकांची गर्दी येथे उसळते. चारी बाजूनी भरभरून मोटारी येत होत्या व लोकांच्या झुंडीच्या झुंडी तिकीट घराकडे येत होत्या परंतु कोणालाही तिकीटाकरता फार वेळ रांगेत उभे राहावे लागत नव्हते. बाबा गाडीत घातलेली मुलं तेथील रक्षक स्वत: ढकलून आत नेत होते आणि त्यांच्या पालकांच्या नंतर हवाली करीत होते. कारण, बाबागाडी-प्रवेशद्वाराजवळच्या फिरकी चक्रीतून जाऊ शकत नाही म्हणून ही फुकट सोय येथे नेहमीच लहान मुलांबरोबर त्यांची बाबागाडी घेऊन जाण्याची पद्धत आहे. कारण, गाडी पार्क करण्याची जागा बहुधा लांब असते आणि जे पाहावयाचे असेल तेथेही पुष्कळ चालावे लागते. बसमध्ये सुद्धा बाबागाड्या ठेवण्याची स्वतंत्र सोय असते आणि लेकुरवाळ्या बाईला कंडक्टर स्वत: ती उतरवून उघडून देतो.

'शो' सुरू होण्यास अवकाश होता म्हणून आम्ही प्रथम हॅन्डीक्राफ्ट प्रदर्शन बघण्यास गेलो. तेथे देशोदेशींच्या हाती केलेल्या कलाकुसरीच्या वस्तू विक्रीस ठेवल्या होत्या. त्या प्रदर्शनाचे वैशिष्टय हे की तेथे नुसतीच विकण्याची दुकाने नव्हती तर प्रत्यक्ष ती वस्तू कशी तयार होते ह्याचे प्रात्यक्षिक करून दाखविलं जात होतं. लाकडाच्या निरनिराळ्या शोभिवंत वस्तू लेथ मशिनवर व हातानं करून दाखविल्या जात होत्या. हातविणीच्या नक्षीदार चादरी, गालिचे, रजया वगैरे प्रत्यक्ष

हातमागावर विणून दाखविण्यात येत होते. नानाविध कागदाची फुले, रंगीत कापडाची फुले, मातीची भांडी, फुलदाण्या मातीच्या गोळ्यातून व कुंभाराच्या चाकातून तयार होत होती. शिंपले, मोती, काचेचे मणी ह्यातून तयार होणारे दागिने, माळा आपल्या समक्ष करून दाखविल्या जात होत्या. देशोदेशींचे कलाकार आपलं कौशल्य पणाला लावून आपआपल्या देशाची शान वाढवीत होते. आपल्या-कडील हॅन्डीक्रॉफ्टची आपण एवढी ऐट मिरवितो परंतु अशा जागतिक प्रदर्शनात आपला स्टॉल नसावा ह्याचं वाईट वाटलं. मनात आणलं तर आपण ह्या दालनात नक्कीच मागे पडणार नाही. कदाचित सर्वाअधिक गुण मिळवू पण आपण लाल फीतीतच अडकून पडतो आणि जागे होतो तेव्हा उशीर झालेला असतो !

लोकांच्या झुंडीच्या झुंडी आता उजव्या हाताच्या एका पुलावरून पलिकडे जाऊ लागल्या. हवेत विमाने उडू लागल्याच्या नौबती तुताऱ्या गरजू लागल्या. म्हणून आम्हीही मुलं, पिशव्या, डबे, बाटल्या सांभाळीत पुलावरून खाडी पार करून पलिकडच्या मैदानात गेलो. ते मैदान म्हणण्यापेक्षा मखमली गालिचे घातलेली व अधूनमधून झाडं झुडपं असलेली टेकडी होती. त्याच्या चोहोबाजूंनी पाणी होतं. पाण्याच्या काठावर एक स्टेडियम होता. परंतु तो पूर्ण भरला होता. पाण्याच्या उतारापर्यंत स्त्रीपुरुषांनी सर्व टेकडी फुलून गेली होती. अंतरा अंतरावर ध्वनिक्षेपण यंत्रे होती. त्यातून माहिती सांगितली जात होती. शिवाय सबंध 'शो' ची कार्यक्रम-पत्रिका लोक विकत घेऊन उत्सुकतेनं विमानांची कवाईत पहात होते. आम्ही प्रथम पाण्याजवळ उतारावर बसलो होतो. तेथे बोटीला आग लागल्यावर ती कशी विमानाने व हेलिकॉप्टरच्या मदतीने विझवतात ते पाहिले. दोन बोटींना आग लागली होती. ती विझविण्याकरता प्रथम दोन विमाने त्यावरून घिरट्या घालू लागली व एकदम खाली येऊन त्यांनी त्या बोटीवर औषधी धुराचा मारा केला व ती निघून गेली. त्यानंतर उरलेली आग हेलिकॉप्टरनं प्रत्यक्ष पाणी मारून विझविली. हा प्रयोग झाल्यावर आम्ही तेथून टेकडीच्या दुसऱ्या उतारावर जाऊन बसलो. कारण, त्यानंतर एकामागून एक कानठळ्या बसविणारे आवाज करीत विमाने सुटू लागली. नाना आकाराची, नाना प्रकारानं उड्डाण करणाऱ्या विमा-नांनी आकाश भरून गेलं. एक जथा, समूहानं आकाशात जाणं, तेथे निरनिराळ्या कोलांट्या उड्या मारणं, निरनिराळे आकृतीबंध तयार करणं, धुराच्या सहाय्यानं आकाशात रांगोळी घालणं, आवाजापेक्षाही अधिक वेगानं जाणं (Supersonic) आकाशात सरळ ताठ उभं जाणं आणि तसेच अत्यंत वेगानं खाली येणं, अशी एक ना दोन अनेक प्रात्यक्षिके संध्याकाळी चार वाजेपर्यंत चालू होती. त्यात मला अत्यंत धाडसी, तितकेच मनोहारी प्रात्यक्षिक आवडले ते पॅराशूटमधून उडी मारणे. एका विमानांच्या ताफ्यातून एकाच वेळी व एकाच उंचीवरून शेकडो पॅराट्रूपर्सनी उड्या मारल्या व सर्व एकाच वेळी खाली आले. ते दृष्य, तसेच अतिशय उंचावरून,

चाळीस हजार फुटांवरून काही जण अंतराळातून तरंगत खाली आले, पुष्कळ खाली आल्यावर त्यांनी पॅराशूटस् उघडल्या व एका वर्तुळाकार जागेतच येऊन पडले. ते दृष्य थक्क करून टाकणारे होते. सात आठजणांपैकी चौघे त्या लहान वर्तुळात येऊन पडले. बाकीचे तिघे चौघे लोकांच्या डोक्यावर जाऊन आपटले. वेगानं जाणाऱ्या विमानांचा कर्णकठोर आवाज, त्याला हेलिकॉप्टरच्या धिम्या ठेक्याची साथ, लोकांचा कोलाहल आणि इतस्ततः फिरणाऱ्या लोकांच्या गोंगाटानं आसमंत भरून गेला होता. पाणी आणण्याकरता म्हणून मी एकदा वाट काढीत बऱ्याच अंतरावर गेलो. पण परत तेथेच येणं मुष्किल झालं, इतकी माणसं दाटीदाटीने बसली होती. त्या गोंगाटात कोठल्या देशांच्या विमानांनी कोणता पराक्रम केला ही ध्वनिक्षेपणामधून सांगितलेली माहिती आमच्या कानापर्यंत येऊंच शकली नाही. आवाजाचा व गर्दीचाही शीण येतो, ह्याचा ब्रॅबोर्न स्टॅडियमवर क्रिकेट मॅच पाहताना आलेला पूर्वीचा अनुभव येथेही आला.

'शो' संपण्यापूर्वीच थोडा वेळ आधी आम्ही चंबूगबाळं गुडाळून पुलावरून पुन्हा अलिकडे आलो. प्रथम सर्वांनी चहा घेतला आणि ह्या 'शो' चा दुसरा भाग जो 'जत्रा' ती पहाण्यास गर्दीत मिसळलो.

## भन्नाट जत्रा

ही 'जत्रा' येथे कायम स्वरुपात आहे. विजेचे आडवे, उभे, गोल फिरणारे असंख्य पाळणे, आकाशाला भिडणारा उंचच उंच चक्री पाळणा, वेडी वाकडी वळणं घेत खूप उंचावर जाणाऱ्या 'मोटारगाड्यां' करता, धाडशी लोकांकरता, बांधलेला मनोरा, लहान मुलांची आगगाडी, एकमेकाला टकरा देणाऱ्या विजेरी मोटारगाड्या, वर आकाशातून इकडून तिकडे दोरखंडावरून जाणारे विजेरी पाळणे, खेळण्यांची दुकाने, नेमबाजीचे जुगारी अड्डे अशा अगणित खेळांनी आणि दुकानांनी भरलेली ही 'जत्रा' हे जगातील एक मोठ्यात मोठे करमणूकीचे ठिकाण म्हणून मानले जाते. कॅनडात आलेला प्रवासी टोरोंटोची ही प्रख्यात जत्रा पाहिल्याशिवाय राहात नाही. नेमबाजीत जिंकून मिळविलेली खेळणी अजस्र होती. कोणी माणसाएवढे उंचीचे अस्वल, कोणी ससा, कोणी वाघ, सिंह वगलेत मारून बाजारातून मिरवीत जाताना व त्याची ते सांभाळत चालण्याची कसरत पाहून गंमत वाटत होती. अमेरिकन माणसाचा अतिभव्य सर्वश्रेष्ठ गोष्टी करण्याचा विचार येथेही दिसतो. एकदा मुलांकरता करमणुकीची साधने तयार करावयाची म्हटल्यावर जगात कोणी ह्यापेक्षा जास्त चांगली करणार नाही, एवढी मोठी ती करावयाची व जगाचे डोळे दिपवून टाकावयाचे ह्याची जणू स्पर्धा येथे चालते. या भन्नाट जत्रेत काय होत हे म्हणण्यापेक्षा काय नव्हतं असं विचारणं योग्य होईल. आम्ही रात्र पडेपर्यंत मनमुराद भटकलो. आणि वाटेत 'मॅक्डोनॉल्ड' ह्या सुप्रसिद्ध उपहारगृहात त्यांचे प्रख्यात 'सॅंडविचेस' कॉफी घेऊन परतलो.

ह्या निमित्तानं एका कॅनेडीयन कुटुंबाबरोबर फिरण्याचा योग आला. पॅट आणि त्याची पत्नी चेष्टा विनोद करण्यात आणि खाण्यापिण्यात आमच्यात सामावून गेली होती. त्यामुळे एक कुटुंबाप्रमाणे आम्ही दिवसभर एकत्र काढला. मात्र एक गोष्ट माझ्या नजरेतून सुटली नाही. पॅटनं गाडीचा पेट्रोलचा खर्च केला म्हणून देशपांडेंनी सर्वांची तिकीटे काढली व चहापाण्याचा खर्च केला. शेवटी मात्र 'मॅक्डोनॉल्ड' मध्ये ज्याचा त्याने खर्च केला. येथे एकमेकांच्या संगतीत ट्रीपला अथवा सर्कशीला जातात. पण ज्याचे त्याचे तिकीट जो तो काढतो. मुले एकटी गेली असल्यास त्यांच्या आया दुसऱ्या दिवशी खाण्यापिण्यासह तिकीटांचे पैसे देऊन हिशेब चुकता करतात. हे झाले परक्या माणसाबद्दल. त्यांची आपसातही काटेकोर देवाण घेवाण होते. दुसऱ्या दोन दिवस पॅटने आपल्या दुसऱ्या गाडीला गॅरेजपुढला रस्ता करण्याचे काम काढले, तेव्हा त्याचा सासरा व मेहुणा त्याला खोदकाम करण्यास मदत करण्यास आले होते. पॅटने सासऱ्याकरता आधी केलेल्या कामाची ती परतफेड होती. येथे रस्ता करण्यास, बागेचं पुनर्जीवन करण्याकरता मजूर मिळत नाहीत. म्हणून अशी एकमेकांची, मोठ्या कामात मदत घेऊन, त्याची कामे त्यालाच करावी लागतात.

दुसऱ्या दिवशी लवकर ब्रेकफास्ट करून आम्ही टोरोंटो शहर पहाण्यास गेलो. प्रथम आम्ही शहराच्या पलिकडे असलेल्या बेटावर बोटीने गेलो. येथे असलेल्या खाड्या सर्व गोड्या पाण्याच्या आहेत. सरोवरांचा तो एक भाग आहे. बेटावर प्रशस्त उद्यान आहे व पिकनीक करता सबंध दिवस घालविण्याकरता लोक येथे येतात. आम्ही तेथे पुष्कळ वेळ घालविला. हिरवळीवर बसून बरोबर आणलेल्या खाद्य-पदार्थांचा फडशा पाडला आणि नंतर आदल्या दिवशी पाहिलेल्या 'जत्रेप्रमाणे' दुसऱ्या, पण फक्त मुलांच्या करमणुकीकरता असलेल्या विभागाकडे गेलो. तेथे कॉम्प्युटरच्या सहाय्यानं चालणाऱ्या रूळावरील छोट्या मोटारीतून नवीन फिरून आला. रेलगाडीत बसून आला, आणखी एका स्वयंचलित मोटारीत मी त्याला घेऊन बसलो, कारण त्याला रूळ नव्हते. त्यानंतर एका होडीतून आम्ही सर्वजण मिळून एक रोमांचकारी विशेष अनुभव घेतला. होडी मुद्दाम बांधलेल्या दोन फळयांच्या पाण्याच्या प्रवाहातून जाते व पुढे सुमारे १०० फूट उंचीवर पोहोचते व तेथून एकदम खाली कोसळते. विजेरी जिने पाण्याखालून असल्यामुळे होडी एवढ्या उंच पाण्यातून जाऊ शकते व एकदम खाली येते. एक क्षणभर आपल्या छातीचे ठोके चुकतात पण होडी उलटी न होता पुन्हा चालू लागल्यावर आपला जीव भांड्यात नव्हे, त्या चौफेर उसळणाऱ्या पाण्यात पडतो! हे विलक्षण 'थ्रिल' अनुभवल्याशिवाय कळावयाचे नाही. तेथेही एकदम एक कुपन बुक विकत घ्यावे लागते व ठिकठिकाणी कुपने फाडून द्यावी लागतात.

त्यानंतर बोटीने आम्ही परत शहरात आलो व सबंध शहराच्या मुख्य मुख्य भागातून हिंडलो. येथेही गगनचुंबी इमारती उभ्या करण्याची स्पर्धा सुरू आहे. विशेषत: सर्व बँकांनी मोठमोठे टॉवर बांधले आहेत. त्यापैकी एका बँकेच्या १०२ मजल्यावर आम्ही जाऊन आलो. येथील वैशिष्ट्य हे की न्यूयॉर्कच्या इमारती सर्व सारख्याच आहेत तर येथील मजल्यांना कोणी अष्टकोनी, त्रिकोनी आकार दिले आहेत व निरनिराळ्या रंगाच्या काचा बसविल्या आहेत. बंदरावर समोर जो टॉवर आहे तो जगातील सर्वात उंच टॉवर आहे. त्याची उंची ११० मजले आहे. व त्याचे खास वैशिष्ट्य हे की तो वादळी वाऱ्यामुळे १ फूट ते १॥ फूट हालतो. 'काँक्रीट' मध्ये हे सुरक्षित 'मार्जीन' ठेवलेले हे पहिलेच बिल्डींग असावे. हा टॉवर येथील जनरल पोस्टाचा आहे. येथील कॉर्पोरेशन बिल्डींग हेही वैशिष्टयपूर्ण आहे. जागतिक टेंडरें मागवून त्याचे डिझाईन पसंत करण्यात आले होते. त्याचा आकार दोन संत्र्याच्या फोडी उलट सुलट एकमेकांसमोर उभ्या ठेवल्या तर त्या जशा दिसतील असा आहे. खाली एका मोठ्या चौथऱ्यावर ह्या दोन इमारती अर्धवर्तुळात उभ्या आहेत. त्यापैकी एक दुसरीपेक्षा थोडी उंच आहे. चौथऱ्याखाली विस्तीर्ण पटांगण आहे व चोहोबाजूला व मध्यावर बगीचा आहे. तसेच मध्यभागी एक मोठा पोहोण्याचा तलाव आहे. त्याचा उपयोग उन्हाळ्यात पोहोण्यास व हिवाळ्यात 'स्केटींग' व बर्फावरचे नाच करण्याकरता केला जातो. सायंकाळी लोक ह्या फरसबंद अंगणात फिरावयास येतात व पायऱ्यांवर बसून गप्पा मारतात. रात्र झाल्यामुळे परत फिरताना आम्ही सिनेमा, नाटकगृहे असलेल्या व 'रात्री जागणाऱ्या' भागातून गेलो. तेथेही न्यूयॉर्कप्रमाणे बकाल वस्ती आहे.

तिसरा दिवस खास नायगारा फॉलकरता राखून ठेवला होता आम्ही सकाळी दहा वाजता ब्रेकफास्ट करून निघालो. ओकव्हीलपासून नायगारा ८० मैल दूर आहे. मी तेथूनच न्यूयॉर्कला परतणार असल्यामुळे मी माझे सर्व सामान आवरून माझ्या बॅगा गाडीत टाकल्या. मला नायगाराहून बस न मिळाल्यास देशपांडे पतीपत्नीला बफेलोपर्यंत यावे लागणार होते म्हणून त्यांनी आपले पासपोर्ट बरोबर घेतले. शोभाने तेवढ्यात मला वाटेत खाण्याकरता दोन पराठे व बटाट्याची भाजी करून माझ्या पिशवीत कोंबली व आम्ही निघालो. 'एअर शो' करता मुद्दाम आलेले व तीन दिवस सुटी असल्यामुळे अमेरिकेतून सहलीला आलेले लोक आता परतत होते. त्यामुळे ओकव्हीलपासूनच आम्हांला गाड्यांची गर्दी भासू लागली. त्यातच एका ठिकाणी मोटा अपघात होऊन पाच गाड्या एकामेकांवर आपटल्या होत्या. त्यामुळे रहदारी सुरळीत होत नव्हती. पुढे तर पोलिसांनी रस्ता अडविला होता व गाड्या एक मार्गानेच चालू ठेवल्या, त्यामुळे गाड्यांचा वेग आणखी मंदावला व शेवटी आम्ही चार तासांनी नायगाराला येऊन पोहोचलो, तेव्हा दुपारचे दोन वाजून गेले होते.

# नायगारा

नायगारा ! निसर्गाचा एक अद्‌भुत चमत्कार जो पहाण्याकरता जगप्रवासी आसुसलेले असतात तो नायगारा मी आता प्रत्यक्ष पाहणार होतो, ह्या कल्पनेनंच माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. आम्ही नायगारा गावाजवळ आलो तेव्हा आम्हाला प्रथम नायगाराच्या पाण्यातून उंच उडणारे कापसासारखे विरळ पांढरे शुभ्र पाण्याचे तरंग हवेत दिसले. त्यानंतर ऐकू येऊ लागला तो त्याचा भन्नाट आवाज. आम्ही गाव ओलांडून नायगाराच्या नजिक आलो व प्रथम गाडी पार्क करण्याकरता जागा शोधू लागलो परंतु कोठेही जागा मिळेना. शेवटी जागा शोधत शोधत जाता जाता एक मैल दूर आम्हांला जागा मिळाली. तेथे गाडी ठेवून आम्ही मुलाला बाबा गाडीत घालून चालत निघालो. नायगाराच्या कॅनेडियन हद्दीत लांब-पर्यंत दगडी कठडा बांधला आहे व लोकांना चालण्याकरता रूंद फूटपाथ आहे. त्या काठानं चालत चालत आम्ही नायगाराच्या अगदी समोर येऊन उभे राहिलो.

अमेरिकेच्या हद्दीत पडणारा नायगारा फॉल अगदीच सामान्य आहे. त्याला उंचीही नाही व पाणीही एवढे वेगाने पडत नाही. परंतु कॅनेडियन बाजूनं पडणारा नायगारा म्हणजे सृष्टीचा अजब चमत्कार आहे. त्याचा आकार घोड्याच्या नाला-सारखा (Horse shoe) अर्धवर्तुळाकार आहे. नायगारा नदी पिसाटासारखी धावत येते आणि ह्या अर्धवर्तुळाकार खडकावर खोल दरीत स्वत:ला झोकून देते. तिचं निळं निळं फेसाळणारं पाणी नागिणीसारखं सरपटत खोल दरीत उडी घेतं तेव्हा नागिणीचं निळं विष अंतर्धान पावून पांढरं शुभ्र गंगाजल उरतं आणि आकाशातील देवांना अर्घ्य देण्याकरता त्याचे धवल तुषार उंच उडत असतात ! भगवान शंकराच्या जटांतून खाली पडणाऱ्या गंगामाईत भगवंताच्या गळ्यात असलेल्या सर्पाचे विष जसे मिसळले जात नाही तसेच हे नायगाराचे पाणी विशुद्ध, पांढरे शुभ्र आहे, तसेच गंगामय्यासारखे अखंड, अहोरात्र वाहात आहे. सौंदर्याचा, मांगल्याचा तो अवर्णनीय अविष्कार पाहून आपण नतमस्तक होतो आणि म्हणतो, 'परमेश्वरा तुझी करणी अगाध आहे !'

नायगारा फॉल उंचावरून पडत नाही तर निसर्गानं करून ठेवलेल्या खोल दरीत पडतो. त्याची तुलना करावयाची झालीच तर गोकर्णजवळच्या गिरसप्पा धबधब्याबरोबर करता येणार नाही, कारण तो उंचावरून पडतो. नायगाराची पुसटशी कल्पना नाशिकजवळच्या भंडारडॅमपासून जवळ असलेल्या एका दरीत पडणाऱ्या धबधब्यावरून करता येईल.

नायगाराचं खरं सौंदर्य बघावयास कॅनेडाच्या हद्दीतच जावयास पाहिजे. नायगारा नदी वाहते अमेरिकन हद्दीत, नायगारा फॉल आहे अमेरिकन हद्दीत पण त्यानं सारं सौंदर्य बहाल केलं आहे कॅनडाला ! खट्याळ भगवान श्रीकृष्णानं

पारिजातकाचं झाड लावलं सत्यभामेच्या अंगणात पण त्याची फुलं पडत होती रुक्मिणीच्या दारी तसं!!

आम्ही तृप्त मनानं आणि भरल्या अंतःकरणानं आमच्या मोटारीकडे परतलो. संध्याकाळचे ५।। वाजले होते. दुपारचं जेवण करावयाचं विसरलो होतो. नायगारामुळे तहानभूक हरवते ह्याची प्रचीती घेत आम्ही बरोबर आणलेल्या खाद्यांवर हात मारला आणि माझ्या बसची चौकशी करण्यास पुन्हा निघालो.

तेथेच एका टेकडाच्या पायथ्याशी रेल्वे स्टेशन होते. तेथून एका उभ्या रेषेत लिफ्टनं गेल्यानं पलिकडेच बस स्टँड होता परंतु माझ्या बँगा घेऊन त्या लिफ्टमध्ये बसणं धोक्याचं वाटल्यावरून आम्ही गाडीनं सुमारे तीन-चार मैल वळसा घेऊन बसस्टॉपवर आलो. व तेथून थेट न्यूयॉर्कचंच तिकीट घेऊन संध्याकाळी ७। वाजता बसमध्ये चढलो.

## एका जिद्दी भारतीय स्त्रीचं दर्शन

नायगारा शहरात येऊन तेथे स्थानिक झालेल्या व मान्यवर झालेल्या डॉ. उपाध्ये ह्यांना भेटण्यास सवड झाली नाही ह्याची चुटपूट लागली होती. पुनः पाच वर्षांनी नायगारा बघण्याचा योग आला पण ह्यावेळी डॉ. उपाध्ये ह्यांचे अकस्मात निधन झाल्यानं त्यांचेकडे जाणं जड वाटत होतं पण त्यांच्या कर्तबगार पत्नीस, सुधा उपाध्ये ह्यांना भेटण्याचं विधीलिखीत होतं म्हणून भेटण्याचा योग आला. त्याचं असं झालं. आम्हाला पिटस्बर्ग पासून पाऊस वाऱ्यात रात्रभर प्रवास करून नायगाराला यावं लागलं. पहाटेस तेथे पोहोचल्यावर थंडी वाऱ्याने बेजार झालो. कोठे चहाही मिळेना म्हणून सुधा उपाध्यांना फोन केला व आमचे हाल सांगितले. त्या तावडतोब आल्या व आपल्या घरी घेऊन गेल्या. चहा झाल्यावर व तेथील उबेमुळे शीण व थंडी गेली. आमचे स्नान वगैरे आटोपेपर्यंत त्या आपल्या कामावर जाऊन अकरा वाजता परत आल्या. त्यानंतर स्वयंपाक करून आम्ही जेवण आटोपले. पाऊस आणखी वाढेल म्हणून त्यांनी दुपारचा चहा झाल्याबरोबर आम्हास नायगाराचा सर्व परिसर दाखविला. पाऊस वारा होताच म्हणून आम्ही त्यांच्या गाडीतूनच भ्रमंती केली व संध्याकाळी दिव्यांची रोषणाई पाहण्यास थांबलो नाही.

परक्या देशात सबंध शहरातील एकमेव मराठी स्त्री सुधा उपाध्ये. पती निधनानंतर खचून न जाता स्वतःचा सिरेमिकचा कारखाना चालविते, विक्रीकेंद्र चालविते, सिरेमिक कलेचे वर्ग चालविते आणि आपला पती जेवढ्या इतमामानं नाव कमवून होता तेवढ्याच दिमाखात स्वतःच्या कर्तृत्वानं ती आपल्या दोन लहान मुलांना व एका व्हिएटनामी मुलीस वाढवीत आहे. मुलांवर एवढे भारतीय संस्कार आहेत की ती मुले रोज संध्या करतात, संध्याकाळी स्तोत्र म्हणतात, आपल्या मानलेल्या धाकट्या वहिणीला जपतात. तिला खेळवितात. आईला घर-

कामात मदत करतात. आणि दारोदारी पेपर टाकून आपल्या वरकड खर्चाची तरतूद स्वतःच करतात. ऐन तारुण्यात एवढा मोठा आघात पेलून पाय घट्ट रोवून आपला संसार जसाच्या तसा शाबूत ठेवणारी सुधा उपाध्ये, परदेशातच नव्हे तर आपल्या देशातही शोधून सापडणार नाही. ती जिद्दी तरुण स्त्री आमच्या अंतःकरणात कायम घर करून राहिली आहे.

पुन्हा कस्टम तपासणीचे सोपस्कार होऊन रात्री ८–३० वाजता बफेलो ह्या शहरी पोहोचलो व तेथे ९–३० वाजता दुसरी बस घेऊन पहाटेस ५–३० वाजता न्यूयॉर्कच्या पोर्ट ॲथॉरिटी ह्या मुख्य बस स्थानकावर पोहोचलो.

तेथून सबवेनं मी ह्यावेळी ज्यांचेकडे उतरणार होतो त्या राजू कुलकर्णी ह्यांचेकडे कसे जावयाचे हे मला माहीत होते, कारण ह्यापूर्वी तीन दिवस मी न्यूयॉर्कमध्ये मनसोक्त हिंडलो होतो व फ्लशींग क्वीन्स हा भाग मला माहीत होता. बस स्थानकाच्या पोटातूनच थेट सबवे स्टेशन गाठता येते. लांबच लांब भुयारातून ह्या हातातील बॅग त्या हातात करीत मी ७ नंबरची ट्रेन पकडली आणि क्वीन्सच्या ९० व्या रस्त्यावर ह्रॅमस्डेन स्टेशनवर उतरलो. तेथून फोन करून राजू कुलकर्णींनी सांगितल्याप्रमाणे पाच मिनिटात त्यांचे घरी दाखल झालो.

## संन्याशाचा संसार

राजू कुलकर्णी व त्यांची पत्नी माधुरी हे दांपत्य एका अपार्टमेंट असलेल्या मोठ्या इमारतीत ५ व्या मजल्यावर रहातात. तळमजल्यावरील त्याच्या नावाची बेल वाजविल्यावरून त्यांनी दूरध्वनीक्षेपणावरून मधले दुसरे दार उघडल्याचे सांगितले. येथे सुरक्षितेकरता ज्याचेकडे जावयाचे असेल त्याने वरूनच बटन दाबून दार उघडल्याशिवाय मधील दार उघडत नाही. प्रत्येकाकडे अशी सोय असल्याचे पाहून इलेक्ट्रीक वायरींचे कौतुक वाटते.

आतापर्यंत मी प्रशस्त बंगल्यात राहिलो होतो, कारण, माझे ते सर्व मित्र अनेक वर्षे येथे राहून सधन झालेले आहेत. पण आता मला एका नुकत्याच शिक्षण पुरं करून, संसार थाटणाऱ्या, वर्षापूर्वीच लग्न झालेल्या नवदांपत्याकडे राहावयाचे होते. त्यांचा 'स्टुडियो अपार्टमेंट' म्हणजे खोली नसलेला फ्लॅट होता. जागा सजविण्याकरता थोडं थोडं जमा करून ठेवलेलं सामान एका कोपऱ्यात पडलं होतं. एका अंगाला स्वयंपाक घराचा ओटा, विजेरी शेगडचा व रिफ्रीजरेटर व त्याचे डोक्यावर भांडी व सामान ठेवण्याचे कपाट, त्याला लागून भिंतीच्या कोपऱ्या-आड संडास बाथरुम. बस्स, बाकी सर्व जागा मोकळी. संडास बाथरुमच्या अंगाच्या कोपऱ्यात नुकतीच घेतलेली मोकळी रबराची गादी, सिमेंटच्या विटांवर ठेवलेली, ही झाली त्यांची बेडरुम. अमेरिकेत शिक्षण करून नुकत्याच स्थायिक होऊ पाहणाऱ्या संन्याशाचा तो संसार होता ! हेही जीवन पहाण्याचा योग मला मिळाला हे माझं

भाग्य. अमेरिकेत आल्यापासून येथे कष्ट करून पुरं केलेल्या शिक्षणाचा, नंतर नोकरी, अर्ध नोकरी तर कधी वेकारीला तोंड देत देत वाटचाल करणाऱ्या एका तरुणाचे ते बोलके चित्र होते. राजूनं बोस्टन विद्यापीठात लहानसहान कामं करून, सुटीत गृहोपयोगी वस्तू विकून आपलं शिक्षण पुरं केलं. इलेक्ट्रीकल आणि कॉम्प्युटर इंजिनियरींगच्या पदव्या घेऊनही मनासारखी नोकरी मिळाली नाही म्हणून ' बिझीनेस मॅनेजमेंट ' कोर्स पुरा केला, तेव्हा कोठे आता त्याला बँकेत मनासारखी नोकरी मिळाली आहे. त्याची पत्नी माधुरी शिक्षण करता करताच गेल्यावर्षी गृहिणी झाली. गेल्या वर्षी राजू बोस्टनहून आणि माधुरी वॉशिंग्टनहून भारतात येताना विमानातून सहप्रवास करता करता त्यांनी जीवनसाथी होऊन जन्मभर एकत्र प्रवास करण्याच्या आणाभाका घेतल्या. हे त्यांच्या तोंडून ऐकता ऐकता माझं मन मला ३५।३६ वर्ष मागे घेऊन गेलं. मीही असाच एका खोलीत माझा भातु-कलीचा संसार कलकत्त्यास मांडला होता त्याची सुखद आठवण करीत मीही त्यांच्या संसारात रमून गेलो. त्यांच्यावरोबर खरेदीला बाहेर पडे, दहा दुकानात जाऊन भोजनटेबल व खुर्च्या, सोफा कमबेड, उशा, चादरी, स्वयंपाकाची भांडी एक ना दोन, वस्तू न्याहाळण्यात व पसंत करण्यात त्यांच्यात रममाण झालो. बेडरुम निराळी करण्याकरता मध्ये घालावयाचे पार्टिशन डिझाईन आम्ही आप-आपल्या मनाप्रमाणे चित्रे काढून एकमेकांशी ताडून पाहू लागलो. पुढे तर आम्हांला त्याचं एवढं वेड लागलं की रात्री मध्येच उठून आम्ही नवीन काहीतरी एकमेकाला सुचवू लागलो पार्टीशनचे डिझाईन ही सोपी गोष्ट नव्हती.कारण, त्यात टेपरेकॉर्डर रेकार्डप्लेअर, ट्रान्झिस्टर, पुस्तकाची जागा, कपड्यांची जागा, शोभेच्या फुलदाण्या व इतर ' शो पीस ' सामावयाला हवे होते आणि तरीही ते आकर्षक व्हावयास हवे होते, सहज मोडून दुसऱ्या जागी हलविता येण्याजोगे ' पोर्टेबल ' व्हावयास हवे होते. येथे बाहेरचा मजूर, सुतार आणून कामे करणे परवडणारे नसल्यामुळे रात्री आम्हीच हा उद्योग करीत असू. सात फूट लांबीची व सहा फूट रुंदीची फळी कापून आम्ही गादीखाली सिमेंटच्या विटांवर ठेवली. ती कमी पडू लागली म्हणून त्याला दुसरा जोड दिला खालून आणखी विटा आणून त्या गादीच्या मध्यभागी ठेवून त्याची मजबुती केली. आणि राजूमाधूरीचा छप्पर पलंग सजविला !

मी टीव्ही पहात जमिनीवर ' झोपण्याच्या पिशवी ' वर झोपत असे. पण त्यावर झोपण्यात आलेला आनंद इतर ठिकाणी मऊ मऊ गाद्यांवर स्वतंत्र शयन-गृहातही मला मिळाला नाही. मी स्वतःला त्यांच्या जीवनप्रवाहात एवढे झोकून दिले होते की तेथे काही गैरसोई आहेत याची आम्हांला कोणालाच अडचण भासली नाही किंवा एकाच मोठ्या खोलीत आम्ही सर्वजण झोपत असल्याचा संकोच वाटला नाही. आपला मोठा भाऊ, प्रेमळ पिता, आणि वरोबरीचा आपल्या एवढाच उत्साही तरुण मित्र ह्या एकत्रित नात्यानं मी त्यांच्यात सामावून गेलो होतो.

त्यांच्याकडे काढलेले माझे पाच दिवस अत्यंत आनंदाचे क्षण म्हणून मी जतन करून ठेवले आहेत. आता राजू मोठ्या हुद्यावर (व्हाईस प्रेसिडेंटच्या) नायजेरीयात गेला आहे म्हणून दुसऱ्या वेळी भेट झाली नाही.

## ‘ कोईबी चीज बे आना ’

न्यूयॉर्कमध्ये मला आता काही मुद्दाम जाऊन पहाण्याची इच्छा राहिली नव्हती. नायगारा फॉलच्या सौंदर्याच्या बासुंदीपुरीच्या मेजवानीनंतर मला येथील एँम्पायर स्टेट बिल्डीगही ठेंगणी वाटली, अगदी धावन घाटलं वाटलं. कुलकर्णी दांपत्यावरोबर भरपूर शॉपींग मात्र केलं. कॅनॉलस्ट्रीट वरची भारतीय दुकानं हिंडून काही खरेदी केली. त्यानंतर ‘ ५१ सेंट ’ ‘ ६९ सेंट ’ अशी ‘ कोईबी चीज बे आना ’ वाली दुकाने पाहिली. त्यात खरोखरच वस्तु स्वस्त मिळतात. तसेच ‘ जॉबलॉट ’ नावाच्या एक मोठ्या डिपार्टमेंटल स्टोअर्समध्ये तर सर्वच वस्तू कमालीच्या स्वस्त मिळतात. त्यात हिंडून काही वस्तू घेतल्या. दिवाळं निघालेल्या कंपनीचा सर्वचे सर्व माल एका लॉटमध्ये घेणाऱ्या काही कंपन्या असतात. त्यांचा माल येथे किमती खूप कमी करून विकला जातो. कमी किमतीमुळे येथे लोकांची झुंबड उडते व त्यामुळे माल नीट पारखून खरेदी करता येत नाही. पार्किंग मीटर-कडे सारखे लक्ष ठेवावे लागत असल्यामुळे गाडी घरी ठेवून येथे गेल्यास अनेक चांगल्या वस्तू येथे मिळू शकतील. ह्या कारणानं आम्हांला तेथे फार रेंगाळता आले नाही. न्यूयॉर्कमध्ये पायी पायी हिंडून शॉपींग करण्यात खरा आनंद आहे.

## न्यूयॉर्कहून प्रयाण

रविवारी माझे निघण्याचे दिवशी राजूचे वडीलबंधू दुपारच्या भोजनास आले होते. १९५५ चे सुमारास नू. म. वि. मधून एस्. एस्. सी.ला सर्वप्रथम आलेला विद्यार्थी रवींद्र कुलकर्णी ते हेच. आता ते न्यू जर्सीमध्ये युनिव्हर्सिटीत गणिताचे प्राध्यापक आहेत. नाना शंकर शेट संस्कृत स्कॉलर असल्यामुळे त्यांचा संस्कृतचा व्यासंगही दांडगा आहे आणि गणिती म्हणून तर त्यांनी संबध अमेरिकेत नाव कमावले आहे. त्यांना भारतातील अर्थिक परिस्थितीबद्दल जाणून घ्यावयाचे होते म्हणून मी त्यांना एक ‘ बौद्धिक ’ दिले तें विमानतळावर आम्ही पोहोचेपर्यंत चालले !

त्या सर्वांना संध्याकाळी न्यूजर्सीमध्ये एका मित्राकडे बारशानिमित्त जाव-याचे होते म्हणून त्यांनी मला ५॥ वाजताच विमानतळावर आणून सोडले आणि मी त्यांचा व अमेरिकेचा निरोप घेतला. रात्री ८-३० वाजता एअर इंडियाच्या विमानानं आकाशात झेप घेतली आणि माझा भारताकडे परतीचा प्रवास सुरू झाला.

प्रवास दिवसाचा असो की रात्रीचा, अॅटलांटिक महासागर ओलांडताना रात्रच असल्याचा भास होतो, कारण, दिवसा प्रखर उन्हाने विमानाच्या पांढऱ्या ढगांकडे बघवत नाही म्हणून विमानातील खिडक्यांचे पडदे ओढलेले असतात. एका केरळातील 'फादर'च्या सोबतीत 'येशूचा प्रसाद' ग्रहण केला आणि तासभर रात्रीच्या जेवणात घालविल्यावर जी ताणून दिली ती सकाळी लंडनला पोहोचेपर्यंत. लंडन एअरपोर्टवर प्रथम टॉयलेट रूमकडे धाव घेतली कारण, एका रात्रीत एअरइंडियाच्या टॉयलेटचे काय झालं असेल ह्या कल्पनेने अंगावर शहारे येतात. शौच, मुखमार्जन, दाढी करून मी तेथील 'ड्यूटी फ्री' दुकानात हिंडलो. लंडनच्या वसंत जोशींना मुद्दामच माझे येण्याचे कळविले नव्हते. नाही तर ते आणखी चार मित्रांना घेऊन सहकुटुंब आले असते आणि आम्हांला एकमेकांशी न बोलताच फारतर हात हालवून निरोप घ्यावा लागला असता. तेवढ्याकरता त्यांना त्रास देणे मला नको होते. काहीही न घेता मी तासभर तेथे काढून परत विमानात आलो. हल्ली 'हवाई चाचेगिरी' चे बंड बोकाळल्यामुळे व नुकतेच विमाने पळवून नेल्याचे दोन ताजे प्रसंग झाल्यामुळे आमची कसून तपासणी झाल्यावरच आम्हास जाऊ देण्यात आले. विमानात माल भरण्या उतरविण्यात विलंब झाल्यामुळे आमच्या विमानाची लंडन विमानतळावर एक तास खोटी झाली. विमानात मालगाडीच्या डब्याएवढे पेटारे भरतात हे दृश्य माझ्या खिडकीतून मी प्रथमच पहात होतो. त्या पेटाऱ्यांची ने आण करण्याकरता ट्रकवर वसविलेले प्रचंड जॅक असल्यानं त्यावरून घसरत अलगद पेटारे विमानाच्या पोटातून आत घातले जात होते. बाहेर काढले जात होते व एका ठिकाणी अलगद उतरविले जात होते. एवढ्या प्रचंड जड सामान नेणाऱ्या विमानाला आमचे दहा पाच पौंड अधिक वाटावे ह्याचा अचंबा व मनस्वी राग आला ! पॅरिसला नेहमीप्रमाणेच हवा खराब होती. पण त्याहून जास्त खराब हवा होती फ्रॅन्कफुर्ट ह्या जर्मन विमानतळावर. फ्रॅन्कफुर्ट मेन विमान तळ इतरांपेक्षा वेगळा आहे. तेथे विमाने चौकाच्या एका कडेनं खालीं उतरतात व इमारतीच्या काठाकाठानं जाऊन नेमलेल्या जागी उभी राहतात व उड्डाण करताना मध्यावरील पट्टीवरून उडतात. हा विमानतळ सोडल्यापासून विमान एवढे हालत होते की एकदा तर जेवणाच्या खोलीतील दोन गाड्या मोकाट बाहेर धावू लागल्या व त्यातील अन्नाचे ट्रे इतस्ततः सांडले. पर्सर व हवाई सुन्दऱ्याही तोंड लपवून मिळेल त्या जागी कंबरेचे पट्टे आवळून बसल्या होत्या. आता बहुधा जर्मन भूमीवरच आमचा मोक्ष होणार अशी भिती वाटून उगीचच मला मुबई विमान तळावर घेतलेल्या विम्याची आठवण झाली ! शेवटी एकदाचे आमच्या सारथ्याला विमान हवे तेवढ्या उंचीवर नेण्यात यश आले आणि त्याने ( बहुधा छाती वर काढून ) सांगितलं. 'आता कुवेत २७०० मैल दूर आहे, ते अंतर आपण ४ तास ५५ मिनिटात कापू.' तोपर्यंत मात्र त्यांनी ३।४ तास आमच्या तोंडचं पाणी पळविले होते. आम्ही रूमानिया, बल्गेरिया, पोलंड

टर्कीवरून उड्डाण करून केव्हा तरी मध्यरात्री कुवेत विमानतळावर पोहोचलो. माझ्या शेजारी बसलेल्या 'फादर' ला व्हिस्की हवी होती. पण ती त्याला शेवटपर्यंत मिळाली नाही. दुपारचे जेवणच जेथे आम्हांला संध्याकाळी ५-३० वाजता, विमान ४० हजार फुटांवर ढगावर आरूढ झाल्यावरच मिळाले, तेथे त्याच्या व्हिस्कीची हौस कोण पुरविणार ? त्या निमित्तानं पुष्कळ वेळ जर्मन भूप्रदेश पहावयास मिळाला, 'हेही नसे थोडके !'

कुवेतहून आमचे विमान थेट मुंबईस जाणार होते असं त्यांच्या वेळापत्रकात छापले होते. म्हणजे आम्ही आता फक्त तीन तासात मुंबईस पोहोचणार अशा आनंदात आम्ही होतो. पण कसंच काय आणि कसंच काय ! आयत्या वेळी आमचे विमान प्रथम दिल्लीला जाणार असल्याची घोषणा झाली आणि आमचा प्रवास आणखी ४ तासांनी लांबला म्हणून मन खट्टू झालं. शेवटी व्हाया दिल्ली प्रवास करून आम्ही पहाटेस ५ च्या ऐवजी ८-३० वाजता मुंबई विमान तळावर सुखरूप पोहोचलो. न्यूयॉर्कहून माझ्या एका मित्राचे बॅन्केतून निघण्यापूर्वी 'टेलेक्स' पाठविला होता म्हणून माझ्या घरची मंडळी व काही मित्र विमान तळावर मला घेण्यास आले होते. विमानाचा आयत्या वेळी मार्ग बदलल्यामुळे त्यांची गैरसोय झाली. पण भारतात आल्याबरोबर एअर इंडियाला 'गूण' लागणारच हयाची त्यांना सवय असल्यामुळे हास्य वदनानं त्यांनी माझं स्वागत केलं.

अशी ही माझ्या इंग्लंड, अमेरिका प्रवासाची 'अपूर्व' चित्तथरारक साठा उत्तरांची, कहाणी पाचा उत्तरीसफल संपूर्ण झाली !

●

# पूर्वेकडे

वरील प्रवास वर्णन मी १९७६ च्या अमेरिकेच्या द्विशतकी महोत्सवानिमित्त केलेल्या भेटीचे आहे. मुंबई ते लंडन प्रवास. लंडनमध्ये वास्तव्य. त्यानंतर युरोपमधील काही देश पाहून मी अमेरिकेला गेलो होतो. त्या वेळी आंतरदेशीय बहुतेक प्रवास बसनं अथवा मोटारीनं केला त्यामुळे सर्व देशांचं फार जवळून दर्शन घडलं आणि अनेक थरातील माणसं भेटली. १९८१ ऑगस्टमध्यें सपत्नीक पुनः प्रवास घडला. तो खऱ्या अर्थानं जगाचा प्रवास म्हणावा लागेल. कारण 'संपूर्ण पृथ्वीप्रदक्षिणेची' तिकिटे आम्ही काढली होती, सिंगापूर एअरवेज व टी. डब्ल्यू. ए. ह्या विमान कंपन्यांची व सर्व प्रवास, आंतरदेशीयसुद्धा विमानानेच झाला. त्यामुळे वेळेत बचत

झाली खरी परंतु वसनं हजारो मैल प्रवास करण्यानं जसं निरनिराळ्या प्रांतांच्या लोकांचं दर्शन जवळून घडलं तसं विमान प्रवासानं झालं नाही.

पूर्वेकडील देश सोडले तर बाकी सर्व प्रवास इंग्लंड अमेरिकेत झाला व अति दक्षिणेकडील ह्युस्टन (ह्याचा अमेरिकन उच्चार युस्टन) व सान अँटोनिया ही शहरं सोडली तर बाकी सर्व शहरं पूर्वी पाहून झालेली होती म्हणून त्यांचं वर्णन पुन्हा केलेलं नाही. फक्त विशेष काही जाणवलं त्याचाच उल्लेख केला आहे.

पूर्वेकडील देशांचा देखील उल्लेख थोडक्यात करीत आहे. कारण त्यांची वैशिष्टयेही वरील वर्णनात जागोजागी आली आहेत. मात्र प्रत्यक्ष प्रवास वर्णन वाचकांच्या समाधानाकरता करीत आहे.

## सिंगापूर

सिंगापूर एअरवेजच्या विमानानं सकाळी १०–३० वाजता मुंबई विमानतळ सोडला आणि आम्ही दुपारी ३–३० वाजता सिंगापूर विमानतळावर पोहोचलो. विमानतळ अतिशय सुंदर आहे व त्याची व्यवस्था उत्तम आहे. आमच्या एका मित्रानं तेथील एक बँक अधिकाऱ्याकडे आमची राहण्याची व्यवस्था केली होती. परंतु तो आम्हास घेण्यास तर आला नाहीच परंतु फोनवरही भेटला नाही. डॉ. जयन्तराव नारळीकर आमच्याच विमानात होते. त्यांच्या मदतीनं आम्ही वाय. एम्. सी. ए. च्या अतिथी गृहात पोहोचलो. प्रतिदिन ५५ डॉलर भाडं पडलं (२ सिंगापूर डॉलर म्हणजे १ यू. एस्. डॉलर) हॉटेल वातानुकूल व टी.व्ही. वगैरे सुविधायुक्त होतं. दुसरे दिवशी आम्ही मार्केटींग केलं. सी. के. टँग हा स्टोअर पूर्ण भरवशाचा किंमती माफक व वस्तू चांगल्या. दुसरा सीन लीन टॉवर म्हणजे प्रचंड बाजार. पण वस्तू पारखून घ्याव्या लागतात आणि किंमतीची घासाघास करावी लागते. अद्ययावत इलेक्ट्रॉनिक वस्तूंनी बाजार भरला आहे. आणि आपणास काय घेऊ आणि काय नको असं होतं. एकट्या सिंगापूरची (तसेच हाँगकाँगची) निर्यात आपल्या देशाच्या कितीतरी पटीनं जास्त आहे. केवळ तीस लाख वस्तीचं हे स्वतंत्र बेट आहे. केवळ परदेशी माल आणून तो निर्यात करीत नाही तर त्यानं स्वतःचे अनेक कारखाने काढले आहेत आणि स्वतःचा माल विकण्यातही तो छोटा देश इतर मोठ्या देशांशी स्पर्धा करीत आहे. त्यांची भाषा इंग्रजी असल्यामुळे आपणास अडचण पडत नाही. आम्हांस तेथे भातभाजीचं चांगलं जेवण मिळू शकलं पण त्यांचा मुख्य आहार मांसाहार. चिनी जपानी भोजनगृहे प्रामुख्यानं दिसतात. शहर अत्यंत सुंदर आणि त्याची आखणी काळजीपूर्वक केली आहे. जगातील सर्वात सुंदर व स्वच्छ शहर म्हणून लौकिक आहे. सर्वत्र वातानुकूल मर्सडीझ गाड्या टॅक्सीत दिसतात आणि त्यांचे सारथी मोठे खुषमिजाज असतात.

# हाँगकाँग

सिंगापूर ते हाँगकाँग साधारण चार तासांचा प्रवास. येथील विमानतळ सिंगापूर एवढा देखणा नसला तरी खूप मोठा आहे. सिंगापूरप्रमाणेच येथे कस्टमचा त्रास नाही. मात्र इमिग्रेशन तपासणी कसून असते. आधी नाणी बदलावी लागतात. विमानतळावरच बँका असतात, पण त्या आपणास योग्य भाव देत नाहीत, असा हाँगकाँगला अनुभव आला व एका व्यापाऱ्यामुळे आमचे थोडे डॉलर वाचले. तेथेही आमच्या मित्रानं एका मराठी बँक अधिकाऱ्याकडे आमची राहण्याची व्यवस्था केली होती म्हणून आम्ही टॅक्सी करून त्यांचे घरी गेलो. प्रथम ते गृहस्थ आम्हांस फार तुटक वाटले. परंतु दुसऱ्या दिवशी जेव्हा त्यांना कळून चुकलं की आम्ही त्यांच्याच 'लेव्हल' चे आहोत तेव्हापासून मात्र त्यांनी आमचे आदरातिथ्य केलं. एवढेच नव्हे तर टोकियो शहर फार महाग आहे म्हणून मुद्दाम बाजारात जाऊन आमच्याकरिता चहाच्या बॅग्ज, साखर, दुधाची पावडर आणि बिस्किटे आणली. ती खरोखरच आम्हास टोकियो मुक्कामात फार उपयोगी पडली.

हाँगकाँग शहर उभं वाढत आहे, कारण त्याच्या आडव्या विस्ताराला मर्यादा पडल्या आहेत.हे शहर एका दरीत आहे आणि तीन्ही बाजूनं समुद्र आहे. उंचच उंच इमारती व अगदी अरुंद रस्ते, डोंगरावर चढत गेलेले. बाजार पेठा माणसांनी फुलून गेलेल्या त्यामुळे आपणा हैराण होतो. सर्व जगातील लोक येथे नानाविध वस्तू खरीदण्यास येतात, कारण ड्यूटी नसल्यामुळे वस्तू खूप स्वस्त मिळतात, मात्र त्या पारखून घ्याव्या लागतात. अरुंद रस्ते व दाट लोकवस्तीमुळे रहदारी सुरळित चालत नाही. तरीही हे शहर विलक्षण स्वच्छ आहे ह्याचा अचंबा वाटतो. सिंगापूरप्रमाणेच येथेही रस्त्यावर घाण टाकल्यास दंड आहे. एका लांबच लांब मोठ्या रस्त्याच्या दुतर्फा बँका, इन्शुरन्स कंपन्या व जगातील सर्व मोठ्या कंपन्यांच्या कचेऱ्या आहेत. बौद्ध संस्कृती सर्वत्र दिसते मात्र एका डोंगरावर एक मोठे हिंदू देऊळ आहे. सिंगापूरप्रमाणेच अलिशान टॅक्सीज आहेत पण त्यांच्या सारथ्यांना इंग्रजी नीटसं समजत नाही. शहराचे समुद्र खाडीनं झालेले दोन भाग पाण्याखालून बोगदा काढून जोडले आहेत त्यामुळे सर्वत्र मोटारीनं हिंडता येते. कौलून ह्या भागात धनाढ्य सिंधी व्यापारी राहतात. ९८ टक्के वस्ती चिनी लोकांची आहे. हवामान सामान्यत: मुंबईसारखेच आहे. ४।। ते ५ हाँगकाँग डॉलर म्हणजे १ यू. एस्. डॉलर होतो.

# इलेक्ट्रॉनिक शहर–टोकियो

हाँगकाँग ते टोकियो प्रवास साधारण तीन तासांचा. पण वाटेत तायपेई (तायवान) विमानतळावर सर्वांना विमानातून उतरावे लागते. विमानाची झडती घेतली जाते व मगच पुन: विमानात प्रवेश मिळतो. त्यामुळे खोटी होते. तायपेई विमानतळ अगदी सामान्य आहे. परंतु तायवान आज जागतिक व्यापार पेठेत जपानची बरोबरी करू लागला असल्यामुळे तायपेईला महत्त्व आले आहे. येथून होनोलुलू मार्गे अमेरिकेला विमाने जातात.

न्यूयॉर्कच्या केनेडी विमानतळावर उतरल्यावर जसं अमेरिकेचं वैभव दिसू लागलं, तसं टोकियोच्या नवीन बांधलेल्या नारिटा विमानतळावर उतरल्यावर जपानच्या सर्वांगीण उन्नतीचं दर्शन घडतं. जगातील कदाचित सर्वांत मोठा विमानतळ हाच असावा कारण, केनेडी विमानतळावर निरनिराळ्या विमान कंपन्यांकरता स्वतंत्र इमारती आहेत. तर 'नारिटा' विमानतळ चार मजली एकच इमारत आहे. येथे उतरणारे प्रवासी आणि येथून जाणारे प्रवासी ह्यांच्या कक्षा एवढ्या मोठ्या आहेत की आपण आलो तो हाच विमानतळ का असा भ्रम पडावा. प्रवाशांच्या सोयीसाठी शहरातून प्रवासी घेऊन आलेली बस ज्या विमान कंपनीनं तुम्ही प्रवास करणार असाल त्या कंपनीच्या गेटपाशी तुम्हांला सोडते. व त्यामुळे तुम्हांला आपले सामान लांववर न्यावे लागत नाही. आपण इलेक्ट्रॉनिक जगात आल्याची जाणीव देणारी एक जाहिरात तुमचे लक्ष वेधून घेते. 'Welcome to the City of Electronics' अशी मोठी पाटी विमानतळाबाहेर दिसते. लांबच लांब कॉरिडॉर मधून चालत अथवा स्वयंचलित जिन्याने तुम्ही एमिग्रेशन, कस्टम हे सोपस्कार आटोपून बाहेर पडता. येथे हेल्थ सर्टिफिकेटस् कसून पाहिली जातात. येणाऱ्या उतारूंचे सामान कोणत्या ठिकाणी मिळेल हे कॉम्प्युटरच्या सहाय्यानं टी. व्ही. स्क्रीनवर पाहून आपण त्या ठिकाणी जातो. एका मागून एक विमाने येत असल्यामुळे कोणत्या विमानातील सामान कोठे मिळेल ते कळणं आवश्यक असतं. आपल्याकडे एकच 'वेल्ट' आहे. कारण, एका पाठोपाठ विमाने आपल्या विमानतळावर लागत नाहीत. पण सर्वच पाश्चात्य देशात व पूर्वेकडील सिंगापूर, हाँगकाँग व टोकियो या विमानतळावर वेल्टनंवर प्रमाणे आपणास सामानाकडे धाव घ्यावी लागते.

नारिटा विमानतळ शहरापासून ४५ मैल दूर असल्यामुळे टोकियो विमानतळानेच शहरात जाण्याकरता लक्झरी बस सेवा ठेवली आहे. बसचं भाडं माणशी २३०० येंन (सुमारे १२५/- रु.) टॅक्सीचं भाडे बस टर्मिनलपासून हॉटेलपर्यंतचे १२५० येन आहे. बस ८० मिनिटात आपणास शहरातील बस टर्मिनस्च्या तिसऱ्या मजल्यावर आणून सोडते. तेथून एस्केलेटरनं आपण तळमजल्यावर यावयाचे. तेथे आपले सामान

ताब्यात मिळते, ते घेऊन तेथेच गेटमधून बाहेर पडल्यावर टॅक्सी मिळते. एकामागून एक टॅक्सी पुढे सरकत असतात. व कोणालाही टॅक्सीकरता थोडंही थांबावं लागत नाही. रात्री १॥ वाजता आम्ही हॉटेल युरोशिमा ह्या १५ मजली हॉटेलात पोहोचलो. आम्हांस ११ व्या मजल्यावर वातानुकूलित सुसज्ज खोली मिळाली. विमान तळावर आम्ही 'एशियन सेन्टर' ह्या हिंदी वसतीगृहाची चौकशी केली. पण भाषेच्या अडचणीमुळे तो पत्ता काही आम्हास मिळू शकला नाही. व शेवटी तेथेच एका एजन्सी मार्फत हॉटेल नक्की केलं, हॉटेल युरोशिमा. दररोजचे भाडे सुमारे रु. ५०० फक्त राहण्याचे. टोकियो, जगात पहिल्या नंबरचे महागडे शहर आहे. आम्हांला मिळालेले हॉटेल कमी भाडे असलेले पण उत्तम होते. हे आमचे नशीब. तसेच ते शहराच्या मध्यभागी असल्यामुळे आम्ही बसनं अथवा पायी सुद्धा 'गिंझा' ह्या मुख्य बाजार पेठेत जा ये करू शकत होतो. आमच्या जवळ चहा, दूधपावडर, साखर असल्यामुळे आमचा चहा आम्ही खोलीतच करून घेत असो. चहा करता उकळतं पाणी, कळ दाबून मिळत असे. कळ दाबून तेथे सर्वच काही मिळण्याची सोय होती. टूथ ब्रश, पेस्ट, दाढी करावयाची सर्व उपकरणी, लोशन्स, बीअर्स, पेये, चॉकलेट, सिगरेटी वगैरे वगैरे. खोलीत दोन बेडस्, आरसा, टेबल, कपड्याकरता कपाट, जोडलेल्या बाथरूम मध्यें टब, वॉशबेसीन व कमोड, दोन टॉवेल व रोज साबूची नवी वडी. तसेच चादरी रोजच्या रोज बदली केल्या जात व एक जपानी पद्धतीच्या पोशाखाची घडी रोज ठेवली जाई. तो त्यांचा नाईट ड्रेस असावा. खोलीला पश्चिमेकडे एकच एक भली मोठी काचेची खिडकी होती. वातानुकूलित खोली असल्यामुळे ती खिडकी उघडी होत नसे. परंतु लहान मोठी करता येई. त्या खिडकीतून पलिकडे दिसणाऱ्या खाडीचं विहंगम दृश्य दिसे. लहान मोठ्या बोटी, त्यावरील मालाची ये जा सतत चालू असे. मधूनच पाऊस येई व मधूनच लख्ख उन्ह पडे. सकाळी १० वाजेपर्यंत सर्व परिसर धुक्यानं भरलेला असे. पुढे तर २।३ दिवस तुफान वादळ वारा सुरू झाला, आणि बोटींची रहदारी संपली. धक्क्यावरची माणसांची वर्दळ थांबली. सर्व जीवनच थिजल्यागत झालं. बाहेर पडणं मुष्किल झालं. म्हणून आम्ही हॉटेलमध्येच खालीवर करीत वेळ काढू लागलो. पहिल्या मजल्यावरची बाररूम, दुसऱ्या मजल्यावरचे अद्यावत सजविलेले भोजनगृह, चौथ्या मजल्यावरचा स्विमिंग पूल, आणखी एका मजल्यावरील स्टोअर सर्वच प्रेक्षणीय, तळ मजल्यावर 'स्वागत कक्षा' आणि त्याला लागून भली मोठी बसण्या उठण्याची सुशोभित जागा ( लॉउंज ) पाऊस असला म्हणजे आम्ही येथे बसत असू व हॉटेलमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशांची गंमत पहात वेळ काढीत असू. तेथे असलेल्या एकमेव इंग्रजी समजणाऱ्या मुलीकडून आमचा बाहेर फिरण्याचा कार्यक्रम ठरवून घेऊन तिच्या-कडूनच इंग्रजीत व जपानी भाषेत लिहून घेत असू. कारण, इंग्रजी मजकूर पाहून

रस्त्यात कोणी आम्हांस मार्गदर्शन करू शकत नसे. आम्हांला साधी ब्रेड हवी होती पण ती कोठे मिळेल हे कोणाला सांगता येईना. शेवटी एका दुकानात थोडं इंग्रजी जाणणाऱ्या मुलीनं जपानीत लिहून दिले तेव्हा कोठे आम्हांला साधी ब्रेड मिळाली.

## नेत्रदीपक प्रगती

जपानवर अमेरिकेचे सुमारे २० वर्षे अधिपत्य होते. अमेरिकन सैन्यानं धुडगूस घातला होता. अनेक जपानी युवतींना भ्रष्ट केलं होतं अथवा त्यांच्याशी लग्न करून त्यांना अमेरिकेला नेलं होतं. पाश्चात्य संस्कृतीचे डोस जबरदस्तीनं जपानी लोकांना पाजण्यात येत होते. परंतु आता अमेरिकन सैन्य काढून घेतल्यापासून व व्हिएटनाममध्ये अमेरिकेची छी थू झाल्यापासून जपानी राज्यकर्त्यांनी अमेरिकन संस्कृतीचं समूळ उच्चाटन केलं आहे. मुली पुन्हा गळाबंद व पायघोळ झगे घालू लागल्या आहेत. इंग्रची भाषेची संपूर्ण हकालपट्टी झाली आहे. कोठेही इंग्रजी पाट्या दिसणार नाहीत. फक्त नंबर इंग्रजीत असल्यामुळे बसनंबर पाहून बसनं प्रवास करता येतो. मात्र कोणालाही इंग्रजीत विचारण्याची सोय नाही. आपला मार्ग चाचपडत का होईना आपल्यालाच शोधावा लागतो. टोकियो रेल्वे स्टेशन अतिभव्य आहे. त्यांच्या भुयारी गाड्या रस्त्याच्या फूटपाथ खालून जातात. त्यामुळे बसपेक्षा भुयारी गाड्यांचाच सर्रास वापर केला जातो. तसेच त्यांच्या अतिजलद गाड्या 'बुलेट ट्रेन' विख्यात आहेत पण आम्ही रेल्वेनं जाण्यास धजावलो नाही, कारण कोठेही इंग्रजी पाट्या नाहीत. गेल्या काही वर्षात जपानी लोकांनी अमेरिकन संस्कृती पार पुसून टाकून त्यांची मूळ संस्कृती पुन्हा आणली आहे, ह्याचा आजच्या तरुण पिढीला अभिमान वाटतो. एवढेच नव्हे तर औद्योगिक क्षेत्रात, विशेषत: इलेक्ट्रॉनिक, इंजिनियरींग, जहाजबांधणी, पूलबांधणी, घड्याळे, टेलिफोन इत्यादी क्षेत्रात त्यांनी सर्व पाश्चात्य देशांना मागे टाकले आहे. मोटार उत्पादनात आणि गुणवत्तेत त्यांनी उच्चांक गाठला आहे. आज अमेरिकेत प्रत्येक २ मोटारीत एक जपानी बनावटीची मोटार आहे. ह्या पुढील पायरी म्हणजे कॉम्प्युटर आणि रोबो (Robot) ह्यांची निर्मिती आणि निर्यात–जगाला थक्क करून सोडणारी आहे. रोबोच्या सहाय्यानं फक्त ३० कारागीर महिना ३० हजार मोटारीचे उत्पादन करू शकतात. रोबो केवळ एकाच पद्धतीचे (मॅकेनिकल) काम करीत नाही तर कॉम्प्युटरवर प्रोग्रॅम लावून दिल्यावर अनेक प्रकारची कामेही बिनचूक करतो.

## संप मोर्चे निषिद्ध

ह्या नेत्रदीपक प्रगतीचं रहस्य आहे कामगारांच्या समंजसपणात आणि त्यांच्या अंगी बाणलेल्या देशप्रेमात. देशाच्या प्रगतीला विघातक होईल अशी कोणतीही गोष्ट जपानी कामगार करीत नाहीत. आधी देश नंतर स्वत:चं कल्याण

ही त्यांची प्रतिज्ञा आहे. हे देशप्रेम आणि कर्तव्यतत्परता कोठून आली? ह्याचं उत्तर त्यांच्या मालकनोकर संबंधात मिळतं. जपानमध्येही ट्रेड युनियन आहेत आणि त्या कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्या पदरात पाडून घेतात. पण संप, हरताळ, करून नाही तर सामोपचारानं, मालकांशी वाटाघाटी करून, आम्ही संपावर आहोत हे फक्त काळी फीत लावून ते दर्शवितात, प्रत्यक्ष काम बंद करून नव्हे. गेल्या कित्येक वर्षांत मालक वर्गानं कामगारांना जवळ करून त्यांची उत्पादन क्षमतेबरोबर अशी काही पक्की गाठ मारली आहे की कामगाराचं भवितव्य सर्वस्वी कारखान्याच्या भवितव्याशी निगडीत झालं आहे. अधिक उत्पादन झालं की अधिक नफ्याच्या वाटणीत कामगारांचा रास्त हिस्सा त्यांना मिळतो. त्याप्रमाणात बोनस मिळतो. कारखान्यात जाण्या येण्याकरता अधिक भत्ता मिळतो, घर भाड्यात अधिक भर पडते, मुलांच्या शिक्षण खर्चात वाढ मिळते. आजारपणाच्या खर्चात कंपनीचा सहयोग वाढतो. थोडक्यात उत्पादन वाढवून दाखविले तर कामगाराला सर्व बाजूनं फायदा होतो. मालकवर्ग आणि कामगार ह्यांचं स्नेहबंधन एवढे घट्ट व एकजीव झालेले आहे की कामगाराच्या आईवडीलांचे वाढदिवस देखील कंपनी आवर्जून करते. त्यांना पुष्पगुच्छ पाठविते. आमच्या हॉटेलमधील त्या इंग्रजी समजणाऱ्या मुलीस पगार फक्त ३०० यु. एस्. डॉलर एवढा मिळतो. परंतु ज्याला पर्क म्हणतात, त्या इतर उत्पन्नाच्या बाबी तिच्या कामाप्रमाणे सारख्या वाढत असतात. म्हणून ती अधिक चांगलं काम करते आणि अधिक पैसे मिळविते. आज जगातील इतर कोणत्याही देशापेक्षा जपानमध्ये दरडोई उत्पन्न जास्त आहे. आणि उत्पन्न खूप असल्यामुळे आपणाला महागडं वाटणारं टोकियो, त्यांच्या दृष्टीनं सामान्य आहे. त्यांच्या नाण्याची (येन) किंमत जगात सर्वाअधिक आहे. यु. एस्. डॉलर त्यानंतर व जर्मनीचा ड्यूशमार्क त्याचे खालोखाल मजबूत आहे.

जपान संबंधी एवढे विस्तारानं सांगण्याचं कारण, दुसऱ्या महायुद्धात शरणागती पत्करलेला, त्यापुढे सुमारे २० वर्षे अमेरिकेने आपल्या टाचेखाली दाबून ठेवलेला हा छोटा देश जिद्दीनं, प्रखर मेहेनतीनं आणि जाज्वल्य देशप्रेमानं प्रेरित होऊन रसातळाला गेलेलं राष्ट्र पुनः उभं करण्यामागं लागला आणि २५ वर्षाच्या आत एक औद्योगिक क्षेत्रातील बलाढ्य राष्ट्र म्हणून मानानं कसा ताठ उभा आहे ह्याचा बोध आपण घ्यावा ह्या हेतूनं.

## शहरात फेरफटका आणि प्रयाण

पाऊस वारा खात आम्ही चार दिवस टोकियो, बघता येईल तेवढे बसमधून हिंडून बघितले. इंपिरिअल पॅलेस व त्या सभोवतीचा सुंदर बगीचा, हिबीया पार्क, टोकियो रेल्वेस्टेशन, धारातीर्थी पडलेल्या शहीदांचा स्तूप, अनेक देवालयं व त्या भोवतीचे बुद्धसंस्कृतीचे अवशेष, गिंझा ह्या त्यांच्या गजबजलेल्या बाजारपेठेत तर

आम्ही रोजच जात होतो, कारण तेथेच आम्हांस सापडलेले एकमेव हिंदी भोजनगृह होते. जपानी कुटुंबात रहाण्याची सोय असते हे आम्हांस उशीरा कळले, त्यामुळे जपानी कुटुंबाला जवळून पहावयास अथवा त्यांचा पाहुणचार घेण्याचा योग आला नाही. त्यांची राहाणी आपल्या राहाणीशी मिळती जुळती असते, म्हणजे खाली पाटावर बसून जेवण्याची पद्धत, जेवण वाढण्याची पद्धत वगैरे. त्यांचे शौचकूपही आपल्यासारखेच असतात आणि परदेशी प्रवाशांना त्यावर कसे बसावे हे चित्र काढून दाखविले जाते असे एक पत्रक आमचे हाती उशीरा पडले.

पाचव्या दिवशी सकाळी ११ वाजताच आम्ही हॉटेल सोडले व बरेच आधी विमानतळावर येऊन दाखल झालो. २९ ऑगस्टच्या संध्याकाळी आम्ही टोकियो विमानतळ सोडला आणि त्याचदिवशी सकाळी ११ वाजता आम्ही लॉस ॲंजेलसला पोहोचलो. उगवत्या सूर्याच्या देशातून (जपान) मावळत्या सूर्याच्या देशात (पश्चिम अमेरिका) २४ तासांचा फरक पडतो म्हणून आम्ही संध्याकाळी निघूनही सुमारे १२ तासाचा विमानप्रवास करूनही त्याचदिवशी सकाळी ११ वाजता पोहोचलो.

पॅसिफिक महासागर, अटलांटिक महासागर आणि लंडन ते मुंबई सातसमुद्र अशी तीन मोठी उड्डाणं आणि अंतरदेशीय १५ उड्डाणं असा आमचा 'उड उड जाये' प्रवास पूर्वयोजनेनुसार सुखानं पार पडला.

●

# उपसंहार

## शोध आणि बोध

आजच्या काळात दररोज शेकडो प्रवासी विलायतेला जात असतात, येत असतात. त्यामुळे विलायती प्रवासाची आता नवलाई राहिलेली नाही. आणि विलायतेच्या प्रवासाची एवढी वर्णने आपण वाचलेली असतात की त्यातही आता 'अपूर्वाई' राहिलेली नाही. तरीही माणसं विलायतेला जाण्याचं थांबत नाहीत, आणि त्यांची प्रवासवर्णनेही लिहीत रहातात. ह्याचं कारण, विलायतेचं आकर्षण आणि त्यासंबंधी अपार कुतूहल असावं. माझ्या विद्यार्थी अवस्थेत मी प्रथम आचार्य अत्रे ह्यांचा 'माझा विलायतचा प्रवास' १९३४–३५ साली, त्या काळी अत्यंत लोकप्रिय असलेल्या 'रत्नाकर' मासिकांतून वाचल्याचं आठवतं. त्या काळी बोटींनी प्रवास

करावा लागे, त्यामुळे देशोदेशींच्या विभिन्नतेबरोबरच हवामानाच्या फरकांचेही रसभरित वर्णन वाचावयास मिळे. आता विमानाच्या युगात सकाळी चहा घेऊन निघालेला प्रवासी दुपारच्या भोजनाला लंडनला आणि रात्रीच्या भोजनाला न्यूयॉर्कला पोहोचतो व विमाने वातानुकूल असल्यामुळे हवामानातील बदल त्याला तेथे पोहोचल्याशिवाय जाणवत नाही.

म्हणून प्रौढी मिरविण्यासारखं माझेजवळ काहीही नाही, तरीही मला माझं प्रवासवर्णन लिहिण्याचा मोह आवरला नाही ह्याचं कारण, प्रत्येकाचं विलायतेला जाण्याचं कारण निराळं असू शकतं. प्रत्येकजण आपआपल्या चष्म्यातून बघतो, त्याप्रमाणे त्याला विलायत दिसतं. कोणी शिक्षणाकरता, कोणी नोकरी करण्याकरता, कोणी एखाद्या कॉन्फरन्सला हजर होण्याकरता, कोणी एखाद्या विशिष्ट हेतूनं विलायतेला जातो. कोणी आपल्या मुलांना भेटण्याकरता तर कोणी टी. व्ही. किंवा रेडिओवर प्रशिक्षण घेण्याकरता जातो, परंतु केवळ विदेशी माणसं पाहण्याकरता जाणारा विरळाच. मी माझ्या पासपोर्टकरता कराव्या लागणाऱ्या अर्जावर 'देश पाहणे' (Sight seeing) एवढेच लिहिले होते. अर्थात माझा हेतू स्पष्ट होता व इतरांपेक्षा बराच निराळा होता.

आता देश पहाणं म्हणजे काय ह्याबद्दलही माझी कल्पना निश्चित होती. मला त्यांच्या इतिहासकालीन वास्तू बघावयाच्या नव्हत्या, त्यांच्या कोणत्याही मोठ्या उद्योगधंद्याची पाहणी करावयाची नव्हती. कोणत्याही चर्चेत भाग घ्याव-याचा नव्हता, की मला खास असं कोणाला भेटावयाचं नव्हतं. मग मला काय पहावयाचे होते ? मला इंग्लंड अमेरिकेच्या दिपवून टाकणाऱ्या प्रगतीमागचा 'माणूस' शोधून काढावयाचा होता. त्याची बौद्धिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय घडण बघावयाची होती. म्हणून रस्त्यावरील झाडूवाला, मोटार ड्रायव्हर, ऑफिस कर्मचारी, त्यांच्या घरात आणि समाजात बघावयाचा होता. त्यांच्या चालीरीती, घरातील कुटुंबाचा कर्ता पुरुष म्हणून त्याची कौटुंबिक वागणूक आणि समाजाचा जबाबदार घटक म्हणून त्याची सार्वजनिक वर्तणूक समजून घ्यावयाची होती. नवरा म्हणून, मित्र म्हणून, शेजारी म्हणून आणि काम कर-ण्याच्या जागी एक चाकरमान्या म्हणून त्याची विविध रूपं समजावून घ्यावयाची होती. म्हणून मी शेजारधर्म पाळणारे, न पाळणारे, बसमधील सहप्रवासी, त्यांची बहुरंगी स्वरूपं, रस्त्यात बसमध्ये, 'ट्यूब'मध्ये, स्टेशनच्या फलाटावर, दुकानांतून दिसणारी नानाविध माणसं पाहिली आणि त्यांच्या बाबतीत आलेल्या अनुभवांची नोंद माझ्या प्रवासवर्णनात केली. त्यांच्याकडील, नाव न घेता, त्यांच्या नसानसात रूजलेल्या लोकशाहीचं जवळून दर्शन घेतलं आणि ती सांभाळण्याकरता ते जी जागरूकता दाखवितात ती पाहून त्याची तुलना करणं अनिवार्य झालं.

देश म्हणून देश तर पाहिलेच कारण निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित तेथे खूप आहे. किंबहुना निसर्गानं ओंजळी भरभरून दिलेल्या अमाप संपत्तीचा कठोर परिश्रम करून मिळविलेल्या त्यांच्या अत्युच्च, श्रेष्ठ पदाचं अवलोकन डोळे भरून कोण करणार नाही ? पण हे सर्व बघत असताना त्याच्या मागचा हात महत्त्वाचा ह्याचं माझं भान सुटलं नाही.

म्हणूनच माझं प्रवासवर्णन चिंतनीय ठरावं असं वाटतं. त्यांच्या डोळे दिपवून टाकणाऱ्या प्रगतीचा शोध आणि त्यापासून आपण घ्यावयाचा बोध हेच माझ्या प्रवासवर्णनाचं सूत्र आहे. शास्त्रीय संगीतात एकच राग निरनिराळ्या घराण्याच्या गवयांनी गायला तरी तो ऐकणाराला निराळा वाटतो. एवढंच नव्हे तर एकाच घराण्याच्या दोन गवयांनी तो राग गायला तरीसुद्धा त्यात विभिन्नता दिसून येते, कारण राग तोच असला तरी तो मांडण्याची पद्धत, आवाज लावण्याची रीत निरनिराळी असते, म्हणून दोघांचेही गाणं आपआपल्या परीनं रंजक, आल्हाददायक होतं. प्रवासवर्णनाचंही तसंच का असू नये ?

वाचकांच्या सोयीसाठी माझ्या 'शोधा'चं व त्यावरील 'बोधा'चं थोडक्यात सारांश रूपानं येथे टिपण करीत आहे ते मनोरंजक वाटेल असा विश्वास वाटतो.

## इंग्रज व अमेरिकन माणसातील फरक

१) इंग्लंड हा पुराणप्रिय देश आहे. त्याला आपल्या इतिहासाचा जाज्वल्य अभिमान आहे. म्हणून इंग्रज माणसाने आपले कोटकिल्ले अजून चांगल्या सुस्थितीत ठेवले आहेत. म्हणूनच त्यांच्या राणीला जनमानसात अतिशय आदराचं स्थान आहे.

२) लंडनचे 'बिगबेन' बिघडलं तर दुसऱ्या दिवशी सर्व वर्तमानपत्रात ठळक अक्षरात छापून आले व त्याच्या दुरुस्तीची व ते का बिघडले ह्याची चौकशीची ताबडतोब व्यवस्था झाली.

अमेरिकेनं ते 'बिगबेन' फेकून दिलं असतं आणि त्या जागी एक १०० मजली टॉवर बांधून त्यावर दुसरे कॉम्प्युटरनं चालणारं, त्याहूनही मोठं घड्याळ बसविलं असतं !

जुनी वस्तू जतन करून ठेवणं हा इंग्रज माणसाचा व ती फेकून देऊन नवीन घेण्याचा अमेरिकन माणसाचा स्थायी स्वभाव आहे.

अमेरिकन माणूस दोन वर्षात मोटार बदलतो, तीन वर्षात घर विकून नवं घेतो आणि चार वर्षात आपली बायको त्याला बदलावीशी वाटते !

३) इंग्रज माणूस प्रथमदर्शनी अबोल, तुसडा, निर्विकार, दुसऱ्याविषयी आस्था न दाखवणारा वाटतो, परंतु त्याच्याशी बोलल्यावर त्याच्याइतका दुसऱ्याच्या उपयोगी पडणारा माणूस सापडणं कठीण.

अमेरिकन माणूस आपल्याच नादात असतो. त्याला काही विचारल्यास तो

जितक्यास तितके उत्तर देऊन चालू लागतो. आपल्याकरता एक क्षणही खर्च करण्यास तो तयार नसतो.

४) इंग्रज माणसात स्वयंशिस्त (Self discipline) अंगात मुरलेली आहे. त्याला कायद्याचा बडगा दाखवावा लागत नाही. शिस्त पाळणं हा एक धर्म म्हणून तो ती पाळतो. त्यामुळे लंडनचा 'बॉबी' एका आडोशाला उभा राहू शकतो.

अमेरिकन माणूस रस्त्यात सिगरेट टाकू शकतो ! न्यूयार्कचे रस्ते घाणेरडे होत असल्याची त्याला खंत नाही. आणि पोलिसांना दंडे घेऊन फिरावे लागते.

५) इंग्रज माणूस व्यवस्थित कपडे केल्याशिवाय बाहेर पडत नाही. रात्री भोजनास जाण्याचा खास पोषाख, इतर समारंभाला साजेसा पोषाख केल्याशिवाय तो जात नाही. जेवण्याचे संकेत व सर्व सार्वजनिक जागी शिष्टाचार पाळावेत ते इंग्रज माणसानेच.

अमेरिकन माणूस ऑफिसमध्ये जबरदस्तीनं सूट चढवून जातो. इतरत्र कोणत्याही समारंभालासुद्धा बुशकोट किंवा 'टी' शर्ट घालून जातो. अघळपघळ बोलतो आणि अनौपचारिक वागण्याने समारंभात मोकळेपणा आणतो.

६) इंग्रज माणसात 'वाकेन पण मोडणार नाही' हा बाणा अंगी मुरला आहे, म्हणून आज इतकी आर्थिक घसरगुंडी होऊनही तो खचलेला नाही. आपण गमविलेला मान आपण पुन्हा मिळवू म्हणून ताठ मानेनंच तो काम करीत आहे.

अमेरिकन माणसाला सर्व दिव्य भव्य सर्वोत्कृष्ट करण्याची हाव सुटली आहे. आपल्यापेक्षा श्रेष्ठ काही असताच कामा नये ही त्याची मनोधारणा आहे. म्हणून त्याला रशिया बरोबरी करूं पहात आहे ते सहन होत नाही.

७) इंग्लंड ही सर्व औद्योगीकरणाची जननी आहे. इंग्लंडनं करावं आणि इतर देशांनी त्यांचं अनुकरण करावं ह्याचा त्यांना रास्त अभिमान आहे, म्हणून अमेरिकेच्या अफाट औद्योगीकरणाला आणि संशोधनाला भिऊन न जाता इंग्लंड आस्ते कदम प्रगती करीतच आहे.

अमेरिकेनं आपलं औद्योगीकरण इंग्लंडच्या खांद्यावर उभं राहून केलं आहे. नाहीतर दोनशे वर्षांत त्यांची एवढी विज्ञानप्रगती झालीच नसती. अफाट संपत्तीच्या जोरावर त्यांची गती अतिजलद आहे एवढेच. तरीदेखील अमेरिकेच्या शोधांची गंगोत्री अजूनही इंग्लंडच आहे.

परवाच, अक्षरे जुळविणाऱ्या 'लायनो मशीन'च्या सहाय्यानं मिनिटाला ३००० अक्षरे जुळविण्याचा विक्रमी शोध इंग्लंडनं लावला. ही घटना बोलकी आहे.

८) इंग्लंडमध्ये लैंगिक स्वातंत्र्य मर्यादित आहे. आपल्या मुलीला घरी उशिरा आल्यावर जाब विचारणारे आईबाप तेथे आहेत. सेन्सारशिप, उदार असली तरीपण आहे. अमेरिकेत स्वैर, लैंगिक स्वातंत्र्य आहे. सेन्सॉरशिप नाही. वयात आलेल्या मुलामुलींनी विवाहबाह्य गैरवर्तन केलं तरी ते स्वाभाविक मानलं

जातं. त्यात काही फारसं गैर आहे असं ते मानत नाहीत.

९) इंग्रज शेजारधर्म जास्त कसोशीनं पाळतात. शेजारचा पॉल नित्यनियमानं जोशींच्या लहान मुलांना आपल्या बरोबर शाळेत नेई. त्यांचे पैसे सांभाळून ठेवी व संध्याकाळी उरलेले परत करी. संध्याकाळी शेजारच्या साळकाया माळकाया एकत्र जमून एकमेकींच्या सुखदु:खात सहभागी होतात. हे चित्र लंडनमध्ये पहावयास मिळते. न्यूयॉर्कमध्ये जो तो आपल्याच 'ह्याच्यात' असतो.

लंडनचं, किंबहुना सर्वच इंग्लंडचं जीवन शांत आहे त्यामुळे असेल कदाचित, इंग्रजी माणसं सहप्रवास करताना दिसतात. कामावर जाता येता जॉन, बेन एकमेकाला अभिवादन करून एकमेकांची विचारपूस करताना दिसतात तसे अमेरिकेत दिसत नाही. त्यांचे जीवन गतीमान धांदलीचे आहे आणि देशोदेशींचे लोक अमेरिकेत राहात असल्यामुळे आपआपले गट करून राहतात. म्हणून कोठे स्पानिश लोक, कोठे ग्रीक लोक, कोठे फेंच लोक समूहानं दिसतात व आपआपले सवते सुभे करून राहतात.

१०) इंग्रज माणसाला आपलं गतवैभव परत आणण्याकरता परिश्रमाची पराकाष्ठा करावी लागत आहे तर अमेरिकन माणसाला आपली अगणित संपत्ती अबाधित कशी राहील ह्या विवंचनेनं अधिक काम करावं लागतं.

११) इंग्रज माणूस जास्त उदारमतवादी आहे, म्हणून त्यानं इतर जाती जमातींना आपल्या जीवन प्रवाहात सामावून घेतलेले आहे. आज जगातील सर्व देशाचे लोक लंडनमध्ये गुण्यागोविंदानं आणि मानानं जगू शकत आहेत. ह्याचं कारण इंग्रजी शासनाची समान वागणूक. इंग्लंडमध्यें एवढी बेकारी असूनही मोठ्या हुद्याच्या जागी इतर देशांतील माणसं आहेत.

भारतीय व पाकिस्तानाविषयी आज जो दुजाभाव दिसतो आणि इमिग्रेशन कायदा जास्त कडक करण्यात आला आहे त्याला जबाबदार आपणच आहेत. आपल्या ज्या लोकांनी तेथें जाऊन 'दिवे लावले' आहेत त्यानं देशाला कमीपणा आणला आहे. साऊथहॉलचं चित्र पाहून आपली मान शरमेनं खाली होते त्यांना बोलण्यात काय अर्थ ?

अमेरिकेत मात्र हा भेदभाव निश्चित केला जातो पण हिंदी माणसाला त्याची तेवढी झळ पोहोचत नाही. कारण त्याला 'ब्राऊन' मानलं जातं आणि स्पॅनिश, ग्रीक ह्या लोकात आपला समावेश होतो. परंतु निग्रो जमातीबद्दल त्यांना विलक्षण घृणा आहे. अमेरिकन माणसाशेजारी निग्रो येऊन बसला तर तो तेथून उठून दुसरीकडे जाऊन बसतो. कागदावर समान वागणूक असली तरी प्रत्यक्षात चित्र निराळे दिसते.

मात्र त्यालाही जबाबदार निग्रो लोकच आहेत. चोऱ्या मारामाऱ्या करणं, अमली पदार्थ पुरवणं, वेश्या व्यवसायाकरता रस्त्यात उभं राहून लोकांना प्रलोभनं

दाखवणं, ज्याला 'जमिनीखालची दुनिया '(Under dog) म्हणतात तीत सामील होऊन हिंसा, अत्याचार, डाके घालणं इत्यादी बेकायदेशीर गोष्टी करणं ह्यात निग्रो लोकांचा पुढाकार असतो. आज न्यूयॉर्क, शिकागो, बोस्टन सारख्या मोठ्या शहरांतून त्यांनी घातलेले धुडगूस पाहिले म्हणजे अमेरिकन माणूस त्यांचेशी एवढा फटकून का वागतो ते समजतं. सर्व कायदे गुंडाळून ठेवून रस्त्यात धिंगाणा घालणाऱ्यांना कोण पाठीशी घालील ? मार्टिन ल्युथर किंगनं जी समानता मिळविण्याकरता आपलं रक्त सांडलं ती मिळवण्याकरता लागणारी बौद्धिक, सामाजिक व शैक्षणिक पात्रता ह्या निग्रो जमातींनी गाठलेली नाही हाच आजच्या निग्रो प्रश्नाचा गाभा आहे.

निग्रो लोक रस्त्यारस्त्यांतून जो पर्यंत असेच थैमान घालीत राहतील तो पर्यंत निग्रो अमेरिकन तणावाचा प्रश्न सुटणार नाही.

## त्यांच्या आमच्यातील भेद आणि मतभेद (टीके विना)

### १) विरळ लोकवस्ती

इंग्लंड अमेरिकेत किडचा मुंग्यांसारखी माणसं दिसत नाहीत. सांपत्तिक स्थितीचं जननक्रियेशी व्यस्त नातं असल्यामुळे असेल अथवा नियोजनात 'पहिली पहिल्यानं' कुटुंब नियोजनाला अग्रहक्क त्यांनी केल्यामुळे असेल, त्यांची लोकसंख्या त्यांचे काबूत आहे. आणि रहाणीमान अधिक उंचावले आहे. मात्र जपानमध्ये लोकवस्ती जास्त असूनही केवळ अत्यंतिक कष्ट करून त्यांनी आपले राहणीमान अति उंच ठेवले आहे.

### २) विलक्षण स्वच्छता

तेथे सर्व रस्ते, उद्याने, सार्वजनिक इमारती विलक्षण स्वच्छ असतात. कोणीही रस्त्यात कचरा टाकीत नाहीत, अगदी बसचं तिकीट सुद्धा. कचरा साफ करण्याची यंत्रणा अत्यंत कार्यक्षम आहे. हजारो टन कचरा रोजच्या रोज ठिकठिकाणी ठेवलेल्या डब्यातून गोळा केला जातो आणि त्याचा नायनाट करण्यात येतो. त्यात कधीही खंड पडत नाही. स्वच्छता अंगात बाणावी लागते. ती कायद्याचा बडगा दाखवून लादता येत नाही, याचे मूर्तिमंत उदाहरण येथे पहावयास मिळते. सिंगापूर हे तर जगातील सर्वात स्वच्छ शहर आहे. लंडनच्या मानानं, वॉशिंग्टन वगळता अमेरिकेतील शहरे तेवढी स्वच्छ नाहीत. टोकियो व हाँगकाँग दाट वस्तीची शहरे असूनही स्वच्छ आहेत.

### ३) कमालीची स्वयंशिस्त

येथे खाजगी अथवा सार्वजनिक जीवन अत्यंत शिस्तबद्ध आहे. ह्यातही कायद्याची अंमलबजावणी दंडुका दाखवून करावी लागत नाही. बसच्या थांब्यावर, ट्यूब रेल्वेच्या फलाटावर, सार्वजनिक मुत्र्यांवर रांगा लावायला कोणी कोणाला

सांगायला लागत नाही. त्यामुळे सर्व व्यवहार सुरळीत विनबोभाट चालू असतात. मुत्र्या आणि सार्वजनिक ठिकाणे व उद्याने विलक्षण स्वच्छ राहातात.

ह्या शिस्तीचा एक भाग म्हणजे सचोटी. मुताऱ्यांमध्ये स्वच्छता तर असतेच परंतु तेथे ठेवलेले साबण, टुवाल वगैरेही कोणी उचलून नेत नाहीत. पोस्टात लिहिण्याकरता ठिकठिकाणी टेबलावर बॉलपेन ठेवलेली असतात. ती लिहून झाल्यावर तेथेच ठेवली जातात. तेथे दुकानातून, हॉटेलमधून ज्यांनी त्यांनी पाहिजे त्या वस्तू उचलावयाच्या असतात व त्याचा हिशोब बाहेर पडताना चुकता करावयाचा असतो. त्यात सहसा लांडीलबाडी होत नाही. पुष्कळशा बसमध्ये आपल्या आपण तिकीट घ्यावयाचे असते. तिकीटाच्या किंमतीपेक्षा जास्त प्रवास करणारा माणूस विरळा. पुष्कळशा ठिकाणी पेपर ठेवलेले असतात. ते विकणारा माणूस गायब असतो पण लोक योग्य ती किंमत तेथे टाकून पेपर उचलीत असतात.

हा सार्वजनिक जीवनातील प्रामाणिकपणा लंडनमध्ये जास्त जाणवतो. अमेरिकेत सार्वजनिक जीवनातील माणूसच गायब झाला आहे. बहुतेक कामे यंत्रच करीत असल्यामुळे अप्रामाणिक व्हावयास तेथे वावच नाही.

## ४) दूरवर विचार करून केलेली नगररचना

लंडन शहर एवढे जुने असूनही त्याची आधुनिक रचना पाहून अचंबा वाटतो. रुंद रस्ते, त्याचे दोन्ही बाजूला रुंद फुटपाथ, सार्वजनिक ठिकाणांसभोवती भरपूर मोकळी जागा, ठिकठिकणचे मोठमोठे चौक, प्रशस्त उद्याने ह्यांना सतत वाढत्या वस्तीचा ताण अथवा बाधा होत नाही. लंडनचा हाईड पार्क, केनसिंग्टन पार्क अथवा रिजंट पार्कची विस्तृत मैदाने पूर्व नियोजित नसती तर त्यांनी एवढी जागा अडविली नसती. भर शहरात मोठमोठल्या वृक्षांनी सुशोभित असलेली 'वूड फॉरेस्ट' म्हणजे पूर्वीच्या लोकांनी घालून दिलेला नगर रचनेचा जगानं गिरवावा असा वास्तुपाठ मानावा लागेल.

लंडनची ' ट्यूब ' रेल्वे विकसित देशात आजही आदर्श म्हणून मानली जाते. त्याची बरोबरी अमेरिकेलाही अजून करता आलेली नाही. लंडनच्या मोठमोठ्या इमारतीखालून भुयारी रेल्वेचं जाळं गेलेलं आहे हे सांगूनही खरं वाटणार नाही. आणि ही सर्व योजना शंभर वर्षांची जुनी आहे. ह्यावर विश्वास बसत नाही. आपल्या शहराची संभाव्य वाढ लक्षात घेऊन इंग्रजांच्या पूर्वजांनी केलेल्या शहराच्या आखणीचं कोण कौतुक करणार नाही ?

अमेरिकेची शहरं त्या मानानं नवीन. त्यामुळे त्यांची नगररचना करणं त्या मानानं सोपं आणि कमी जिकीरीचं. ह्या बाबतीतही अमेरिकेची गंगोत्री लंडनच आहे. लंडनच्या रचनेत थोडे फेरबदल करून त्यांनी आपले रस्ते जास्त मोठे आणि सरळ रेषेत ठेवले आहेत व त्यांना कोणाही व्यक्तींची अथवा ठिकाणांची नावे न

देता अनुक्रम नंबर दिले आहेत. त्यांची ' सब वे' भुयारी रेल्वे मात्र लंडन 'टच्यूब'-च्या पासंगालाही शोभत नाही एवढी टुकार आहे. लंडनचं अनुकरण करूनही एक वॉशिंग्टन सोडलं, तर अमेरिकन शहरांतून कोठेही हाईड पार्कसारखी प्रचंड उद्यानं नसावीत ह्याचं आश्चर्य वाटतं. मात्र सिंगापूरनं सर्वांवर कडी केली आहे. बाग-बगिचे व रस्त्यांच्या दुतर्फा हिरवळ व मोठमोठ्या वनराजी परिश्रमपूर्वक जोपासून त्यांनी शहर देखणं केले आहे.

ह्या वर्षी पाऊस कमी पडल्यामुळे इंग्लंडमध्ये पाण्याचा दुष्काळ होईल ह्या भितीनं प्रथमच ' पाणी जपून वापरा ' अशी पत्रके काढावी लागली. पण पाणी ' फक्त रात्री आठ ते नऊ ' सोडण्यात येईल अशी हास्यास्पद आणि लाजिरवाणी गोष्ट त्यांचेकडे संभवनीय नाही. टोकियोत सर्व पाणी शुद्धीकरण केलेले असते.

अमेरिकेत तर गोडच्या पाण्याचे समुद्रवजा तलाव आहेत. तेथील तलावातून शेकडो मैलांवरून पाईप टाकून पाणी आणले आहे. पाण्याच्या तोटच्यांतून एवढे जोराने पाणी येते की पाण्याच्या तोंडालादेखील फेस येतो ! बरं त्यातून पाणी कमी पडलं तर एवढे मोठे दोन महासागर दोन्ही बाजूला पसरलेले आहेत. त्यांचे खारं पाणी गोडं करणं, ह्या बोटाची थुंकी त्या बोटावर करण्याइतकं, त्यांना सोपं आहे. पाण्याची एवढी विपुलता असूनही डाव्या हाताच्या तोटीतून पडणारं गरम पाणी म्हणे गटारांतून वाहणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया (Recycled) केलेलं असतं असं म्हणतात.

## ५) वाहतूकीची साधने व रस्ते

वाहतूकीची साधनं जेवढी संपन्न तेवढी देशाची औद्योगिक प्रगती जलद ह्याची जाण सर्वात जास्त कोणाला असेल तर ती ह्या पाश्चात्य देशांना. जलद वेगानं जाणाऱ्या अधिक अश्वशक्तीच्या आधुनिक मोटार गाडयांचे उत्पादन दोन्ही देशात एवढे प्रचंड आहे की अमेरिकेत तर मिनिटाला एक गाडी निर्माण करणारे अनेक कारखाने आहेत आणि त्यांनी अमेरिकेचे रस्ते भरून टाकून वर ते फार मोठ्या प्रमाणावर निर्यात करीत आहेत. मात्र आता जपाननं मोटारींच्या बाबतीत उच्चांक गाठला आहे, उत्पादन आणि क्षमता ह्या दोन्हीत त्यांनी सर्व जगातील पुढारलेल्या देशांतील बाजारपेठ काबीज केली आहे. दर वर्ष दोन वर्षांत अमेरिकन माणसाची गाडी जुनी होते व त्या जागी दुसरी नवी गाडी येते. इंग्लंडमध्ये देखील आता बहुतेक गाडया लहान का होईना नव्या असतात व रस्ते गाडयांनी भरलेले असतात. लंडनच्या टॅक्सी सुद्धा आता नव्या कोऱ्या आहेत, मात्र त्या त्यांच्या स्वभावानुसार खूप जुन्या मॉडेलची बरहुकूम नक्कल आहे. स्वतःच्या मोटारीमुळे तेथील लोक मिनिटं सेकंदाच्या हिशेबानं वेळेवर पोहोचतात, वेळेवर आपली अपॉईंटमेन्ट पाळतात आणि वेळेवर व कमीत कमी त्रासात ऑफिसमध्ये पोहोचल्या-

मुळे जास्त कार्यक्षम व तरतरीत राहतात. ज्यांना मोटारी परवडत नाहीत त्यांचे-करता ' टयूब ' ' सबवे ' किंवा ' मेट्रो ' रेल्वे आहेत त्या वेळाप्रमाणे चालतात व त्यांत सहसा बिघाड होत नाही किंवा वादळ पावसामुळे त्यांची भुयारं पाण्यानं भरून जात नाहीत. त्यांच्या बस सर्व्हिसबद्दल तर करावी तेवढी प्रसंशा थोडीच होईल. अमेरिका आपल्या देशाच्या तिप्पट आकाराचा व कॅनडा त्याहूनही मोठा देश आहे. परंतु त्यांचं बस्चं जाळं एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत उभं आडवं पसरलेलं आहे. रेल्वेसारखी त्यांची वेळापत्रकं असतात आणि त्या हजारो मैल प्रवास करून एका ठिकाणाहून दुसऱ्यावर ठिकाणावर ठीक दिलेल्या वेळेवर पोहो-चवितात शहरातील बसेसही एवढ्या नियमित वेळेवर येतात की आपण बसनं प्रवास करूनही ठीक वेळेवर पाहिजे त्या ठिकाणी पोहोचू शकतो. मुंबईत ८१ नंबर करता बाट पहात असताना १, ४, २०१, ३१५ आपणास हवी असलेली बस सोडून कोणतीही, एका पाठोपाठ एक येऊन आपणास वैताग आणते किंवा शेवटी पुष्कळ वेळ वाट पाहिल्यावर आपणास हवी असेल ' ती ' बस येते पण ती वरळी किंवा ताडदेवपर्यंतच जाते, म्हणजे आपले चेहरे जसे पहाण्यासारखे होतात, तशी ' गंमत ' त्यांना पहावयास मिळत नाही, ही त्यांच्यात मोठीच कम-तरता आहे ! त्यांच्या रेल्वे गाड्या ह्या बहुधा माल वाहण्याकरताच असाव्यात. बसपेक्षा रेल्वे भाडे जास्त असल्यामुळे लोक बहुधा बसनेच प्रवास करतात. मात्र बहुतेक जड वाहतुक रेल्वेनं होते. अपवाद जपानचा. त्यांच्या रेलगाड्यांनी बनावटीत आणि वेग मर्यादित उच्चांक गाठला आहे. उदा. त्यांची बुलेट ट्रेन. ' टेक्सास ' मधून जाताना मी एका मालगाडीला मोजून ७८ डबे असलेले पाहिले. त्या गाडीला पुढे दोन व मागे एक अशी तीन इंजिने होती. आणि सर्व डबे तेलवाहू होते. एका ठिकाणी एका मालगाडीत सर्व डबे मोटार गाड्या भरून जात होते. प्रत्येक डब्यात एकावर एक ठेवलेल्या आठ गाड्या होत्या व गाडीला किमान ६० डबे होते. तयार मोटारीची जा ये मोठ्या व्हॅनमधूनही हमरस्त्यावर दिसते. त्यातही एका व्हॅनमध्ये आठ गाड्या खुबीनं ठेवलेल्या असतात आणि त्या व्हॅन्स (त्यांना मोठी गाडी Long Van म्हणतात) इतर मोटारींपेक्षाही वेगानं जातात. सिमेंटची वाह-तूक गोल टँकरमधून आणि लाकूड ओंडक्यांची, तुळयांची उघड्या ट्रकमधून. भाजी पाल्याच्या मालगाडीसारखे डबे असलेल्या पण बंद गाड्या असतात, जहाज वाहतूक तर इंग्लंडची मिरासदारी. एका काळी जर्व जगाचा माल ने आण करण्याचं काम ब्रिटीश बोटी करीत असत व अजूनही त्यांना अग्रपूजेचा मान आहे. इंग्लंडच्या बंदरपट्टीवर जहाज बांधण्याचे असंख्य कारखाने आहेत आणि नवीन नवीन जहाजे बाहेर पडत आहेत. अमेरिकेने आपला आयात निर्यात माल आपल्याच बोटीतून ने आण करण्याची क्षमता तर गाठली आहेच परंतु इतर देशांचाही माल नेण्याएवढी जहाजं त्यांचे जवळ आहेत. शिवाय त्यांची देशान्तर्गत माल वाहतूक त्यांनी त्यांची

मोठी सरोवरे एकमेकांना कालव्यानं जोडल्याने पॅसिफिकपासून अटलांटिक महासागरापर्यंत विना अडथळा चालू शकते. हवाई वाहतुकीतही ह्या दोन्ही देशांनी उच्चांक गाठला आहे. अमेरिकेच्या सर्व मोठ्या विमानतळावरून मिनिटाला एक ह्याप्रमाणे सुटणाऱ्या विमानातून प्रवासी आणि माल वाहतूक सतत चालू असते. रेल्वे गाड्या, भुयारी गाड्या, मोटार गाड्या, बसेस, व्हॅन्स, ट्रक्स ही भूभागावरून, अजस्त्र आगबोटी, जहाजे, टॅंकर्स ही पाण्यावरून आणि जांबोजेटसारख्या असंख्य विमानांनी हवेतून, पाश्चात्य देशांत प्रचंड उद्योगधंद्यांच्या रक्त वाहिन्या सतत वहात ठेवल्या आहेत. तोच कित्ता आता जपाननं गिरविला आहे. नव्हे त्यातही अग्रहक्क मिळविला आहे.

## हमरस्ते

परंतु ह्या दळणवळण करणाऱ्या जलद वाहनांची ने आण करण्यास तेवढेच कार्यक्षम रस्ते हवेत. अन्यथा, नव्या गाड्या सुद्धा काही दिवसातच खिळखिळ्या होतील, आणि रेलगाड्या उलथून पडतील. (आपल्याकडील अनुभव बोलका आहे)

दळणवळणाची उत्कृष्ट साधने आणि त्याकरता तेवढेच चांगले रस्ते असणं आवश्यक आहे हे प्रथम हिटलरनं ओळखलं. त्याचा हेतू फौजेची ह्या टोकापासून देशाच्या दुसऱ्या टोकाला दृतगतीनं हालचाल करता यावी हा होता. म्हणून त्यानं ' अटो बॉन ' ह्या नावानं अत्यंत प्रशस्त लांब, रुंद रस्ते जर्मनीत प्रथम बांधले. आज त्याच्याच पावलावर पाऊल टाकून जगातल्या सर्व पुढारलेल्या राष्ट्रांनी आपल्या देशात अशा रुंद एकेरी वाहतुकीचे मोठमोठे रस्ते बांधले आहेत. रस्त्यावर खड्डे नाहीत. मोठ मोठी रिपेअरची कामे काही तासात बहुधा रात्रीच्या वेळी केली जातात. अमेरिकेच्या ' फ्रीवे ' वर एकाच वेळी ६ लेनमध्ये एकतर्फी मोटारींची जा ये चालू असते. शेकडो मैलात त्यांना वळणे नाहीत की दुसरे रस्ते आडवे येत नाहीत. ठिकठिकाणी ' फ्लाय ओव्हर ' बांधून ती अडचण दूर केली आहे. त्यांचेकडे गाडी कमी वेग मर्यादेनं चालविणं गुन्हा आहे. प्रत्येक गाडीनं आपआपल्या वेग-मर्यादेनुसार त्या त्या लेन मधून गाडी चालविली पाहिजे. त्यामुळं जड वाहने, बसेस ह्यांचा उपसर्ग न होता हजारो मैलांचा प्रवास ठरल्यावेळी होतो.

बैलगाड्या, हातगाड्या, घोडागाड्या ह्यांचे त्यांनी कधीच उच्चाटन केले आहे. वाहतूक नियंत्रण व्यवस्था चोख आहे. त्यामुळे न्यूयॉर्कसारख्या शहरांत शंभर रस्ते आडवे येत असूनही मोटारी भरधाव जाताना दिसतात.

आमचा बहुतेक प्रवास विमानानं झाला व आम्हांस उतरवून घेणाऱ्यांच्या सोईकरिता आम्ही बहुधा दिवेलागणीच्या सुमारास दुसऱ्या शहरी पोहोचत असू. दिव्यांच्या ओळी पाहून आम्हास शहराच्या नगर रचनेची व त्यांच्या रस्त्यांची स्पष्ट कल्पना करता येई. दिव्यांच्या रांगावरून रस्ते सरळ एका रेषेत लांबच लांब पसरलेले व त्यांना आडवे जाणारे एव्हेन्यू फ्लायओव्हरनं जोडलेले

असतात. कोठेही अडथळा होत नाही. सान अँन्टोनियोची रचना विशेष लक्षात राहण्यासारखी आहे. संबध शहराला एक ५५ मैल लांबीचे रस्त्याचे वर्तुळ आहे व शहराची संभाव्य वाढ लक्षात घेऊन बाहेरून ११० मैलाचे दुसरे वर्तुळ आहे. ह्या दोन वर्तुळी रस्त्यांना फाटे फोडून शहराच्या मध्यभागी जाण्याचे रस्ते आहेत. त्यामुळे कमीत कमी वेळात शहराच्या कोणत्याही भागात जाता येते. सॅन अँन्टोनियो, ह्यूस्टन ही शहरे आणखी वाढत आहेत. म्हणून कॉर्पोरेशननं आधीच रस्ते, बगीचे व दुर्तफा झाडे लावून ठेविली आहेत. तुरळक घर बांधणीचं काम दिसते. उद्या तेथे अनेक कॉलनीज् होतील पण सरकारनं आधीच त्याचा आराखडा पक्का करून सर्व सुविधा तेथपर्यंत आणून ठेवल्या आहेत.

जपानची औद्योगिक प्रगती नेत्रदीपक आहे. पण त्यांना वाहतुकीचा प्रश्न नीटसा सोडविता आलेला नाही, ह्याची खात्री त्यांच्या बसेसनं प्रवास करताना जाणवते. हाताहातावर आडवे रस्ते व लाल दिवे. त्यामुळे अक्षरशः आपली बस अथवा मोटार मुंगीच्या गतीनं जात असते. त्यापेक्षा चालणं परवडतं. बस टॅक्सी ह्यात ट्रॅन्समिटर बसविलेले असतात व वाहतूकनियंत्रण कचेरीतून ड्रायव्हर्सना अमूक रस्त्यावरून जाऊ नका, तेथे वाहतूक अडकून पडलेली आहे वगैरे जपानी भाषेतून संदेश येत असतात. तसेच काही रस्त्यानं तुमची टॅक्सी सकाळच्या वेळात गेली तर उतरूंकडून जास्त पैसे वसूल केले जातात, टोकियो ' नरिटा ' एअरपोर्ट ४५ मैल दूर आहे. म्हणून प्रवाशांना संभाव्य लागणाऱ्या वेळापेक्षा २।३ तास जास्त लागतील असं समजून निघालं पाहिजे; नाहीतर विमानाची वेळ गाठणं कठीणच. ह्या उलट, सिंगापूरला त्यांच्या वातानुकूल मर्सिडीस टॅक्सीतून तुम्ही केव्हाच विमानतळावर पोहोचता.

आज काल आपण ' इन्फ्रास्ट्रक्चर ' हा शब्द अधूनमधून ऐकतो. औद्योगिक कारखान्याची प्रथम पूर्व तयारी म्हणजे कच्च्या मालाचा विपूल साठा, यंत्र सामग्री, मुबलक पाणी आणि दळणवळणाची साधने ह्या अर्थी तो शब्द वापरण्यात येतो. परंतु त्यातील दळणवळण ह्या महत्त्वाच्या भागाचा आपल्याला विसर पडतो. दळण-वळण साधने वाढविल्यानं ओसाड माळरानही फुलविता येते आणि सुप्त खनिज-संपत्ती बाहेर काढता येते ह्याचे प्रात्यक्षिक येथे पहावयास मिळते. कोकणाला पुरेशी निसर्गसंपत्ती नाही म्हणून दळणवळणाकरता रेल्वे मार्ग मिळत नाही. आणि रेल्वेमार्ग नाही म्हणून त्या भागाचा विकास होत नाही असं त्रांगडं त्यांचेकडे नाही.

## ६) मजुरीची प्रतिष्ठा

त्यांचेकडे कोणतेही काम हलके मानले जात नाही. बस ड्रायव्हर, कंडक्टर, रेल्वेचा तिकीटविक्रेता, आणि रस्त्यावर व बगीच्यात झाडू मारणारा झाडूवाला हे प्रतिष्ठेनं समाजात वावरतात. त्यांना कुणी कनिष्ठ क्षुद्र मानीत नाही. आपआपलं

काम झाल्यावर तो त्याचा गणवेश उतरवून ठेवतो आणि चांगले कपडे करून समाजात मिसळतो. त्यांना आपल्या मानानं पगार चांगला असला तरी त्यांच्या राहणीमानानुसार कमीच असतो. तरीही तो कमी लेखला जात नाही. 'ग्रेहाऊंड'च्या बस ड्रायव्हरला (त्यांना तेथे ऑपरेटिव्ह म्हणतात) पगार ताशी आठ ते बारा डॉलर मिळतो. म्हणजे, त्याला महिन्याला काम केलेल्या तासानुसार १५०० ते २००० डॉलर एवढा मोठा पगार मिळतो. बस कंडक्टर शिवाय जबाबदारीनं हजारो मैल बस सुखरूप चालविण्याबद्दल ही रास्त मजुरी समजली जाते. आपल्या पेशाचा न्यूनगंड नसल्यामुळे व त्याचे राहणीमान उंच असल्यामुळे तो मनापासून काम करतो, जास्त काम करतो. त्यामुळे मजुरीची बचतच होते.

मजुरीची प्रतिष्ठा लहान मुलांच्या अंगी बाणविली जाते. तेथे चांगल्या सधन कुटुंबातील मुले पेपर टाकण्याचे काम करतात. डॉ. नंदापूरकरांचा मुलगा देखील सहा महिने पेपर टाकीत असे. अर्थात त्याचा ताप सौ. नंदापूरकरांनाच जास्त झाला हा भाग निराळा. कारण, त्यांना रोज सकाळी लवकर उठून पेपरांना घड्या घालाव्या लागत आणि १५०।२०० पानी पेपरांचे गठ्ठे व मुलाला गाडीत घालून दारोदारी मोटार घेऊन फिरावे लागे. जोशींची गाडी दर रविवारी शेजारचा बेन आणि रिची धुवत असत. त्यांचा बाप एका मोठ्या हुद्यावर नोकरी करीत होता. मिळणारे पैसे त्यांची 'पॉकेट मनी' म्हणून ते खर्च करीत. स्वावलंबन आणि कष्ट करून तेथील शाळा कॉलेजातील मुले आपली वर्षाची फी देखील बाहेर काढतात. माझ्या युरोपच्या बसवरील 'बॉबी' वाटाड्याचं काम करून आपलं कॉलेज शिक्षण पुरं करीत होता. 'डिस्नेलँड' मध्ये १६।१७ वर्षांची मुलं स्वच्छ पांढरे कपडे घालून सपासप झाडू मारत होते, एका हातात लांब काठीचा झाडू व दुसऱ्या हातात तेवढ्याच उंचीच्या ट्रे मध्ये ते अशा शिताफीनं सिगरेटची थोटकं, कचरा न वाकता उडवून जमा करीत होती की मी कित्येक वेळ त्यांचेकडे बघत राहिलो होतो. न राहवून मी त्या देखण्या मुलांना त्यांची नावे व माहिती विचारली. ती कॉलेजमध्ये जाणारी मुलं होती. 'समर' च्या सुटीत ती नेहमीच येथे काम करून फीचे पैसे मिळवितात, असं त्यांनी सांगितलं. लंडनच्या सफारी पार्कमध्ये अशाच देखण्या हसतमुख तरुणी झाडू मारताना पाहिल्या होत्या परंतु मला त्यांना विचारण्याचा धीर झाला नाही !

## ७ ) स्त्री पुरुष नाती व सामाजिक संबध

आपल्या हिंदुपद्धतीनं लाजा होमाभोवती सात प्रदक्षिणा घालून घेतलेल्या शपथा जास्त मंगलमय, टिकाऊ असतात. लग्न हे धर्मसंस्काराने देवा ब्राह्मणाला साक्ष ठेवून, ह्या सात शपथांच्या पूर्तीसाठी असतं. दोन जीव कायेनं, वाचेनं, मनानं एकरूप होतात आणि जन्मभर एकमेकांच्या सावलीत जीवनाची वाटचाल करतात.

संस्कारानं, रूढीनं, आपल्या लग्नगाठी अजरामर राहतात. फारकतीचा कायदा अपवादात्मक वापरला जातो. त्यांचेकडे लग्न हा 'धर्मबंध करार' ( Sacred contract) असतो. त्यामुळे कराराच्या अटी पाळल्या नाहीत तर एकमेकाला विभक्त होण्याचा हक्क आहे. आणि एवढ्या तेवढ्यावरून विभक्त होण्यात त्यांना काही वाटत नाही. लंडनला जोशींच्या शेजारचा बेन दोन लहान मुलांना अंगडंटोपडं घालताना पाहिला. त्याची बायको दुसऱ्याचा हात धरून पळून गेली होती व तिने विभक्त होण्या करता अर्ज केला होता. ओकलॅंडला शेजारच्या बंगल्यातील ५२ वर्षांच्या बाईला तिच्या नवऱ्यानं 'डायवोर्स' घेऊन मोकळी केली होती. तिच्या नावावर बंगला गाडी व बँकेतील सर्व शिल्लक करून दिल्यावर दुसऱ्या तरण्या मैनेबरोबर लग्न करण्यास तो मोकळा झाला होता. लोकांचा लाडका जॉन केनडी मेल्यावर त्याची बायको ( जॅकलिन ) एका म्हाताऱ्याबरोबर लग्न करून उडून गेली हा इतिहास ताजा आहे. नव्याची हाव, लैंगिक स्वातंत्र्य आणि समाजाची सहिष्णुता ह्यामुळे त्यांचेकडील लग्ने म्हणजे वज्रगाठी नव्हेत.

लैंगिक स्वातंत्र्यामुळे उद्याची पिढी बहुधा लग्न बंधनात न पडताच स्वैर-जीवन जगू लागली तर त्यात आश्चर्य करण्यासारखं काही नाही.

गेल्या वर्षी काश्मीरच्या सफरीत एका जर्मन युवक युवतीचा सहप्रवास घडला. व ओळखही कायम राहिली. दोन वर्षांनंतरही आम्ही अजून लग्नाचा विचार पक्का केला नाही असं ते आम्हास पत्रानं कळवितात !

## म्हाताऱ्या माणसांचा प्रश्न

म्हाताऱ्या माणसांचा प्रश्न ही एक मोठी सामाजिक समस्या आहे. अपार्टमेन्टच्या तळघरात एक शयनगृह असलेल्या जागेत बहुधा म्हातारे. म्हातारी राहतात, घरासमोर छोट्या बागेत काम करतात व बहुतेक वेळ तेथेच आराम-खुर्च्या टाकून पडतात. त्यांना पेन्शन मिळते किंवा बेकारभत्ता तरी मिळतो, त्यावर त्यांची कशीवशी गुजराण होते. त्यांची मुलं त्यांना जवळ करीत नाहीत. म्हणून त्यांच्या आजाराची सरकार काळजी घेतं. त्यांना 'पोक्त माणसं' Senior citizen म्हणून बऱ्याच सवलती मिळतात.

सामाजिक न्याय, Social security कायदे जारी असल्यामुळे समाजातील बेकार लोकांना बेकारी भत्ता मिळतो. तेथे कोणीही रस्त्यावर भीक मागत फिरणार नाही. कारण, सरकार त्यांना बेकार भत्ता देऊन त्यांच्या पोटापाण्याची सोय करते. 'बेकार भत्ता' मिळत असल्यामुळे पुष्कळ लोक चांगली नोकरी मिळेपर्यंत लहान-सहान अथवा कष्टाच्या नोकऱ्या करीत नाहीत. अमेरिकेत निग्रो लोक 'बेकार भत्ता' घेऊन रस्त्यात मारामाऱ्या करतात. पण कष्टाची नोकरी करण्याचे नाकार-तात. ही देखील अमेरिकन सरकारला डोकंदुखी होऊन बसली आहे.

## उद्योग धंद्यात मुक्तांगण

तेथे व्यापार धंद्याचे स्वातंत्र्य आहे. (Free Trade). थोडया कमी अधिक टॅरिफ डयुटी असतील पण परदेशांतील कोणताही माल तेथे मिळू शकतो. उद्योग कारखान्यांना मक्तेदारी ( Monopoly ) नाही त्यामुळे कोणत्याही कारखान्यांत वाटेल ते व हवं तेवढं उत्पादन करावं व जगाच्या चुरशीच्या बाजार पेठांना तोंड द्यावं. आजकाल जपानच्या मोटारींनी आणि टेपरेकॉर्डस् वगैरे इलेक्ट्रॉनिक मालांने अमेरिकन बाजारपेठ भरून गेली आहे व त्यांचे बरोबर टक्कर देणं कठीण होऊन बसलं आहे. जपानी लहान मोटारींनी तर फोर्ड, जनरल मोटार्ससारख्या बडया मोटार कारखान्यांना आपली उत्पादन तंत्र बदलण्यास भाग पाडले आहे व आता जपानी लहान गाडयांप्रमाणे लहान गाडयांचे उत्पादन त्यांनी सुरू केले आहे. तरीही अमेरिकन सरकार हस्तक्षेप करीत नाही, कारण आपल्या उद्योगधंद्यांनी अंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आपल्या गुणवत्तेवर टिकून राहिले पाहिजे असा त्यांचा निर्धार आहे. व्यापार धंद्यात 'मुक्तांगण' ( Free Competition ) असल्यामुळे मालाची गुणवत्ता वाढते आणि किंमती कमी होतात. अमेरिकन वस्तूंची रोजच्या रोज होत असलेली सुधारणा आणि माफक किंमती ह्याचं इंगित ह्या आंतरराष्ट्रीय चुरशीला आहे. आपल्या मालाची गुणवत्ता पटवण्याकरता टी. व्ही. वर जाहिरातीचा पाऊस पडतो. व टी. व्ही. चा कारभार त्यावरच चालतो. 'मक्तेदारी' मुळे आपल्या देशात मालाचा दर्जा किती खालावला आहे हे 'मोटारीत' बसणाराला तरी सांगावयास नको !

## मक्तेदारीचा अभाव

आपल्या देशात उद्योगात राष्ट्रीयीकरण केलं की उत्पादन वाढेल व लोकांना वाजवी किंमतीत वस्तू मिळू शकतील अशी भ्रामक कल्पना आहे. 'मक्तेदारी' आणि 'राष्ट्रीयीकरण' ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एका टोकाला 'मक्तेदारी' आणि दुसऱ्या टोकाला 'राष्ट्रीयीकरण' ह्यांच्यामधला मार्ग म्हणजे खाजगी उद्योगांत चुरस लावून मालाचे उत्पादन व गुणवत्ता वाढविणं. इंग्लंड अमेरिकेत सर्व उद्योगधंदे तर खाजगी मालकीचे आहेतच पण दळणवळणाची साधने, भुयारी रेल्वे, बस, विमा कंपन्यादेखील खाजगी मालकीची आहेत. रेडिओ, टी. व्ही. चे जाळे खाजगी मालकीचे व त्याचेवर कोणतेही सरकारी नियंत्रण नाही. त्यांच्यातील आपसातील चुरशीमुळे ह्या सर्व यंत्रणा अत्यंत कार्यक्षम, दक्ष आणि लोकाभिमुख आहेत. 'चुरस नाही–सुधारणा नाही.' ( No Competition-No Efficiency ) ही त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे. मग त्यांना 'भांडवलशाही' म्हणलं तरी त्यांना पर्वा नाही. राष्ट्रीयीकरणात आणि मक्तेदारीत हा कणाच

आहे म्हणून आमचे राष्ट्रीकृत प्रकल्प ' पांढरे हत्ती ' झाले आहेत आणि मक्तेदारी कंपन्या लोकांची वंचना करीत आहेत.

## परदेशांतील हिंदी भाई

मी पाहिलेले सर्व लोक चांगल्या नोकऱ्या धंदे करून सुस्थितीत राहात आहेत. तेथे गुणाची पारख असल्यामुळे तेथे शिक्षण घेऊन स्थायिक झालेले उच्चपदी मानानं राहात आहेत. मनोहर आपटे ह्यांनी काही विशेष कामगिरी केल्यावरून त्यांना फार वरची जागा देण्यात आली व ते ज्यांच्या हाताखाली काम करीत होते त्यांना आता ह्यांच्या हाताखाली काम करावं लागतं, पण त्यात त्यांना कमीपणा वाटत नाही. सुभाष करमरकर हे अमेरिकेच्या मिलिटरीच्या अति गुप्त विभागात तज्ज्ञ म्हणून काम करतात, हे सांगून खरं वाटणार नाही. डॉक्टरांच्या खालोखाल इंजिनियर जम बसवून आहेत. शिक्षण संस्थेतून अनेक हिंदी प्राध्यापक नांव कमवून आहेत. भारतीय मंडळी एकमेकांशी संपर्क ठेवून भारतीय संस्कृती जतन करण्याची पराकाष्ठा करताना आपल्या मुलांवर सातत्यानं भारतीय संस्कार घडविण्याची धडपड करतात. अमेरिकेपेक्षा इंग्लंडमध्ये आपली मराठी मंडळी जास्त जवळच्या नात्यानं राहतात. त्यांची महाराष्ट्र मंडळं आहेत. परंतु मंडळाची स्वतःची अशी वास्तू मात्र कोठेच नाही ह्याचं नवल वाटतं.

त्यांच्या वयात आलेल्या मुलांचा प्रश्न आज त्यांना भेडसावीत आहे.

कमशिक्षित अथवा अशिक्षित मजूर ह्यांनी मात्र, विशेषतः इंग्लंडमध्ये, आपणास खाली मान घालावयास लावले आहे.

## लोकशाही आणि त्याचं स्वरुप आणि मुक्त पत्रकारिता –

इंग्लंड ही लोकशाही राज्य पद्धतीची जननी मानली जाते. पण तेथे राज्य करणारे कोणी आहेत का ? राज्य शकटाला कोणी सारथी आहे का ? का, राज्य व्यवस्था ही चीजच नाही ? माझ्या २१ दिवसांच्या वास्तव्यात मला एकदाही लंडनमध्ये कॅलॅहॅम का कोण तो मुख्य प्रधान त्याचं नांव ऐकावयास आलं नाही. म्हणून १० डाऊनीग स्ट्रीटवर त्याच्या निवास स्थानी गेलो तेथेही सामसूम. कोणी हटकलं नाही की कोणी धावत आला नाही. आम्ही खुशाल त्याच्या दरवाज्याच्या पाटीला पाठ लावून फोटो काढले. तेथल्या एकुलत्या एक पोलिसाबरोबर आमच्या मुलांनी हस्तांदोलन केलं आणि आम्ही निराश होऊन निघालो. दररोज मी बसनं जा ये करीत होतो परंतु रस्ता तास तास आधीपासून रोखून पंतप्रधानांची गाडी गेली आहे आणि त्यामागून पाच पन्नास बाजार बुणगे गाड्या उडवीत गेले आहेत हे दृश्य नाही. सरळ आपला लाल दिवा दिसला की थांबणारा हा कसला पंत-प्रधान ? थॅचर बाईचं तर कधी नांवही छापून येत नाही. घरी आल्यावर स्वयं-

पाकही ती स्वतःच करते आणि नवरोजींना वाढते. तिचे कपडे देखील जिन्या-जवळच्या चिचोळ्या जागेत ठेवलेले असतात म्हणे ! जिराल्ड फोर्ड कधीकधी टी. व्ही, वर दिसावयाचा पण तोंड वासलेल्या जिमी कार्टरच्या समवेत गंभीर चेहऱ्यानं उत्तर देणारा. पुढं जिमी कार्टर निवडून आला आणि आता त्याचा पराभव करून रेगन प्रेसिडेन्ट झाला. पण कधीही 'लोक कल्याण' कामात दर्शन नाही. कधी उद्घाटन समारंभात भाषण करताना, कधी सुरेखशा चांदीच्या कात्रीनं जलसंचन प्रकल्पाचं, अथवा पुलाचं, एकाद्या इमारतीचा 'शिलान्यास' बसविण्याचं, किमानपक्षी, एकाद्या प्रदर्शनाचं नाहीतर परिसंवादाचं उद्घाटन करून चार गोड शब्द बोलून थोडं बोधामृत पाजण्यात ह्यांना एवढं जड का जातं ? का करदात्याच्या, पैशातून नेमून दिलेल्या पैशात एकादा पूल, भूयारी मार्ग उभा राहिला तर ते त्यांचं कामच आहे, त्यात दिवे ओवाळून घेण्यासारखं काय आहे असं तर त्यांना वाटत नाही ? चांगल्या एकशे एक सुवासिनींकडून ओवाळून घेऊन वाजत गाजत एकाद्या उद्घाटनाला येण्यात काय मौज आहे ती ह्यांना कधी कळणार ? रोषणाई, वाजंत्री बॅंडबाजांचा खर्च त्यांना परवडत नसेल तरी काहीतरी निमित्त काढून कोणाची पुण्यतिथी, कोणाचं बारसं यथासांग साजरं करून 'दोन शब्द' बोलून आपलं तोंड दाखवावयास काय हरकत आहे ? का हे लुच्चे टी. व्ही. वाले त्यांना 'कव्हरेज' देत नाहीत ? रेडियो टी. व्ही स्वायत्त संस्था आहेत ना ! त्यांना मुक्त रान दिलं आहे त्याचा त्यांनी असा गैरफायदा घ्यावा ना ! पेपरवाल्यांनी 'निक्सन' ला जिवंत भाजून खाल्ला. आता ते फोर्डवर मनमुराद तोंडसुख घेत आहेत. त्याचीही काही कुलंगडी बाहेर काढत आहेत. मागच्या निवडणुकीत केला असेल त्यानं बेसुमार खर्च, केली असेल त्याला काही मतलबी कंपन्यांनी मदत, म्हणून ते आताच बाहेर काढण्याची काय जरुरी ? आणि कोर्ट तरी किती 'देशद्रोही'. तीही त्यांच्याच पाठपुरावा करतात. जिराल्डफोर्ड एका फटक्यासरशी हा सगळा तमाशा बंद का करीत नाही ? ह्या 'देशद्रोह्यां' ना तुरुंगात का डांबून टाकीत नाही. एवढा भेकड कसा हा ! इंग्लंडचा पंतप्रधान तर आपल्या पार्टीचं सरकार सावरण्यातच मशगुल. पण एवढी निसरडी 'मेजॉरिटी' असावीच का ? चांगले तीनचतुर्थांश लोक निवडून आणता येत नाहीत त्यांना ? मनात आणलं की पार्लमेंट मध्ये हात वर, कायदा पास ! उगाचच्या उगाच रात्र रात्र पार्लमेंटमध्ये वादविवाद करीत बसून नसता वेळ दवडतात ह्याला काय म्हणावं ? लोकांचा पैसा फुकट जात नाही का ? पण नाही. दोन पैशांनी पावाची किंमत वाढविल्यावर लोकांनी कोण गहजब केला. शेवटी त्याला येत्या हिवाळ्यात हिटरमुळे विजेचा वापर जास्त होईल त्यावरील ड्युटी कमी करतो सांगावं लागलं तेव्हा कोठे त्याची सुटका झाली. इलेक्शनच्या वेळी, ऐन दिवाळीच्या वेळी भाव वाढीकडे दुर्लक्ष केल्यानं हवा तेवढा पैसा मिळू शकतो ही 'युगत' कार्टर, रेगन, थॅचरबाई तुम्ही

कधी शिकणार ? टी. व्ही. वाले तर एवढे माजोरी झाले आहेत की परवा जिमी कार्टर व फोर्डमध्ये प्रश्नांची जुगलबंदी (Debate) झाली, त्यावेळी फोर्डनं ह्या टी. व्ही. वाल्यांना सांगितलं होतं 'कॅमेरे प्रेक्षकांवर केन्द्रीत करू नका' त्यावर टी. व्ही. वाल्यांनी तेथल्या तेथे त्याला ठणकावलं 'उडत गेलास तू' आम्ही ह्या जुगलबंदीवर बहिष्कार घालू. तू कोण आम्हांला हुकूम करणारा ?' बोला, अमेरिकेच्या अध्यक्षासमोर असं उद्धट बोलवितं तरी कसं ! पण अशी आहे टी. व्ही. रेडियो ही प्रसिद्धी यंत्रणा, मुक्त, स्वतंत्र !! परवाच्या पाच आठवड्यांच्या वास्तव्यात एकदाही रेगन साहेबांचं नाव टी. व्ही. नं घेतलं नाही मग त्याचं दर्शन तर दूरच !

म्हणून मला पुन्हा पुन्हा वाटतं की इंग्लंड अमेरिकेत राज्यव्यवस्थाच नाही. कोणी तरी अनामिक शक्ती पडद्यामागून सूत्रे हलवित असते आणि बंदोबस्त सुरळीत चालवीत असते. शासनकर्तेच नसल्यावर लोकशाही, लोकशाहीचा डांगोरा कोण पिटणार, सामाजिक न्याय असलेलं निधर्मी, समाजवादी लोकशाही गणतंत्र म्हणून नगारे ढोल बडवून जगाला पुन्हा पुन्हा कोण सांगणार ? शासनकर्ते गायब तर उद्घाटनं, प्रदर्शनं, परिसंवाद कोणासाठी भरवायचे आणि कोण त्याची दखल घेणार ? रेडिओ, टी. व्ही. ला हवामानाचं अचूक भविष्य वर्तवणे आणि अधून-मधून देशी परदेशी सनसनाटी घटना दाखविणं, खेळाची वर्णनं आणि विज्ञानाची माहिती सांगणं येवढंच चिल्लर काम रहातं. अनवर सादतवर गोळ्या घातल्या ४ वाजता आणि लगेच ६ च्या बातम्यात बी. बी. सी नं त्याचा सचित्र चित्रपट दाखविला. ७ वाजता रेगन, मोशे दायन, थॅचरबाई यांच्या प्रत्यक्ष मुलाखती टी. व्ही. वर ऐकल्या, पाहिल्या !

अशी आहे इंग्लड अमेरिकेची लोकशाही. त्याची महत्ता तुम्हा आम्हाला काय हो ! प्रतिष्ठान फेम अंतुले महाशयांची मनमानी चव्हाट्यावर आणण्यात आमच्या पत्रकारितेनं दाखविलेली जागरुकता आणि न्यायदेवतेने निर्भीडपणे दाखविलेली न्यायाची बूज हे 'रुपेरी कण', खचत चाललेल्या भारतीय लोकशाहीला गर्तेतून वर काढतील का ह्या यक्ष प्रश्नाचे उत्तर अजून दूरच आहे.

●

# परिशिष्ट

## परदेशातून काय आणता येते–काय आणता येत नाही.

परदेशी प्रवास करणाराला एक प्रश्न नेहमी त्रस्त करीत असतो, तो म्हणजे ड्युटी न पडता कोणत्या वस्तू मायदेशी आणता येतील हा. कस्टमच्या कायद्याचं ज्ञान सामान्य माणसाला नसतं, त्यामुळे परदेशात गेल्यावर तेथे मिळणाऱ्या अत्याधुनिक वस्तू विकत घेण्याचा मोह त्याला आवरता येत नाही व तेथे आल्यावर विमानतळावर तो कस्टमच्या तावडीत सापडतो आणि बेसुमार ड्युटी भरतो व स्वस्तात विकत घेतलेली तीच वस्तू त्याला शेवटी फार महागात पडते. कित्येकदा एकादी वस्तू जप्त केली जाते, कारण, ती परदेशातून आयात करण्यास बंदी असते. परदेश प्रवासाचा आनंद व केलेला खर्च वाया जाऊ नये व विमानतळावरून बाहेर पडेपर्यंत मनावर दडपण येऊ नये असं वाटत असेल तर कस्टमच्या कायद्याचं ज्ञान असणं आवश्यक आहे.

परदेशात निर्धास्त खरेदी करता यावी व बिनदिक्कत कस्टमच्या कक्षेतून बाहेर पडता यावे म्हणून प्रवाशांना अत्यंत उपयुक्त अशी माहिती देत आहे. परदेशात खरेदी करतांना ही यादी जवळ बाळगल्यास आपणास काय आणावे आणि काय आणू नये ह्यासंबंधी संभ्रम व भीती राहणार नाही.

प्रथम आपण आपला देश सोडण्यापूर्वी आपल्या जवळील मौल्यवान वस्तू, कस्टम अधिकाऱ्याला दाखवून त्याचे कडून 'निर्यात पावती' घ्यावी. भारी मौल्यवान दागिने शक्यतो नेऊ नयेत. नेल्यास रिझर्वबँकेचे अनुमती पत्र घ्यावे. म्हणजे परत आणताना कोणताही त्रास होत नाही. व त्यावर ड्युटी पडणार नाही.

## कोणत्या वस्तू ड्यूटीशिवाय आणता येतात ?

### ड्युटी फ्री अलावन्स मध्ये खालील वस्तू आणता येतात.

१) 'व्यक्तिगत वस्तू' ('Personal Effects') नवे अथवा जुने कपडे. परदेश प्रवास करण्यास लागणाऱ्या सर्व नव्या अथवा जुन्या वस्तू परदेशात घेतलेल्या असल्या तरी. मात्र त्या स्वतःला प्रवासात लागणाऱ्या हव्यात. येथे आणून धंदा करण्याकरता नव्हे.

२) रु. ५००।– पर्यंत एक मनगटी घड्याळ, शिवाय रु. १०००।– पर्यंत कोणत्याही लहान मोठ्या वस्तू.

बारा वर्षा आतील मुलास रु.२५०।– पर्यंत व्यक्तीगत वस्तू आणता येतात–

### मात्र ह्यात खालील वस्तूंचा समावेश असता कामा नये.

१) एअर कंडिशनर २) रेफ्रिजरेटर ३) डीप फ्रीजर ४) कुकींग रेंज ५) धुलाईचे यंत्र ६) मोटार सायकल, स्कूटर, मोपेडस् ७) टी. व्ही. ८) टेप रेकॉर्डर, रेकॉर्ड प्लेअर, ॲम्प्लिफायर, मुव्ही कॅमेरा, प्रोजेक्टर अथवा अन्य इलेक्ट्रॉनिक वस्तू.

३) कॅसेट टेपरेकॉर्डर किंवा ट्रान्झिस्टर आणता येतो परंतु 'टू इन वन' आणता येत नाही.

४) २०० सिगारेट अथवा ५० चिरूट किंवा २०० ग्रॅम तंबाखू.

५) ०.९५ लिटर म्हणजे एक बाटली स्कॉच व्हिस्की.

६) आपण एक वर्षाहून अधिक परदेशात राहिला असल्यास पुरुषास रु. १५०० पर्यत व स्त्रीस रु. ३०००।– पर्यंत ज्युवेलरी आणता येते. ही वरील वस्तू सोडून अतिरिक्त आहे.

### ड्यूटी भरून आणावयाच्या वस्तू

अ) वरील सर्व ड्युटीमाफ आणता येणाऱ्या वस्तूंखेरीज खालील वस्तू ड्यूटी भरून आणता येतात. रु. २०००।– पर्यंतच्या वस्तूवर १५५ टक्के ड्युटी पडेल.

ब) रु. २०००।– पेक्षा जास्त असलेल्या वस्तूंवर ३२५ टक्के ड्युटी पडेल.

मात्र खालील सात वस्तूंवर सरसकट ३२५ टक्के ड्युटी पडेल. म्हणजे रु. २०००।– पर्यंतची सवलत सदर वस्तूंना लागू नाही.

१) एअर कंडिशनर २) रेफ्रिजरेटर किंवा डीप फ्रीजर ३) टी. व्ही. सेट ४) सिगरेट, सिगार, तंबाखू, ड्युटीमाफ असलेल्या पेक्षा जास्त आणल्यास. ५) व्हिडियो कॅसेट रेकॉर्डिंग मशीन अथवा सुटे भाग ६) पिस्तुल, बंदुक वगैरे ७) रु. ५०० पेक्षा जास्त किंमतीचे कापड. म्हणजेच ३।४ साड्या, शर्ट, पँट, मुलांचे कपडे वगैरे आणता येतात. मात्र त्याची किंमत रु. ५००।– पेक्षा जास्त असता कामा नये.

सवलतीचे अथवा संपूर्ण मोफत प्रवास करण्याचे तिकिटावरही १० दिवसाहून अधिक प्रवास करणारास वरील सर्व ड्युटी फ्री सवलती मिळतात.

दहा दिवसांपेक्षा कमी वास्तव्य करणारास वरील बॅगेज सवलती न मिळता प्रतिदिन फक्त रु. १००।– प्रमाणे सवलत मिळते.

## व्यवसायानिमित्त तीन महिन्यांहून अधिक वास्तव्य करणारांसाठी

अ) वरील सर्व सवलतीशिवाय घरगुती सामान, कपडे वगैरेसाठी रु.१०००।– पर्यंत अतिरिक्त सवलत.

ब) रु. ५०००।– पर्यंत किंमतीची व्यवसायास उपयोगी पडणारी पोर्टेबल वस्तू, टाईपरायटर, वैद्यकीय अवजारे आपल्या व्यवसायाला लागणाऱ्या वस्तू. इत्यादी.

क) कुत्री, मांजरे, पक्षी वगैरे, मात्र त्यांचे ‘ हेल्थ सर्टिफिकेट’ जवळ पाहिजे.

## आपल्याबरोबर न आणलेले सामान

आपण स्वतंत्रपणे पाठविलेले सामान आंतरदेशीय विमानतळ, कस्टमपोर्ट अथवा शहरातील कस्टमपोस्ट ऑफिसमधून आणता येते.

बोटीने पाठविलेले सामान आपण आल्यापासून एक महिन्याचे आत व विमानाने १५ दिवसाचे आत येईल अशी दक्षता घ्यावी. जर विलंब होणार असेल तर कस्टम कलेक्टर यांचेकडून वेळ वाढवून घ्यावी.

आपल्याबरोबर न आणलेल्या सामानासंबंधी ‘ Landing Certificate ’ आपण कस्टमकक्षा सोडण्यापूर्वीच मागून घ्यावे. असे सर्टिफिकेट तावडतोब व विनामूल्य मिळते.

ह्याचा फायदा असा :–

अ) आपल्या ‘ ड्युटीफ्री अलावंस ’ मध्ये ह्या सामानाचा समावेश होईल.

ब) ड्युटी पडणाऱ्या वस्तुंवर रु. २०००।– पर्यंत सूट मिळून ड्युटी जास्तीत जास्त १५५ टक्के पडेल.

क) इतर मिळणाऱ्या सर्व सवलतीची पात्रता.

## गिफ्ट पार्सलस्

रु. ८०।– पर्यंत खाण्याचे पदार्थ अथवा औषधे ड्युटीफ्री. इतर कोणतीही वस्तू रु. ४० पर्यंत. रु. ५००।– पर्यंत भेटवस्तूवर मूळ किमतीवर १२५ टक्के ड्युटी.

रु. ५००।– चे वरील वस्तू आयात करण्यास 'आयात परवान्या' ची जरुरी आहे.

भेटवस्तू मुंबईच्या बलार्ड इस्टेट मधील फॉरिन पोस्ट ऑफिसमधून पाठविता येतात अथवा बाहेरहून आलेल्या वस्तू सोडवून घेता येतात. येथे कस्टम अधिकारी पार्सलची पहाणी करतात व नंतर पोस्टामार्फत पाठविली जातात अथवा स्वतः जाऊन आणता येतात.

## भारतीय विमानतळावरील कस्टम संबंधी यंत्रणा

कस्टमची तपासणी सोपी व प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणून कस्टमच्या दोन कक्षा आहेत. एक 'ग्रीन' व दुसरी 'रेड.' आपला विमानतळ जवळ येण्या-पूर्वी सुमारे एक तास आधी विमानात आपणास एक फॉर्म देण्यात येतो. त्यात आपले संपूर्ण नांव, पत्ता, पासपोर्ट नंबर वगैरे माहिती बरोबर आपण आणीत असलेल्या वस्तू संबंधी माहिती भरून द्यावयाची असते. तुम्ही जर ड्युटी फ्री वस्तू आणल्या असल्या तर 'Nothing To Declare' असे लिहा. जर ड्युटी पडणार असेल तर त्या वस्तूंची यादी विगतवार लिहा व तो फॉर्म सही करून आपल्या पासपोर्टमध्ये ठेवा.

विमानतळावर उतरल्यावर जर आपण 'Nothing To Declare' असे लिहिले असेल तर कस्टमकक्षेत 'ग्रीन चॅनेल' मध्ये रांग धरा. आपण काहीही ड्युटी पडेल असे आणलेले नाही असे समजून कस्टम अधिकारी आपणास जुजबी प्रश्न विचारून आपल्या बॅगा न उघडताच बाहेर जाऊ देईल. सामान्यतः दूर पर-देशी गेलेला प्रवासी आपल्या नातलगांकरता कमी अधिक प्रमाणात भेटवस्तू आणीत असतो. मग त्या वरील यादीपेक्षा थोड्या जास्त असल्या तरी कस्टम अधिकारी सहसा अडवीत नाही, जर त्याची खात्री असेल की आपण त्या वस्तू

काही बाहेर विकण्याकरता आणलेल्या नाहीत. कस्टम अधिकारी एवढा समंजसपणा जरूर दाखवितात असा अनुभव आहे. मात्र त्यांना वाटल्यास व संशय आल्यास बॅगा उघडून सर्व सामान तपासले जाईल. व त्यात जर ड्युटी असलेल्या वस्तू आढळल्या तर आपणास ड्युटी तर भरावी लागेलच पण दंडही होईल. एकादी भारी ' Smuggled ' वस्तू असेल तर खैर नाही. कैदही होऊ शकते व मालही जप्त होतो.

' रेड चॅनेल ' मधून जाणाऱ्या उतारुंच्या सामानाची संपूर्ण तपासणी होते व कस्टमचे अधिकारी मूळ किमतीपेक्षाही जास्त किंमत धरून आकारणी करतात. त्यांना बहुतेक सर्व परदेशी वस्तूंच्या किमती माहित असतात व त्यांना फसविता येणं कठीण असतं.

म्हणून आपण वस्तू खरेदी करतानाच विचारपूर्वक खरेदी करावी व प्रामाणिकपणे त्याप्रमाणे जाहीर करावी म्हणजे निर्धास्त मनानं आपण आपला प्रवास पूर्ण केल्याच्या आनंदात आपल्या घरी परत याल.

REFBK-0023511

REFBK-0023511

६२८
23499